# मराठीमातीचे वैभव

१८



18

Y.C.P

M923.60954/SUR

018940

LIBRARY

# कृतज्ञता

महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्यावर एखादे पुस्तक संपादित करावे, अशी मूळ कल्पना माझे मित्र व सुप्रसिद्ध कवी वा. ह. कल्याणकर यांनी मांडली. त्या दृष्टीने मी महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांना पत्रे लिहिली. त्यांनी प्रतिसाद दिला व हा ग्रंथ आकाराला आला. थोर समाजवादी नेते व महाराष्ट्र-भूषण कै. एस्. एम्. जोशी यांनी स्वतःला कॅन्सर झालेला असताना-सुद्धा यशवंतरावांवरील प्रेमापोटी लेख दिला. त्यांची कृतज्ञता कोणत्या शब्दाने व्यक्त करावी ? कै. अण्णांनी माझ्यासारख्या असंख्य अनोळखी व्यक्तींवर निरनिराळ्या मार्गाने उपकार केले आहेत. नांदेडच्या यशवंतराव महाविद्यालयाचे उपप्राचार्य भुजंगराव वाडीवर, ख्यातनाम समीक्षक, गीतकार व आघाडीवर तळपत असलेले कवी प्रा. फ. मु. शिंदे यांनी वेळोवेळी सूचना व मोलाचे मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो. आमच्या महाविद्यालयाचे लिपिक श्री. शंकर विधाते व विद्यार्थी नागोराव जोंधळे यांनी लेखाचे उत्तम टायपिंग केले. त्यामुळे मला हे पुस्तक प्रेसकडे निर्धोकपणे देता आले. या पुस्तकाचे मुखपृष्ठ व आतील समर्पक चित्रे सुप्रसिद्ध चित्रकार व कवी श्री. भ. मा. परसवाळे यांनी समर्थपणे चितारली आहेत. हे अवघड काम आपले घरचे काम समजून त्यांनी अल्पावधीत पार पाडले. त्यांचे व माझे संबंध आभार मानण्यापलीकडचे आहेत.

माझे एक स्नेही व निकटवर्ती डॉ. प्रा. प्रल्हादराव डावळे यांनी पुस्तक पूर्ण करण्यासाठी गेल्या दीड वर्षापासून सतत आग्रह धरला होता व सौंदर्यदृष्टी असलेले सुप्रसिद्ध कवी व लेखक आमचे प्रकाशकमित्र प्रा. भगवंत क्षीरसागर यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्याचे मान्य केल्यामुळे ' मराठी मातीचे वैभव ' वाचकांच्या हाती देता आले. या सर्वांची कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. शेवटी या पुस्तकात आपले लेख समाविष्ट करण्यासाठी अनुमती दिल्याबद्दल सर्व मान्यवर लेखकांचा मी आभारी आहे.

या पुस्तकाच्या सुबक छपाईबद्दल कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर व त्यांच्या सर्व कामगारवर्गाचे मी मनापासून आभार मानतो.

धर्माबाद
जि. नांदेड ४३१८०९

प्रा. उत्तम दिपाजी सूर्यवंशी

# यशवंतराव चव्हाण

फ. मु. शिंदे

सावलीच्या स्पर्शानं
वृक्ष मनात
उतरावा
उन्मळू नये कधीच
तसाच तो राहावा
तुम्ही गेल्यानंतर
खेडयातल्या हृदयातील
डहाळ्यांच्या पानोपानी
तशीच
लहर शहारून गेली
कोरलेली प्रतिमा
जवळ अधिकच आली !

खोट्या जवळिकेतला
खरा दुरावा
लपत नाही

अतृप्त आत्म्यांना
चांगुलपणाही खपत नाही
        यशवंतराव गेले ...
        कशासाठी एवढा
        त्यांचा आता उदोउदो ...
वेटोळ्यात शंखाशिंपले
        वाळगणारे
नाग फुत्कारले
आणि भेगाळ जमिनीलाही
        दुष्काळातल्या
कीव आली
आठवणीतल्या भिजलेपणाच्या
गहिवरानं
        गरळही पचवली.
फेट्या पागोट्यातल्या
        पटक्यातल्या
मुंडाशातल्या माणसाला
फुत्कारातला डाव
        कळत नाही
काळसाकडं गोरेपणा
        वळत नाही

रानावनानं शेतानं
        तुम्ही झुळझुळला
अक्षराच्या ओढीनं
पायातला वाळा
पाळण्यात खुळखुळला
तिथला मुलूख
बांधून पदरात सुख

नाही आठवणार
असं कधी होईल का ?

हिमालयाच्या हाकेसरशी
सह्याद्री सरसावला
कृष्णेच्या डोळ्यातले तेव्हाचे
तेजतरंग
कोयनेच्या संगमात आजही उसळतात
देश प्रदेश अखंड मिसळतात
तिथं का नसता तुम्ही ?

कोणत्याच नकाशात
जमीन मात्र नसते.
माणसाशिवाय मन
धावत नसते
वाटा विसरणारा वाटसरू
भोक्ता असतो
दगडाचा
रमून शिल्पात तुम्ही
आकार गोंजारले
म्हणून तरी
उद्ध्वस्त का होईना
गाव आहे
खंगून गेलेल्या माणसाला
सांगण्यापुरते
नाव आहे
त्या सर्वांनी
आटलेल्या अश्रूंत तुम्हालाही ठेवलं !

शांत शीतल स्वरांची
आवड
वेणूच्या प्रसन्नतेत
बहरताना
कृष्णेचा काठ काळजातून
निसटला नाही
जोडणारा धागा
ओढणारं नातं
एकच सर्वांसाठी
कित्येकांच्या अशा
किती तरी गाठीभेटी !

तुडुंब नद्या भेटल्या
थोपवलेले जलाशय
भेटले
वाट काढून वाहणारे
कालवे भेटले
तृप्त मातीची कृतज्ञता
गाणारी हिरवी
शेतं भेटली
या साऱ्यांचा कधीच
दुस्वास न करणारे
कोरडे नाले भेटले
आसपासच्या कंठातली
तहान भेटली
अवर्षणातला
दुष्काळ भेटला
माणूसच माणसाचा
काळ भेटला

टाहोची किंचाळी भरलेला
नाळ भेटला
भेगातून डोकं खुपसून
निपचित पडलेला
नांगराचा फाळ भेटला
एका डोळ्यात
स्वप्न
आणि दुसऱ्यात
सल
घेऊन चालतानाची हर्षव्यथा
सांभाळली ती कशी ?

तुम्हाला
कुंपणावर बसवले
त्यांनी
क्षणभर हसवले
मनभर फसवले

कोण कुणाचा
काय लागतो
तितकाच तो
तिथं जगतो
इथल्या माणसांचा
वास केव्हा येईल
सांगता येत नाही
कळपाच्या अंगणाशिवाय
त्यांना रांगता येत नाही

भोगले नाही

## चुकांचे शाप

असा कोण आहे
आला नाही
वाट्यास विलाप
असा कोण आहे ?

सोसल्या भोगल्यातून
घडले
त्यांनीच युगांचे बंद
दरवाजे उघडले

त्यातून आज
जाता येतं
विशाल काही
घेता येतं

तुम्ही त्यांतलेच
जे जे देऊन गेले
पहाटेच्या प्रकाशात
क्षितिज ठेवून गेले !

# २

# आदर्शांच्या प्रकाशात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व

## तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

भारताच्या लोकशाही क्रांतीचा महिमा ज्यांच्या जीवनाने चांगला ध्यानात भरेल अशा अनेक व्यक्ती आधुनिक भारताच्या राष्ट्रीय जीवनात चमकून गेल्या; त्यांपैकीच यशवंतराव चव्हाण ही व्यक्ती होय. अशा काही थोड्याच व्यक्ती झाल्या आहेत की, ज्यांच्या जीवनात भारताच्या वर्तमान युगाचा गर्भितार्थ अधिक खोलपणे सूचित होतो; या युगाच्या प्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरे आणि महत्त्वाच्या घडामोडी यांचा ध्वन्यर्थ ज्यांच्या जीवनात उमटलेला आहे अशा थोड्या व्यक्तींपैकीच यशवंतराव चव्हाण हे होत.

ब्रिटिशांच्या राज्यस्थापनेपासूनची भारताच्या इतिहासाची गेली २००–२५० वर्षे हे एक महत्त्वाचे युग आहे. पूर्वीच्या अनेक शतकांच्या आणि सहस्रकांच्या इतिहासापेक्षा हे युग संपूर्णपणे वेगळ्या ऐतिहासिक घटनांनी भरलेले युग आहे. म्हणून यास युगांतर म्हणता येते. अस्तित्व किंवा जीवन हे नित्य परिवर्तनशील असते. जग जगते म्हणजे नित्य बदलत राहते. जगाची ही परिवर्तनशीलता सामाजिक वा राष्ट्रीय जीवनात अधिक स्पष्ट होते. काही थोड्या कर्तृत्वशाली व्यक्तींमध्ये ही परिवर्तनशीलता उत्कट प्रमाणात अनुभवास येते. परंतु नुसती परिवर्तनशीलता म्हणजे इतिहास नव्हे. काही विशिष्ट उत्कट घटना, आणि तशा घटनांच्या मालिका, इतिहास या संज्ञेस प्राप्त होतात. बऱ्याचशा घटना

काळाच्या पोटात गडप होतात, भूतकाळाच्या अंधारात त्यांचा मागमूसही राहात नाही. कारण त्यांना ऐतिहासिक महत्त्व नसते. विशेषत: समाजात किंवा राष्ट्रात गुणात्मक, अर्थपूर्ण वैशिष्ट्ययुक्त होणारी घडामोड म्हणजेच इतिहास होय. इतिहास घडतो तेव्हा काही तोडमोडही अपरिहार्यपणे होते. विकास घडविला जातो म्हणजे परंपरा मोडावीच लागते. इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण अशा घडामोडीच्या नव्या घटनांची मालिका म्हणजे युगांतर होय. सामाजिक वा राष्ट्रीय जीवनात नेहमीच काहीतरी अत्यंत मूलगामी समस्या निर्माण झालेल्या असतात. जेव्हा अशा समस्या सोडविण्याचा प्रयत्न शिथिल होतो, मंद होतो, त्या समस्यांमध्ये सामाजिक जीवन कुंठित होऊन अगतिक व सुस्त बनते, तेव्हा त्यास अंधारयुग म्हणतात. भारताचा भूतकाळ पाहिला तर अशा कुंठित अवस्थेत अनेक युगे निघून गेली. रवींद्रनाथ ठाकूर यांनी म्हटल्याप्रमाणे निर्विकल्प योगसमाधीत गढलेला अस्थिपंजरावशेष असा हा भारत देश बनला होता. या योग्याच्या चिरनिद्रेचा भंग नवयौवन-संपन्न अशा पश्चिमी संस्कृतीच्या गोऱ्या, बूट घातलेल्या पुरुषाने एका लाथेच्या तडाख्याने केला. कठीण समस्यांचे पहाड डोळे उघडल्याबरोबर एकदम या योग्याला दिसले. त्या समस्यांचे आव्हान स्वीकारले. मुकाबला सुरू झाला. इतिहास घडू लागला. खुरटलेले अनेक दुर्धर मानसिक व्याधींनी जर्जर झालेले राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दुरवस्थेचे विषादकारक आणि निराशाजनक चित्र ग्रामीण जीवनाचे होते. इतिहास घडत नव्हता म्हणून विकासाचा स्पर्श कोठेही नव्हता. अशाच ग्रामीण जीवनात ब्रिटिश पारतंत्र्याच्या उत्तरार्धात किंवा अखेरच्या अर्धशतकात यशवंतराव चव्हाण यांचा सातारा जिल्ह्यातील एका खेड्यात देवराष्ट्रे या लहानशा गावात एका गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्म झाला.

समस्यांचे आव्हान स्वीकारणे व त्या समस्या सोडविणे यांचा अव्याहत क्रम यशवंतरावांच्या आयुष्यक्रमात दिसतो. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव आणि मातुश्री विठाबाई. यशवंतरावांच्या जन्माच्या वेळी विठाबाईंची सुटका लवकर झाली नाही. आमचा कयास असा की, सुटका लवकर न होण्याचे कारण या बालकाचे डोके मोठे होते. या धोक्यातून योगायोगाने सुटका झाली. डोके मोठे असल्यामुळेच अखेरची ५-६ वर्षे सोडली तर विलक्षण कठीण समस्यांचा मुकाबला यशवंतराव करू शकले. ब्रिटिशांच्या द्वारे भारतात जवळ जवळ १५०

वर्षे बीजारोपण झालेली आणि पसरत असलेली आधुनिक संस्कृती भारताच्या शहराच्या मर्यादा ओलांडून कोठेही फारशी गेली नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात अलीकडे ग्रामीण भारताला ती स्पर्श करू लागली आहे. यशवंतरावांचे जन्मगाव या आधुनिक नागरी संस्कृतीपासून त्या वेळी म्हणजे ७० वर्षांपूर्वी अगदी दुरावलेले होते. यशवंतरावांचे पिताजी बळवंतराव यांचे प्राथमिक शिक्षण जेमतेम झाले होते. पण नशीब काढायची अनिवार इच्छा झाली. देवराष्ट्र्याची सीमा उल्लंघून कऱ्हाड येथे बेलिफाची नोकरी पत्करली. अजूनही अगणित ग्रामीण व्यक्तींना खेडे सोडून शहरात पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याकरता जावे लागते, तरी नागरी संस्कृतीपासून वंचितच राहावे लागते. याला काही अपवाद सापडतात. चव्हाणांचे कुटुंब असा हा क्वचित सापडणारा अपवाद होय. आधुनिक संस्कृतीचा उदार वरदहस्त प्राप्त झाला म्हणजे जीवन-विकासाच्या वाटा दिसू लागतात. कित्येकांची दृष्टी त्यामुळे क्रांतदर्शीही बनते. याचे महाराष्ट्रातील अत्यंत अपवादभूत उदाहरण म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांचे होय. या आंबेडकरांच्या उदाहरणाशी कोणाचीच तुलना होऊ शकत नाही, इतके ते आश्चर्यकारक उदाहरण आहे. आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा लाभ यशवंतरावांना त्यांच्या वडीलबंधूंच्या कै. गणपतरावांच्या आधुनिक जीवनदृष्टीमुळे झाला हे मात्र योगायोगाने घडले नाही. गणपतराव जोतीराव फुल्यांनी स्थापिलेल्या व ब्राह्मणेतर चळवळीत -रूपांतरित झालेल्या सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. नव्या इंग्रजी शिक्षणाचे रहस्य त्यांना उमगले होते. मोठा सामाजिक परिवर्तनाचा आदेश सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने महाराष्ट्राच्या ग्रामीण जगात दुमदुमू लागला होता. पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये या प्रचाराला प्रखर स्वरूप प्राप्त झाले होते. गरीब अशा ब्राह्मणेतर मराठा, कुणबी, माळी इ. सामाजिक स्तरामध्ये सत्यशोधक समाजाच्या विचाराचे स्वागत मनमोकळेपणे होत होते. परंतु त्या वेळच्या ब्राह्मण, वाणी आणि इतर उदिम व्यापारी वर्ग हा या चळवळीपासून अलिप्त होता. या चळवळीच्या कार्यक्रमात प्रचाराचे दणदणीत साधन म्हणून तमाशाही अंतर्भूत केला होता. ह्या तमाशाची गंमत मात्र पांढरपेशा समाजातील मंडळी तटस्थपणे पाहात होती.

यशवंतराव कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होते. शिक्षकांना पसंत पडणाऱ्या विद्यार्थी मंडळींत चमकत होते. टिळक हायस्कूलची त्या वेळची शिक्षक

मंडळी ही एक प्रकारची ध्येयवादी मंडळी होती. ठरलेला अभ्यासक्रम शिकवून विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त संख्येने उत्तीर्ण केले म्हणजे झाले, एवढाच शिक्षणोद्देश त्यांच्या पुढे नव्हता. त्या वेळी सर्वत्र भारत राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनांनी भारला जात होता. टिळकयुग नुकतेच संपले होते. म. गांधींच्या नेतृत्वाखाली परकीय स्वातंत्र्याविरुद्ध जी तीन मोठी देशव्यापी वादळे १०–१२ वर्षांच्या अंतराने निर्माण झाली; त्यांतील पहिले वादळ नुकतेच शमले होते. हे पहिले वादळ असहकारितेचे. ते १९२३–२४ च्या सुमारास शांत झाले होते. परंतु सगळा पांढरपेशा समाज राष्ट्रीय भावनांनी भारला गेला. अशा राष्ट्रीय भावनांनी भारलेले शिक्षण टिळक हायस्कूलमध्ये शिकवीत होते. या भावनांनी लहानमोठ्या नगरांना वेढून ग्रामीण भागामध्येसुद्धा खोल प्रवेश केला होता. त्यामुळे विचारांचे दोन प्रवाह एकमेकांना छेद देऊ लागले. सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळ ही यशवंतरावांच्या भाषेत सांगायचे म्हणजे मध्ययुगीन सरंजामदारी प्रवृत्तीच्या वर्गांनी उचलून धरली होती. ही मंडळी राजनिष्ठ होती. या राजनिष्ठ सरंजामदारांपासून बहुजनसमाजाला फोडून वेगळे करण्याचे काम या म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या राजकीय आंदोलनाने केले. वैचारिक द्वंद्वे, संघर्ष यांचे पडसाद वारंवार उमटत होते. या राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयवादी क्षोभामध्ये भगतसिंगसारख्या सशस्त्र क्रांतिवाद्यांनी भावनेची आग निर्माण केली. जतींद्रनाथ दास या सशस्त्र क्रांतिकारकाने कारागृहामध्ये आमरण उपवास अनेक आठवडे, ६२ दिवस चालविला, व त्यातच आत्मार्पण केले. याचा विलक्षण परिणाम देशाच्या तरुण पिढीवर झाला. जतींद्राच्या अन्नत्यागाच्या बातम्या रोज यायच्या. ते क्षीण होत गेले. त्यांची शुद्ध गेली. त्यांचा जीवात्मा राष्ट्राच्या आत्म्यामध्ये विसर्जन पावला. हे सगळे रोज वाचत असता यशवंतराव रात्रंदिवस दुःखाने आणि संतापाने अस्वस्थ होत होते. जतींद्रांच्या आत्माहुतीची वार्ता वाचल्याबरोबर घरातलेच अत्यंत जिव्हाळ्याचे कोणीतरी दगावले अशा भावनेने ओक्साबोक्शी रडू लागले. अनेक दिवस त्यांचे नेत्राश्रू ओघळत होते. यशवंतराव म्हणतात, "जतींद्राच्या देहातील राष्ट्रीय स्वातंत्र्याचे प्रखर वलय माझे अंतःकरण छेदून गेले." भारतीय स्वातंत्र्याच्या कॉंग्रेसच्या आंदोलनात संपूर्णपणे माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असताच वयाच्या १६ व्या वर्षी ते सामील झाले.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एका निराळ्या पर्वाची ही घटना सूचक ठरली. सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर चळवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत विलीन झाल्याची ही घटना सूचक होय. टिळक हायस्कूलमध्ये यशवंतराव वक्तृत्वही शिकले. वयाच्या १६ व्या वर्षी वक्तृत्व स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे रु. १५०/– बक्षीस यशवंतरावांनी मिळविले. त्याच सुमारास म्हणजे १९३० साली म. गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. ब्रिटिशांचे राज्य गरिबा-करिता नाही. गरिबांना जाचक असे कायदे ब्रिटिशांनी केले आहेत. ते कायदे मोडणे व मोडल्यावर झालेली शिक्षा शांतपणे भोगणे म्हणजे सविनय कायदेभंग. मीठ खासगी रीतीने परवाना घेतल्याशिवाय कोणी बनवू नये असा कायदा होता. म. गांधींच्या चळवळीच्या कार्यक्रमामध्ये हा कायदा मोडून कारागृहवास प्रतिकार न करता किंवा बचाव न करता पत्करायचा हा मुद्दा अंतर्भूत केलेला होता. हा कायदेभंग प्रतीकात्मक होता. ही चळवळ देशभर पसरली. गांधींनी दांडी नावाच्या समुद्रकाठच्या गावाकडे ८० सत्याग्रहींसह साबरमतीच्या तीरा-वरून पदयात्रा सुरू केली आणि तेथे मिठाचा कायदा मोडला. ह्या दांडी यात्रेची वार्ता रोज वृत्तपत्रांत प्रकाशित व्हायची. गावोगाव, शहरोशहरी मोर्चे आणि प्रचाराच्या सभा व्हायच्या. माध्यमिक शिक्षण घेत असतानाच या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाने यशवंतरावांना ओढून घेतले. यशवंतरावांच्या भाषेत बोलायचे म्हणजे अहमदाबादजवळील साबरमती नदीच्या तीरावरून दांडीमार्च सुरू झाला. त्याने उठलेल्या या वादळाने कृष्णाकाठ पुरा भारून गेला. या वादळाने भारताची सगळी शहरे आणि खेडी थरारू लागली. काँग्रेसचा झेंडा सगळीकडे फिरत आणि फडकत होता. अशा अहिंसक चळवळीमुळे एवढी दूरगामी शस्त्रास्त्रांनी समृद्ध असलेली ब्रिटिश सत्ता कशी पराभूत होणार अशा वस्तुवादी विचाराला त्या वेळच्या तरुण पिढीच्या मनामध्ये थारा मिळेनासा झाला. स्वराज्य मिळणारच असा अंतःप्रत्यय येत होता. याचे तपशीलवार विवेचन यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रातील 'वैचारिक आंदोलन' या प्रकरणात सम्यक्रीतीने केलेले वाचावयास मिळते. या चळवळीत एकंदरीत १९३३ पर्यंत १८ महिन्यांचा कारावास यशवंतरावांनी भोगला. या संदर्भात ते आपल्या एका लेखात म्हणतात, "१९३० साली मी राष्ट्रीय चळवळीत उतरलो त्या वेळी माझ्या मनात एक वैचारिक द्वंद्व निर्माण झाले. स्वातंत्र्य

चळवळीला सामाजिक व आर्थिक स्वरूपाची एक बाजू असावी असे मला नेहमी वाटे. त्या दृष्टीने एम.एन. रॉय यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर अधिक पकड करू शकला.'' या स्वातंत्र्याच्या आंदोलनात सामील झालेले यशवंतराव वयाने लहान होते, परंतु त्या मानाने त्यांची वैचारिक प्रौढता सहकाऱ्यांच्या मनावर प्रभाव गाजवीत होती. या वैचारिक प्रौढतेचा परिचय त्यांनी आत्मचरित्रात वर्णिलेल्या मसूर येथे भरवलेल्या सातारा जिल्हा राजकीय परिषदेच्या घटनेवरून चांगला होतो. या परिषदेचे कोल्हापूर संस्थानचे राजकीय नेते माधवराव बागल यांनी वैचारिक नेतृत्व केले. ती परिषद संपल्यानंतर प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये वादविवाद सुरू झाले. त्या वादामध्ये सामाजिक व आर्थिक प्रश्नांना स्पर्श केल्याशिवाय आपली स्वातंत्र्याची चळवळ पुढे जाऊ शकणार नाही असे आपले मत यशवंतरावांनी सविस्तर रीतीने पटवून देण्याचा प्रयत्न केला. तेव्हापासून यशवंतरावांचा मित्रसंग्रह सारखा वाढत गेला. हरिभाऊ लाड, काशीनाथपंत देशमुख, शांताराम इनामदार, महादेव जाधव, बाळासाहेब पाटील उंडाळकर, सदाशिव पेंढारकर, नीळकंठराव कल्याणी, गणपतराव बटाणे, राघुआण्णा लिमये इ. कितीतरी मित्र अगोदरच मिळविले होते. त्यात वाईचे किसन वीर, वाळव्यातले आत्माराम पाटील व पांडुरंग मास्तर, खटाव तालुक्यातील गौरीहर सिंहासने इत्यादिकांची भर पडली. जेथे जातील तेथे काही काळ राहिले म्हणजे नवे मित्र व नवे सहकारी जोडायचे ही त्यांच्या ठिकाणी असलेल्या माणसांच्या नैसर्गिक आवडीतून निर्माण झालेली पद्धती होती.

यशवंतरावांनी चळवळीत प्रथम कारावासाची एक वर्षाची शिक्षा भोगली होती. औपचारिक शिक्षणाला खंड पडला; परंतु जेलमध्ये काढलेल्या एका वर्षात निराळ्या प्रकारचे अनौपचारिक परंतु विद्यापीठीय दर्जाचे शिक्षण संपादन केले. कारावासातील प्रौढ विचाराची माणसे, निरनिराळ्या राजकीय विचारप्रणालीच्या कार्यकर्त्यांनी जेलमध्ये आणलेली पुस्तके, तेथे झालेल्या चर्चा यांच्या माध्यमातून ते वैचारिक चिंतनशील जीवनाच्या नव्या मार्गात शिरले. त्यांच्या कृतिशील जीवनाला चिंतनशीलतेची कायमची जोड मिळाली. १९३३ च्या मे महिन्यानंतर जेलमधून बाहेर पडले, तेव्हा ते फक्त काँग्रेसमान राहिले नव्हते. त्यांच्या काँग्रेसनिष्ठेला समाजवादी ध्येयाची जोड मिळाली. जागतिक समाजवादी आंदोलनाचे वैचारिक मंथन हे त्यांच्या राष्ट्रीय चिंतनाला पोषक

ठरले. समाजवादी व रॉयवादी मित्रांच्या बरोबर सातारा जिल्ह्यात ते काम करीत राहिले. या अवधीत त्यांनी शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन १९३८ मध्ये इतिहास व अर्थशास्त्र या विषयात मुंबई विद्यापीठातून बी. ए. पदवी मिळवून १९४० मध्ये एल.एल. बी. ही कायद्याची पदवी संपादन केली. पदवीनंतर पत्नी मिळविली. फलटण येथील सुखवस्तू मोरे घराण्यातील सुरेख व सुशील मुलगी वेणूताई पत्नी झाली.

१९४० च्या सुमाराला युरोपमध्ये दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. काँग्रेसमधील रॉयवादी गट ( लीग ऑफ काँग्रेसमन ) काँग्रेसचे या दुसऱ्या जागतिक महायुद्धाबद्दलचे धोरण नापसंत पडल्यामुळे काँग्रेसमधून बाहेर पडला. तोपर्यंत यशवंतराव या रॉयवाद्यांबरोबरच काम करत होते. महाराष्ट्राचे काँग्रेसनेते त्यांना रॉयवादीच समजत, परंतु यशवंतरावांनी रॉयवाद्यांबरोबर काँग्रेसच्या बाहेर पडण्याचे नाकारले, एवढेच नव्हे तर १९४२ सालच्या ' भारत छोडो ' या काँग्रेसच्या आंदोलनात ते सहभागी झाले. या आंदोलनात सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना करणारी भूमिगतांची चळवळ वाढत गेली. त्या चळवळीच्या प्रारंभीच्या अवस्थेत यशवंतरावांनी भूमिगत होऊन नेतृत्व केले, परंतु दीर्घकाल भूमिगत न राहता प्रकट होऊन त्यांनी कारावास पत्करला. ते रॉयवाद्यांबरोबर राहिले नाहीत कारण त्यांना रॉयवाद्यांची दुसऱ्या महायुद्धाबद्दलची भूमिका पटली नव्हती. ही गोष्ट ' कृष्णाकाठ ' या त्यांच्या आत्मचरित्रावरून लक्षात येते. ह्या ग्रंथात काँग्रेसची महायुद्धाबद्दलची कल्पना यशवंतरावांनी मोठ्या आत्मीयतेने मांडली आहे. ' भारत छोडो ' आंदोलनाचे सयुक्तिकपणे समर्थन केले आहे. पण एम. एन. रॉय यांचा या युद्धाबद्दलचा दृष्टिकोण त्यांनी समजावून घेण्याचा कधीच प्रयत्न केला नाही, असे या समर्थनावरून दिसते. एम. एन. रॉय यांनी या जागतिक युद्धाची मीमांसा १९४० साली अशी केली की, या महायुद्धात जागतिक हुकूमशाहीचा विजय झाल्यास म्हणजे मुसोलिनीचा फॅसिझम व हिटलरचा नाझिझम विजयी झाल्यास जगातील लोकशाहीच नष्ट होईल आणि पश्चिमी साम्राज्यशाहीच्या आधिपत्या-खाली असलेली राष्ट्रे कायम गुलाम राहावी आणि कायम गुलाम राहण्यासच ती पात्र आहेत असा विचार प्रस्थापित होऊन प्रभावी होईल. याच्या उलट ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका इ. दोस्त राष्ट्रांचा विजय झाल्यास पश्चिमी साम्राज्य-

शाह्यांचा ऱ्हास होऊन वसाहतवाद संपेल आणि लोकशाहीला ऊर्जितावस्था प्राप्त होईल.

एम. एन. रॉय यांनी वर्तविलेल्या जागतिक साम्राज्यशाहीच्या ऱ्हासाच्या भविष्याची सत्यता १९४५ सालाने पटवून दिली. १९४५ साली दोस्त राष्ट्रांचा विजय होऊन आणि हिटलर, मुसोलिनी आणि जपानची साम्राज्यशाही याचा पराभव होऊन भारतीय स्वातंत्र्याचा उष:काल दिसू लागला.

१९४६ ची मार्च महिन्यातली निवडणूक यशवंतरावांनी जिंकली. काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीचे नेते म्हणून बाळासाहेब खेर निवडले गेले होते. त्यांनी यशवंतरावांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड केली. त्यामुळे यशवंतरावांना कृष्णाकाठावरून अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील एका महानगरात म्हणजे मुंबईत आपले निवासस्थान थाटावे लागले. पुढे ते शेवटपर्यंत कृष्णाकाठावर कायम कधीच परतले नाहीत. मुंबईत महाराष्ट्राच्या राजकारणाची धुरा त्यांच्या खांद्यावर थोड्या वर्षांच्या अवधीत आली. पुढील जीवनाची भव्य यात्रा यशस्वी रीतीने डौलात पुढे जाऊ लागली. यमुनेच्या तीरावरच त्या यात्रेची समाप्ती झाली.

पार्लमेंटरी सेक्रेटरीपदावर राहून यशवंतराव मुंबईत काम करू लागले. शरीर मुंबईत पण मन कराडात अशा द्विधा मन:स्थितीत ते काम करीत होते. परमप्रिय वडीलबंधू गणपतराव क्षयाने आजारी होते. त्यांची सेवा करीत असताना गणपतरावांच्या पत्नींनाही त्या संसर्गजन्य रोगाने पछाडले. या दोघांच्या सेवेमध्ये यशवंतरावांची तरुण पत्नी वेणूताई सारख्या झटत होत्या. त्यांनाही क्षयाची बाधा झाली. १९४७ च्या डिसेंबर महिन्यामध्ये गणपतराव दिवंगत झाले. पुढील दोन वर्षांत गणपतरावांच्या पत्नींही इहलोक सोडून गेल्या. गणपतरावांच्या मुलांची म्हणजे पुतण्यांची जबाबदारी यशवंतरावांवरच पडली. सौ. वेणूताईंची प्रकृतीही ढासळलीच होती. अशा आपत्तीच्या वेढ्यात यशवंतराव सापडले. वेणूताई मिरजेच्या डॉ. जॉन्सन या मिशनऱ्यांच्या उपचाराने संकटातून बाहेर पडल्या. कराडच्या घरात त्या परिवाराची जबाबदारी समर्थरीतीने पेलणारी यशवंतरावांची माता विठाबाई, त्या खूप वृद्ध झाल्या होत्या, परंतु थकल्या नव्हत्या.

पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्यांचा गृहमंत्री मोरारजी

देसाई यांनी गृहखात्यात उपमंत्री म्हणून नेमणूक केली. या त्यांच्या उत्कर्षाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीस कराड-वाळवा भागातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये यादवी सुरू झाली. या यादवीला 'कऱ्हाडचे कुऱ्हाडीचे राजकारण' असे नाव देत होते. यशवंतरावांचे जिवलग मित्र के. डी. पाटील यांची शेतात कुऱ्हाडीने हत्या झाली. हा सूडाचा प्रकार होता. अगोदर आमदार चंदू पाटील यांचा खून झाला होता. त्यांच्या खुनाचा आळ के. डी. पाटलांवर आला. के. डी. पाटलांच्या गटाचे म्होरके म्हणून यशवंतरावांवरही हत्येचे संकट टपून बसले होते. यशवंत-राव मुंबईहून आजारी व अस्वस्थ स्थितीतल्या वडील बंधूंना उभ्या उभ्या भेटून जावे म्हणून कऱ्हाडला आले. कल्याणी बिल्डिंगमध्ये ते राहात. बंधूंच्या जवळ बसून मनमोकळेपणे दोन तास बोलणे झाले. नंतर खोलीच्या बाहेर पडून सिगारेट पेटविली. त्या इमारतीच्या गच्चीवरून सिगारेट ओढत विचार करीत बाहेर उभे राहिले. थोरली बहीण तेथेच होती. तिच्याशी बोलत असता कसल्या तरी विचारतंद्रीत दूर दिसणाऱ्या रेल्वे स्टेशनचा सिग्नल पाहिला, मनात एकदम धस्स झाले, कराड त्वरित सोडावे असे त्यांच्या मनाने घेतले. त्वरित रेल्वे स्टेशनचा रस्ता धरला. बहीण जाऊ देत नव्हती. तिचे ऐकले नाही. कऱ्हाड स्टेशनमध्ये उभ्या असलेल्या गाडीत शिरले व पुण्यास निघून गेले.

नंतर त्याच दिवशी रात्री विलक्षण भीषण प्रसंग घडला. टपलेल्या शत्रुपक्षाला बातमी लागली होती की, यशवंतराव कल्याणी बिल्डिंगमध्ये वडील बंधूंच्या समाचाराकरिता आले आहेत. मध्यरात्र उलटल्यावर दोनच्या सुमारास सहा जवान ठासलेल्या बंदुका, भाले, कुऱ्हाडी घेऊन कल्याणी बिल्डिंगवर चाल करून आले. त्यांनी दारावर धक्के मारून दार फोडण्याचा प्रयत्न केला. ही बातमी पोलिसांपर्यंत पोचली व गावात पसरली. लोकांचा समज झाला की यशवंतरावांना शत्रूंनी पळवून नेले असावे. यशवंतरावांचा शोध सुरू झाला. रात्री सर्वत्र तारा झाल्या. रेल्वेने यशवंतराव अगोदरच पुण्यास पोचले होते व इन्स्पेक्शन बंगल्यात झोपी गेले होते. पुण्याच्या पोलिसांनी कराडच्या पोलिसांना यशवंतरावांच्या खुशालीची बातमी दिली. भीषण प्रसंग टळला. यशवंतरावांच्या अंतर्मनाला सांकेतिक भाषेत इषारा मिळाला व त्याप्रमाणे यशवंतरावांनी सावध-गिरीने संकटाच्या क्षेत्रांतून पलायन केले. परंतु यशवंतरावांना या अंतर्मनाच्या इषाऱ्याच्या बाबतीत अगम्य व गूढ घटनाच वाटली. ते 'ऋणानुबंध' या लेख-

संग्रहात ‘ नियतीचा हात ’ या लेखात म्हणतात, “ त्या सिग्नलच्या बोलावण्याचा अर्थ समजून घेण्याचा मी खूप प्रयत्न केला आहे. परंतु या गोष्टीचा अन्योन्य संबंध जुळवून देणारा मला अजून कोणी भेटला नाही. एवढे मात्र खरे की तो खुणेचा हात नियतीचा होता. ”

१९४७ साली भारत स्वतंत्र होऊन भारताची संविधान समिती स्थापन झाली. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल आणि संविधान समितीचे सभापती राजेंद्र प्रसाद हे होते. संविधान समिती म्हणजेच घटना समिती. स्वतंत्र भारताची घटना समिती ही स्वतंत्र व एकात्म भारताची लोकशाहीप्रधान घटना निर्माण करण्यात यशस्वी झाली. आशिया खंडात अशी विशाल संसदीय लोकशाही म्हणजे भारताचीच लोकशाही ठरली. पाकिस्तान आणि भारत असे हिंदुस्थान उपखंडाचे दोन राजकीय विभाग निर्माण झाले. राजकीय दृष्ट्या अखंड भारत उभा राहू शकला नाही. भारत व पाकिस्तान अशी विभागणी होत असताना काही देवघेवीचे प्रश्न उत्पन्न झाले. म. गांधींनी पाकिस्तानला सोईची होईल अशा रीतीने एक देवघेव सोडविण्यात भारत सरकारला मदत केली. हिंदुत्ववाद्यांना नेहमीच वाटत होते की, म. गांधींचा कल हा मुसलमान-धार्जिणा आहे. या गैरसमजामध्ये थोडीशी भर पडून एका हिंदुत्ववादी अतिरेक्याने महात्मा गांधींचा वध केला. सगळे जग हादरले. त्याची भयंकर प्रतिक्रिया महाराष्ट्रात उफाळून आली. १०० वर्षाच्या जुन्या ब्राह्मणब्राह्मणेतर वादाने हिंसक व विध्वंसक रूप घेतले. अनेक शहरांमध्ये आणि शेकडो खेड्यांमध्ये, तालुक्याच्या ठिकाणी असलेली ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली. जवळजवळ ६ महिने या संहारक घटनांची मालिका लागोपाठ सुरू होती. सांगली, कोल्हापूर, सातारा या भागात याला अधिकच उग्र रूप आले होते. यशवंतरावांनी या वेळी योग्य अशी कामगिरी बजावली. त्यांच्या राष्ट्रवादी नेतृत्वाची कसोटी लागली. त्यांनी कराड व कराडच्या भोवतालच्या भागात जातीने गाठीभेटी घेऊन ग्रामीण, प्रक्षुब्ध, गटागटाने हिंडणाऱ्या जमावांना शांत केले.

महाराष्ट्रीतील प्रादेशिक काँग्रेस संघटनेमध्ये डावे आणि उजवे असे गट निर्माण झाले. त्यांच्यात रस्सीखेच सुरू झाली. ज्या डाव्या गटांना वाटले की जुने ब्राह्मणी नेतृत्वच अधिक प्रभावी राहिले आहे, तो डावा गट कॉंग्रेसमधून फुटून

बाहेर निघाला. शेतकरी कामकरी पक्षाची १९४९ साली स्थापना झाली. बहुजन समाजातले काही मुरब्बी नेते काँग्रेस सोडून या नव्या पक्षाचे नेतृत्व करू लागले. शंकरराव मोरे, केशवराव जेधे, दत्ता देशमुख, तुळशीदास जाधव, र. के. खाडिलकर, यशवंतराव मोहिते इ. नी या पक्षाच्या प्रचारास वेग आणला. या पक्षाच्या स्थापनेच्या वेळी अनेक खलबते झाली. त्यांतील काही बैठकींत यशवंतराव स्वत: उपस्थित होते. तेव्हा त्यांचे मन दोलायमान झाले. एक पाय काँग्रेसच्या बाहेर व एक पाय काँग्रेसच्या आत होता. परंतु आयत्या वेळी पक्ष-स्थापनेच्या वेळी काँग्रेसच्या बाहेर आलेला पाय त्यांनी पुन्हा आत घेतला. काँग्रेसलाच चिकटून राहिले. सुमारे २० वर्षे खांद्यावर बाळगलेला काँग्रेसचा तिरंगी झेंडा बदलून लाल झेंडा खांद्यावर घेणे जीवावर आले. आयत्या वेळी विवेकाने त्यांना साथ दिली. हा विवेकही नियतीचा हात होता.

स्वतंत्र भारताचे संविधान म्हणजे स्वतंत्र भारताच्या संसदीय लोकशाहीची राज्यघटना १९५२ साली अमलात आणण्याकरता प्रदेश राज्यांच्या आणि लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. १९५२ सालची भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली तेव्हाच मुंबई प्रदेश राज्याची सार्वत्रिक निवडणूक झाली. महाराष्ट्रात काँग्रेसविरुद्ध शे. का. पक्ष असा निकराचा सामना होऊन जेधे, मोरे यांचा नवा पक्ष त्या वेळी मार खाऊन खाली बसला. त्यानंतर ४·५ वर्षांच्या अवधीत शे. का. पक्षाला गळती लागली. जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, खाडिलकर इ. मंडळी काँग्रेसमध्ये म्हणजे स्वगृही परतली. हे बहुभाषिक मुंबई राज्य होते. त्यात गुजराथ, महाराष्ट्र आणि कर्नाटक हे तिन्ही भाषिक प्रदेश लहान-मोठ्या प्रमाणात समाविष्ट होते. १९५२ च्या निवडणुकीत खेरांची राजवट संपली, मोरारजींची राजवट सुरू झाली. मोरारजींनी आपल्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे या दोघा ग्रामीण जनतेच्या नेत्यांना सामावून घेतले. परंतु महाराष्ट्राचे वास्तविक नेतृत्व भाऊसाहेब हिरे यांच्याकडे आले.

भारत स्वतंत्र झाल्यावर भाषिक राज्ये निर्माण व्हावी, भाषावार प्रादेशिक राज्यांची निर्मिती व्हावी हा सिद्धान्त भारत स्वतंत्र होण्याच्या अगोदर ३०–३५ वर्षे मान्य झाला होता. १९२० च्या काँग्रेस अधिवेशनात भाषावार प्रादेशिक राज्यरचनांचा सिद्धान्त मान्य करण्यात आला. परंतु भाषावार प्रादेशिक राज्यांची

रचना भारताच्या संविधानात प्रत्यक्ष अंतर्भूत केलेली नाही. भारताचे केंद्रीय सत्ताधारी भाषिक राज्य निर्मितीच्या बाबतीत साशंक मनःस्थितीत होते. भाषिक प्रादेशिक राज्ये निर्माण झाली तरी एकात्मतेला न जुमानता फुटून निघण्याच्या मागणीला प्रारंभ करतील अशी भीती त्या साशंक मनःस्थितीच्या मुळाशी होती. आंध्रामध्ये हा प्रश्न धसास लागला. रामुलूंचा प्राणान्तिक उपवास झाला आणि निषेध–मोर्चे सुरू झाले. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या लक्षात आले की, भाषिक आंध्र राज्याची मागणी याच वेळी अमान्य केल्यास स्वतंत्र आंध्र राज्याची मागणी सुरू होईल. म्हणून नाखुषीने लोकसभेमध्ये प्रादेशिक आंध्र राज्याची योजना मान्य करून घेतली. महाराष्ट्रात अगोदरच म्हणजे १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन आकारात येऊ लागले. या आंदोलनाचा प्रथम पुढाकार महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी केला. त्यानंतर लगेच महाराष्ट्राच्या राजकीय पक्षांनी त्या आंदोलनाला पाठिंबा दिला व ते आंदोलन सबंध महाराष्ट्रभर पसरले. महाराष्ट्राचा काँग्रेसपक्ष त्यापासून अलिप्त राहू शकला नाही. महाराष्ट्र काँग्रेस समितीने या मागणीचा ठराव एकमताने संमत केला. नंतर महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्येच नेमस्त गट आणि लढाऊ गट असे भेद पडले. भाऊसाहेब हिरे आणि शंकरराव देव हे लढाऊ गटाचे नेते बनले. काँग्रेसच्या पाठिंब्यावाचूनच संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन आक्रमक बनले. शहरे आणि खेडी तापू लागली. यशवंतराव चव्हाण या आंदोलनात हिरीरीने पडले नसले तरी त्याला त्यांचा मनापासून पाठिंबा होता. यशवंतरावांच्या लक्षात आले होते की, काँग्रेसला संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे नेतृत्व करता येणार नाही. त्याकरता आपणास काँग्रेसमधून फुटून निघावे लागेल, त्यामुळे महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये फूट पडली व ती वाढत गेली. १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर ही पडलेली फूट अधिक रुंदावली. पक्षाचा एकमताने पाठिंबा मिळणार नाही, हे लक्षात घेऊन मोरारजी देसाई यांनी पक्षनेता म्हणून उभे न राहता यशवंतराव चव्हाण यांनाच पक्षाचे नेते म्हणून उभे केले. यशवंतराव चव्हाण पक्षनेते म्हणून बहुमताने निवडून आले, तरी एक गट त्यांच्या विरोधीच राहिला.

१ नोव्हेंबर १९५६ ला द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. कर्नाटकाचा भाग त्यातून वगळला होता. त्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून

चव्हाणांनी सत्ता हाती घेतली. त्याच वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला आक्रमक उग्र रूप प्राप्त झाले होते. महाराष्ट्र खवळून उभा राहिला होता. तोपर्यंत १९५२ सालापासून १९५५ सालापर्यंत मोरारजी देसाईंच्या प्रशासनाने आंदोलन दडपण्याकरता १०५ बळी घेतले. हा सगळा इतिहास डोळ्यांसमोर घडत असताना यशवंतरावांनी मुंबई राज्याची धुरा खांद्यावर घेतली, हे मोठे साहस होते. केंद्रीय नेत्यांना त्यांनी आश्वासन दिले होते की, हे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन दडपण्याकरता मी राज्याची सूत्रे हाती घेतली नाहीत. बंदुकीची गोळी न वापरताच मी राज्य चालवणार आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील नेत्यांशी त्यांनी सतत संपर्क चालू ठेवला. गुजराती आणि महाराष्ट्रीय मंत्र्यांमध्ये प्रशासनाच्या बाबतीत सामंजस्य व सलोखा निर्माण केला. त्यापुढे झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये महाराष्ट्रात व गुजरातेत काँग्रेस उमेदवारांचा पराभव होऊ लागला. १९५७ साली प्रतापगड येथे शिवाजीमहाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा अनावरण समारंभ पंडित नेहरूंच्या हस्ते मोठ्या इतमामाने साजरा करण्यात आला. त्या वेळी वाईपासून प्रतापगडपर्यंतच्या ३२ मैलांच्या हम रस्त्यावर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे मोर्चे गर्जत होते. याचे प्रत्यक्ष दर्शन पं. नेहरूंना घडले. पंडित नेहरूंच्या लक्षात आले, की महाराष्ट्र संतापला आहे. त्यांना यशवंतरावांनी सांगितले की महाराष्ट्रीय लवकर रागावत नाहीत, पण रागावल्यानंतर लवकर शांत होत नाहीत. त्यानंतर महाराष्ट्र आणि गुजरातमधील लोकमानसाचा अंदाज घेण्याकरता पंडित नेहरूंनी स्थानिक नेत्यांशी वारंवार चर्चा केल्या. अनेकदा मुख्य चर्चा यशवंतरावांशी झाल्या. यशवंतरावांनी सांगितले की, मी द्वैभाषिक राज्याचे शासन मनापासून राबविले आहे, परंतु माझी खात्री झाली की, पुढील सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही प्रांतांमध्ये काँग्रेस अल्पमतात जाणार. ही गोष्ट केंद्रवर्ती सत्ताधारी वरिष्ठ नेत्यांना पटली. वऱ्हाड व मराठवाडा येथील स्थानिक नेत्यांशी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या नेत्यांच्या आणि यशवंतरावांच्या अनेकदा वाटाघाटी झाल्या. नाग-विदर्भ आणि मराठवाडा यांच्यासह सबंध महाराष्ट्र म्हणजे कोकणासह उत्तर-दक्षिण महाराष्ट्र असे मराठी भाषिक राज्य स्थापन करण्याचे विधेयक लोकसभेने आणि राज्यसभेने संमत केले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली. १९४६–६० पर्यंतच्या

कालखंडात यशवंतराव चव्हाणांचे बेरजेचे राजकारण यशस्वी झाले. मैत्री, सद्भावना, स्वच्छ प्रशासन आणि व्यावहारिक शहाणपण या सद्गुणांचे फलित यशवंतराव यांच्या हाती लागले.

१९५६ पासून १९६२ पर्यंतच्या ६ वर्षांच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला. अर्थरचना, प्रशासनपद्धती व शिक्षणाचा विस्तार हे तिन्ही मूलभूत विषय त्यांनी मूलगामी पद्धतीने हाताळले. अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले. कृषिऔद्योगिक अर्थव्यवस्था सहकारी तत्त्वाच्या आधारे निर्माण करण्याकरता कायदेविषयक तरतुदी केल्या. गरीब माणसाला शिक्षणाच्या बाबतीत केव्हाही आणि कोणत्याही श्रेणीपर्यंत पोहोचवण्यास आर्थिक अडचण येऊ नये म्हणून महत्त्वाचे विधेयक संमत करून घेतले. ग्रामीण जनतेच्या हातात सत्तेची सूत्रे काही प्रमाणात जावीत व सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे याकरता ग्रामपंचायतीचा व जिल्हा परिषद निर्मितीचा कायदा संमत करून घेतला. एकंदरीत स्थानिक स्वराज्य संस्था समर्थ व्हाव्यात याकरता राज्याचे नवे धोरण आखले. महाराष्ट्राची कला आणि साहित्य या विषयाची फार मोठी दीर्घकालीन परंपरा लक्षात घेऊन त्याकरता अत्यंत महत्त्वाची धोरणे आखली, परंपरागत धोरणे बदलून टाकली.

१९४८–५७ पर्यंत सरकारी कराचा जबर बोजा मराठी रंगभूमीवर होता. त्यामुळे ती खंगली होती. महाराष्ट्रातील रंगभूमी हिंदुस्थानातील एक प्रगत रंगभूमी असल्यामुळे तिचा हा पडता काळ सर्वांनाच तीव्रतेने जाणवत होता. यशवंतरावांनी यासंबंधी शासनाचे धोरण पूर्ण बदलून टाकले. १९५८ साली नाट्य, नृत्य, संगीत, लोककला इत्यादींवरील करांचा बोजा काढून टाकला. त्यामुळे महाराष्ट्रातील नाट्यकलेला नवे भरते आले. रंगभूमी अधिक उजळून निघाली. सहकारी चळवळ ही महाराष्ट्रात इतकी फोफावली की तिने भारतामध्ये आता अग्रस्थान मिळविले आहे.

१९६२ साली चीनचे आक्रमण भारतावर झाले. या आक्रमणाच्या क्षणापर्यंत ' हिंदी-चिनी भाई भाई ' अशा भावनेमध्येच भारतीय राज्यकर्ते गुंग होते. त्या वेळचे भारताचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्यावर पंडित नेहरूंचा नितांत विश्वास होता. कृष्ण मेननना या आक्रमणाची अगोदर यत्किंचितही कल्पना आली नाही. बेफिकीर राहिले. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभा त्यांच्या विरुद्ध क्षुब्ध

झाली. यशवंतरावांच्या हाती संरक्षणाची सूत्रे द्यावी असे भारतीय संसदेचे सदस्य आणि नेते म्हणू लागले. यशवंतरावांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे पद सोडून केंद्रातील संरक्षणमंत्रिपद नाइलाजाने व नाखुषीने स्वीकारावे लागले. महाराष्ट्राच्या विकासाचे भावी भव्य चित्र मनापुढे ठेवून त्यांनी कारभार चालविला होता. ते संरक्षणमंत्रिपदावर गेल्याबरोबर तत्क्षणी दैवयोग असा की, चीनने आपणहून हिमालयातून माघार घेतली. १९६५ साली पाकिस्तानचे आक्रमण झाले. तेव्हा लालबहादूर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान होते. पाकिस्तानने आघाडीवर मार खाल्ला आणि सोव्हिएट रशियाच्या मध्यस्थीने भारताशी अनाक्रमणाचा करार केला.

१९६२ चे चीनचे आक्रमण आणि १९६५ चे पाकिस्तानचे आक्रमण या दोन आक्रमणांमध्ये मंत्रिपदावरून रणनीती ठरवीत असता आणि शत्रूच्या आघाडीवर सैन्याच्या हालचालीच्या आणि व्यूहांच्या तपशीलवार दैनंदिनी आखीत असताना युध्यमान राष्ट्रांच्या उद्दिष्टांचेही ते चिंतन करीत होते. ते म्हणतात, " संरक्षणमंत्री म्हणून ज्या दिवशी मी दिल्लीला गेलो त्याच्या दुसऱ्या दिवशी चीनचे सैन्य माघारी फिरले आणि प्रश्न असा पडला की या सगळ्या गोष्टीचा अर्थ काय? ते आले आणि परत गेले. याच्या पाठीमागे त्यांचे काय इरादे असावेत? काय हेतू असावेत? याचा जेव्हा अभ्यास झाला आणि चर्चा झाली तेव्हा त्याचे सरळ सरळ तीन हेतू दिसून आले. सरळ एक गोष्ट आहे की, चीन आणि हिंदुस्थान हे प्रचंड लोकसंख्या असलेले विस्तीर्ण भूभाग आहेत. दोन प्रचंड भूभाग असलेली राष्ट्रे जेव्हा शेजारी शेजारी असतात तेव्हा हितसंबंधाचे विरोध निर्माण होत असतात. चीनच्या दृष्टीने त्यांच्यात आणि भारतात जी स्पर्धा होती ती अशी, की आशिया आणि आफ्रिका खंडातील स्वतंत्र होणारी जी छोटी छोटी राष्ट्रे आहेत, त्यांच्या पुढे आफ्रिका आणि आशिया खंडांत चीन हा भारतापेक्षा लष्करी दृष्ट्या अधिक समर्थ देश आहे. असे जे प्रदर्शन करावयाचे होते ते त्याने हिमालयामध्ये करण्याचे ठरविले आणि तेथे हा उद्योग केला.

" दुसरी गोष्ट अशी, की गेली १५-१६ वर्षे हिंदुस्थानने लष्करी तयारी गौण मानून विकासाची तयारी महत्त्वाची मानली आणि आपली सगळी साधन-सामग्री विकासाच्या कामावर केंद्रित केली. पण लष्करी प्रश्न हिंदुस्थानपुढे

येऊन ठाकल्यामुळे विकासाच्या कामासाठी लागणाऱ्या साधनांतला काही भाग तरी संरक्षणाच्या तयारीला घातल्याशिवाय हिंदुस्थानला दुसरा मार्ग नाही, हे चीनला माहीत होते. हिंदुस्थानच्या आर्थिक संकटाचा बोजा अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न करणे हा चीनच्या आक्रमणातला दुसरा उद्देश होता. चीनचा आणखीही एक उद्देश होता. तो म्हणजे हिंदुस्थानच्या नॉन-अलाइनमेंटच्या—तटस्थतेच्या धोरणाला खीळ घालणे हा होय. पण या बाबतीत चीनचा अपेक्षाभंग झाला. हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यातील संघर्ष जागता ठेवला पाहिजे असा त्यांचा आता नवा प्रयत्न आहे. परंतु या संघर्षाचे स्वरूप पाकिस्तानने समजून घेतले, तर ती गोष्ट पाकिस्तानच्या हिताची ठरेल. कारण हिंदुस्थान व पाकिस्तान यांचा संघर्ष झाला पाहिजे अशा तऱ्हेची भावना मनात ठेवून आम्हाला चालणार नाही, कारण त्यामध्ये पाकिस्तानचाही नाश आहे व हिंदुस्थानचेही नुकसान आहे. हे आम्हाला उघड दिसते.

" पाकिस्तानच्या मनात हिंदुस्थानसंबंधी विरोधाची भावना मुळातच आहे. पण पाकिस्तान व चीन हे एकत्र आले याचे मुख्य कारण कोणते ? एकत्र आले ते काही धर्म किंवा साम्यवाद यांच्यामुळे नव्हे, तर हिंदुस्थानसंबंधी या दोन राष्ट्रांच्यामध्ये असलेला विरोध हेच याचे मुख्य कारण आहे. पण विरोधावर आधारलेले राजकारण फारसे यशस्वी होत नसते ही गोष्ट त्यांना समजत नसावी. " ( युगांतर, पृ. १००–२ ).

यशवंतरावांच्या अध्ययनशील, चिंतनशील आणि कृतिशील राजकारणाला एक खोल अशी निष्ठा लाभली होती. प्रत्यक्ष राजकारणामध्ये राष्ट्राची प्रकृती ते सतत जाणून घेत होते. इथल्या लोकशाहीचा पाया मजबूत नाही, नेहरू-सारख्या नेत्यांच्या अभावी ही संसदीय लोकशाहीची विशाल, भव्य रचना डळ-मळून कोलमडेल अशीही शंका एतद्देशीय आणि विदेशी राजकारणी आणि समाजकारणी पंडितांना पडत होती. यशवंतराव संरक्षणमंत्री असतानाच चीनच्या आक्रमणाच्या धक्क्याने प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू खचले व निर्वतले. त्यांच्या पदावर लालबहादूर शास्त्री आले. ताश्कंद करार झाला. त्या संदर्भात यशवंतराव म्हणतात, " या देशामध्ये असलेली लोकशाही या देशाला एक मोठा नेता होता, म्हणूनच आहे यावर माझा पूर्वीही विश्वास नव्हता आणि आजही नाही. नेहरूंनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकवली.

हिंदुस्थानचा हा एक मोठा विजय आहे. या राष्ट्राच्या जीवनात प्राण ओतून एक नवे राष्ट्र बनवण्याचा प्रयत्न करताना एका नवीन तऱ्हेच्या आर्थिक जीवनाचा आपणास पाया घालावयाचा होता ... हिंदुस्थान हे एक पहिल्या प्रतीचे आणि मोठे प्रगत राष्ट्र म्हणून दुनियेमध्ये अभिमानाने जगू शकेल अशी माझी श्रद्धा आहे. राष्ट्र बनविण्याचे हे काम आज तुमच्या-आमच्याकडे आले आहे; हे तुमचे आमचे भाग्य आहे." ( युगांतर, पृ. १०८–१० )

संरक्षणमंत्रिपदानंतर त्यांच्याकडे केंद्राचे गृहमंत्रिपद आले. नंतर अर्थमंत्री म्हणून समर्थपणे कारभार केला व अखेर विदेशमंत्रिपद स्वीकारले. विदेशमंत्रिपद स्वीकारल्यावर त्यांनी पश्चिमेकडील आणि पूर्वेकडील राष्ट्रांच्या यात्रा केल्या. एका तऱ्हेची सर्वंच पृथ्वी-प्रदक्षिणा घडली. महानद्यांच्या काठची आणि सागरकिनाऱ्या-वरची शहरे पाहिली. नद्या, सरोवरे, जंगले, उद्याने यांच्यात विहार केला. निरनिराळ्या राष्ट्रांच्या विकासाचे कार्यक्रम अमलात आलेले प्रत्यक्ष अवलोकिले. या सर्वांचे मोठे रसिकतेने मार्मिक वर्णन त्यांनी आपल्या विविध लेखसंग्रहांमधून केलेले वाचावे. ते प्रत्यक्ष प्रशासनाच्या व्यापात नसते, तर मराठीतील प्रवासवर्णनाच्या साहित्यात त्यांनी अभिजात यात्रा-वर्णनांची भर घातली असती. त्यांच्या त्या यात्रावर्णनावरून त्यांचे मराठी शब्दकळेवरील प्रभुत्व प्रत्ययास येते. प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांना तात्त्विक चिंतनाची जोड अशा तऱ्हेचे सुभग लेखन करण्यात यशवंतरावांचा हातखंडा होता. ' सह्याद्रीचे वारे ', ' ऋणानुबंध ', ' युगांतर ', ' कृष्णाकाठ ' हा आत्मचरित्राचा प्रथम खंड आणि ' भूमिका ' हा चौथा लेखसंग्रह व भाषणसंग्रह ( प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे ) हे सगळे ग्रंथ मराठी साहित्याचे तेजस्वी अलंकार आहेत. त्यात यशवंतरावांची क्रांतदर्शी प्रतिभा आणि तत्त्वदर्शी प्रज्ञा प्रसन्नपणे प्रकट झालेली दिसते.

शेवटची १९७९ पासूनची त्यांची वर्षे ही ते यशाच्या उत्कर्षबिंदूपासून खाली जात आहेत याचे दर्शन ठरतात. परंतु त्यातही त्यांचे अंतःकरण शुद्ध तत्त्वनिष्ठेपासून कधीही ढळलेले आढळत नाही. नियतीने हात दिला असता तर या १९८५ च्या काँग्रेसच्या अभूतपूर्व विजयाच्या वर्षात ते पुन्हा भारताच्या राजकीय क्षितिजावर तेजस्वीपणे जनतेला मार्गदर्शन करीत असलेले दिसले असते.

# ३

## बलवंत यश सरले !!

### शिवाजी सावंत

दि. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी या मराठी मुलखातून एक 'बलवंत' 'यश' उभ्या भारत देशाला धक्का व तीव्र शोक देऊन गेले. स्वातंत्र्य-संग्रामातला ज्याला सच्चा धडाडीचा असा 'शेवटचा' वैचारिक क्रियाशील 'रोमन योद्धा' म्हणता येईल असा बलदंड राजपुरुष हरवला.

स्व. यशवंतराव चव्हाण तुमच्या आमच्यातून जाऊन आताशी कुठं फक्त चार एक वर्षं झालीत. एव्हाच आपणाला अनेक आघाडयांवर त्यांच्या जाण्यानं निर्माण झालेली पोकळी तीव्रपणे जाणवायला लागली आहे.

यशवंतरावांची त्यांच्या जाण्यानंतर अनेक जाणत्या प्रज्ञावंतांनी आधुनिक लो. टिळक अशी भलावण केली आहे. अनेक वाद-विवादपटूंना ती अवास्तव वाटली आहे. पण ती रास्त आहे. लोकमान्यांनी सातशे वर्षं थंडगार गोळ्या-सारख्या पडलेल्या या कोट्यवधींच्या जनसमूहात 'स्वराज्याची स्वातंत्र्याची' प्रेरणा व आच हक्क म्हणून भरली. तेल्या-तांबोळ्यांचे ते जननायक झाले. यशवंतरावांनी स्वातंत्र्यानंतर प्रथम महाराष्ट्राची बहुजनगंगा ज्ञानाच्या व आर्थिकाच्या आघाडीवर क्रियाशील पावले टाकून सतर्क व सजग केली. त्यासाठी विषवत् असलेली कठोर टीका प्रसंगी शंकराचं शाळीग्रामी, निर्धारी मन करून पचविली. प्रथम महाराष्ट्र सत्ता-विकेंद्रीकरण व डोळस सहकारी

क्षेत्राच्या आघाडीवर पुढे खेचून आणला. मग १९६२ साली देशावर चीनचं आक्रमण येताच पंडितजींच्या आवाहनाला कष्टाळू सेवेनं रोकडा प्रतिसाद दिला. महाराष्ट्र सावरणाऱ्या यशवंतरावांनी आपल्या सायवळ हातांनी व हितकर दूर-दृष्टीच्या बुद्धिमत्तेनं भारताच्या संरक्षण खात्यातील निर्माणाचा विभाग व अनुशासनाचा विभाग इतका भक्कम कार्यक्षम केला की, १९६५ च्या पाक-बरोबरच्या संघर्षात देशानं १९६२ मध्ये झालेली नामुष्की धुऊन काढली. पुढे परराष्ट्र, अर्थ व गृह अशी देशाची महत्त्वाची खाती त्यांनी सांभाळली.

१९६५ पर्यंतचे यशवंतरावांचे राजकीय जीवन हे नीलवर्णी आकाशमार्गावर सरसरत झेपावत जाणाऱ्या सुवर्णी बाणासारखं आहे. त्यांच्यावर पूर्वी टीका करणारेही राजकारणातली चाललेली आजची धुळवड बघताना बोलून जाताना दिसतात की, " साहेब गेले ते आपल्याबरोबर महाराष्ट्रात अनेक आघाड्यांवरचे, क्रियाशील म्हणजे विधायक असं बेरजेचं श्रेय घेऊन गेले. त्यांच्या जाण्याबरोबर एक ' बलवंत ' ' यश ' महाराष्ट्र नक्कीच हरवून बसला आहे. स्व. यशवंत-रावांच्या अकाली हरवण्यामुळं महाराष्ट्राची दिल्ली दरबारातील असलेली पत व वट कितीतरी टक्क्यांनी कोसळली आहे. "

यशवंतराव तडकाफडकी जाणं हा महाराष्ट्राच्या अनेक आघाड्यांवरचा वर्मी घाव तर आहेच, पण उभ्या देशाचा विचार केला तर राष्ट्रहिताच्या वैचारिक बँकेतील ती एक जबरदस्त हानी आहे. ज्या पिसं कुरतडत जाणाऱ्या वाटेनं त्यांना एकेकाळी ऐटदार मयूराचं जीवन संपन्न केलेल्या आठवणी जपत जाणं लागलं आहे, त्याचं स्मरण तर त्यांच्यावर निरपेक्ष व निकोप प्रेम करणाऱ्या कुठल्याही भारतीयाला केवळ उद्विग्न करणारं आहे.

सतत सभोवती वावरणाऱ्यांनाही यशवंतरावांच्या अभिजात देशप्रेमाची जात-कुळी नेमकी काय होती, तिची पाळंमुळं त्यांच्या बालमनावर संस्काररूपानं कशी शिल्पासारखी कोरली गेली होती हे कधीच कळलं नाही. यशवंतरावांच्या अडगर किशोरवयात घडलेली एक अत्यंत बोलकी अशी संस्कारदायी घटना त्यांच्या उभ्या व्यक्तिमत्त्वालाच स्पष्ट व ढळढळीत दर्पण दाखविणारी आहे असं मला नेहमीच प्रकर्षानं वाटत आलं आहे. यशवंतरावांची राष्ट्राची कल्पना, त्यांचं स्वातंत्र्यप्रेम, त्यांची नेहमीच दृग्गोचर होणारी प्रगल्भ जाण, त्यांचं सुसंस्कारित व माणूसवत्सल मन या सर्वांचंच मूळ या छोट्या घटनेत सखोलपणे

व चपखल बसलेलं जाणवतं.

ती घटना अशी आहे – ‘ देवराष्ट्रे ’ हे कऱ्हाडजवळचं छोटेखानी गाव. हे यशवंतरावांचे जन्मगाव. तेथून ते हायस्कूलच्या शिक्षणासाठी कऱ्हाडला आले. एका नातेवाइकाकडं राहिले. त्यांचं वय १४ ते १६ असं शाळकरी असतानाच ते स्वातंत्र्याच्या लढ्याकडं ओढले गेले होते. हे साधारण २८ ते ३० साल होतं. लो. टिळकांचा राजकीय क्षितिजावरून अस्त होऊन म. गांधीजींची विचारधारा देश स्वीकारत चालला होता. याच काळात बंगालमधील थोर क्रांतिकारक यतीनदास यांनी तुरुंगात राजकीय कैद्यांना ब्रिटिश सरकार अमानवी व निर्दय वागणूक देत आहे म्हणून निषेधार्थ कठोर उपोषण केलं. त्या काळात ते उपोषण फारच गाजलं होतं. उभा भारत देश यतीनदासांच्या श्वासाबरोबर धडधडत होता त्या वेळी. त्या थोर व कृतनिर्धारी क्रांतिकारकाची तब्येत कशी आहे याची वजन, नाडी, झोप या तपशिलासह देशाला गुपचूप माहिती देणारी पत्रकं त्यांचे तुरुंगाबाहेरील चाहते क्रांतिकारक मित्र गुप्तपणे छापत व हातोहात देशभर वाटत. उभा देश ती पत्रके औत्सुक्याने वाचत असे.

यतीनदासांच्या यतिव्रती निर्धारी उपोषणात मन, बुद्धी, आत्मा व जीव अडकलेला कऱ्हाडमधील चव्हाणांचा शाळकरी यशवंता ठरावीक ठिकाणी शाळा सुटल्यावर जाऊन ती पत्रके हस्तगत करी. गुपचूप ती वाचून काढी. यतीनदासांच्या ढासळत्या प्रकृतीनं यशवंत अस्वस्थ, सैरभैर होई. त्याला काही सुचत नसे.

यतीनदासांचं हे उभा देश हेलावून टाकणारं उपोषण त्या वेळी सर्वांना पिळवटून काढून पुरे साठ दिवस चाललं ! इकडे कऱ्हाडला यशवंताचा साठ दिवस कोवळा जीव टांगणीला पडला होता. अडगर–किशोरमनाच्या यशवंतावर असह्य मानसिक तणाव आला होता. त्याबद्दल त्याला कुणाला बोलताही येत नव्हतं.

या अत्यंत मूकनाट्याचा शेवटी शेवट झाला. त्या दिवशी शाळा सुटल्या-नंतर यशवंतानं आपल्या लाडक्या क्रांतिकारकाच्या तब्येतीचं तपशील देणारं पत्रक धडधडत्या काळजानं घेतलं. आज नेमका तो सुट्टीमुळं कऱ्हाडहून देवराष्ट्र्याला जाणार होता एकटाच. कऱ्हाडबाहेरची निर्मनुष्य पायवाट सुरू झाली. शाळकरी यशवंतानं धडधडत्या मनानं आपल्या बंगीतील ते पत्रक

बाहेर काढलं. चालता–चालता तो पत्रक वाचू लागला. आज त्या गुप्त पत्रकानं आपल्या निर्धारी क्रांतिकारकाच्या दु:खद निधनाची अत्यंत कटू वार्ता तीव्र निषेधाच्या धारदार शब्दात छापली होती ! ती पिळवटणारी काळीज-तोड होती.

पायातलं त्राणच गेल्यासारखा किशोरवयाचा यशवंता पत्रकातच आपला मुखडा झाकून घेऊन गपकन् त्या निर्मनुष्य पायवाटेवर खालीच बसला आणि आपल्या अडगर, निकोप काळजातले कढ असह्य व अनावर झाल्याने हमसून रडू लागला ! तिथं कोणीही नव्हतं. यशवंता गदगदून, फुटफुटून रडत होता– सख्खा भाऊ अंतरल्यासारखा !

त्या दिवशी ती पायवाट चालताना, रडणाऱ्या यशवंत चव्हाणाच्या डोळ्यांतून टपकलेला प्रत्येक अश्रू थेंब पुढच्या यशवंतरावांच्या जडण-घडणीला पायाभूत ठरला आहे, असं मला त्यांची ही घटना त्यांच्या तोंडून ऐकताना एक ललित लेखक म्हणून प्रकर्षानं जाणवून गेलं आहे.

म. गांधींच्या १९४२ च्या ' जले जाव ' या ऐतिहासिक व प्रेरक अशा घोषणेनं ब्रिटिशांविरुद्ध एक लोकयुद्धच पेटलं. ४२ चा भारतीयांचा लढा अद्याप व्हावा तसा इतिहासबद्ध झालेला नाही. या काळातील यशवंतरावांच्या कितीतरी आठवणी त्यांच्या एकूणच मनाच्या जडण-घडणीवर बोलका प्रकाश टाकणाऱ्या आहेत. या काळात ते कम्युनिझम, रॉयवाद, क्रां. नाना पाटलांचे प्रतिसरकारचे आंदोलन अशा विचारापासून गांधीजींच्या सनदशीर सत्याग्रहा-पर्यंतची वाटचाल असे दोलायमान झाले आहेत. ते साहजिकही होते. याच काळात कोल्हापूरचे एक तडफदार कार्यकर्ते श्री. बळवंतराव ऊर्फ वीर माने व यशवंतराव यांना काही दिवस एकाच बेडीत जोडकैदी म्हणून राहण्याचा प्रसंग आला. तो काळच तसा होता. ब्रिटिश सरकारच्या अपेक्षेचा भंग करीत बहुसंख्य तरुण स्वेच्छेने राजकीय मैदानात उतरले होते. राजकैदी झाले होते. यशवंत चव्हाण आणि बळवंत माने ! एकत्र जखडले गेले होते.

पुढे स्वातंत्र्यानंतर संस्थानांच्या विलीनीकरणाचे कार्य कोल्हापूर परिसरात वीर माने यांनी रत्नाप्पाण्णा कुंभार, भाई माधवराव बागल यांच्या सोबतीने " प्रजा परिषदेच्या " झेंड्याखाली जोमाने चालविले. वीर माने हे त्या वेळी कोल्हापुरात शब्दश: " टेरर " होते. छ. राजाराम महाराजांनी तर त्यांना नव्या

राजवाड्यावर एकान्ती पाचारण करून " तू टेंबलाईच्या टेकडीवरून नजर टाकशील तेवढी टप्पात येणारी सरकारी जमीन तुला देतो–पण हा प्रजा परिषदेचा भलता नाद सोड." असं प्रलोभनासह फोडण्यासाठी चाचपून पाहिलं होतं. वीर माने कशालाच बधले–भुलले नाहीत. जनतेनं त्यांना दिलेली " वीर " ही स्वयंस्फूर्त पदवी त्यांनी त्याच धडाडीनं व एकनिष्ठ प्रामाणिकपणे पाळून दाखविली.

स्वातंत्र्यानंतर अंगच्या मूलभूत कर्तबगारीमुळे, जनमेळामुळे यशवंतराव राजकीय क्षितिजावर सरसर एकएक टप्पा मागे टाकत चालले होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावरून पंतप्रधान पंडितजींनी यशवंतरावांना आत्मीय कौलाच्या विश्वासाने देशाचे संरक्षणमंत्री म्हणून मोठ्या गौरवाने पाचारण केले. चीनशी ६२ साली झालेल्या युद्धात अनेक प्रकारच्या लष्करी हेळसांडीमुळं भारताची तेव्हा जगभर नामुष्की झाली होती. देश कठीण वाटचालीत होता. यशवंतरावांवर संरक्षणमंत्री म्हणून आव्हानात्मक अशी मोठीच जबाबदारी येऊन पडली होती. दरम्यानच्या काळात वीर माने यांच्या आयुष्याचीही बरीच चक्रे फिरून गेली होती. अत्यंत मानी व कमालीचा अबोल स्वभाव यामुळं त्यांनी कधीच आणि कुणाकडेही आपल्या स्वातंत्र्यप्रेमाच्या " रिटर्नची " कसलीही मागणी केली नव्हती. शिक्षण वेताचे म्हणजे जेमतेम व्ह. फा. पर्यंतचे असल्याने त्या बळावर ते स्वतंत्र भारताच्या कोल्हापूर विभागातील पी. डब्ल्यू. डी. खात्यात "चिकटले" होते. काय म्हणून तर मैल-कुलींच्यावर देखरेख करणारे " मुकादम " म्हणून. हा आपलं निरवा-निरवीसाठी बोलायचं म्हणून " दैवाचा अजब खेळ " होता असं आत्ता म्हणायचं! एकाच बेडीतील दोन जोड राजकैद्यांपैकी एक स्वतंत्र भारताचा संरक्षण-मंत्री होता–दुसरा पी. डब्ल्यू. डी. चा मुकादम होता!

यशवंतरावांचं बावनकशी संस्कारित मन जे या वेळी एका क्षणी प्रकट झालं त्याला मात्र तोडच नाही. त्या वेळी झालं ते असं. संरक्षणमंत्री म्हणून यशवंत-रावांचा कोल्हापूर भागात दौरा लागला. पुढे एस्कॉर्टची एक गाडी, पाठीमागे एक. मध्ये दस्तुर खुद्द यशवंतरावांची गाडी असे ते कोल्हापूरपासून पंधरा एक मैल अलीकडं आले.

" मुकादम " वीर माने त्याच रस्त्यावर आपल्या ड्यूटीवर होते! डोक्यावर नेहमीची राखी रंगाची फर कॅप होती त्यांच्या. एस्कॉर्टची पुढची गाडी रस्त्याने

भरधाव निघून गेली. वीर माने यांना कोण खास असामी चाललीय याची काहीच कल्पना नव्हती. आपले मैल–कुली आवरून ते रस्त्याच्या कडेला ही " कटकट " केव्हा एकदाची पसार होते आहे याची डोळ्यात धूळ जाऊ नये म्हणून ते किलकिले करून वाट बघत होते. यशवंतरावांची मुख्य गाडीही पास झाली. पन्नास एक मीटरवर जाऊन मात्र ती अचानक थांबली. साहेबांनी स्वगत वाटावं असं सचिव श्रीपाद डोंगऱ्यांना म्हटलं–" वीर माने दिसतात बहुधा. श्रीपादराव गाडी थोडी रिव्हर्स घ्यायला सांगा. बघूया ! "

त्या निर्जन रस्त्यावर भारताच्या संरक्षणमंत्र्याची गाडी थांबून परतून आली. दार स्वत:च उघडून धोतराचा सोगा सावरत यशवंतराव रस्त्याच्या कडेला झपाझपा गेले. भुवयांवर हाताची झड घेऊन डोळे बारीक करीत त्यांनाच निरखणाऱ्या वीर मान्यांसमोर उभे ठाकले !

" ओळखलंत तरी ? सांगा बघू. " नेहमीच्या पद्धतीनं त्यांनी आपल्या जिवलग सत्याग्रही मित्राला प्रश्न टाकला.

गोंधळलेल्या, आता उतारवयानं थकलेल्या वीर मान्यांनी खिशातली चाळिशी काढून प्रथम डोळ्यावर चढविली. माने अस्पष्ट पुटपुटले– " यशवंत – बळवंत – "

– आणि साहेबांनी गाडीतून उतरतानाच हाताशी पडलेल्या हारातील सोबत घेतलेला हार स्वातंत्र्य सैनिक, बेडीमित्र बळवंत ऊर्फ वीर माने यांच्या गळ्यात क्षणात चढविला – " बरोबर " म्हणाले. ते दोघे स्वातंत्र्य शिपाई एकमेकांना कडकडून उराउरी भेटले. वीर माने तर फार संकोचून गेले होते. दोघांच्याही मनात ४२ च्या मंतरलेल्या दिवसांच्या शिवकर स्मृतींच्या घंटा घणघणत होत्या. आठवणीच आठवणी. त्याही तुरुंगातील दोघांच्या मनात दाटल्यानं शब्द फुटत नव्हता. ते दृश्य टिपायला कुठलाही कॅमेरा नव्हता. साहेबांनी सावरत विचारलं " काय वीर, कसं चाललंय ? काही अडचण वगैरे ? "

" जी, काही नाही. बेस चाललंय. फार वर्षांनी भेट झाली. काळीज भरलं. तुमचं कसं काय चाललंय ? " वीर मान्यांचा सवाल निकोप, रांगड्या व भाबड्या मनाचा होता. निरपेक्ष मैत्रीपोटीचा होता. साहेबांनी उत्तर दिलं, " छान ". त्या दोघांचा तो संवाद टिपायला कुठलाही टेपरेकॉर्डर नव्हता.

कुणीही प्रत्यक्ष संरक्षणमंत्री यशवंतरावांनी निर्मनुष्य रस्त्याच्या कडेला

थांबलेल्या आपल्या जुन्या सत्याग्रही मित्राच्या गळ्यात हार घालून त्याला कड-कडून मारलेली मिठी डोळ्यापुढे आणून बघावी. फरकॅप घातलेले गळ्यात तो हार वागविणारे मुकादम वीर माने डोळ्यासमोर आणून बघावेत. यशवंतरावांच्या मनाची नस नक्कीच कळेल.

मराठी मुलखातल्या सर्व भागातील, सर्व थरांतील जनतेला यशवंतराव हे आपलं दुखलं-खुपलं मन व त्याची कैफियत मांडण्याचं न्यायालय वाटे. ते महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपद सोडून दिल्लीला गेले तरी ही नाळ काही तुटली नाही. मध्यंतरी याबाबत म. टा. मध्ये आलेली बागलाण भागातील एक शेतकरी स्त्री गाठोडं बांधून थेट दिल्लीलाच कशी गेली, तिनं आपल्या जमिनीचा कायदेशीर गुंता साहेबांच्या कानी कसा घातला, त्यांनी तो अत्यंत सुहृद शांतपणे कसा ऐकून घेतला, नासिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना तात्काल ट्रंक जोडून तिची अडचण कशी समजावून सांगितली, शेवटी वेणूताईंच्या हस्ते तिची साडीचोळीनं ओटी भरून तिला अगत्यानं आपल्या एक रेस कोर्स या दिल्लीच्या निवासात एक दिवस ठेवून घेऊन रेल्वेचे पहिल्या वर्गाचे तिकीट काढून आपल्या सचिवांना तिच्या सोबत स्टेशनपर्यंत पाठवून यशवंतरावांनी तिची बागलाणपर्यंतची परतीची बोळवण कशी केली याची केवळ हारून-अल-रशिदच्या चरित्रात शोभावी अशी सुरोचक कथा मराठी वाचकांनी डोळे विस्फारून वाचली आहे.

अनेक वेळा स्पष्टपणे आपल्या भाषणात यशवंतरावांनी स्पष्ट इन्कार केला होता की, " मी प्रतिशिवाजी मुळीच नाही. असलोच तर शिवरायाचे एक निष्ठावान भक्त आहोत, चाहते आहोत. " तरीही भारावल्या जनसामान्यांनी त्यांना आपल्या रांगड्या मनाच्या कप्प्यात शिवरायांच्या लगीनं मानलं होतं हे अनेक सूर्यप्रकाशवत बोलक्या घटनांनी सिद्ध केलं आहे. वानगीदाखल त्यातील एकच अशी घटना पुरेशी आहे की मराठवाड्यातील एका ठार अडाणी व वृद्ध अशा मराठमोळ्या, कष्टकरी बाईशी निगडित आहे.

यशवंतराव त्या वेळी बीड जिल्ह्यात केजजवळ दौऱ्याच्या प्रवासात होते. त्या वेळी तर ते फक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीच होते. त्यांच्या गाड्यांचा तांडा नेहमी-प्रमाणे अंतर ठेवून चालला होता. एका निरुंद पुलाजवळ एक जाम म्हातारी बाई शेजारी बहुधा नातवंडांना घेऊन निर्धारानं उभी होती. ती मंत्र्यांच्या गाड्यांना धीरानं पुढं होत थांबण्याची इशारत करीत होती. एस्कॉर्टच्या एक

दोन गाडया तिला न जुमानता पुढं गेल्या. यशवंतरावांनी ती म्हातारी आपल्यासाठीच थांबली असावी हे अचूक हेरून गाडी थांबवायला सांगितले. ते गाडीतून बाहेर उतरणार नव्हते. श्रीपादराव डोंगरे या आपल्या सचिवांना म्हणाले, " श्रीपादराव, त्या बाईचं म्हणणं काय आहे बघा बघू. " सचिवांनी उतरून तिच्याजवळ जात तशी चौकशी केली. म्हातारीचे केस काही केवळ उन्हाच्या धगीनं पांढरे झाले नव्हते. ती ठणकावत बोलली, " तुम्हापैकी यशवंतराव म्हन्तेला कोन ? त्येला म्होरं घ्या. " श्रीपादराव फार समजदार सचिव होते. त्यांनी साहेबांना बाईचा निरोप आपल्या कार्यालयीन अदबीनं सुधारून सांगितला. " बाई आपणालाच भेटायचं म्हणतात साहेब ! "

यशवंतराव उतरले. बाईसमोर जाऊन दोन्ही हात जोडून–वाकून अत्यंत नम्रपणे म्हणाले, " मीच यशवंतराव आई..., बोला काय गाऱ्हाणं आहे ? " महाराष्ट्राचा सामान्यातून सरसावत मुख्यमंत्री झालेला राजा कमालीच्या आस्थापूर्ण आदबीनं म्हणाला.

कानशिलाकडनं डोळ्यांच्या सुरकुत्यांचं थकलेलं जाळं आक्रसत त्या अनाम कुणबाऊ म्हातारीनं महाराष्ट्राचं समोर उभं ठाकलेलं ' बलवंत ' ' यश ' डोळाभर निरखलं. मग म्हातारी रांगडया मराठवाडी बोलीत ठणकारली, " गाऱ्हानं न्हाई ल्येकरा माजं काई ! ह्यो तुझ्या ल्येकराबाळास्नी खाऊ वायसाटनं उबी हाय कवा धरनं ! "

– आणि म्हातारीनं कमरेजवळ खोचलेली कापडी पिशवी बाहेर खेचून – तिच्यातून बंदा रुपाया काढला आणि तो महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हातावर ठेवून त्याची अलाबिला घेत त्या रस्त्यावर आपल्या कानशिलाजवळ आपली निरागस, निरामय बोटं कटाकट मोडली ! !

यशवंतरावांसह सगळ्यांच्या अंगावर काटाच सरकविला असेल त्या बंदा रुपयानं. त्यांनी वाकून रस्त्यावरच म्हातारीला नमस्कार केला, आणि काहीच न बोलता ते गाडीत येऊन बसले. कितीतरी आत्ममग्न होत आपल्याच विचारात गढलेले.

यशवंतरावांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून एका अनाम वृद्धेकडून आपणाला नसलेल्या लेकराबाळांच्या खाऊसाठी संतांच्या भूमीवर तो रुपया स्वीकारला होता !

भावप्रधान यशवंतरावांचं उभं जीवन अशा कितीतरी रसवाळ्या व जिवंत अशा मराठमोळ्या रांगडेपणानं शिगोशीग भरलेलं होतं. त्यांचे अभ्यासपूर्ण तरी सहजपणे अवतरलेलं व्याख्यान ऐकणं हा स्मरणीय अनुभव असे. त्यांच्या स्वभावाला धरूनच त्यांचे वागणे व बोलणे होते. तशी खरेतर मराठी भाषा तिच्या भूप्रदेश व माणसांप्रमाणे रांगडी आहे. फव्वारती आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार विषयावर बोलताना तर ती पट्टीच्या वक्त्यालाही केव्हा रूक्षतेकडं घेऊन जाईल याचा नेम नाही. पण यशवंतरावांचं कुठल्याही व्यासपीठावरचं व्याख्यान कधीच रूक्ष व सत्वहीन झालं नाही. वेळेचं अचूक अवधान हे त्यामागचं एक सुप्त असं त्यांचं म्हणून सूत्रबद्ध शास्त्र होतं. राजकीय व सामाजिक व्यासपीठापेक्षा ते साहित्यिक व्यासपीठावर अधिक रंगून जायचे. अधिक खोलीनं व खेळीमेळीत प्रकट व्हायचे.

त्यांची साहित्यिक व्यासपीठावरची अनेक व्याख्यानं गाजली. त्यांचं नकळतच आतलं असं सूत्र असे. ते नव्या, तरुण व साहित्यवकूब असलेल्या प्रतिभा-वंतांना दिलखुलास व मन भरून निकोप असं प्रोत्साहन देत. अनेकदा म्हणूनच मी म्हणतो की राजकारणानं आमच्या मराठी साहित्य-दरबारातील दोन जबरे लेखक केव्हा लाटून नेले ते समजलंच नाही. ते म्हणजे यशवंतराव व नानासाहेब गोरे.

यशवंतराव साहित्याच्या व्यासपीठावर स्वतःला हरवून किती रंगून जात हे बघणं हाही एक जिवंत अनुभव होता. कॉंटिनेंटल प्रकाशनचे साक्षेपी प्रकाशक अनंतराव कुलकर्णी यांनी छत्रपती शिवराय हे यशवंतांचं महाकाव्य पुण्यात १९६८ साली बालगंधर्व रंगमंदिरात यशवंतरावांच्या हस्ते प्रकाशित केलं. कॉंटिनेंटलचा तो जाहीर असा पहिलाच समारंभ असल्यानं सर्व कॉंटिनेंटलकरांनी त्याचं भव्य असं आयोजन केलं होतं.

त्या दिवशी व्यासपीठावर कुसुमाग्रज, भाऊसाहेब खांडेकर, कवी यशवंत, हरिभाऊ पाटसकर अशा दिग्गजांच्या मखरात यशवंतराव अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून मध्यभागी बसले होते. पुरं बालगंधर्व छत्रपती शिवरायांवरील "महाकाव्य", रचनाकार कवी यशवंत व काव्यावर बोलणारे कवी कुसुमाग्रज व भाऊसाहेब अशा दुर्मिळ मेळामुळं खचाखच तुडुंबलं होतं. साहित्यातील झाडून सारं आघाडीचं क्रीम उपस्थित होतं. प्रेक्षकांत पहिल्या रांगेतच पु. ल.,

ना. सी. फडके, ग. दि. मा., द. र. कवठेकर असे आमंत्रित साहित्यिक बसले होते.

छत्रपती शिवराय या महाकाव्यावर व एकूणच काव्यावर कुसुमाग्रज फारच छान बोलले त्या दिवशी. त्या अगोदर भाऊसाहेब खांडेकरांचेही कवी यशवंतांच्या रविकिरण मंडळातील आठवणी सांगणारं, अत्यंत दुर्मिळ संदर्भ देणारं रंगतदार भाषणही झालं होतं.

शेवटी अध्यक्ष म्हणून यशवंतराव काय बोलतात यासाठी जमलेल्या महाराष्ट्रातील निवडक वक्ते, साहित्यिक व शिवप्रेमींची उत्सुकता कमालीच्या शिगेला पोचली. ही खरे तर यशवंतरावांच्या वक्तृत्वकलेचीच कसोटी होती.

––आणि त्या दिवशी यशवंतरावांनी आपल्या आयुष्यातील एक अविस्मरणीय व्याख्यान व तेही अगदी सहजपणे दिलं. वीस वर्षांनंतरही त्यांनी त्या वेळी पहिलंच जे वाक्य व ज्या सफाईदार मराठमोळ्या बोलीत उच्चारलं होतं ते आजही मला स्पष्ट आठवतं ! रिवाजाचं सर्व प्रास्ताविक आपल्या नेहमीच्या ऐटदार ढंगात करून यशवंतराव त्या वेळी म्हणाले होते—

" मैतरणी बिगी बिगी चाल—असं म्हणत महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात भटकणारे रांगडे कवी यशवंत आज शिवप्रभूंच्यावर हे समर्थ महाकाव्य रचून महाकवींच्या दालनात जाऊन बसलेत याचा त्यांचा चाहता म्हणून मला आज अतिशय आनंद होत आहे ! "

त्यांच्या ह्या सहज व रास्त अशा पल्लेदार वाक्यानं क्षणभर सलामीच्याच टाळ्या घेतल्या ! ती सुरुवातच अगदी अनपेक्षित होती.

" न्याहरिचा वकुत होईल—
मैतरणी बिगी बिगी चाल "

ह्या कवी यशवंतांच्या एका गाजलेल्या गीताच्या ' मुखड्याच्या ओळी ' जमलेल्या रसिकांच्या स्मृतिकोषातून त्यांनी तरारून अशा एकाकू जबरदस्त वाक्यात खेचून बाहेर घेतल्या होत्या. आपल्या त्या जवळ जवळ विस्मृत गीताचा एवढा वाजवी व रोकडा प्रत्यय प्रत्यक्ष यशवंतरावांनी सहज दिलेला पाहून साक्षात कवी यशवंतांनीच सद्गदित होऊन चष्मा काढून डोळे टिपल्याचे अनेकांनी पाहिले. यशवंतरावांनी ती कसोटीची सभा सहज जिंकली.

त्या सलामीच्या लढतींनंतर उभे बालगंधर्व सुमारे तासभर कान टवकारून

यशवंतरावांच्या तोंडून राजाराम कॉलेजच्या आठवणी, ४२ चा लढा, शिवरायांच्या चारित्रातले दुर्मिळ संदर्भ नुसतं ऐकतच राहिलं त्या दिवशी...उतांच्या पंख्यांची घरघरही तेव्हा स्पष्ट ऐकू येत होती. इतकी शांतता, हास्य-विनोद धरून मध्येच आपोआप पसरत होती. खरोखरीच तो प्रकाशन समारंभ एक दुर्मिळ असा साहित्यिक अनुभव होता.

अभिजात साहित्यिकाचंच रसिक मन यशवंतरावांत जन्मजातच वावरत होतं. महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात शिकत असतानाच अनेक नाटके कोल्हापूरच्या भोसले नाट्यगृहात पिटात बसून यांनी पाहिली होती. औंधच्या दाजी गुरवांचा लयदार पखवाज ऐकण्यात अनेक रात्री रंगविल्या होत्या. त्यांनी शाहीर शंकरराव निकम, पिराजीराव सरनाईक, सिद्राम मुचाटे यांचे रसरशीत पोवाडे समोर बसून अनेकदा ऐकले होते. बेचाळीसच्या मंतरलेल्या व भूमिगत काळातील यशवंतरावांच्या, शाहीर निकम यांच्या व शाहीर औंधकर ऊर्फ ग. दि. माडगूळकर यांच्या बैठकींचा उल्लेख तिघेही आवर्जून करीत. होय. ४२ च्या दंगलमय–चैतन्यदायी काळात गदिमा ‘ शाहीर औंधकर ’ म्हणून प्रसिद्ध होते !

ही चोखंदळ रसिकता यशवंतरावांच्या बाबतीत मूलभूत त्यांच्या ठायी असलेल्या निखळ देशप्रेमाच्या व जनप्रेमाच्या हातात हात घालून ऐन धामधुमीच्या काळातही नांदत होती आणि हेच त्यांचं आगळेपण होतं. त्या काळातही अंदमानहून परतलेले थोर क्रांतिकारक व पतितपावन हे सर्व जमातींसाठी देशातील पहिले मंदिर उठविणारे थोर क्रियाशील भारतभक्त म्हणून ते स्वा. सावरकरांना रत्नागिरीला जाऊन भेटून आले होते. सावरकर त्या वेळी भारतकीर्त नेते असल्याने या भेटीची व्हावी तेवढी चर्चा तेव्हा व नंतरही झालेली नाही. आज वास्तविक ती व्हायला हवी. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील स्पष्ट कलंक आहे, हे मानणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्याबद्दल यशवंतरावांठायी अत्यंत सच्चा व सार्थ असा आदरभाव होता. मॅट्रिकला असतानाच त्यांनी शाळकरी वयात हरिजनांसाठी शाळा काढली होती. त्या वेळी तिच्या उद्घाटना-साठी यशवंतरावांनी कऱ्हाडात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना आवर्जून आणलं होतं. सामाजिक अनिष्ट रूढींनी पछाडलेला समाज शिकून ज्ञानी व्हावा ही यशवंतरावांची केवळ करुणा भावाची धारणा नव्हती, तर अभ्यासातून,

अनुभवातून आखलेली ती मानवतेची कास धरणारी अत्यंत बलिष्ठ अशी विचारधारा होती. यासाठी महाराष्ट्रासारख्या विशाल व कृषि-औद्योगिक दृष्ट्या झपाट्यानं पुढे झेपावणाऱ्या भू-प्रदेशाचे मुख्यमंत्रिपद ही ' की-पोस्ट ' त्यांनी वेळोवेळी आपली खंबीर शब्द भरीला घालून पूर्ण अकरा वर्षे श्री. वसंतराव नाईक या सुविद्य अशा वंजारा समाजातील प्रशासनकुशल नेत्याच्या हाती हेतुतः सोपविली होती.

यशवंतरावांचे महाराष्ट्रासाठी जे सखोल असे ' समाजहितैषीपण ' खुलून व उभरून आले ते १ मे १९६० पासून. ते जेव्हा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेऊन कार्य व कर्तव्यबद्ध झाले तेव्हापासून.

आजचा सहकाराची कास धरून आर्थिक आघाडीवर किमान सुस्थिर झालेला महाराष्ट्र ही यशवंतरावांची वैचारिक कमाई आहे. पुढचा इतिहास हे त्यांचे कार्य डावलूच शकणार नाही.

आजचा शैक्षणिक दृष्ट्या अंग धरलेला नागरी व ग्रामीण महाराष्ट्र ही यशवंतराव व बाळासाहेब देसाई यांची दूरदृष्टी आहे. बाळासाहेबांच्या बाराशेच्या आतील उत्पन्नाच्या शिकाऊ मुलांना मोफत शिक्षण या क्रांतिकारक कायद्याला यशवंतरावांनी पाठबळच दिलं. त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी दिलेली अनुदानं योग्य मानली.

आजचा शासकीय विकेंद्रीकरणाचा महाराष्ट्र ही यशवंतरावांची एक जीवनपूर्ती साधू बघणारी स्वप्नसृष्टी होती. त्या सृष्टीत त्यांना अपेक्षेएवढं यश आलं नाही. तरीही लोकशाही महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात पोचू शकली हे सत्य नाकारता येणार नाही.

हाती कर्तुमकर्तुम सत्ता असली म्हणजे माणसं जनप्रिय होतातच असे नाही. उलट ती बऱ्याच वेळा अपेक्षाभंगापोटी जनरोषाला पात्र ठरतात. यशवंतराव राजकीय क्षेत्रात ' प्रिय ' राहिले की नाही हा त्यामुळे अत्यंत गौण मुद्दा ठरतो. ते महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या नागरी आणि ग्रामीण अशा दोन्ही सामान्य जनांचे मात्र अत्यंत प्रिय नेता आणि तेही शेवटपर्यंत राहिले.

एक साहित्यिक म्हणून त्यांच्याशी माझा जो व्यक्तिगत संबंध आला तो अत्यंत अकृत्रिम, आत्मीय ऋणानुबंधाचा व केवळ अविस्मरणीय ऋजुभावांचा आहे. त्यांना भेटताना मला कधीच दडपण वाटलं नाही इतकी जिवलग आत्मीयता

त्यांच्या विचारपुशीत व हस्तांदोलनात असे.

"छावा"चं पूजन त्यांच्या सारस्वत शिवहस्तेच करायचं हे मी ती कथावस्तू बांधायला सुरुवात करतानाच मनोमन ठरवलं होतं.

१९७९ साली छाव्याचं फक्त अखेरचं एक प्रकरणच लिहायचं बाकी असताना मला स्कूटरचा तीव्र अपघात झाला. उपचारासाठी तेव्हा जसलोकमध्ये दाखल होण्यापूर्वी मी पत्नीला– सौ. मृणालिनी सावंत हिला– छाव्याचं 'शेवटचं' प्रकरण अत्यंत निर्धारानं डिक्टेट केलं होतं.

मी जसलोकमध्ये असतानाच कॉंटिनेंटलच्या अनंतराव कुलकर्णी यांनी 'छावा' छापून सिद्ध करून मला पत्र लिहिलं– "तुमच्या बोलण्याप्रमाणे आता तुम्ही हॉस्पिटलमधूनच पूजनासाठी साहेबांना विनंतिपत्र लिहा. ते नक्की येतील."

त्याप्रमाणे मी दिल्लीला एक साधं पोस्टकार्ड जसलोकमधून साहेबांना लिहिलं. आशय मोजकाच पण बोलका होता– "कदाचित माझं हे शेवटचं पुस्तक असेल. ते हाती घेतानाच आपल्या हस्तेच त्याचं पूजन व्हावं हा निर्धार केला होता. आपण अवश्य पुण्याला यावं व कृपया या पुस्तकाचं पूजन करावं."

–यशवंतरावांनी अत्यंत आपुलकीच्या, प्रेमळ व वडिलधाऱ्या जाणतेपणानं दिल्लीहून पुण्याला परस्पर येऊन अत्यंत साधेपणानं कॉंटिनेंटलच्या कार्यालयात छाव्याचं पूजन केलं. त्या पूजनाला मी उपस्थित नव्हतो. माझ्या पत्नीची व दोन्ही मुलांची काळजीपूर्वक चौकशी करताना यशवंतरावांच्या चर्येवर उठलेले गांभीर्याचे भाव आजही त्या वेळच्या त्यांच्या फोटोत स्पष्ट दिसतात.

छाव्यासाठी एवढीच कर्तव्याची भावना त्यांनी मानली नाही. पुस्तक छपाई, मुखपृष्ठ, बांधणी असं पूर्ण सिद्ध होताच मी पुन्हा त्यांना लिहिलं या 'छाव्याची' पहिली प्रत तुमच्या हस्ते प्रतापगडच्या तुळजाभवानीच्या चरणा-वर वाहिल्याशिवाय मी व प्रकाशक ती वाचकांच्या हाती देणार नाही. पुन्हा साहेबांचं पत्र आलं– "मी अमक्या तारखेला कऱ्हाडला येतो आहे. परस्पर प्रतापगडावर येईन. तुम्ही अनिरुद्ध यांच्यासह प्रत घेऊन प्रतापगडावर यावं, आपण ती भवानी चरणी वाहू."

'छावा'च्या संदर्भात यशवंतरावजींशी असलेला ऋणानुबंध एवढा दृढ

सन्न होता की शेवटच्या क्षणी प्रतापगडावर घडलेलं नाट्य मी आणि कॉंटि-नेंटलचे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी कधीच विसरू शकणार नाही.

आम्ही दोघे ऐन उन्हाळ्यात गाडी घेऊन वेळेवर प्रतापगड गाठावा म्हणून पुण्याहून गेलो खरे. पण तरीही थोडा वेळ झालाच. आम्ही प्रतापगडाच्या पायऱ्या भराभर चढून, केदारेश्वराचं मंदिर मागे टाकून भवानीच्या मंदिराच्या समोरील आवारात कसेबसे आलो आणि दोघेही क्षणभर थांबलोच. आमच्या धावपळीवर पाणी पडायचीच वेळ स्पष्ट समोर दिसत होती. साहेब भवानीचं दर्शन घेऊनच मंदिराबाहेर पडून पायात बूट सरकवितांना दिसत होते !

आम्ही पार नाराज झालो. आता कसले ते पुन्हा मंदिरात फिरतात ? आपली ही प्रतापगडवारी फुकट झाली–असे बोलतच आम्ही त्यांना गाठलं. त्यांनी आम्हाला बघताच प्रश्न केला, " छावा आणलाय ? "

" होय " अनिरुद्धनं उत्तर देत–झटकन पुस्तकाचं रॅपर खोलत ती लाभाची पहिली प्रत त्यांच्या हाती दिली. कसदार, अनुभवी साहित्यिकानं हाताळावं तसं ते पुस्तक हळुवार हाताळत महाराष्ट्राचं " बलवंत " " यश " आकाशबोलीत बोललं–" सुंदर पुस्तक छापलंय अनंतरावांनी. शिवाजीराव, हे मोठंच काम करण्याचं भाग्य लाभलंय तुम्हाला. "

मी वाकून त्यांना भवानी मंदिराच्या दारातच नमस्कार करून म्हणालो, " भवानीच्या पायांवर ही पहिलीच प्रत वाहून ती आपणाला द्यायची आहे साहेब ! "

" छा...न—चला ! " म्हणत ते मंदिरात जाण्यासाठी हातात तशीच छाव्याची प्रत घेऊन माघारी वळले. मी आणि अनुरुद्धनं पूर्ततेचे निःश्वास टाकले.

प्रतापगडावर छाव्याची प्रत तुळजाभवानीच्या शिवकर व विमल चरणावर स्वहस्ते ठेवून तिच्यावर हळदकुंकू व फुले वाहून भवानीला क्षणभर आजवर आपल्या उदंड नजारे पाहिलेल्या सोशिक डोळ्यांत त्या जगन्मातेला समजावून घेत–भोवतालच्या आम्हा सर्वांना विसरून साहेबांनी डोळे मिटले व हात जोडले.

काही सेकंद ते महाराष्ट्राचे " बलवंत " " यश " तसेच निःस्तब्ध राहिले.

त्या वेळी त्यांच्या शेजारीच भवानीसमोर असताना विचार आला होता की– " या क्षणी साहेब कसला विचार करीत असतील ? शिवरायांचा ? सजा भोगणाऱ्या शंभूराजांचा ? की भवानीलाच आपल्या कसदार बोलीत त्यांनी साकडे घातले असेल–की जीवन जे लाभले ते शिवशंभोच्या निष्ठेने तुझ्या पायीच तर ह्यातभर ठेवीत आलो. पुढे आभाळात सूर्य-चंद्र असेतो कोठेही लाभो–ते महाराष्ट्रातच लाभो–जगन्माते सदैव सेवेचे बळ दे ! "

आज तर ते महाराष्ट्राचे " बलवंत " " यश " लौकिकाच्या अर्थाने सरले आहे. यशवंत बलवंत चव्हाण ऊर्फ असंख्यांचे साहेब देहाने तुम्हा–आम्हात नाहीत. मात्र ज्या वैचारिक सामर्थ्याला ते सदैव अमर व अजर मानत आले त्या रूपाने ते कधीच अदृश्य होऊ शकत नाहीत. त्यांच्या त्या रूपालाच सादर विनम्र श्रद्धांजली !

# ४

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार

## एस्. एम्. जोशी

संयुक्त महाराष्ट्राचे घटक राज्य स्थापन झाल्याला आता पंचवीस वर्षे झाली. हे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. मी संयुक्त महाराष्ट्र समितीचा सरचिटणीस होतो. त्यामुळे अनेक वर्तमानपत्रांच्या आणि नियतकालिकांच्या प्रतिनिधींनी माझ्या मुलाखती घेतल्या. त्यांपैकी बऱ्याच प्रतिनिधींनी मला एक खास प्रश्न विचारला; हे सारे महाभारत होऊन गेले. संयुक्त महाराष्ट्र झाला. महागुजरातही झाला. मागे वळून पाहता तुम्हाला या लढ्यात भाग घेतल्याबद्दल पश्चात्ताप होत नाही काय?

त्यांच्या प्रश्नाचा रोख सध्या जी मराठी व मराठीतर अशी संकुचित भावना वाढत आहे तो असावा किंवा महाराष्ट्रामध्ये विशिष्ट जातीच्या हाती सत्ता एकवटू पाहते आहे, त्याला अनुलक्षून असावा. मी मात्र ठणकावून सांगत असे की संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मी जे प्रयत्न केले त्याबद्दल जागतेपणीच काय पण स्वप्नातदेखील मला पश्चात्ताप झालेला नाही.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे मला दु:ख झाले. कारण आता संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामुळे सुरू झालेली समाजपरिवर्तनाची प्रक्रिया अशीच पुढे चालू ठेवण्याचे काम करू शकेल असा एक समर्थ नेता आम्ही हरवून बसलो आहो. समितीने एक ऐतिहासिक कार्य केले, यात वाद नाही.

महाराष्ट्रातील सर्व जाति-जमातींच्या लोकांना एका झेंडयाखाली आणून सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला चालना दिली. एक अनुकूल वातावरण निर्माण केले. यापुढील कार्य करण्याची जबाबदारी यशवंतरावांवर येऊन पडली. त्यासाठी लागणारी योग्यता आणि गुण त्यांच्या ठिकाणी होते असे माझे मत आहे. जातीय भावनेपासून पूर्णतया मुक्त असा पुढारी आज तरी मिळणं कठीण आहे. पण सर्व जातिजमातींना बरोबर घेऊन वाटचाल करणारा आणि जातिद्वेष वाढू नये अशी खबरदारी घेणारा नेता महाराष्ट्राला हवा आहे. यशवंतरावांचा तसा प्रयत्न होता. त्यांनाच ते शक्य होते.

संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांना स्व. माडखोलकर यांनी सरळच प्रश्न केला की, हे राज्य मराठ्यांचे होणार काय? तेव्हा यशवंतरावांनी देखील तितक्याच मोकळेपणाने सांगितले की हे राज्य मराठ्यांचे नाही तर मराठी जनतेचे होणार आहे. महात्मा फुल्यांच्यापासून केशवराव जेधे यांच्यापर्यंत महाराष्ट्रात जी चळवळ झाली तिचा आशय प्रामुख्याने समाजपरिवर्तनाचा होता. सामाजिक समतेच्या ध्येयाकडे नेणारे ते आंदोलन होते. सन १९२० च्या आसपास तिला ब्राह्मणेतरांची ब्राह्मणविरोधी चळवळ असे स्वरूप आले होते. पण मूलतः अन्यायाविरुद्ध ती चळवळ होती. स्वर्गीय केशवराव जेधे यांना पहिली कारावासाची शिक्षा झाली ती त्या चळवळीतच झाली होती. याची पुरेशी जाणीव आजच्या तरुण पिढीला दिसत नाही. यशवंतरावांना ती सारी परिस्थिती अवगत होती. काही वर्षांखाली केशवराव जेध्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरामध्ये एक सभा आयोजित केली होती. त्या सभेचे अध्यक्ष यशवंतराव आणि मी प्रमुख वक्ता होतो. मी माझ्या भाषणामध्ये केशवरावांच्या पहिल्या तुरुंगवासाचा उल्लेख केला. त्यांची चळवळ प्रामुख्याने सामाजिक समतेसाठी होती. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रातील शोषित आणि पीडित जनतेचा पाठिंबा होता. बहुजन समाजाचे पुढारीपण लाभले होते. केशवरावांचे एक चरित्र अजून प्रसिद्ध झालेले नाही याबद्दल मी माझी खंत व्यक्त केली.

यशवंतरावांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये माझ्या सूचनेचा उल्लेख केला आणि त्याला आपला पाठिंबा दिला. महात्मा फुले आणि केशवराव जेधे यांनी पुढाकार घेऊन चालविलेले समाजपरिवर्तनाचे कार्य चालू राहिले पाहिजे

असे आवर्जून सांगितले. सुदैवाने त्यानंतर डॉ. य. दि. फडके यांनी परिश्रम-पूर्वक लिहिलेले केशवरावांचे चरित्र प्रसिद्ध झाले. बहुजन समाजाचे दु:ख, दैन्य आणि दारिद्र्य दूर केले पाहिजे, याची जाणीव यशवंतरावांना होती. म्हणूनच "समाजवादी भारतामध्ये समाजवादी महाराष्ट्राचे स्वप्न" ते पाहू शकत होते. त्यासाठी लागणारा विशाल दृष्टिकोण आणि औदार्य यशवंतरावांच्या ठिकाणी होते, असे माझा अनुभव मला सांगतो.

महाद्वैभाषिकाच्या आणि तदनंतरही समितीचा चिटणीस म्हणून मी विधानसभेमध्ये काम करीत असे. पहिल्या वर्षी तर मी विरोधी पक्षाचा अधिकृत नेता म्हणूनच आपली जबाबदारी पार पाडीत होतो. मी पुण्याच्या शुक्रवार पेठ मतदारसंघातून निवडून आलो होतो. शुक्रवार पेठ एका विशिष्ट कारणासाठी कुप्रसिद्ध आहे. त्याच पेठेमध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या भगिनींची वस्ती आहे. पेशवे काळी ती 'बावनखणी' म्हणून उल्लेखली जात होती. माझ्या निवडणुकीच्या प्रचारात मी त्या भगिनींना देखील भेटलो होतो. त्यांनी ही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा एक पुढारी म्हणून मला मतदान केले होते. मी त्यांच्या मतावर निवडून आलो आहे असा छद्मीपणाने एका काँग्रेसच्या सदस्याने आपल्या भाषणात उल्लेख केला आणि काही लोक उपरोधिकपणाने हसले. मी लगेच उठून सांगितले की तुम्ही म्हणता ती गोष्ट खरी आहे. त्या भगिनींनी मला मते दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्या देखील माझ्या भगिनीच आहेत. त्यांना या समाजात पोट भरण्यासाठी हा व्यवसाय करावा लागावा याबद्दल मात्र मी शरमिंदा आहे.

यशवंतराव त्या वेळी सभागृहामध्ये नव्हते. थोड्याच वेळात ते आले आणि त्यांनी माननीय सदस्यांच्या त्या भाषणाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. ही घटना लहानशी असली तरी त्यातून यशवंतरावांच्या मानवतावादी विशाल अंत:करणाची आणि औदार्याची प्रचीती येऊन गेली. सर्व जातिजमातींच्या लोकांना बरोबर घेऊन पुढे जाण्याची त्यांची मनोमन इच्छा होती. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतरची एक घटना मला राहून राहून आठवते. महात्मा गांधींच्या हत्येनंतर महाराष्ट्रामध्ये ब्राह्मणांच्या घरांची जाळपोळ झाली. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सरकारने कर्जे दिली होती. पण बऱ्याच कर्जदारांना कर्जाची परतफेड करता आली नव्हती. त्यांच्यापैकी काही मंडळींनी मला सांगितले की, आम्ही निम्म्या-

पेक्षा अधिक कर्ज परत केले आहे, पण आता आमची शक्ती संपली आहे. आम्हाला सूट देण्यासाठी काही खटपट करा. म्हणून मी यशवंतरावांना सुचविले की ज्यांनी निम्याहून अधिक रक्कम परत केली असेल त्यांना उरलेल्या बाकीची सूट द्यावी. त्यांनी थोडा वेळ विचार केला आणि ते म्हणाले, " असे कशाला? आपण सर्वच कर्ज माफ करून टाकू." त्यांचा हा निर्णय आणि त्याची अंमलबजावणी बरेच काही सांगून जाते.

विधानसभेतर्फे राज्यसभेवर प्रतिनिधी पाठवायचा प्रश्न होता. रिपब्लिकन पक्षाचे नेते स्वर्गीय दादासाहेब गायकवाड यांना यशवंतरावांनी आपल्या पक्षाच्या सदस्यांची मते देऊन निवडून आणले. बहुजन समाजातील अगदी खालच्या स्तरावर जीवन जगत असलेल्यांना संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न होता. विधानसभेतील विरोधी पक्षाचा नेता म्हणून मी काम करीत होतो. त्या वेळी त्यांनी मला मानाने वागवले. विरोधकांना विश्वासात घेऊन निरनिराळे प्रश्न सोडविण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न असे. पुण्याच्या दैनिक प्रभातचे संपादक स्व. बालचंद कोठारी यांनी एकदा विधानसभेची बदनामी होईल असा अग्रलेख लिहिला. कोणीतरी विधानसभेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न उपस्थित केला. प्रिव्हिलेजेस कमिटी बनविण्यात आली. समितीला कोठारींना दोषमुक्त करणे शक्यच नव्हते, परंतु ते दोषी ठरले तरी त्यांना शिक्षा काय करावी हा प्रश्नच होता. कमिटीच्या सदस्यांमध्ये यशवंतरावांच्या पक्षाचे बहुमत होते. तरीही परिस्थितीचे गांभीर्य ओळखून यशवंतरावांनी रात्री मला फोन करून चर्चा केली व माझा सल्ला घेतला. प्रतिष्ठेचा भंग झाला असला तरी कोठारींना जबर शिक्षा करू नये, मामुली तंबी देऊन प्रश्न मिटवावा असा मी विरोधकांच्या वतीने सल्ला दिला आणि तो त्यांनी मानला. आश्चर्य असे की, कोठारींनी देखील मला पत्र पाठवून त्यांना दोषी ठरवले असले तरी तो निर्णय चळवळीच्या हिताच्या दृष्टीनेच घेतला गेला आहे ही गोष्ट मान्य केली.

त्यांच्या पक्षाचे बहुमत असले तरी शक्य तोवर सहमती करूनच निर्णय घेण्याचा त्यांचा प्रयत्न असे. सर्वांना बरोबर घेऊन प्रगतिपथावरून वाटचाल करण्याचे त्यांचे धोरण होते. सामाजिक समतेच्या ध्येयाकडे जाण्यासाठी आणि लोकशाही दृढमूल करण्याच्या दृष्टीने त्यांचे हे धोरण अतिशय उपयुक्त होते. निरनिराळ्या जाति-जमातींच्या आणि उच्चनीचतेच्या दुष्ट कल्पनांवर आधारलेल्या समाजात

लोकशाही दृढमूल करण्यासाठी त्या धोरणाचीच गरज आहे.

चीनच्या आक्रमणानंतर यशवंतरावांची भारताचे संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला असे त्या घटनेचे वर्णन करण्यात आले. परंतु यशवंतराव दिल्लीस गेले तरी महाराष्ट्र राज्यातील सत्ताधाऱ्यांनी त्यांचेच नेतृत्व मान्य केले होते. त्यांच्या पश्चात दादा कन्नमवार आणि वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनीही यशवंतरावांचेच धोरण चालू ठेवले. १९७२ साली दुष्काळाची आपत्ती आली. तिला सर्वांनी मिळून यशस्वीपणे तोंड दिले. विशेष म्हणजे शोषित आणि पीडित ग्रामीण जनतेसाठी रोजगार हमी योजना सर्वसंमतीने पास करण्यात आली. आज त्या योजनेची प्रशंसा देशभर होत आहे. त्या योजनेमुळेच शेतमजुरांना, दलितांना आणि आदिवासींना घटनेने दिलेल्या लोकशाही हक्कांसाठी खंबीरपणे उभे राहण्यासाठी एक साधन उपलब्ध झाले आहे. इतःपर शासन जर सहानुभूतीने वागणारे असेल तर त्यांना बहिष्कृत करून व शेतावर काम देण्याचे नाकारून जमीनमालक त्यांची उपासमार करू शकणार नाहीत.

तळागाळातल्या लोकांना स्वाभिमानाने जीवन जगण्याची संधी कशी उपलब्ध करून देता येईल हीच मुख्य समस्या आहे. आज मात्र वारे उलट्या दिशेने वाहात आहेत असे वाटते. आपल्या घटनेने मागासवर्गीयांसाठी प्रातिनिधिक संस्था, सरकारी अथवा तत्सम प्रकल्प आणि शाळा-कॉलेजांमध्ये राखीव जागांची योजना करून ठेवलेली आहे. बरीच वर्षे शिक्षणातील मागासलेपणामुळे मागासवर्गीयांना या सवलतीचा फायदा घेता येत नव्हता. आता कुठे त्यांची शैक्षणिक पात्रता वाढू लागल्यामुळे त्यांना या सवलतीचा थोडाफार लाभ मिळू लागला आहे. पण त्यामुळे उच्च वर्णीयांना आपली संधी गेल्यासारखे वाटते. त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होऊन वैषम्य वाढत आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात मागासवर्गीयांसाठी आपण काही तरी त्याग केला पाहिजे ही जाणीव होती. पण आता प्रत्येक मनुष्य आपल्या स्वार्थाचा विचार करू लागला आहे. सामाजिक कर्तव्याची जाणीव लुप्त झाल्यासारखी दिसते. त्यामुळे तथाकथित उच्चवर्णीयांचा असंतोष हिंसाचाराने देखील व्यक्त होऊ लागला आहे. गुजरातमध्ये आज जी दंगल चालू आहे तिची सुरुवात राखीव जागाविरोधी आंदोलनाने झाली. पुढे जाता त्याला जातीय दंग्याचे स्वरूप येऊ लागले. फौजेचे साहाय्य घेऊन देखील

राज्यकर्त्यांना कायदा आणि सुव्यवस्था राखणे अशक्य होऊन बसलेले दिसते. बहुजन समाजातील व्यक्तींच्या हाती राजसत्ता आली तरी निवडणुकीच्या वेळी दिलेली अभिवचने आणि घोषित केलेले धोरण अमलात आणता येईलच असे नाही. विरोधकांनी हिंसाचाराचा अवलंब करून अराजकाची परिस्थिती निर्माण केली तर काय करायचे ? असा प्रश्न पडतो. या अगतिकतेचे मुख्य कारण मागासवर्गीय समाजाची बहुसंख्या असली तरी त्यांच्यामध्ये पुरेशी जागृती नाही आणि म्हणून संघटनाही नाही. प्रस्थापितांचे समर्थ वर्ग अल्पसंख्य असूनही जागृत असल्यामुळे मतलबीपणाने त्यांची सहज दिशाभूल करू शकतात. प्रसिद्धीची साधने त्यांच्या हाती आहेत, त्याचा वापर करून आणि प्रसंगी संकुचित जातीय भावनेला प्रोत्साहन देऊन ते मागासवर्गीय सत्ताधाऱ्यांना नामोहरम करू शकतात. मागासवर्गीयांमध्ये जागृती कशी करायची आणि प्रतिगामी शक्तींच्या दादागिरीला वेसण कशी घालावी हाच आजचा ज्वलंत प्रश्न आहे. या समस्येला जर तोंड देता आले नाही तर संयुक्त महाराष्ट्राच्या आन्दोलनातून गतिमान झालेली समाजपरिवर्तनाची प्रक्रिया कुंठित झाल्याशिवाय राहणार नाही. लोकशाही बेगडी होऊन बसेल म्हणूनच आजच्या घटकेला यशवंतराव चव्हाणांची अनुपस्थिती तीव्रतेने जाणवते.

मंडल आयोगाच्या शिफारशींना त्यांचा विरोध नव्हता, असे माझ्या मित्राने सांगितले. तेव्हा मी म्हणालो की, त्यांचा विरोध असणे शक्यच नाही. उच्चवर्णीयांची आणि धनवानांची दादागिरी कशी असते ते त्यांनी पाहिले होते. म्हणूनच त्यांना सवर्ण गोरगरिबांचा पाठिंबा होता. त्यांना मिळणाऱ्या सवलतींना ते कसा विरोध करतील ? सर्वांना बरोबर घेऊन पुढे जायचे आणि सामाजिक आणि आर्थिक समता निर्माण करावयाची अशी त्यांची जिद्द होती. समाजवादी भारतामध्ये समाजवादी महाराष्ट्राचे त्यांचे स्वप्न होते. गुजरातमध्ये आज जे अराजक माजून राहिले आहे त्यावरून प्रतिगामी शक्ती हिंसाचाराचा वापर करू शकतात. इतकेच काय पण त्याला ' आहेरे ' समाजाची मूक अनुमती देखील मिळवू शकतात, हे सिद्ध होते. यशवंतराव हयात असते तर त्यांनी या संकटाला कसे सामोरे जायचे ते दाखवून दिले असते. सत्ताधारी काँग्रेसला आणि मागासवर्गीयांना या घटकेला त्यांची विशेष आवश्यकता होती. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्राची आणि म्हणूनच देशाची फार मोठी हानी झाली असे वाटते.

५

# ध्येयनिष्ठ नेता– यशवंतराव

रामभाऊ जोशी

समर्थांची चतु:सूत्री मनात ठेवून विसाव्या शतकात राजकारण प्रधान यशस्वी राष्ट्रप्रपंच करणाऱ्या नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण हे अग्रगण्य नेते होते. आयुष्याची एकाहत्तर वर्षे ' जीवनाचा अर्थ ' शोधण्याचीच वाटचाल त्यांनी केली. संपूर्ण जीवनाला काही अर्थ असू शकतो का अशासंबंधीचे प्रश्न त्यांच्या मनात अनेकदा उद्भवले असण्याची शक्यता आहे. तसं पाहिलं तर त्यांच्या जीवनाच्या सारीपटावर अनेक अर्थ उद्भवले, चमकले आणि अवकाशात विलीनही झाले. तरीही जीवनाचा त्यांचा शोध सुरूच राहिला.

यशवंतरावांच्या जीवनात अनेकविध अनुभवांची, अवस्थाभेदांची संख्या वाढली. संख्या वाढली तशी संपन्नताही वाढली. परंतु जेव्हा अनुभवात संग्रह, समन्वय, संबद्धता, संगती इत्यादींची गुणवत्ता वाढली तेव्हाच याची साक्ष अंतर्मनात उमटली.

जीवनाची धडपड काहीतरी प्राप्त करण्यासाठी असते. जीवनाच्या प्रारंभीच्या काळात यशवंतरावांची धडपड, खटपट, देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झाली. स्वातंत्र्योत्तर काळात स्वराज्याचे सुराज्य बनविण्यासाठी होत राहिली. निरनिराळ्या व्यक्ती, तत्त्व, अर्थ त्यांनी आपल्या जीवनाला जोडण्याचा प्रयत्न केला आणि संपूर्ण जीवनावर त्याची प्रतिक्रिया उमटत राहिली.

यशवंतरावांच्या विचारकोषात जीवन हाच जीवनाचा अर्थ होता. वयक्तिक जीवन हेच त्याचे ध्येय. लोकसत्ताक जीवनाचा अर्थही वैयक्तिक जीवन असाच करावा लागतो. लोकसत्ताक राष्ट्रीय जीवनात प्रत्येक व्यक्ती ही सत्तेचे श्रेष्ठ असे केंद्रच आहे. राष्ट्रसत्तेचे उगमस्थान, उत्कर्षस्थान, मानवमात्रच आहे. उत्कर्ष साधणारी शक्तीही तीच आणि उच्छेद करणारीही तीच. लोकसत्ता म्हणजे लोकांची सत्ता हे खरे असले तरी अनेकांची एकावरील सत्ता मात्र नव्हे. लोकसत्तेचा खरा अर्थ व्यक्तिमात्राची स्वत:वरील पूर्ण सत्ता, प्रत्येक व्यक्तीचे स्वत:पुरते संपूर्ण स्वातंत्र्य.

भारतीय लोकराज्यात, लोकशाहीत, यशवंतरावांनी प्रत्येक व्यक्ती हीच श्रेष्ठ सत्तेचे केंद्र मानले. संपूर्ण स्वातंत्र्याचा अधिकारबिंदू राहील असेच अभिप्रेत धरले. लोकशाही म्हणजे समूहशाही नव्हे, किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य संपुष्टात आणणारी कंपूशाही नाही याची जाण त्यांनी स्वतः सातत्यानं ठेविली आणि ही जाण ठेवलीच पाहिजे असं जाहीरपणानं आवर्जून प्रतिपादन केले.

यशवंतराव हे ध्येयवादी, ध्येयनिष्ठ आणि ध्येयप्राप्तीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी केलेले देशनिष्ठ नेते होते. लोकशाही किंवा सामुदायिक सत्ता याचा ' अनेकनिष्ठ एकात्मता ' असाच अर्थ त्यांनी सांगितला. कंपूशाहींचा अहंकार आपल्या जीवनात निर्माण होऊ नये यासाठी समूहनिष्ठेचा परीघ ते सतत वृद्धिंगत करीत राहिले. त्यामुळे त्यांना वैयक्तिक आणि कंपूशाहीच्या अहंकाराची बाधा होऊ शकली नाही. देशाची, सगुणाची, म्हणजेच माणसाची आणि त्यासाठी ध्येयाची उपासना ते आजन्म करीत राहिले.

देशसेवा म्हणजे काय ? असं कोणी विचारलं तर त्यांचं सांगणं असे की देशाची, देशातील लोकांची सेवा. तीच उपासना देशाची आणि म्हटलं तर देवाचीही !

यशवंतराव महाराष्ट्राच्या मातीत जन्मले आणि वाढले. देश आणि देव यात अंतर नाही अशी राष्ट्रसंतांची शिकवण लाभलेली ही भूमी. यशवंतरावांचा वैयक्तिक आणि राजकीय प्रपंच इथेच सुरू झाला. त्यांनी प्रपंचही केला आणि राजकारणही केलं. परंतु राजकारणाशिवाय केलेला प्रपंच हा खरा प्रपंच नव्हे ही राष्ट्रसंतांची शिकवण त्यांच्या मनीमानसी रुजलेली असावी. ' प्रपंची जाणे राजकारण ! ' ही सज्जनगडची शिकवण त्यांची मार्गदर्शिका बनली. ही शिकवण

त्यांच्या ठिकाणी जागृत होती, जिवंत होती. देशसेवेचं बोट धरून त्यांची वाटचाल अखंड सुरू राहिली ती त्यामुळेच होय.

राजकारणाचा प्रपंच करताना, दुसऱ्याचं अंतःकरण जाणावं लागतं. वैयक्तिक प्रपंचाचं जे, तेच राजकारणाच्या प्रपंचाचं. समय ओळखावा लागतो, अडचणीत न सापडण्याची खबरदारी घ्यावी लागते. प्रसंगी नम्र व्हावं लागतं, लोकांची पारख करावी लागते. दोष अवगुणांत दडवावे लागतात. विरोधकांशी त्यांच्याच शस्त्रानं लढावं लागतं. तसं करणं कित्येकदा अवश्यच असतं. दूरदर्शीपणानं काही कयास बांधावे लागतात आणि पुन्हा सर्वांना बरोबर घेऊन पुढं जावं लागतं. यशवंतरावांनी हे सारं केलं. देशाचं सुख समोर ठेवून यथामति, यथाशक्ति, असं आचरण करण्यावर त्यांचा कटाक्ष राहिला. हा कटाक्ष पाळून राजकारणात, कार्यकर्त्यांना योग्य ते मार्गदर्शन, उपदेश करण्याचं महत्त्वाचं कामही केलं.

हे सारं घडलं. पण हे कसं आणि कशानं घडलं याच्या तपशिलात शिरलं की विचाराशी येऊन थांबावं लागतं. विचारानं यशवंतरावांची किंवा यशवंतरावांनी विचारांची अहर्निश सोबत केली. त्यांचं कर्तृत्व उदयाला आलं, चमकलं आणि स्थिर बनलं हे त्याचंच फळ मानलं पाहिजे. तरीपण विचार म्हणजे वाचनानं, अध्ययनानं मेंदूत साठवलेले विचार आणि त्यामुळे असं काही घडलं असं मानता येणार नाही. तसं पाहिलं तर वाचनानं, अध्ययनानं विचारवंत बनलेले पुष्कळ असू शकतात. परंतु कित्येकदा असंही आढळतं की, विशाल विचार मेंदूत जमा झालेले आहेत पण त्यांची हृदयाशी ताटातूट झालेली कायमच आहे. वास्तवात ते विचार अवतरलेले नाहीत. याचा अर्थ असा की, विशाल विचाराची स्वप्नं साकार करावयाची तर त्यासाठी वेगळीच कला आत्मसात करावी लागते, लागत असावी. यशवंतरावानी ही कला चांगलीच आत्मसात केलेली असली पाहिजे.

यशवंतरावांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जी स्वप्ने उरीपोटी बाळगली होती ती बहुतांशी साकार केलेली आढळतात. म्हणजेच त्यांनी आपले विचार मेंदूत अडकवून ठेवलेले नव्हते. ते रक्तात भिनवले. देशाच्या स्वातंत्र्याचे आणि देशातील लोकांना सुखी करण्याचे विचार क्रांतिवीरांच्या सर्वांगात, रक्तात भिनल्यानेच ते आपले स्वप्न साकार करू शकले. क्रांतिवीर असो वा यशवंत-

यशवंतरावांच्या विचारकोषात जीवन हाच जीवनाचा अर्थ होता. वयक्तिक जीवन हेच त्याचे ध्येय. लोकसत्ताक जीवनाचा अर्थही वैयक्तिक जीवन असाच करावा लागतो. लोकसत्ताक राष्ट्रीय जीवनात प्रत्येक व्यक्ती ही सत्तेचे श्रेष्ठ असे केंद्रच आहे. राष्ट्रसत्तेचे उगमस्थान, उत्कर्षस्थान, मानवमात्रच आहे. उत्कर्ष साधणारी शक्तीही तीच आणि उच्छेद करणारीही तीच. लोकसत्ता म्हणजे लोकांची सत्ता हे खरे असले तरी अनेकांची एकावरील सत्ता मात्र नव्हे. लोकसत्तेचा खरा अर्थ व्यक्तिमात्राची स्वतःवरील पूर्ण सत्ता, प्रत्येक व्यक्तीचे स्वतःपुरते संपूर्ण स्वातंत्र्य.

भारतीय लोकराज्यात, लोकशाहीत, यशवंतरावांनी प्रत्येक व्यक्ती हीच श्रेष्ठ सत्तेचे केंद्र मानले. संपूर्ण स्वातंत्र्याचा अधिकारबिंदू राहील असेच अभिप्रेत धरले. लोकशाही म्हणजे समूहशाही नव्हे, किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य संपुष्टात आणणारी कंपूशाही नाही याची जाण त्यांनी स्वतः सातत्यानं ठेविली आणि ही जाण ठेवलीच पाहिजे असं जाहीरपणानं आवर्जून प्रतिपादन केले.

यशवंतराव हे ध्येयवादी, ध्येयनिष्ठ आणि ध्येयप्राप्तीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी केलेले देशनिष्ठ नेते होते. लोकशाही किंवा सामुदायिक सत्ता याचा ' अनेकनिष्ठ एकात्मता ' असाच अर्थ त्यांनी सांगितला. कंपूशाहींचा अहंकार आपल्या जीवनात निर्माण होऊ नये यासाठी समूहनिष्ठेचा परीघ ते सतत वृद्धिंगत करीत राहिले. त्यामुळे त्यांना वैयक्तिक आणि कंपूशाहीच्या अहंकाराची बाधा होऊ शकली नाही. देशाची, सगुणाची, म्हणजेच माणसाची आणि त्यासाठी ध्येयाची उपासना ते आजन्म करीत राहिले.

देशसेवा म्हणजे काय? असं कोणी विचारलं तर त्यांचं सांगणं असे की देशाची, देशातील लोकांची सेवा. तीच उपासना देशाची आणि म्हटलं तर देवाचीही !

यशवंतराव महाराष्ट्राच्या मातीत जन्मले आणि वाढले. देश आणि देव यात अंतर नाही अशी राष्ट्रसंतांची शिकवण लाभलेली ही भूमी. यशवंतरावांचा वैयक्तिक आणि राजकीय प्रपंच इथंच सुरू झाला. त्यांनी प्रपंचही केला आणि राजकारणही केलं. परंतु राजकारणाशिवाय केलेला प्रपंच हा खरा प्रपंच नव्हे ही राष्ट्रसंतांची शिकवण त्यांच्या मनीमानसी रुजलेली असावी. ' प्रपंची जाणे राजकारण ! ' ही सज्जनगडची शिकवण त्यांची मार्गदर्शिका बनली. ही शिकवण

त्यांच्या ठिकाणी जागृत होती, जिवंत होती. देशसेवेचं बोट धरून त्यांची वाटचाल अखंड सुरू राहिली ती त्यामुळेच होय.

राजकारणाचा प्रपंच करताना, दुसऱ्याचं अंतःकरण जाणावं लागतं. वैयक्तिक प्रपंचाचं जे, तेच राजकारणाच्या प्रपंचाचं. समय ओळखावा लागतो, अडचणीत न सापडण्याची खबरदारी घ्यावी लागते. प्रसंगी नम्र व्हावं लागतं, लोकांची पारख करावी लागते. दोष अवगुणांत दडवावे लागतात. विरोधकांशी त्यांच्याच शस्त्रानं लढावं लागतं. तसं करणं कित्येकदा अवश्यच असतं. दूरदर्शीपणानं काही कयास बांधावे लागतात आणि पुन्हा सर्वांना बरोबर घेऊन पुढं जावं लागतं. यशवंतरावांनी हे सारं केलं. देशाचं सुख समोर ठेवून यथामति, यथाशक्ति, असं आचरण करण्यावर त्यांचा कटाक्ष राहिला. हा कटाक्ष पाळून राजकारणात, कार्यकर्त्यांना योग्य ते मार्गदर्शन, उपदेश करण्याचं महत्त्वाचं कामही केलं.

हे सारं घडलं. पण हे कसं आणि कशानं घडलं याच्या तपशिलात शिरलं की विचाराशी येऊन थांबावं लागतं. विचारानं यशवंतरावांची किंवा यशवंतरावांनी विचारांची अहर्निश सोबत केली. त्यांचं कर्तृत्व उदयाला आलं, चमकलं आणि स्थिर बनलं हे त्याचंच फळ मानलं पाहिजे. तरीपण विचार म्हणजे वाचनानं, अध्ययनानं मेंदूत साठवलेले विचार आणि त्यामुळे असं काही घडलं असं मानता येणार नाही. तसं पाहिलं तर वाचनानं, अध्ययनानं विचारवंत बनलेले पुष्कळ असू शकतात. परंतु कित्येकदा असंही आढळतं की, विशाल विचार मेंदूत जमा झालेले आहेत पण त्यांची हृदयाशी ताटातूट झालेली कायमच आहे. वास्तवात ते विचार अवतरलेले नाहीत. याचा अर्थ असा की, विशाल विचाराची स्वप्नं साकार करावयाची तर त्यासाठी वेगळीच कला आत्मसात करावी लागते, लागत असावी. यशवंतरावानी ही कला चांगलीच आत्मसात केलेली असली पाहिजे.

यशवंतरावांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जी स्वप्ने उरीपोटी बाळगली होती ती बहुतांशी साकार केलेली आढळतात. म्हणजेच त्यांनी आपले विचार मेंदूत अडकवून ठेवलेले नव्हते. ते रक्तात भिनवले. देशाच्या स्वातंत्र्याचे आणि देशातील लोकांना सुखी करण्याचे विचार क्रांतिवीरांच्या सर्वांगात, रक्तात भिनल्यानेच ते आपले स्वप्न साकार करू शकले. क्रांतिवीर असो वा यशवंत-

रावांसारखा शांतिवीर असो, त्याला विचार हा रक्तापर्यंत पोहोचवावाच लागतो. तरच तो विचार त्याच्या जीवनाला ऊब आणतो. यशवंतरावांनी विचारांचं बी रक्तात भिजत घातलं, रक्तमांसाच्या चिखलात रुतवलं, त्यामुळेच त्याला कोंब फुटले आणि कालांतराने डेरेदार बनलेल्या वृक्षानं फळ धरलं. ज्यांच्या ज्यांच्या कर्तृत्वानं फळ धरलं त्यांच्याबद्दलची इतिहासाची अशीच साक्ष आहे.

देश स्वतंत्र व्हावा, देशातील सर्व लोकांना सुख लाभावे यासाठी काहीतरी करावे असे विचार यशवंतरावांच्या मेंदूत उद्भवले ते त्या काळातील वाचनामुळे. श्रेष्ठ विचारवंत नेत्यांचे विचार ऐकल्यामुळे, त्यातूनच त्यांनी कामाचा वसा घेतला. अनेकांशी बोलत राहिले. चर्चा करीत राहिले. स्वत: विचारही करू लागले. त्या काळात विचार आणि विकार याचा झगडा मनात वाढत राहिला. परंतु पुढे पुढे बोलून विचार करावा 'यापेक्षाही विचार करूनच बोलावे असा त्यांच्या मनाचा पिंड बनला. मेंदूतील विचारांचा नकळत हृदयाशी मिलाफ होऊ लागला. देशाच्या सुखाचा विचार रक्तातच सर्वत्र पसरण्याची प्रक्रिया यातून घडली असली पाहिजे. विचार, उच्चार आणि आचार यांची संगती हे त्या प्रक्रियेतून निर्माण झालेले यशवंतरावांचे सहज स्वरूप म्हणावे लागते. अशा सहज स्वरूपातून नीतीची मूर्तीही मूर्त रूप धारण करू लागते.

यशवंतरावांच्या संदर्भात नेता आणि नीती हे दोन शब्द समोर आले की विचारचक्राला वेगळीच गती मिळते. नेतृत्वाचा अर्थ काय ? खरा नेता कोण ? लोकशाहीत नेत्याचे, नेतृत्वाचे स्थान आणि मान कोणते ? असे अनेक प्रश्न समोर गर्दी करतात. नेता, नेतृत्व हे शब्द अलीकडे बरेच घसरडे झाले आहेत. खरं म्हणजे, लोकांना योग्य तऱ्हेनं, योग्य ठिकाणी नेतो तो नेता. उदात्त उदाहरण घालून देणे, प्रगल्भ प्रात्यक्षिक निर्माण करणे म्हणजे नेतृत्व करणे होय. नेता हा सर्वांच्या पुढे, अग्रभागी असावा लागतो. सर्वांच्या अगोदर त्याने तेथे पोहचावे लागते आणि शेवटपर्यंत त्याला थांबावे लागते. नेता सर्वांच्या वर असतो तो श्रेणीने. सर्वांच्यावर म्हणजे त्यांच्या डोक्यावर नव्हे. तसा तो डोक्यावर राहील तर तो ज्यांचे नेतृत्व करतो, त्यांच्या आशा-आकांक्षा पायदळी तुडविल्या जाण्याची भीती असते आणि असे झाले म्हणजे ते नेतृत्व चेष्टेचा विषय बनते. प्रसंगी संपुष्टात येते. यशवंतरावांचे नेतृत्व प्रसंगोपात्त टीकेचा विषय बनले असेल पण ते कधी चेष्टेचा विषय झाले नाही. याचं कारण

त्यांनी नेतृत्वाची जागा लोकांच्या समोरची राखली. डोक्यावरची नव्हे. लोकांच्या समोर राहून त्यांच्या आशा-आकांक्षांचा आदर केला. त्या अधिकात अधिक फलद्रूप होतील याचा अहर्निश ध्यास घेतला.

लोकशाहीत जो नेता लोकांशी संलग्न राहून लोकांचा आणि स्वतःचा आत्मविकास घडवितो त्यालाच लोक आराध्य दैवत मानतात. लो. टिळक, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. आंबेडकर, म. जोतिबा फुले हे या श्रेणीचे नेते झाले. लोक हे त्यांनी आराध्य दैवत मानले आणि लोकही त्यांना अराध्य दैवत मानू लागले. भारतीय लोक, लोकसंख्या आणि हे नेते यांच्यात खरेखुरे तादात्म्य नांदले. यशवंतरावांच्या बाबतीत नेमकी हीच वस्तुस्थिती आढळते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशाशी, लोकांशी ते तादात्म्य पावले. नंतरच्या काळात उभयपक्षी हे तादात्म्य एकरूप बनले. कारण देश, देशातील लोक, लोकशाही यावरील त्यांची श्रद्धा इतकी दृढमूल झाली की व्यक्ती म्हणून त्यांच्यात वेगळे-पणाची भावनाच उरली नाही.

श्रद्धा ही एक अशी शक्ती आहे की, अढळ आणि निस्सीम श्रद्धा मानवाला सर्वस्वाचा स्वाहाकार आनंदाने करण्यास सिद्ध बनवते. व्यक्तिगत आणि सार्व-जनिक, राजकीय जीवनात संघर्षाचे, जीवननिष्ठा दोलायमान करणारे प्रसंग यशवंतरावांच्या जीवनात घडोघडी निर्माण होत राहिले. घटना शिजल्या, परंतु त्या प्रत्येक वेळी जीवननिष्ठा अधिक मजबूत, बळकट करण्याची त्यांनी ती एक संधी मानली. संघर्षांवर, संकटांवर स्वार होत राहिले. लोकशाहीवरील, लोकांवरील श्रद्धेच्या बळावर, राष्ट्रनिष्ठा, समूहनिष्ठा, मानवतेवरील निष्ठा, समाजपरिवर्तनावरील निष्ठा, जीवननिष्ठेपासून अलग होऊ दिली नाही, एरवी ते जीवन निर्माल्य बनले असते.

यशवंतरावांनी नेतृत्वाचे थोर आदर्श भारतीय समाजासमोर व्यक्तिगत वागणुकीतून ठेवले हा तर इतिहासच आहे. परंतु त्याचबरोबर नेता हा नीतिमान असलाच पाहिजे, हा आदर्शही त्यांनी प्रत्यक्ष आचरणाने देशासमोर, जगासमोर ठेवला. हे सदासर्वकाळ स्वीकारार्ह असेच आहे. आयुष्यभर सद्गुणाचे कण वेचण्याचा, साठवण्याचा आणि बहुतांना वाटण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला.

राजकारणात, सामाजिक जीवनात पन्नास-पंचावन्न वर्षांचा प्रदीर्घ काळ व्यतीत केलेल्या यशवंतरावांच्या जीवनाची समीक्षा करणं हे तसं पाहिलं तर

समीक्षकांना आणि इतिहासलेखकांना एक आगळं आव्हान आहे असं म्हटलं तर ते अतिशयोक्तीचं ठरू नये. राजकारणी यशवंतराव आणि व्यक्ती यशवंतराव अशी त्यांच्या जीवनाची दोन रूपं. परंतु ती पूर्णतः एकवटलेली आढळतात. व्यक्ति-जीवनाचा आसर त्यांच्या राजकीय जीवनावर किती आणि कसा पडला आणि राजकीय जीवन व्यक्तिगत जीवनाला छेद देण्याइतपत प्रभावी बनले काय हा निश्चितच संशोधन करून निष्कर्षाप्रत येण्याचा विषय आहे.

लोक हे ज्यांनी ज्यांनी आराध्य दैवत मानले आणि आराध्य दैवत म्हणून लोकांनी ज्यांचा स्वीकार केला त्यांच्या जीवनाचा, जीवनकार्याचा शोध घेताना, इतिहास लिहिताना एकारलेल्या भूमिकेतून करण्याचा प्रयत्न क्वचितच आढळतो. ज्यांनी कुणी तसा प्रयत्न केला ते फसले. एकांगीपणाने लिहिलेला इतिहास, इतिहास या संज्ञेस पात्र ठरत नाही. समतोल न्याय देण्यातील अभाव हे त्याचे प्रमुख कारण.

ज्येष्ठ ठरलेल्या व्यक्तींचे सामाजिक, राजकीय, लोकजागृतीचे, लोकहिताचे, लोकांच्या जीवनाला स्पर्श करणारे, प्रेरणा देणारे कार्य जेवढे केवढे महत्त्वाचे आणि इतिहासाचा विषय ठरणारे असते तेवढेच त्यांचे व्यक्तिजीवन, चारित्र्य, नीतिनिष्ठा, सदाचार, विद्वत्ता, बुद्धिनिष्ठा, विचारप्रगल्भता, दूरदर्शित्व महत्त्वाचे असते. इतिहासकारांनी या पैलूंचा शोध घेणे, अभ्यास करणे आवश्यक ठरते. कारण एकाचा परिणाम दुसऱ्यावर आणि दुसऱ्यावरून पहिल्याची परीक्षा अशी ही सांगड असते.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, म. जोतिबा फुले आदी आदर्श पुरुषोत्तमांचे व्यक्तिरेखाटन करताना, कर्तृत्व रेखाटताना, इतिहासकारांना समतोल राखावाच लागतो. तसा तो राखल्यामुळे देशात उदयास येणाऱ्या नव्या पिढीला या व्यक्तींच्या आदर्शांपासून अव्याहत प्रेरणा मिळत राहिली. मिळत राहणार आहे. छत्रपतींचा ज्वाज्वल्य राष्ट्राभिमान, धर्माभिमान, शौर्य, मुत्सद्दीपणा, लोकसंग्रह, न्यायप्रियता त्याचबरोबर, नीतिमत्ता, व्यक्तिगत चारित्र्य, निरहंकारी वृत्ती, लोकमान्य टिळक आणि म. गांधी यांची स्वातंत्र्याची तळमळ, त्यासाठी लोकजागृती, सर्वस्व समर्पणाची तयारी, स्वत्व आणि समानतत्व यासाठी आग्रह, निःस्वार्थ, निरपेक्ष आचार आणि त्याचबरोबर लोकमान्यांनी स्वतः आचरलेला आणि गीतारहस्याच्या

माध्यमातून लोकांसमोर ठेवलेला धर्मग्रंथ, म. गांधींची सत्याचरण व अहिंसा-पालनाची निष्ठा आणि या सर्वांचा जनमानसावर ठसलेला प्रभाव यांची सांगड इतिहासकारांना घालावीच लागते. म. फुले यांच्या बाबतीतही मागासांची सेवा, दलितांची सेवा, गरीब शेतकऱ्यांची सेवा, शिक्षण उपलब्ध करून देण्याचा हव्यास याचबरोबर शुद्ध विचार, शुद्ध चारित्र्य, निरलस कर्तृत्व यांचीही सांगड घातलीच पाहिजे. ज्यांचे संपूर्ण जीवन हेच सद्गुणांची, सद्विचारांची, सत्-कृत्यांची सांगड बनलेले असते त्यांचा अशा अंगाने असा विचार करणे किंवा तसा इतिहास रेखाटणे अन्यायकारक नव्हे का ?

यशवंतरावांच्या जीवनाची समीक्षा करताना समीक्षकांना आणि इतिहासकारांना आव्हान आहे ते याच संदर्भात. कारण त्यांच्याही जीवनात व्यक्तिगत गुणसंपदा, चारित्र्यसंपन्नता, बुद्धिनिष्ठा, लोकसंग्रह, देशनिष्ठा, नीतिमत्ता आणि राजकारणी व्यक्तिमत्त्व यांची बेमालूम सरमिसळ झालेली आढळते. एकाच आम्रवृक्षाने दिलेल्या आम्रफळांची ही निपज वाटते. एक फळ गोड आणि एक आंबट अशी निपज एकच आम्रवृक्ष कधी करीत नाही. ज्याने रुची चाखायची त्याला फळाची पक्वता पारखण्याची जबाबदारी मात्र स्वीकारावी लागतेच. पारखच कच्ची असेल तर फळाचं माधुर्य चाखायला मिळणार नाही आणि ते उमजणारही नाही.

समस्यांचे आव्हान स्वीकारणे आणि त्या समस्या सोडविणे यांचा अव्याहत क्रम म्हणजे जीवनविकास असे म्हटले जाते. यशवंतरावांच्या जीवनात जन्मा-पासून एकापाठीमागून एक हाच क्रम आढळतो. ज्यांच्या जीवनाचा शोध घ्यावा, महत्ता अजमावण्याचा प्रयत्न करावा अशा आधुनिक भारतात, राष्ट्रीय जीवनात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेल्या ज्या थोड्या व्यक्ती आहेत त्यांत यशवंतराव ठळकपणे आहेत. त्यांचा म्हणून स्वतंत्र इतिहास घडला आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्वानं तो घडविला आहे. अशा श्रेष्ठ विचारवंत, कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनाची समीक्षा केवळ राजकारणी यशवंतराव एवढ्यापुरतीच करण्याने त्या समीक्षेला पूर्णता अशी कधीच येणार नाही. किंबहुना ती एकारलेली भूमिका ठरेल. समग्र यशवंतराव असे दर्शन घडवायचे तर राजकारणी यशवंतराव आणि व्यक्ती यशवंतराव अशी ती बेरीज आहे. समीक्षकांना, इतिहासकारांना हे भान ठेवावे लागणार आहे. अन्यथा एकांगी लेखन, विचारमंथन म्हणजे त्यांच्यावर आणि इतिहासावरही अन्याय केल्यासारखे होण्याचा धोका आहे. अर्थात

समीक्षकांचा, इतिहासलेखकांचा शासनकाटा, तोलकाटा समतोल राहीलच याची तरी काय शाश्वती ! आपण फक्त अपेक्षा करावी इतकेच !

राजकारणी यशवंतराव व्यक्तिशः आणि राष्ट्राच्या कठीण प्रसंगातही काँग्रेस पक्षाच्या प्रमुख प्रवाहापासून कधी बाजूला झाले नाहीत. काँग्रेसची एक, दोन, तीन छकले झाली, मतभेद झाले, तपशील बदलले, पक्षावर व्यक्तिनिष्ठेच्या आपत्ती कोसळल्या आणि जाणत्या माणसांनी त्याचा खेळ केला तरी या सर्व अवस्थांमध्ये यशवंतराव लोकगंगेपासून बाजूला झाले नाहीत. याचा अर्थ कुणी ' संधिसाधू ' असा केला असेल, करोत बापडे ! काँग्रेस पक्ष हा देशातील बहुसंख्याकांचा पक्ष आहे, ती एक बहुजनांची चळवळ आहे ( मास मुव्हमेंट ), याचं यशवंतरावांना भान होतं. मनात दुहेरी भावना नव्हत्या. त्याचबरोबर एकाकी व्यक्ती कसलाच विकास करू शकत नाही, स्वतःचा नाही आणि लोकांचाही नाही याचं यशवंतरावांचं भान पक्कं होतं. लोकशाहीच्या वर्तुळात एकदा स्वतःला झोकून दिलं म्हणजे त्यानंतर त्या वर्तुळापासून आपण निराळे होऊ शकत नाही, राहू शकत नाही; तसे झाले तर स्वत्वच नष्ट होण्याची भीती आहे. ध्येयापासून अलग पडण्याचा धोका असतो हे उमजण्यातही त्यांच्या बुद्धीची प्रगल्भता, परिपक्वता निश्चितच होती. त्यामुळे स्वातंत्र्याचे, लोकशाहीचे होमकुंड, यज्ञकुंड देशात धगधगल्यापासून किंवा धगधगल्यानंतर त्यातलाच एक निखारा बनून ते राहिले, ते काही संधिसाधू म्हणून नव्हे ! यज्ञकुंड धगधगत राहावे यासाठी. यज्ञकुंडातून बाहेर पडतो तो एकटा निखारा धगधगत राहू शकत नाही. त्याची राख होते. यशवंतरावांना स्वतःची राख होऊ द्यावयाची नव्हती. त्यांना जी राख अपेक्षित होती ती संकुचित भावनांची, क्षुद्रतेची. यशवंतरावांनी ती पूर्वीच करून टाकली आणि संघटनेच्या समूहाच्या महान यज्ञात सातत्याने जळत राहून आपले आणि राष्ट्राचे जीवन तेजस्वी करावयाचे हाच ध्यास धरून राहिले. जीवन समृद्ध बनल्यामुळेच हा निर्णय ते करू शकले. सावधानतेने करू शकले.

राजकारणप्रधान राष्ट्रप्रपंच ( पॉलिटिक्स ) करताना ' सावध ' असावेच लागते. हे ' सावध 'पण सर्वांविषयीच ठेवावे लागते. जोडीला साक्षेप—अत्यंत ज्वलंत साक्षेपही ठेवावा लागतो. राजकरणी असणं वेगळं आणि साक्षेपी राजकारणी असणं वेगळं. यशवंतराव हे सर्वकाळ सबध, साक्षेपी राजकारणी असल्याबद्दलची

लोकमान्यता त्यांनी संपादन केली होती. तरीपण राजकारण म्हणजेच सारं जीवन असं त्यांनी कधी मानलं नाही. तसं आचरण केलं नाही.

यशवंतराव ' सावध ' नेते होते तरी त्यांचं व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व मात्र एकारलेलं राहिलं नाही. सामाजिक कार्यातून आणि विचारातून त्यांची प्रगमन-शील जीवनदृष्टी फुलत गेली. राजकीय, सामाजिक विचारप्रणालीचा त्यांनी मन:पूर्वक अभ्यास केल्याने त्यांचा वैचारिक पिंड समृद्ध बनला. दृष्टिकोण विस्तारला. व्यक्तित्व आणि नेतृत्व याचा पाया पक्का झाला. ते कुशल प्रशासक होते. तरबेज संसदपटू म्हणून त्यांनी मान्यता मिळविली. राष्ट्रीय आपत्ती उद्‌भवली असता आपल्या कणखर, तत्त्वनिष्ठ क्षमतेचं प्रत्यंतर आणून देणारा पल्लेदार दृष्टी लाभलेला नेता म्हणून भारताच्या अभ्युदयाचे आशास्थान म्हणूनच सर्व धर्मांच्या, पंथांच्या, पक्षांच्या लोकांनी त्यांच्या निर्णयाकडे दृष्टी रोखून ठेवली. ते स्वत: सांप्रदायिक, संकुचित विचाराचा स्वीकार करण्यापासून दूर राहिले. व्यक्तीची मूलभूत प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य यावरील विश्वास आणि निष्ठा आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांनी अभंग ठेविली. ज्ञानाच्या उपासनेतून सामाजिक क्रांतीला जाणीवपूर्वक चालना देऊन समाजपरिवर्तनाचं ध्येय गाठण्यासाठी राबणारा आणि बहुजन समाजापर्यंत सुखाचा प्रकाश पोहोचवून समाजाला सुखाच्या मार्गानं वाटचाल करावयास उद्युक्त करणारा, प्रेरणा देणारा अभ्यासू, दूरदर्शी, मुत्सद्दी, समाजवादी अग्रगण्य लोकनेता हीच ध्येयनिष्ठ यशवंतरावांची भारतीय लोकमानसातील प्रतिमा आहे.

देशनिष्ठा, बुद्धिनिष्ठा, नीतिनिष्ठा, ध्येयनिष्ठा आणि या सर्वांना ओलांडून जाणारी जन्मजात मातृनिष्ठा असं हे यशवंतरावांच्या जीवनाचं पंचामृत आहे. यातील एकेक अलग करून किंवा एकत्रितपणे, कसंही चाखलं तरी मधुरता सारखीच !

ॐ

६

# आधुनिक महाराष्ट्राचा युगपुरुष

## पद्मश्री शामराव कदम

महाराष्ट्राने देशाला जी बलदंड कर्तृत्वाची माणसं दिली त्यांत यशवंतराव चव्हाणांचे स्थान अग्रगण्य आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अलौकिकत्व लाभलेले जे राष्ट्रीय नेते सर्वमान्य ठरले त्यांतही यशवंतराव यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळींचा स्वराज्य- मागणीसाठी एकत्रित विचार करणारे जितके नेते महाराष्ट्रात झाले तितके देशाच्या अन्य प्रांतात झालेले नाहीत ही अनेक विचारवंतांनी मान्य केलेली वस्तुस्थिती आहे. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्राचे व मुंबईचे योगदान सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. लो. टिळकांच्यासारखा लोकोत्तर नेता, म. गांधींनी ज्यांना गुरुस्थानी मानले ते गोपाळ कृष्ण गोखले, न्या. महादेव गोविंद रानडे, म. जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही महाराष्ट्राने देशाला दिलेली काही अलौकिक माणसे. त्याचबरोबर निरनिराळ्या क्षेत्रात कीर्तिवंत ठरलेले अनेकजण महाराष्ट्रातच घडले आणि वाढले. मुंबई हे तर अनेकांचे कार्यक्षेत्र राहिले. अशा अनेक द्रष्टया आणि ज्येष्ठ मार्गदर्शकांच्या कार्याने पुनित झालेल्या या मंगलभूमीत समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा एक धुरंधर द्रष्टा राजकारणी म्हणून यशवंतराव चव्हाणांनी मिळविलेले महत्त्वपूर्ण स्थान कुणीही नाकबूल करणार नाही. स्वातंत्र्यपूर्वकाळात म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोडले तर

ग्रामीण भागातून पुढे आलेले नेतृत्व म्हणून यशवंतरावांच्याच नेतृत्वाचा उल्लेख करावा लागेल. अर्थात केशवराव जेधे, शंकरराव मोरे, बापूसाहेब लाड, नाना पाटील इ. नेत्यांचा उल्लेख करणे या ठिकाणी आवश्यक असले तरी देशभर कीर्तिवंत ठरलेला सर्वमान्य नेता फक्त यशवंतरावांच्याच रूपाने अवतीर्ण झाला ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल.

तशी यशवंतरावांची कौटुंबिक परिस्थिती राजकारणास पूरक नव्हती. त्यांचे बालपण व शालेय शिक्षण अतिशय हलाखीच्या परिस्थितीत आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे आयुष्य एकाअर्थी दारिद्र्यातच गेले. 'कृष्णाकाठ'-मधील त्यांच्या आठवणी वाचल्या तर किती विषम आणि प्रतिकूल परिस्थितीस त्यांना तोंड द्यावे लागले याची कल्पना येते. आईच्या संस्कारने सुसंस्कारित झालेले मन घेऊन यशवंतराव खेड्यापाड्यातील शतकानुशतके खुरटलेल्या ग्रामीण जीवनाचे हाल उघड्या डोळ्यांनी पाहात होते. प्रत्यक्ष तशाच परिस्थितीत राहून आपल्या शिक्षणाची आवड अत्यंत कठीण परिस्थितीस तोंड देत पूर्ण करून घेत होते. हा विद्यार्थिदशेतील संघर्षाचा काळ यशवंतरावांना अनेक गोष्टी शिकण्यासाठी उपयोगी ठरला. ग्रामीण भागातील जनतेच्या दु:खावर फुंकर घालण्यासाठी या तप्त अनुभवाचे भांडवल त्यांना उपकारक ठरले. आपल्या दैन्याचा व दु:खाचा प्रत्यक्ष साक्षीदार व भागीदार असलेला माणूस महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेने प्रेमादराने आणि कौतुकाने आपला नेता म्हणून स्वीकारला. कारण महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर सर्वंकष नेतृत्व देण्याचे सामर्थ्य फक्त त्यांच्यातच दिसले. महात्मा जोतिराव फुले यांनी अनेक सामाजिक प्रश्न घेतले, ग्रामीण भागातील जनतेच्या दैन्याची मीमांसा केली, त्यावर उपायही सुचविले, परंतु समाजाचे राजकीय नेतृत्व त्यांना करता आले नाही आणि तो त्यांच्या जीवनधारणेचा भागही नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जरी सामाजिक चळवळीचे प्रणेते होते तरी त्यांचे नेतृत्व दलितांपुरतेच मर्यादित राहिले. राजर्षी शाहू महाराजांनी पश्चिम महाराष्ट्रातल्या एका मर्यादित कार्यक्षेत्रात बहुजन समाजाचे नेतृत्व केले. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब हिरे, बापूसाहेब लाड इ. मंडळी बहुजन समाजाचे नेतृत्व करताना एका विशिष्ट चक्रातच अडकून पडली आणि म्हणून त्यांचेही नेतृत्व प. महाराष्ट्रातील काही विभागांच्या पलीकडे जाऊ शकले नाही. यशवंतराव

चव्हाण हे महाराष्ट्राचा गेल्या शंभर वर्षांचा इतिहास पाहता सर्व विभागाने स्वीकारलेले व बहुजन समाजाने आपल्या जीवनात मंगल क्षण निर्माण करू शकणारा एकमेव द्रष्टा ह्या दृष्टीने भौगोलिक विभागांच्या सर्व कक्षा ओलांडून निर्विवादपणे मान्य केलेले नेतृत्व होते. म्हणून विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, प. महाराष्ट्र या मराठी भाषिकांच्या सर्वच विभागांत त्यांचे नेतृत्व आदराने स्वीकारले गेले ही घटना आवर्जून उल्लेख करण्याजोगी आहे. पंजाबराव देशमुखां-सारख्या केंद्रीय मंत्रिपद भूषविणाऱ्या व्यक्तीलाही विदर्भाव्यतिरिक्त आपल्या नेतृत्वाची छाप पाडता आली नाही. ही सर्वच माणसे आपापल्या क्षेत्रातली बलदंड माणसे होती, पण मराठी माणसाची नाडी ओळखता आलेला आणि खेड्यात व शहरी भागात सर्वदूर स्वतःचा प्रभाव निर्माण करू शकलेला यशवंतरावांच्याशिवाय दुसरा माणूसच सांगता येणार नाही. देशाच्या पातळीवर तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरवाने उल्लेख केला गेला. राज्याच्या आणि राष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर सारख्याच सामर्थ्याने तळपणारा एक समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा अनेकावधानी नेता म्हणून त्यांचे स्थान वादातीत आहे.

द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाचा तेजस्वी आविष्कार प्रकर्षाने जाणवला. बाळासाहेब खेर, मोरारजीभाई देसाई यांसारख्या दिग्गजांनंतर द्वैभाषिक मुंबईचे नेतृत्व करणे अतिशय अवघड होते. कारण गुजराथ आणि महाराष्ट्र यांच्या एकत्रित नेतृत्वाची धुरा किती यशस्वीपणे पेलता येईल याची राज्यपुनर्रचनेनंतर अनेकांना शंका होती. मोरारजीभाई देसाईंना मात्र सर्व कसोटीवर एकटे चव्हाणच उतरू शकतात याची सार्थ खात्री होती. द्वैभाषिकाचे मुख्यमंत्रिपद स्वीकारताना संयुक्त महाराष्ट्रात उग्र आंदोलनाला तोंड द्यावे लागेल, याची पंडित जवाहरलाल नेहरूंपासून अनेक श्रेष्ठींना कल्पना होती. कारण फाजलभाय कमिशनचा रिपोर्ट स्वीकारताना मराठी भाषिकांचा भाग कर्नाटक, तेलंगण आणि मध्यप्रांतात शिल्लक राहिला ही जाणीव त्या वेळच्या नेत्यांना नव्हती, असे म्हणणे बरोबर होणार नाही. पाटसकर सूत्रा-प्रमाणे मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आलेले नव्हते. म्हणून आगडोंब उसळणार आहे असे स्वच्छ दिसत असताना द्वैभाषिकाच्या मुख्य-मंत्रिपदाची जबाबदारी आव्हान म्हणून स्वीकारणं सोपं नव्हतं. यशवंतराव चव्हाणांसारखा चतुर राजकारणीच ही जबाबदारी पेलू शकेल याची खात्री

काँग्रेसश्रेष्ठींना पटली. म्हणून अनेकांच्या इच्छा डावलून पंडितजींनी द्वैभाषिकाचे मुख्यमंत्रिपद चव्हाणांनी स्वीकारावे यास संमती दिली.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा अपेक्षेप्रमाणे सर्व सामर्थ्यानिशी उभारला गेला. अनेकांची मनं सांभाळून ही अतिशय जिकिरीची कामगिरी यशवंतरावांच्याच शिरावर येऊन पडली. केंद्रीय मंत्र्यांचा विश्वास सुरक्षित ठेवणे आणि मराठी भाषिकांचा, एकत्रीकरणाचा लढा जोपासणे अशी बिनतोड कर्तबगारी यशवंत-रावांनी दाखविली. परिणामी संयुक्त महाराष्ट्राची चार वर्षे चाललेली चळवळ यशस्वी ठरली. मराठवाडा आणि विदर्भ या विभागातील नेत्यांची मने सांभाळण्याचे काम त्यांनी समर्थपणे हाताळले. स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू, बाबासाहेब सवनेकर, देवीसिंग चौहान हे मराठवाड्यातील, बॅ. रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, मा. सां. कन्नमवार, वसंतराव नाईक इत्यादी वऱ्हाडातील नेत्यांच्या सहकार्याने नागपूर करार संमत केला गेला आणि आजचा महाराष्ट्र जन्माला आला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ज्या नेत्यांनी यशस्वी केली त्यांतील अनेकांनी यशवंतरावांवर सत्ताविलासाचे आरोप केले पण त्या वेळेच्या काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी, पंतप्रधान नेहरू, आणि इतर काँग्रेसश्रेष्ठींचे मन वळविण्याचे यशस्वी काम, मध्यस्थ म्हणून यशवंतरावांनीच पूर्ण केले, हे इतिहासाला विसरता येणार नाही. सयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, आचार्य अत्रे, उद्धवराव पाटील, कॉम्रेड डांगे, स्वामी रामानंद तीर्थ, यांच्याइतकेच महाराष्ट्र निर्मितीत यशवंतरावांचे स्थान महत्त्वाचे आहे. यापैकी प्रत्येकाने वेगवेगळ्या स्तरावर केलेले कार्य कुणीही नाकारणार नाही इतके मजबूत स्वरूपाचे आहे.

१९६० साली महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर यशवंतराव चव्हाण दोन अडीच वर्षेच, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या जीवनातील हा काळ अलौकिक व सर्वार्थाने सर्वश्रेष्ठ होता. या काळात त्यांच्या कर्तबगारीला विलक्षण बहर आला. लहानपणापासून महाराष्ट्राच्या ग्रामीण पुनरुत्थानाचे जे सुंदर स्वप्न ते पाहात आले होते त्यास प्रत्यक्षात आणण्याची संधी त्यांना प्राप्त झालेली होती. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचे काळात, अनेक पुरोगामी निर्णय त्यांनी घेतले आणि महाराष्ट्र राज्याची घडी अतिशय चाणाक्षपणे त्यांनी बसविली. महाराष्ट्राचे तीनही भाग म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, वऱ्हाड आणि मराठवाडा, मराठी भाषिक असले, तरी

वेगवेगळ्या परंपरा जपणारे होते. वऱ्हाडात आणि पश्चिम महाराष्ट्रात इंग्रजांची राजवट असल्यामुळे जेवढा विकास या विभागांचा झाला होता, तेवढा निजामाच्या राजवटीखाली १९४८ पर्यंत असलेल्या मराठवाड्याचा झालेला नव्हता. शिवाय भौगोलिक गैरसोयीमुळे विकसित विभागातील काही भागही अविकसितच राहिले होते. अशा परिस्थितीत जनतेच्या आकांक्षा उंचावलेल्या असताना, अनेकांना एकत्रित सांभाळून घेणे अत्यंत अवघड होते. साधनसामग्री अतिशय तुजवी होती. त्यांच्या काळात दुसरी पंचवार्षिक योजना सुरू होती म्हणून केंद्राकडून मिळणारी आर्थिक मदतसुद्धा सर्व गरजा पूर्ण करणारी नव्हती. एकटी मुंबई सोडली तर उर्वरित महाराष्ट्रातून येणारे महसुली उत्पन्न खूपच कमी होते. वऱ्हाडचा विभाग ब्रिटिश राजवटीखाली असताना सुद्धा मध्य प्रांताला जोडलेला होता. म्हणून पश्चिम महाराष्ट्र, वऱ्हाड आणि मराठवाडा येथे अनेक कायदे वेगवेगळ्या प्रकारचे होते. सर्व महाराष्ट्राला एकाच प्रकारचे कायदे लागू करणे अतिशय अवघड होते आणि सगळ्यांचे हितसंबंध सांभाळीत कायदेशीर मार्ग काढणे तर आवश्यक होते. अशा परिस्थितीत कृषिउद्योगांच्या विकासाचे कार्यक्रम आखणे अतिशय कठिण होते. या तिन्ही विभागांची अस्मिता शिल्लक ठेवून पुरोगामी विचारांचे नवे कायदे अमलात आणण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि हे करताना या विभागातील कोणाचेही हितसंबंध धोक्यात येणार नाहीत याची काळजी वाहिली. कूळकायद्यासारखे जमीनदारीवर प्रहार करणारे कायदे आणि मुंबईसारख्या अफाट शहरातील भाडेकरूंचे रक्षण करणारे कायदे यशवंतरावांच्या प्रेरणेने केले गेले. शैक्षणिक विकास झाल्याशिवाय मागासलेपणा संपणार नाही याची तीव्र जाणीव असलेल्या यशवंतरावांनी त्यांच्या काळातच मराठवाडा व शिवाजी ही दोन्ही विद्यापीठे अस्तित्वात आणली. या विद्यापीठांमुळे उच्च शिक्षणाच्या समान सोयी सर्व महाराष्ट्राला सारख्या प्रमाणात उपलब्ध झाल्या. महाविद्यालयीन शिक्षणाची सोय मुंबई, पुणे, नागपूर अशा मोजक्या ठिकाणीच केंद्रित झालेली होती. यशवंतराव चव्हाणांनी उभ्या महाराष्ट्रात सर्वदूर अनेक महाविद्यालये काढली गेली पाहिजेत हा आग्रह धरला. आज उच्च शिक्षणाचा प्रचंड वाढलेला व्याप त्यांनी स्वीकारलेल्या धोरणाचा परिपाक आहे. या धोरणामुळेच ग्रामीण भागातील अनेक बुद्धिमान तरुण शालेय व उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन आपली कर्तबगारी सिद्ध करू शकले.

उद्योगीकरण हाच बेकारीला पर्याय असू शकतो हा दृष्टिकोण स्वीकारून, महाराष्ट्राच्या उद्योगीकरणाचा योजनाबद्ध कार्यक्रम आखण्यास त्यांच्या काळातच सुरुवात झाली. महाराष्ट्रातली कोरडवाहू शेती, ती करणारा शेतकरी दरिद्री राहण्याचे एक प्रमुख कारण आहे याची त्यांना जाणीव होती म्हणून ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट करणाऱ्या अनेक पाटबंधारे योजना त्यांच्या मार्गदर्शनाखाली आखण्यात आल्या. अर्थात गोदा-कृष्णेचा परिसर समृद्ध व्हावा हे त्यांचे स्वप्न मूर्तस्वरूपात येण्यास वेळ लागेल हे खरे असले तरी बागायती शेतीच्या विकासाच्या त्यांच्या योजना लक्षणीय होत्या. कृषिउद्योग या क्षेत्रातील मक्तेदारी नष्ट करण्यासाठी सहकारी चळवळ उपयोगी ठरणार आहे हा त्यांचा आग्रह खरोखरच अतिशय दूरदर्शित्वाचा आहे. १९६० सालचा सुधारित सहकारी कायदा त्यांच्या कारकीर्दीत मंजूर झाला आणि ग्रामीण भागातील अनेक माणसांना कर्तृत्व आणि कर्तबगारी दाखविण्याची संधी उपलब्ध झाली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ देशभर सर्वोत्कृष्ट मानली जाते याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. या सहकारी चळवळीतूनच महाराष्ट्राची आर्थिक फेररचना केली गेली.

साखर कारखानदारी, पतपेढ्या, सहकारी बँका, सहकारी गृहनिर्माण संस्था अशा सर्व क्षेत्रांत ही सहकारी चळवळ खूपच परिणामकारक ठरली. या चळवळीत पुढे मक्तेदारी निर्माण झाली असेल किंवा इतरही काही दोष निर्माण झाले असतील पण यशवंतरावांचे नेतृत्व, अधिक वर्षे महाराष्ट्राला लाभले असते तर सहकारी चळवळीतील आजची वैगुण्ये निर्माणच झाली नसती.

महाराष्ट्राची त्रिस्तरीय प्रशासकीय योजना ही यशवंतरावांची गौरवास्पद कामगिरी आहे. खेडे स्तरावरील ग्रामपंचायत, तालुका स्तरावरील तालुका पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावरील जिल्हा परिषद ही ग्रामीण नेतृत्वाच्या उभारणीसाठी व सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी त्यांनी आखलेली योजना, देशभरातील सर्व प्रांतांनी मार्गदर्शक मानली. एस.के. डे यांचा ग्रामीण विकासाचा मूळ आराखडा आणि वसंतराव नाईक समितीचा अहवाल, यांच्या आधाराने महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा त्यांनी अंमलात आणला आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करून, तळाच्या कार्यकर्त्यांना अचूक हेरून त्यांना थेट राज्यपातळीवरच्या राजकारणात आणून सोडले.

यशवंतराव चव्हाण हे केवळ धुरंधर राजकारणी किंवा प्रशासनकुशल नेतेच होते असे नव्हे तर ते एक उत्कृष्ट वक्ते आणि अभ्यासकही होते. ग्रामीण पुनर्रचनेबरोबरच महाराष्ट्राची सांस्कृतिक कामगिरी लक्षणीय झाली पाहिजे यासाठीही त्यांनी मोलाचे प्रयत्न केले. अनेक लेखकांना, नटांना, साहित्यिकांना, कलावंतांना सहकार्य करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी असते, असे त्यांनी आवर्जून सांगितले आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता जपण्याची अनेक प्रकारांनी पराकाष्ठा केली. लेखक-कलावंतांच्या निवासासाठी स्वतंत्र गृहनिर्माण संस्था, त्यांनी जितक्या तळमळीने काढल्या तितक्याच तळमळीने साहित्य संमेलने, पत्रकार संमेलने, मुद्रक संमेलने, तमाशा परिषदेसारख्या संस्था आणि अनेक प्रकारच्या सांस्कृतिक, वाङ्मयीन चळवळी यांना त्यांनी सढळ हातांनी मदत केली. याचा परिणाम म्हणून त्यांच्या काळात महाराष्ट्रात चैतन्याचे वारे वाहू लागले आणि पिचलेला, दबलेला मराठी माणूस पुन्हा एकदा स्वाभिमानी झाला. शहरी नेतृत्वाच्या बरोबरीचे कर्तृत्व असलेले, बहुजन समाजाचे व ग्रामीण भागातील अनेक कर्तृत्वसंपन्न नेते पुढे आले आणि विभागाच्या कक्षा ओलांडून यशवंतरावांचे नेतृत्व उभ्या महाराष्ट्राने निरपवादपणे स्वीकारले.

यशवंतराव चव्हाण हे सर्व करू शकले याची अनेक कारणे आहेत. ही कारणे जशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहेत, तशीच ती त्यांच्यावर झालेल्या थोर संस्कारात आहेत. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण अतिशय अवघड परिस्थितीत त्यांना घ्यावे लागले. पण ही अवघड परिस्थितीच त्यांना जीवनाच्या पुढील वाटचालीत उपयोगी ठरली. स्वातंत्र्य चळवळीतील विविध प्रकारची कामे करताना अनेक खेड्यांत जाण्याची आणि ग्रामीण जीवन अधिक जवळून पाहण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. अनेकांचा दाट परिचय झाला. किसन वीर यांच्यासारखे अनेक सहकारी त्यांना या कलातच लाभले. सातारा, कोल्हापूर, पुणे, सांगली या जिल्ह्यांच्या परिसरातील अनेकांचे त्यांच्याशी दृढ नाते याच काळात जुळले. स्वातंत्र्य चळवळीचे महत्त्व विशद करताना विविध स्तरावर ज्या चर्चा कराव्या लागत त्यातून त्यांच्या विचारांना धार आली. गरीब शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांची जाणीव झाली. या जाणिवेतून त्यावर उत्तरे शोधण्यासाठी सतत चिंतन करण्याची सवय जडली. म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या भारतीय स्वातंत्र्य-लढ्याचे वेगळेपण समजावून सांगताना आणि म. गांधींची विचारसूत्रे ग्रामीण

जनतेला पटवून देताना त्यांना अनेकविध विषयांचा अभ्यास करण्याची सवय जडली. शालेय व महाविद्यालयीन जीवनात जोपासलेली ज्ञानपिपासा त्यांच्या मदतीला आली. सॉक्रेटिस, प्लेटो यांच्यापासून ते कार्ल मार्क्सपर्यंत 'स्वातंत्र्य' या संकल्पनेची झालेली मीमांसा आणि फ्रेंच राज्यक्रांतीनंतर अस्तित्वात आलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये स्वदेशी व स्वराज्य चळवळीचे आधार आहेत हे लोकांना पटवून देणे आवश्यक आहे असे त्यांना पटले. प्राचीन भारतातील उज्ज्वल परंपरा आणि आर्य चाणक्यासारख्या महापंडिताने आर्थिक जीवनातील इतर क्षेत्रांत सांगितलेली विविध प्रकारची विश्लेषणे त्यांनी काळजीपूर्वक अभ्यासिली. मानवेंद्रनाथ रॉय, लक्ष्मणशास्त्री जोशी, धनंजयराव गाडगीळ यांच्या सहवासातून आणि त्यांच्याशी केलेल्या चर्चेतून स्वातंत्र्योत्तर भारतात काय केले पाहिजे याची वैचारिक बैठक अनेक विषयांच्या अभ्यास-चिंतनातून त्यांना नक्की करता आली. अतिशय परिश्रमपूर्वक त्यांनी स्वतःला घडवले, आणि महाराष्ट्राची बुद्धी शक्तिशाली झाली पाहिजे व शक्ती बुद्धिशाली झाली पाहिजे यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

यशवंतराव चव्हाणांचे साहित्यप्रेम, त्यांचे नाटकवेड, त्यांची संगीतप्रीती ही एक नितांत सुंदर घटना आहे. इंग्रजी मराठीतील कथा, कादंबरी, कविता त्यांनी आधाश्यासारखी वाचून काढली होती. शेक्सपियर आणि कालिदास त्यांनी काळजीपूर्वक अभ्यासिला होता. सततचे वाचन व विद्वानांचा सहवास हाच त्यांनी आपल्या जीवनातील विरंगुळा मानला होता आणि म्हणून त्यांची वैचारिक बैठक पक्की झालेली होती. रॉय यांच्या विचाराचा त्यांच्यावरील परिणाम ते पुढे सत्तेवर आल्यावर त्यांनी जे अनेक पुरोगामी कायदे केले त्यात जाणवतो आणि तर्कतीर्थांच्या संस्कार-सहवासाच्या परिणामातून महाराष्ट्राची बौद्धिक पातळी उंचावली पाहिजे यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा शोध लागतो. बुद्धिमत्ता आणि ज्ञान ही शहरी लोकांची मक्तेदारी नाही हे ग्रामीण भागात फिरताना शिक्षण नसतानाही जी बुद्धिमान माणसे त्यांना भेटली त्यांचेशी झालेल्या चर्चेतून ते समजून घेऊ शकले आणि एक अपूर्व नेतृत्व ते उपलब्ध करून देऊ शकले.

चीनच्या आक्रमक युद्धप्रसंगी संरक्षणमंत्रिपदी त्यांना एक फार मोठे आव्हान स्वीकारूनच जावे लागले. चिनी नेतृत्वाशी केलेल्या कराराच्या प्रभावात

असलेल्या नेहरूंना या आक्रमणामुळे जो मानसिक धक्का बसला, त्या धक्क्यातून त्यांना सावरून घेऊन विस्कळित झालेली संरक्षण आघाडी पुन्हा एकदा नीट बांधण्यासाठी त्यांना पराकोटीचे परिश्रम घ्यावे लागले. १९६५ च्या भारत पाक संघर्षात, यशवंतरावांनी केलेली संरक्षण खात्याची पुनर्बांधणी समर्थ ठरली. त्या युद्धात आपले सैन्य विजयी होऊ शकले याचे फार मोठे श्रेय, यशवंतरावांनी संरक्षणखात्यास दिलेल्या प्रेरणांस, योजकतेस आणि पुनर्बांधणीस द्यावे लागेल. या मंत्रिपदाच्या काळात त्यांचे देदीप्यमान नेतृत्व देशभर प्रभाव पाडणारे ठरले.

देशात जेव्हा गोहत्याप्रतिबंधक आंदोलन सुरू झाले, साधूंचे आंदोलन पेटले, गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे भारत सरकार पेचात आले. दिल्लीत स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आणि यशवंतराव चव्हाणांनी आव्हान स्वीकारूनच गृहमंत्रिपदाची धुरा स्वीकारली. देशाचे गृहमंत्रिपद त्यांनी अतिशय कौशल्याने सांभाळले आणि सगळी स्फोटक परिस्थिती अतिशय मजबूतदारपणे पण समंजस उदार मनस्कतेने हाताळली. त्यामुळे एक कर्तबगार गृहमंत्री म्हणून त्यांची प्रतिमा देशभर उमटली. त्यांची अर्थमंत्रिपदाची आणि परराष्ट्रमंत्रिपदाची कारकीर्दही लक्षणीय ठरली. राज्यात काय अगर देशात काय ज्या ज्या वेळी संकटसदृश परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी त्या संकटसदृश परिस्थितीचे काँग्रेसश्रेष्ठींजवळचे उत्तर यशवंतराव चव्हाण हेच राहिले. " देश चालविणारी, त्याला स्थैर्य मिळवून देणारी, त्याची प्रगती घडविणारी, संरक्षण करणारी, आणि देशाची प्रतिमा जगात उंच करणारी जी महत्त्वाची खाती केंद्र सरकारात असतात त्या सर्व खात्यांचा कारभार यशवंतरावांनी एकामागून एक सांभाळला " आणि आपल्या प्रशासनकुशलतेची आणि निष्णात मुत्सद्दीपणाची प्रचिती घडविली. असा महान कर्तृत्वाचा आणि प्रांजळ स्वभावाचा रसिला राजकारणी ही महाराष्ट्राने देशाला दिलेली अपूर्व देणगी आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाची बव्हंशी जडणघडण राजकारणाने केली हे तर खरेच, पण त्यांनी जे राजकारण केले ते सुसंस्कृत सत्तेचे राजकारण होते. राजकारण म्हणजे जीवनसर्वस्व असे त्यांनी कधीच मानले नाही, आणि म्हणून या सुसंस्कृत नेत्याचे साहित्यिकांशी, कलावंतांशी, संशोधकांशी, विरोधकांशी आणि वैचारिक प्रबोधन प्रवाहांशी, व

चळवळींशी सतत निकटचे संबंध राहिले. प्रबोधन चळवळीत तर ते जीवनाच्या प्रारंभापासून निगडित होते. आणि अखेरपर्यंत त्यांनी हा प्रबोधन प्रवास चालूच ठेवला. राजकारण तर त्यांनी आयुष्यभर केले. पण राजकारणातील कोणताही गढूळपणा त्यांच्या व्यक्तिगत चारित्र्यावर जराही शिंतोडा उडवू शकला नाही. यशवंतराव अंत:करणाने चांगले होते म्हणूनच ते चांगले राजकारणी झाले. चांगले वक्ते, रसिक आणि साहित्यिक झाले. स्वभावाच्या चांगुलपणामुळेच त्यांचे सर्वांशी पटले आणि ते सर्वांचे मित्र झाले. निरपेक्ष विचारांचा आणि समर्पण-वृत्तीचा त्यांचा दृष्टिकोण अनेक बाबतीत अतिशय उपयोगी ठरत असे. अनेकविध विषयांचा व्यासंग केल्याने, अनेक प्रकारचे अनुभव घेतल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने फुलून आलेले होते. मर्मज्ञता आणि रसिकता यांचा अजोड मिलाफ त्यांच्या सहवासातील अनेकांना प्रत्ययास येत असे, आणि बहारदार वक्तृत्वाची निसर्गाने त्यांना बहाल केलेली देणगी आमजनतेशी संवाद प्रस्थापित करताना अतिशय परिणामकारक ठरे. त्यांचे कोणत्याही विषयावरचे व्याख्यान विचाराने समृद्ध असे आणि त्यांच्या वक्तृत्वाला असलेला लालित्याचा लाघवीपणा श्रोत्यांची मने जिंकून घेण्यास उपयोगी पडत असे. भाषाप्रभू असलेले व समृद्ध वैचारिक बैठक लाभलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय दुर्मिळ आणि कुणाशीच तुलना करता येण्यासारखी नाही आणि म्हणूनच यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे अतुलनीय नेते ठरले. त्यांचे नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरू आणि जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या महान नेत्यांनीसुद्धा अतिशय गौरवपूर्ण मानले. यशवंतराव चव्हाण यांच्या रूपाने राज्याला निरपवाद नेतृत्व लाभले. राज्याचे ते शिल्पकार ठरले. भारताचे आदरणीय राजकारणी ठरले आणि महाराष्ट्राचे तर ते युगपुरुष ठरले.

७

# भावलंकेचा माणूस : यशवंतराव चव्हाण

## डॉ. सरोजिनी बाबर

समाजकारणात, राजकारणात, बरीच मंडळी वावरतात. आमदारकीच्या, खासदारकीच्या रिंगणात पुष्कळजणं उतरतात. नेतेपदात, मंत्रिपदात, निवडक मंडळी रमतात. पण जाणूनबुजून, विचार करून या कार्यक्षेत्रात आयुष्यातली बरीच वर्षं घालविणारी अशी फारच थोडी असतात. त्यातून एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करीत निवडलेलं कार्यक्षेत्र कारणी लावणारी तर आणखीनच फार कमी. आमचे यशवंतराव चव्हाण त्यांपैकीच एक. आम्ही त्यांना 'साहेब' म्हणत असू. आमच्यापैकीच एक मानीत असू. आमचं ते आपलेपण साहित्य क्षेत्रातलं. लेखक कवीच्या सहवासातलं. निवडक पुस्तकांच्या वाचनातून रंगणाऱ्या रसिकांच्या मेळाव्यातलं. चोखंदळ वाचकांमधलं, जिवाभावाच्या नात्यातलं.

साहेबांनी बैठक घालून तसं कधी फारसं लिहिलं नाही. पण त्यांच्या मनाचा पिंड साहित्यिकाचा, त्यांना लेखनकलेची खूप हौस असायची पण वेळेअभावी त्यांना ते जमायचं नाही. परंतु कुणी काय लिहिलंय आणि कुणाची कशात वाहवा होतेय, त्यातला वारकावा त्यांच्या ठायी दांडगा. त्यांचं वाचन फार विस्तृत. इंग्रजी, मराठीतली आणि हिंदीतली ठळक ठळक पण निवडक पुस्तकं त्यांच्या संग्रही असायची. भेट आलेली जेवढी त्यापेक्षा विकत घेतलेलीच फार. त्यामुळं एखादा परिचित लेखक, कवी समोर दिसला की, साहेब लगेच त्याच्या नवीन कलाकृतीबद्दल आवर्जून बोलायचे. ऐकणाराला वाटायचं की, " ह्यांना

हे वाचायला वेळ तरी केव्हा मिळाला ? आणिक एवढं ह्यांनी लक्षात तरी कसं घेतलं बारीकसारीक ? ''

साहेब रोज रात्री वाचत बसायचे. कामाच्या निरनिराळ्या फाईली, निवडक ग्रंथ, विमानात अगर रेल्वेत सवड मिळाली की बरोबर आणलेली आवडीची पुस्तकं वाचून ते त्यावर महत्त्वाच्या कल्पनाविस्तारासंबंधीच्या किंवा उल्लेखनीय विचारातील आविष्काराबद्दलच्या मजकुरावर खुणा करायचे. हा तपशील जरूर पडेल तेव्हा त्यांच्या लक्षात यायचा. आवश्यक तेव्हा भाषणांमधून प्रगट व्हायचा. विधानभवनातलं, संसदेतलं अगर जनसंमेलनातलं त्यांचं भाषण त्या कारणानं श्रवणीय ठरायचं.

आगाशिवाच्या डोंगरावर मोठमोठ्यानं बोलण्याचा सराव करीत त्या ध्वनि-प्रतिध्वनींच्या आधारावर साहेब बोलायला शिकलेले. त्यामुळे आवाजातील चढउतार आणि विचारातील पल्ला त्यांच्या ठायी त्यांनी पक्का जोडलेला होता. अभ्यासून आत्मसात केला होता. त्या कारणानं श्रोत्यांशी त्यांना जवळीक साधणं जमत होतं आणि जनतेला नेमकं काय हवं ते जिद्दीनं मापलं होतं.

मराठवाड्यात मुख्यमंत्री म्हणून कामाच्या निमित्तानं साहेब प्रवासात असताना एका शेतकऱ्यानं त्यांना प्रेमानं नोटांचा हार घातला ! वडिलकीच्या अधिकारानं म्हणून ! तसे साहेब हसले. त्यांना जणू आपलं लहानपण गवसल्यागत झालं. ह्या साधुसंतांच्या भूमीचा आपल्याला आशीर्वाद आहे असं त्यांनी मानलं ! एकनाथांनी या भूमीतून वावरताना गोरगरिबांचा त्यांनी ठेवलेला मान त्यांनी लक्षात घेतला. जिजाऊ मासाहेबांचं माहेर याच भागातलं हे लक्षात घेऊन वाचलेला इतिहास नजरेपुढे आणला.

आपला मुलूख, आपलं कार्यक्षेत्र साहेबांनी असं जोपलं होतं. आपण जिथं जायचं आहे तिथल्या परिस्थितीचा, तिथल्या लोकांच्या आचारविचारांचा आणि तिथं मांडून गेलेल्या इतिहासाचा अभ्यास करून मगच तिथं पाऊल टाकलं होतं. म्हणून त्या त्या ठिकाणचे भावबंध त्यांना गवसले होते. भावनिक ऐक्य साधणं शक्य झालं होतं. तिथल्या लेखक-कवींशी, कलाकारांशी, कार्यकर्त्यांशी जवळीक साधता आली होती. साहेब स्वतः क्रांतिपर्वात वावरलेले असल्यामुळे आणि स्वातंत्र्यसंग्रामात आघाडीवर राहिल्याकारणानं तुरुंगात किंवा भूमिगत जीवनात लाभलेली मैत्री त्यांच्या ठायीच्या अगत्यामुळं जपली गेली होती. त्यांचं

विश्व व्यापक झालं होतं.

जगातील क्रांतिकारकांच्या गाथा साहेबांनी वाचल्या होत्या. चिंतनमननात बाळगल्या होत्या. लढाईतले डावपेच आत्मसात केले होते. त्यासाठी कितीतरी पुस्तकं वाचली होती. जागोजागची स्मारकं न्याहाळली होती. त्यामुळे संरक्षण-मंत्री म्हणून आत्मविश्वासानं त्यांनी बजावलेली कामगिरी अपूर्वाईची ठरली. जागोजागच्या जवानांशी वेळोवेळी बोलताना त्यांच्या साहित्यिक वाणीनं देश मजबूत करायला स्फूर्ती दिलेली.

साहेब परदेशात गेले म्हणजे तिथल्या भौतिक वैभवाबरोबरच साहित्यकारांची विचारपूस करायचे. त्यांचं वागणं बोलणं समजावून घ्यायचे. त्या संदर्भात कृष्णा-काठचं आपलं राहणं जोखून पाहायचे. आपल्या आईच्या मुखी रुळलेल्या ओव्या आठवीत आपलीपण वेगळी तालेवारी आहे हे लक्षात घ्यायचे. वेळप्रसंगी इतरांपुढं आपल्या अस्खलित वाणीनं इतरांवर छाप पाडायचे. ते स्वत: वकील असल्यामुळे आपल्या देशाची बाजू प्रभावीपणानं मांडणं त्यांना सहज जमून जायचं. म्हणून जे बोलताय ते लिहा, जे लक्षात आहे ते कागदावर येऊ द्या, जे मनात आहे ते शब्दांकित होऊ द्या, असा आम्ही त्यांना वारंवार आग्रह करायचे. अशा वेळी त्यांचा चेहरा प्रसन्न दिसायचा. "मनात खूप आहे पण वेळ कुठाय?" या उत्तरानं मानातली खंत बोलून दाखवायचे. साहेबांचं बरंचसं आयुष्य पुढारी-पणात, मंत्रिपद सांभाळण्यात गेल्यामुळे त्यांची स्वत:च्या हातानं लिहायची सवय मोडून गेली होती. त्यांना हाताशी लेखनिक लागत होता, पण मराठी बोलणं चटकिनी लघुलिपीत टिपणाराची दिल्लीत वानवा होती! त्या कारणानं साहेबांची दिवाळी अंकातील एखाद दुसऱ्या लेखापलीकडे ललित लेखनाची हौस बाजूला राहिली होती. हिरमुसल्या मनानं वावरत होती. त्याचा पडताळा साहित्यविषयक सभासंमेलनांतून होणाऱ्या साहेबांच्या भाषणामधून यायचा. अशा वेळचं साहेबांचं भाषण एवढं चटकदार व्हायचं की, साहेबांमधला लेखक गुदमरून गेला आहे याची स्पष्ट जाणीव ऐकणाराला व्हावी! लक्षात कुणी आणून दिलंच हे तर साहेबांना देखील!...

म्हणून तर आम्हा अनेक सुहृदांच्या विलक्षण आग्रहाखातर साहेबांनी "कृष्णाकाठ"चं लेखन हातावेगळं केलं आणि आपल्या भाषणांचा संग्रह प्रकाशित होताना त्या मजकुरावरून हात फिरवला. तसंच दिल्लीला कामात

व्यग्र असतानाही त्यांनी पुस्तक-प्रकाशनाची आणि साहित्यविषयक समारंभाच्या उद्‌घाटनाची निमंत्रणं आवर्जून स्वीकारली. पुण्याच्या साहित्य परिषदेच्या हीरकमहोत्सवासाठी ते मुद्दाम वेळ काढून पुण्याला आले आणि कराडच्या साहित्यसंमेलनाचं स्वागताध्यक्षपद त्यांनी स्वीकारलं.

त्या वेळी साहेब बारीकसारीक सगळ्या शाखा-उपशाखांना कराडात हजर राहिले. " होस्ट " म्हणून त्यांनी सर्वांचं आदरातिथ्य येवढं केलं की, माणसं हारखून गेली. विरोधातल्या मंडळींनी त्या संमेलनात आरडाओरडा केला, निदर्शने मांडली तरी साहेबांनी सगळ्यांना प्रेमानं वागवलं. कराडला उभारलेल्या भव्य शामियान्यातील त्यांचं आगळं सौजन्यशील रुपडं बघण्याजोगं होतं.

साहेबांनी त्या वेळी कराडला नुसतं साहित्य संमेलनच भरवलं नाही तर त्या निमित्तानं जमा करण्यात आलेला बराचसा निधी न्यास निर्माण करून बँकेत ठेवला. त्या निधीतून येणाऱ्या व्याजामधून उपलब्ध होणारी ठरावीक रक्कम दरवर्षी वेगळ्या साहित्य प्रकारातील सर्वोत्कृष्ट कलाकृतीला बक्षिसादाखल दिली जाईल अशी व्यवस्था केली.

वाङ्मयाचा मोठा भोक्ता माणूस आमचे साहेब. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी साहित्यविषयक विकासाच्या संदर्भातील " साहित्य संस्कृती मंडळ ", " लोक-साहित्य समिती ", " भाषा सल्लागार समिती ", असली राज्य थरावरील मंडळं स्थापन करून त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांना कामाला लावलं. अधूनमधून ही निरनिराळी मंडळी भेटली म्हणजे आणि स्वत: महाराष्ट्रात ते आले म्हणजे त्यांनी या सर्व कामकाजात तसे येऊन त्यातील विकासाच्या संदर्भातील चर्चा केल्या. मार्गदर्शन केलं. वेळ काढून विचारपूस मांडली. त्यांना त्यांच्या या कार्यात सर्वांनी आपला हातभार लावला. एवढंच नव्हे तर हे काम वेगानं आणि उमेदीनं यापुढेही चालू राहील हे पाहिलं.

साहेब अवचितच देवाघरी गेले. पण त्यांच्या या भावलंकेत सामावून गेले. त्यांनी त्यांची ही आवडनिवड महाराष्ट्राची अस्मिता म्हणून जिद्दीने जोपासली जाईल याची निष्ठा पदरी बाळगलेली आहे. केवळ राजकीय वर्तुळातून, सरकारी कार्यातून नव्हे तर खाजगीतून देखील! म्हणून आमचं म्हणणं साहेब गेले नाहीत त्यांचं काम जणू त्यांच्या रूपानं उभं आहे. त्यात खंड पडायचा नाही. उलट ते वाढीदिडीनं चालूच राहील.

# ८

## वाङ्मयातून माणूस घडतो

### आनंद यादव

विद्यार्थी झाल्यापासून यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा मनावर उमटला होता. हे व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभे राहिले होते ते प्रामुख्याने त्यांच्या वक्तृत्वाने. सातारा जिल्ह्यात त्यांची खूप भाषणं ऐकली. विद्वत्ता, आक्रमक, पल्लेदार अशी कोणतीही 'भाषणबाजी' न करता यशवंतराव खास स्वतःच्या शैलीत बोलत. हे बोलणे बहुजनप्रिय पण त्यातही वेगळे असे होते. ज्ञानेश्वर जर गद्यात बोलले असते तर ते असे झाले असते असे यशवंतरावांचे मृदू बोलणे होते. मृदू बोलणारी माणसे कधी आग ओकणारे बोलत नाहीत. ती दुसऱ्याला समजून घेत घेत दुसऱ्याला आपले म्हणणे समजून देत असतात. कारण मुळातच ही माणसे संवेदनशील असतात, भावनाप्रधान असतात – यशवंतराव तसे होते. त्यांचे ज्ञान चौफेर होते पण त्याचे त्यांनी कधी 'डोस' पाजले नाहीत. शांतचित्ताने, एकचित्ताने ते दुसऱ्याचे जे ऐकत तेच त्यांच्या वाणीतून प्रगट रूप होई. हे करताना महाराष्ट्र दुभंगणार नाही याची ते काळजी घेत. म्हणूनच पंडित जवाहरलाल नेहरूंप्रमाणे त्यांनी गुणग्राहकवृत्ती ठेवली आणि महाराष्ट्राला एका उच्च स्थानावर नेऊन ठेवले. त्यांचं साहित्याबद्दलचं प्रेमही त्यांच्या बोलण्यातून जाणवत असे. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी माझी 'गोतावळा' ही कादंबरी वाचली होती आणि तीवर ते खूष होते. हे मला नंतर

निर्मलकुमार फडकुले यांच्याकडून कळले होते. फडकुलेंकडे माझी चौकशी करत त्यांनी तेव्हा एकच मार्मिक आणि नेमका प्रश्न विचारला होता. " 'गोतावळा'-तील भाषा मराठी रसिकांना मान्य होईल का पण ? " – राजकारणात अखंड मग्न असतानाही साहित्य-प्रवाहाकडे त्यांचे किती सूक्ष्म लक्ष होते !–त्याच वेळी त्यांनी येथून पुढे बहुजनांच्या भाषेला महत्त्व येणार आहे याचे समाधान व्यक्त केले होते.

साहित्याप्रमाणे साहित्यिकांबद्दलही त्यांना आस्था होती. रणजित देसाई, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांचे सारे साहित्य त्यांनी अभ्यासू वृत्तीने वाचले होते आणि त्या त्या लेखकाशी चर्चाही केली होती. साहित्यिकांबद्दल आदर बाळगण्यात, त्यांचा सन्मान करण्यात त्यांना अवीट आनंद वाटायचा. ग. दि. माडगूळकर, ना. धों. महानोर अशा साहित्यिकांना आमदारकी बहाल करण्यात त्यांचाच जास्त पुढाकार होता. गुणांची कदर व्हावी हीच त्यामागची भूमिका होती.

कऱ्हाडजवळ कार्वे नावाचे एक गाव आहे. तेथे संभाजीराव थोरात हा वाङ्मयप्रेमी माणूस राहतो. या संभाजीरावांच्या आत्मचरित्राचा प्रकाशन समारंभ होता. त्याचे अध्यक्ष अर्थातच यशवंतराव होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणा म्हणून मला बोलाविणे आले होते आणि यशवंतरावांपुढे आपणाला आपले विचार मांडता येतील या हेतूने मी ते स्वीकारलेही होते. आत्मचरित्राबद्दल बोलणे झाल्यावर मी आमच्या ग्रामीण साहित्य चळवळीचे विचार तेथे मांडले आणि आता परिस्थिती बदलली आहे. नव्या पिढीला घडविण्यासाठी यशवंतरावांसारख्यांनी दैनंदिन राजकारणातून काढता पाय घ्यावा असेही सूचित केले. त्यांची माझी शेवटची भेट कोवाडला रणजित देसाई यांच्याकडे झाली तेव्हाही मी त्यांना हा विचार बोलून दाखविला होता. या दोन्ही वेळेला यशवंतरावांना माझ्या म्हणण्यात तथ्य वाटले होते आणि यशवंतराव म्हणाले होते, " यादव, हे सोडून द्यावं आणि तुमच्या चळवळीमागे लागावं असं मलाही वाटतंय पण आता राजकारणातून माघारी येणे अशक्य आहे..."

दुसऱ्याला मोठेपण देत देत हा माणूस मोठा होत गेला आहे. ते रागावत चिडत नसत. व्यथित होत. त्यांनी ज्या तडजोडी केल्या त्या या व्यथेमुळेच ...अशी व्यथा साहित्याने दूर होऊ शकते. वाङ्मयातून माणूस घडतो, संस्कृती

# १

## तुझी साद तुझे आशीर्वाद प्राणाचे दुवे मेळवित गेले
## तुझी साद तुझे आशीर्वाद घरभर दिवे लावून गेले

ना. धों. महानोर

पंचवीस नोव्हेंबर १९८४. एक काळी सायंकाळ. पुण्यात एस. एम. जोशी ह्यांच्या सत्कार-समारंभाचा कार्यक्रम आटोपून शरदराव पवार व मी रेस्ट हाऊसवर आलो. पहिली बातमी ही अशी. आम्ही दोघं सुन्न झालो.

आज तीन दिवस झाले. अंत्यविधी झाला. अनेक संपादकांनी सांगितले. परंतु चव्हाणसाहेबांवर लिहायला नीट जुळत नाही. कितीतरी आठवणींनी मन भरून येते. चित्रपटासारख्या त्याच त्या जुन्या गोष्टी समोर येतात...डोळे वाहू लागतात...लिहिताना बोटं थांबतात...ते इतके तडकाफडकी गेले...अजून पाच दहा वर्षे त्यांनी राहणं जरुरीचं होतं. निदान अशा अवस्थेत. उदासवाणं एकटेपण दिवसरात्र आता व्यापून आहे.

त्यांचा-माझा दहा वर्षांचा सहवास : तसा थोडा. पण कितीतरी मोठा. काय लिहावं, किती लिहावं, काही सांगता येईल, काही शब्दांपलीकडलं आहे. एवढ्या मोठ्या मनाचा, उंचीचा, जीवनाच्या सर्वांगाची समृद्धता—विशालता असलेला माणूस. नव्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिमाणाचे भान ठेवून देशाच्या, महाराष्ट्राच्या जडणघडणीचा ऐश्वर्यसंपन्न सुजाण शिल्पकार. सह्याद्रीच्या छातीचा आणि फुलराणीतल्या नाजूक, सुगंध शब्दबंधातला. सुसंस्कृत

नेता. शेवटपर्यंत सामान्य माणसातला नेता. अलवार, कोवळ्या कवि-हृदयाचा रसिक घरंदाज.

कविता, साहित्य ह्या निमित्तानं आता फक्त थोडं ऋणानुबंधातले सांगतो. डिसेंबर १९७४, इचलकरंजी साहित्य संमेलन.

पक्षांचे लक्ष थवे, गगनाला पंख नवे.
वाऱ्यावर गंधभार, भरलेले ओचे
झाडातून लदबदले, बहर कांचनाचे
घन वाजत गाजत ये, थेंब अमृताचे.

दोन कविता वाचण्याची मर्यादा कवीला होती. तीस हजार रसिकांच्या पुढे कोणाचेही काही चालेना. रसिकांच्या आग्रहानं मी पाच-सहा कविता वाचल्या. दुसऱ्या दिवशीही वाचल्या. व्यासपीठावर सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठ कवी होते. समोर रसिकांत भाऊसाहेब खांडेकरांपासून माडगूळकर इत्यादी. आणखी यशवंतराव चव्हाण, मी कवी– संमेलन खूप गाजविलं होतं.

रात्री नऊ वाजता कुमार गंधर्वांचं गाणं होतं. मंडपाजवळ मला रणजित देसाई घ्यायला आले. तेथील मुक्कामावर मला चव्हाणसाहेबांनी बोलविल्याचं सांगितलं. माझी त्यांची साधी ओळखही नव्हती. मी बुजल्यासारखा गेलो. यशवंतराव चव्हाणांनी जवळ घेऊन मिठी मारली. कविता, राहणं, उद्योग, घरचं, सगळं विचारलं. हजार वस्तीच्या खेड्यात मी राहतो व घरी कोणीही शिकलेलं नाही हे ते पुन्हा पुन्हा इतरांना सांगत होते.

**पहिला धागा**

ते त्या वेळी परराष्ट्रमंत्री होते. कोल्हापूरला जाणं रद्द केलं व रात्री माझी व अनेक कवींची मैफल झाली. बोरकर, अनिल, पाडगावकर इत्यादी. तसेच दुर्गाताई, पु. ल. देशपांडे, कुरुंदकर इत्यादी मिळून शंभर लोकांमधली कधीही न विसरावी अशी मैफल. त्यांच्या माझ्या ऋणानुबंधाचा पहिला धागा.

त्यानंतर बरोबर महिन्याभरानं माझ्या जिल्ह्यात एका साखर कारखान्याच्या उद्‌घाटनासाठी ते आले. सोबत मुख्यमंत्री नाईकसाहेब व मंत्रिमंडळ. मला बोलावून आणायला अगोदरच सांगितलं होतं. सर्व मंत्री, आमदार, खासदार, जिल्हाभर फिरले. परंतु त्यांना चव्हाणसाहेबांनी सांगितलेला तो फार मोठा

कोणी कवी सापडेना. समारंभ आटोपल्यावर गर्दीत चुकून मी नमस्कारासाठी समोर गेलो तर त्यांनी सोडलंच नाही. आमचे आमदार, खासदार, मंत्री थंडगार झाले. घुमून दोन दिवस थकले होते.

" अहो, हा तर पंचविशीतला पोरगा. पळसखेडचा. हा कुठला थोर कवी वगैरे ? " आमचे लोक. माझ्या खेड्यात धावाधाव. जेवणानंतर पुन्हा शेती, घरचं व गप्पा झाल्या.

चव्हाणसाहेबांना माझ्या कविता समोरच्या रसिकांना (?) पाठ म्हणून दाखविल्या. नंतर मी म्हटल्या वगैरे. ही रसिकता, साहित्यप्रेम व माणसावर, कलेवर जीव ओवाळून टाकणं फक्त त्यांच्याजवळच होतं.

एक परराष्ट्रमंत्री, सार्वभौम नेता आपल्याकडे राजकीय प्रणालीत कसा असतो, वागतो, हे नवीन नाही. एवढं निर्भर, निर्मळ, काहीही संबंध नसताना प्रेम करायला मन आभाळाएवढं, फार परिपूर्ण लागतं. नंतर दहा वर्षं मी आणखी अनेक लोक चव्हाणसाहेबांच्या घरातले झालो. कवितेच्या निमित्तानं जवळ आलो. गेली दहा वर्षं एका कुटुंबातले असल्यागत जगलो. प्रेम केलं. कविता, साहित्य, त्याशिवायचं व्यवहारातलं जग, माझे शेतीचे प्रश्न, कुटुंबातले प्रश्न, माणसं त्यांची झाली.

त्यांच्यात– माझ्यात सर्वार्थांनी फार मोठं अंतर. ते अंतर मोडून ते सातत्यानं जवळ राहिले. हे वाटतं तितकं सोपं नाही. एका उन्हाळ्यात बद्रीनारायणाच्या दर्शनानंतर माझे आईवडील, चव्हाणसाहेबांकडे दिल्लीत मुलांची ओळख आहे भेटून यावं म्हणून गेले. लाल पगडीचं मुंडासं, धोतर, आईचं नऊ वारी लुगडं–चोळी. लिहिण्वाचणं नाव माहीत नाही. पोलिस, पहारेकरी, सर्वत्र अडवाअडवी, त्रास. पण चव्हाणसाहेबांचा किती आनंद सांगावा ? माझ्या कवीचे आई– वडील माझ्या घरी. त्यांनी त्यांना थांबवून घेतलं, दिल्ली दाखविली, इंदिरा गांधी, राष्ट्रपती व अनेकांच्या भेटीची वडिलांची व सोबत्यांची इच्छा होती. सगळं काही केले. हे फक्त तेच करू शकत होते.

### कवितेसाठी हे सारं

नंतर माझे वडील वारल्यावर दिवसावर घरी पळसखेडला आले. ते, मुख्यमंत्री इत्यादी आले ह्याचा मला मोठेपणा वाटत नाही. दरम्यान त्यांना माझे काही

प्रश्न माहीत झाले होते. मी एकाकी, उदास पत्रं त्यांना मोकळेपणानं पाठवायचो. भेटीत त्यावर ते आवर्जून विचारीत. वयाचं, मोठेपणाचं अंतर, नातं नंतर नव्हतंच. माझ्याच घरातले ते वडील माणूस म्हणून अंतःकरणानं होते. वडील वारलेले. मी सगळ्यात मोठा. धाकटी भावंडं, बहिणी, दोन मातोश्री, घरकुलातील भांडणं, अडचणी, पेच, भयाणता व त्यात माझी म्हणून जबाबदारी, भार, त्यांना माहीत होता. घरातला माणूस बोलतो म्हणून, त्यांनी तो सोडवला. त्यांचा धाक, दबाव घरच्यांची डोकी शुद्ध करून गेला. आज प्रश्न नाहीत असं नाही. परंतु त्यांनी संपूर्ण गुंतागुंत काढूनच टाकली. हे खरं तर त्यांच्या आमच्या वयाच्या, मोठेपणाच्या हिशेबात बसत नाही. परंतु आमच्यात हे, असं नातं राहिलं. माझी कविता राहावी यासाठी हेही त्यांना जरुरीचं वाटत होतं.

खरं तर शरदराव किंवा त्यांच्याइतवयाच जवळच्या आपल्या समवयस्क सहकाऱ्यांना सांगितलं नाही ते मी त्यांना सांगितलं. आज कुटुंबप्रमुख गेले!

सव्वीस जानेवारी ८३ ला, गेल्या वर्षी त्यांच्या घरी दिल्लीला 'खेड्यातील मराठी कविता' असा काव्यवाचनाचा कार्यक्रम त्यांनी घेतला होता. वेणूताई आणि चव्हाणसाहेबांनी खूप परिश्रम घेतले. यशवंतराव चंद्रचूड, वसंतरावदादा पाटील, बहुसंख्य केन्द्रीय मंत्री, आमदार, खासदार, दिल्लीतले पत्रकार व इतर मराठी रसिक. त्या दिवशी ते कवितेवर, मराठी कवितेवर खूप बोलले, चर्चा-गप्पा झाल्या. ना. घ. देशपांडे, बी. रघुनाथ व भालचंद्र लोलेकर ह्यांची मी वाचलेली कविता त्यांना खूप आवडली होती. त्वरित त्यांनी त्यांच्या संग्रहाची नावे लिहून घेतली. "एवढे मराठीतले चांगले कवी मी नीट वाचले नाहीत म्हणून मला वाईट वाटते" असे म्हणाले. नंतर दोन दिवस अशोक जैन, चव्हाणसाहेब, मी, दिल्लीतली भेटणारी मंडळी खूप चर्चा.

नॅशनल बुक ट्रस्टचं दिल्लीनंतरचं केंद्र मुंबईत आणले. तो आग्रह त्यांनीच धरला. साहित्य अकादमीची बक्षिसं, त्याची पद्धती, स्वरूप बदललं पाहिजे असं ते आवर्जून म्हणाले. अनेकांशी त्यांची–आमची चर्चा झाली. कितीतरी नव्या कल्पना कला, साहित्य, संस्कृती, नृत्य, चित्र, शिल्प, यासंबंधात त्यांच्या असायच्या. महाराष्ट्राच्या ह्या संदर्भातल्या जडणघडणीतल्या व्यवस्था, यंत्रणा, संस्थांसंबंधी–साहित्य संस्कृती मंडळ, लोकसाहित्य समिती, कला अकादमी इत्यादी–आता काळाच्या संदर्भात खूप बदल केला तर पाहिजेच; परंतु निश्चित

स्वरूपाचं संशोधन, संपादन काळजीपूर्वक केलं पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

केव्हा तरी आमदार म्हणून सभागृहात मी काही बोललो तर त्यांच्या मूळ कल्पना, विचार नंतर भेटीत ते बोलून दाखवीत. पदरात फार कमी पडतं, ह्या सगळ्या संस्था स्थापण्यातला हेतू, त्यापासूनच आपण दूर जातो, किंवा पसरट काही तरी करीत असतो ही खंत त्यांना होती.

### अद्ययावत वाचन

चव्हाणसाहेब खरे तर फडके, खांडेकर युगातले. बोरकर-कुसुमाग्रज हे वास्तविक त्यांचे कवी. परंतु माडगुळकर, जी. ए., नेमाडे, चित्रे, महानोर, दया पवार, एवढेच नाही तर १९६५ च्या नंतरची कथा, कविता, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी लेखन त्यांनी जास्ती नाही पण किती तरी प्रमाणात वाचलेलं असायचं. त्याबद्दल ते चर्चा करायचे.

औरंगाबादला साहित्य सभेच्या उद्घाटनाला ते दोन वर्षांपूर्वी आले होते. तेव्हा १९६५ नंतरच्या पुस्तकांबद्दल, लेखकांबद्दल नुसते नावानी नाही तर त्यातील एकूण जाणिवांसंबंधी, प्रवाहासंबंधी उदाहरणांनी ते बोलले. तेव्हा समोरचा साहित्यिक, रसिकवर्ग चाट पडला व त्यांनाच त्याची लाज वाटू लागली. कारण बहुतेकांनी एवढी नवी पिढी व त्यांची पुस्तकं वाचलेली नव्हती. त्या वेळी त्यांनी एका अगदी नव्या कवीच्या—सुधाकर गायधनी-कवितेच्या ओळी व कविता तोंडपाठ सांगितली.

> चिंध्या पांघरून सोनं विकायला बसलो
> गिऱ्हाईक कुठेही फिरकेना।
> अंगावर सोनं पांघरून चिंध्या विकाया बसलो
> गर्दी हटता हटेना ॥

त्यांनी मग नवी कविता कुठेतरी येणार, कथा येणार, परंतु ती खेड्या-पाड्यातल्या सामान्यांच्या जीवनातून येते ही गोष्ट महत्त्वाची आहे. केंद्र बदलले आहे. इत्यादी गोष्टी परिपक्व वाङ्मयीन भूमिकेतून मांडल्या.

साहित्यिकांच्या व्यासपीठावरून ते जेव्हा नितळ रसिक साहित्यिक वाणीनं असं बोलत असत तेव्हा त्यांचे राजकीय कपडे, त्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहणे, इत्यादी बदललं पाहिजे. असं अनोळखी साहित्यिक मग जवळ आल्यावर,

ऐकल्यावर म्हणत. साहित्यावर अपार प्रेम, साहित्यिकांसंबंधी प्रेमजिव्हाळा, साहित्य संस्था, संमेलनं इत्यादीविषयी त्यांना खूप अंतःकरणापासून आतून वाटायचं व ते त्यासंबंधी सर्व काही करायला तयार असत.

अठ्ठावन्नाव्या जळगावच्या साहित्य संमेलनाच्या वादामुळे ते फार खजील झाले. असे म्हणाले होते, ही पद्धत बदलली पाहिजे. साहित्यातल्या सर्वोच्च निवडीचा हा कुठला बहुमान ? घटना बदलवा, ज्येष्ठ साहित्यिकांना फार तर अधिकार द्या, कुठे फार घटना व तपशिलात जाता ? आपलं म्हणून सोयीचं, सन्मानाचं काही अध्यक्षपदासाठी करा, असं सांगत. साहित्य प्रांतात राजकारणा-तल्यापेक्षाही कटुता अधिक वाढीस लागल्याची खंत तेव्हा त्यांनी बोलून दाखविली. त्यांच्याशी ह्या विषयावर संवाद करण्यास त्यांना फार आनंद वाटत असे.

प्रत्येक भेटीत बोलणं झाल्यावर मग काय नवीन लिखाण इत्यादी, नवीन चांगली पुस्तकं कुठली आली का ? कुणाचं काय लिहिणं चाललं आहे, ‘ उपरा ’नंतर लक्ष्मण मानेनं काही लिहिलं का ? मी उत्सुक आहे तो आता काय लिहील ? नेमाडेनं ‘ हिंदू ’ अजून कशी पूर्ण केली नाही ? अशी चौकशी करत. करमणूक इत्यादी ठीक आहे. पण शेतीच्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात मी थिएटर वर्क करावे असं एकदा सहज म्हणाले.

‘ घाशीराम कोतवाल ’ परदेशात पाठविण्यासंबंधी पंतप्रधानांना सांगण्याचा भाग त्या वेळचा महत्त्वाचा म्हणून असो की, “ जनांचा प्रवाहो चालला ”, “सिंहासन” ह्या पुस्तकांची पारितोषिकं महाराष्ट्र शासनानं नाकारणं असे त्यांचं स्वच्छ मत असे. आमदार म्हणून त्यांच्याशी ह्या प्रसंगी मी फोनवर बोलतो होतो. त्यांनी त्यांची स्पष्ट भूमिका मलाही व जाहीरही सांगितली. दोन्ही ठिकाणी दोन्ही प्रश्न धसास लागले. शासन नमले. कलाकृती म्हणून व त्यातले तज्ज्ञ जाणकार साहित्यिक काय म्हणतात ह्याचाच विचार महत्त्वाचा, राजकीय दडपण शहाण-पणाचं नाही अशी त्या वेळी त्यांनी भूमिका सांगितली.

कितीही मोठ्या, वृद्ध कलावंताचं खासगी शासनातलं काम असो की लता मंगेशकरांचा कलाप्रकल्प असो, त्या विषयाला गती द्यायला, पूर्ण करायला चव्हाणसाहेब हा एकमेव माणूस होता. त्याची त्यांना पूर्णपणे समज होती, आस्था होती.

**वाङ्मयीन प्रश्न**

वाङ्मयीन मासिके महाराष्ट्रात बंद पडत चालल्याचं ते एका भेटीत अलीकडे बोलले. अनुष्टुभ, युगवाणी, सत्यकथा ते वाचीत; नियमित नसले तरी बऱ्याचदा स्वतःच वर्गणीदार झाले. अंकातल्या मजकुरावर त्यांनी लिहिलं हे सांगून होणं वेगळं. त्यांनी स्वतःच हे केलं; उत्स्फूर्तपणे ग्रंथाली व इतर वाङ्मयीन चळवळी-संबंधी ते संबंधितांशी बोलत. पुस्तके, किंमती, विक्री यासंबंधात चांगली पुस्तकं शासनानं घेऊन ग्रंथालयांना द्यावी, निदान निवडक पाचशे, असं मी शासनात बोललो होतो. त्यातला मुख्य विचार त्यांचा होता. यापूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मर्यादित स्वरूपात तुकाराम, ज्ञानेश्वर, गाथा इत्यादीं-पासून सुरुवात केली होती.

परराष्ट्रमंत्री असतानाच एवढ्या धकाधकीत श्रीपाद डोंगरे ह्यांनी एकदा कळवलं—नासिक—निफाडला या, साहेबांनी बोलाविलं आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण झाल्यास निफाडजवळच्या एका हुतात्म्याच्या नावानं वाचना-लय सुरू करायचं होतं. मी गेलो. कुठे कोणी यावं याचं त्यांना फार भान होतं. सत्यकथा दिवाळीतली माझी प्रदीर्घ कविता त्यांनी आठवणीनं आणली होती. ( मीच कात्रण पाठविलेलं होतं. ) तीवर ते फार खूष होते. तुमच्या कवितेतलं हे परिवर्तन फार मोलाचं आहे असं म्हणाले. एका बाजूला अस्सल चिंतनशील दीर्घ कविता, मुक्त कविता, दुसऱ्या बाजूला मुद्दाम लिहिलेली काव्यात्म चित्रपट गीतं. इतर गीतं. कसं काय जुळतं सगळं. ओतप्रोत आनंद त्यांच्यापाशी मी पाहिला.

शरदराव, प्रतापराव, विनायकराव इत्यादींसमोर कवितावाचन झाले तेव्हा म्हणाले, " मातीतून मोत्याची कणसं निर्माण करणारा, मातीतला सर्जनशील महानोर, त्याच कणसांना बालकवींच्या पुढे जाऊन जोंधळ्याला चांदणं लगडून जावं असे लिहिणारा महानोर, यापेक्षा महाराष्ट्रात अधिक किती गतिमानता पाहिजे इ. " त्यांचं वाक्य हे माझं बळ झालं.

आज आमच्यापैकी कोणी कुठल्या पक्षात, दूरदेशात, राजकारणात, शेतीत, कारखान्यात असतील. ही सगळी नाती-गोती, गोतावळा यशवंतरावांचा एकच होता, आहे. परंतु शरदराव, विनायकराव, आम्ही दुसऱ्या अर्थानं या क्षेत्रात फार पोरके असहाय झालो, हे खरं.

राजकारणी पुरुष म्हणून त्यांनी आपल्या ठिकाणी राहावं. साहित्यिक व्यासपीठ त्यांना वर्ज्य इत्यादी फार ताणण्यात अर्थ नाही. इतर जाणकार [?] राजकारण्यांची गोष्ट वेगळी. यशवंतराव चव्हाणांची गोष्ट वेगळी. ते साहित्यिक होते. त्यांच्या पद्धतीनं त्यांनी लिहिलं.

" ऋणानुबंध ", " कृष्णाकाठ " लोकांना अधिक भावलं. "कृष्णाकाठ"चा प्रकाशनसमारंभ करण्यास त्यांचा सक्त विरोध होता. केला नाही. परंतु पुस्तक छापून झाल्यावर सर्जेराव घोरपडे ( प्रकाशक म्हणून नव्हे व्यक्ती ) यांचे घरी साहित्यिक मित्रांना बोलवून त्यांच्याशी त्यांनी गप्पागोष्टी केल्या व कृष्णाकाठ भेट दिले. ना. गो. कालेलकर, व्यंकटेश माडगुळकर, गोविंदराव तळवलकर, भालचंद्र नेमाडे, गो. मा. पवार, शरद पवार, विनायक पाटील, मी इत्यादी मित्रमंडळी होतो. हा त्यांचा नित्याचा आवडीचा भाग. असा संपूर्णपणे साहित्यिक पिंडाचा माणूसही ज्या वेळी कधी टीकाविषय होतो, याचं आश्चर्य वाटतं. बऱ्यांनी त्यांच्या वाङ्मयीन भूमिकेबाबत लिखाण, वाद करणे वेगळे पण लुंगेसुंगे साहित्यिक त्यांच्यावर या निमित्ताने " त्यांचे राजकारणाचे कपडे " म्हणून आकसानं लिहितात तेव्हा फार फार वाईट वाटतं. तुम्हाला राजकारणाविषयी बोलण्याचा, भोग भोगण्याचा जसा अधिकार, तसा त्यांनाही साहित्यिक म्हणून आहेच.

एकदा मी हा विषय काढला की ह्यांनी हे लिहिलं, त्याच्या अशा ओळी वगैरे. ते फक्त हसले. फार गोड हसले. त्यांना माहीत सर्व होतं. संबंधितांचा इतिहास माहीत. तरीही त्यांच्याविषयी कटुता नाही. ते जाहीर बोलले नाहीत, किंवा माझ्याजवळही त्यांनी याची दखल घेतली नाही. राजसत्तेतील माणसाला ते फार कठीण नसतं. परंतु चव्हाणसाहेबांच्या सुसंस्कृत, समंजस, सोशिक व्यक्तिमत्त्वाला ते माहीत नाही.

आमदार, खासदार पुष्कळ पुष्कळ मिळतील, कवी महानोर मिळणं कठीण असं ते म्हणत. मोकळेपणी बोलताना दोघांनाही विषयाचा आडपडदा नसे. मी शरदरावांबरोबर पहिल्या दिवसापासून होतो, तिथेच राहिलो. ते कधीच मला तिकडे कुठे यावं, म्हणाले नाहीत. उलट काय काय हाऊसमधलं विचारीत. फक्त ह्या धावाधावीत, आमदारकीत मी वाचन इत्यादी सोडू नये, राजकारण्यांच्या फार आहारी जाऊ नये असं आतून माहिती असल्यामुळे व माझी प्रकृती ठाऊक

असल्यानं सांगत. किती तरी अशा एकट्या भेटी झाल्या. ते, वेणूताई मी असं पुष्कळ.

असंच एकदा विरंगुळ्याला ते दोन दिवस होते. वेणूताईही होत्या. मला बोलावून घेतले. त्या वेळी खूप मोकळं बोलता आले. राजकारण चांगलं मी करतो, ते त्यांना खूप आवडायचं. पाणी, शेतीचे प्रश्न, पाण्याचे प्रश्न, साहित्य कलेपेक्षा मी अधिक मांडतो ह्याचा त्यांना खूप आनंद होता. परंतु मी कविता फार जपली पाहिजे असं त्या भेटीत त्यांनी सांगितलं. तेच माझं बळ, असं म्हणाले. निवडणुकीच्या पद्धतीनं जाण्याची माझी प्रकृती नाही. जाऊ नये. इतर व्यवस्था माझ्यासारख्यासाठी आहे. आमदार वगैरे असावं, परंतु कवितेपेक्षा ते मोठं नाही असं सांगितलं. म्हणून खूप आग्रह झाला तरी मी उभा कधी राहिलो नाही.

### योग नव्हता

कृष्णाकाठनंतर दुसरा खंड यावा म्हणून प्रकाशक सर्जेराव घोरपडे व आम्हीही बरेच लोक त्यांच्यापाठी लागायचो. एक फार महत्त्वाचं काम ते झालं असतं. योग नव्हता, एवढंच म्हणावं. गेल्या महिन्यात त्यांना पत्र लिहिलं होतं. त्यात शेवटी एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी मला खासगी बोलायचं आहे असं लिहिलं होतं. कऱ्हाडला भेटू या, असं त्यांचं पत्र आहे. ते त्यांचं मला शेवटचं पत्र.

ती भेट झालीही नाही. काम खरं वेगळं होतं. परंतु त्याचा होकार मिळणार की नाही म्हणून अडखळत होतो. मी साहित्य महामंडळाचा अध्यक्ष त्यांचे– माझे घरगुती संबंध. तरीही बोललं पाहिजे असं. एक साहित्यिक–रसिक माणूस, महाराष्ट्राची साहित्यिक सांस्कृतिक परंपरा त्यांनी जपली, वाढविली, त्याचे मोल सयाजीराव महाराज गायकवाड त्यांना संमेलनाचे अध्यक्षपद दिले तसे करावे म्हणून प्रथम क्रमांकाचे यशवंतरावांचे नाव सुचवले व त्यासाठी आग्रह धरला. स्वागताध्यक्ष शामरावजी कदम यांचा पाठिंबा होता. मी काही साहित्यसंस्था व साहित्यिकांशी बोललो. जवळ जवळ सगळेच सहमत होते. पुणे–मुंबईत व तेथील संस्थांत बोलायला २६-२७ नोव्हेंबरला येऊन ठेपलो होतो. सर्वत्र प्रतिसाद त्यांच्या नावे आलाच असता. असं झालं तर एकदा बिनविरोध त्यांना संमेलनाध्यक्षपद द्यावे असं वाटत होतं. त्यांनी अनेक मोठ्या

जागा, सन्मान, भाषणे घेतली. परंतु शेवटी हेही जरुरी होते. ते मनात राहून गेलं आहे. त्यांचा होकार कसा मिळवायचा हेही पाहता आलं असतं. अडचणी तशा नव्हत्या. आज त्यांना श्रद्धांजली वाहण्याची वेळ आली.

आजवर वेळोवेळी कितीतरी गोष्टी साहित्यासंबंधी बोललो. साहित्यासंबंधी संस्था, चळवळ, कला, संगीत, गाणं हा त्यांच्या खास पिंडाचा भाग होता. त्यांच्या तोडीची जाण व ओलावा ह्या क्षेत्रात दोन्ही हातांनी आम्हाला देणारा, समजून घेणारा राज्यकर्ता रसिक माणूस त्यांच्याशिवाय जवळपास दिसत नाही. माणसा-माणसांना जोडणारा, शत्रूंवर प्रेम करणारा एक दिलदार, कलावंताच्या प्रकृतीचा माणूस कायमचा दूर गेला. आम्हाला एकटं सुनं वाटतं. राजकीय, सामाजिक घडणीच्या संदर्भात फार मोठी हानी झाली. व्यक्तिशः माझ्या दहा वर्षांच्या जीवनाला ज्यांनी शक्ती दिली, नवी पालवी दिली, आधार दिला.

विरंगुळामध्ये ( कराडचे घर ) एकदा चव्हाणसाहेब, वेणूताई, मी, त्यांचा डॉक्टर ( के ) पुतण्या, सूनबाई जेवायला होती. ताटं तयार झाली माझ्यासाठी, साहेबांसाठी वेणूताईंनी फार जीव टाकून नॉन्व्हेज केलं होतं. औषधी गोळ्या घेऊन घास घेणारे व्हा. साहेबांनी मला घुटमळताना पाहिलं. एकदम उठले. मी शाकाहारी. पण वेणूताईंना माहीत नव्हतं. सगळे अर्धा तास थांबले. पुन्हा कवीसाठी ( निसर्गाच्या इत्यादी ) व्हिजिटेरियन गोडधोड जेवण. सगळं होतं. पुरेसे पण पुन्हा जेवण वेगळं. साहेब म्हणाले, ' पावसाची कविता 'ची अर्पण-पत्रिका वेणूताईंना दाखविली तेव्हा ती संकोचली. म्हणाली, " तुमचं ठीक. माझं नाव कशाला टाकलंय. "

" तो कविराजांचा प्रश्न. त्यांना असं सांगशील ? "

" नाही. "

इतके घरातले झाल्यामुळे वेणूताई गेल्यानंतर आम्हालाही साहेबांचं एकटेपण फार जाणवत राहिलं. ते वेणूताईंच्या आठवणींच्या गर्तेतून बाहेर येऊच शकले नाहीत.

कसंतरी वर्ष लोटलं. अनेक थरांतली, खूप मोठी, खूप सामान्य, फाटक्या माणसांच्या अंतःकरणातली ही मंडळी पाच-सात लाख लोक कऱ्हाडला तुडुंब रडत होते, सारखे.

१०

# यशवंतराव आणि समाजवाद

भास्कर लक्ष्मण भोळे

## सामाजिक पार्श्वभूमी आणि बौद्धिक तयारी

ज्या सातारा जिल्ह्यात यशवंतरावांचा जन्म झाला आणि जिथे त्यांनी नेतृत्वाची उभारणी केली तो महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांपेक्षा समाजवादी विचारसरणीच्या जोपासनेस अधिक अनुकूल होता. जमीनदार आणि त्यांची कुळे यांच्यातील संघर्ष या जिल्ह्यात अधिक ठळक व झुंजार स्वरूपात व्यक्त झाला होता. एकेकाळच्या मराठा साम्राज्याची इथे राजधानी असल्यामुळे पराक्रम आणि राष्ट्रभक्ती यांची दीर्घ परंपरा तिथे आधीपासून होतीच. शिवाय टिळकप्रणीत शिवाजी संप्रदायानेही या जिल्ह्याला बरेच प्रभावित केले होते. विद्यमान परिस्थितीविषयी असमाधान आणि ती बदलण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याची शोषितांची तयारी यामधून आपोआपच समाजवादी विचाराची पूर्वपीठिका जिल्ह्यात तयार झालेली होती. ब्राह्मणेतर चळवळीचा बालेकिल्ला या जिल्ह्यात होता. त्या चळवळीने तिथल्या जनसामान्यांच्या मनावर सामाजिक समता व सामाजिक न्याय या तत्त्वांचे खोल संस्कार केले होते. शेटजी-भटजी या युतीविरुद्ध असंतोष मोठ्या प्रमाणात उसळला होता.

बहुजन समाजातील श्रेष्ठींच्या ठिकाणी या चळवळीतून कायदे-कौन्सिलातील राखीव जागा, सरकारी नोकऱ्या, व्यवसाय-उद्योगातील वाढीव भागीदारी

वगैरेंबद्दल आकांक्षा निर्माण झाल्या, तर खालच्या श्रेणीच्या सामान्य शेतकरी शेतमजूर वर्गांच्या ठिकाणी तिने पिळवणुकीपासून सुटका करवून सामाजिक न्याय पदरात पाडून घेण्याच्या अपेक्षा पल्लवित केल्या होत्या. त्यांच्यासाठी ही चळवळ केवळ ब्राह्मण जातीचे वर्चस्व झुगारून देण्यापुरती नव्हती तर तिला वर्गवर्चस्वविरोधी स्वरूप आपसुकच प्राप्त झाले होते.

गांधींचे असहकारिता आंदोलन सामान्य शेतकरीवर्गाला जवळचे वाटले कारण त्याचे आवाहन वरिष्ठवर्गीय श्रेष्ठींना डावलून तळपातळीवरच्या सामान्य नागरिकांना केले गेले होते. नेतृत्वाचे पारंपरिक वलय छेदून नवे नेतृत्व उदित होण्याची शक्यता या आंदोलनातून पुढे आली होती. स्वाभाविकच पुरोगामी पिंडाच्या सातारा जिल्ह्यातील बहुजन समाजात नवचैतन्य प्रसृत होऊ लागले होते. यशवंतराव हे या चैतन्याची पेरणी करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून जिल्ह्यात वावरत होते. काँग्रेसच्या चळवळीबद्दल आदर बाळगूनही काँग्रेस सामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी एकरूप होत नसल्यामुळे ती तळागाळा-पर्यंत जाऊ शकत नाही हे सत्य प्रस्तुत कार्यकर्ते दुर्लक्षू शकत नव्हते. आर्थिक शोषणाचा खोलवर विचार केल्यामुळे जातिविग्रही भूमिका मांडणाऱ्या बहुजन-श्रेष्ठींपेक्षा वर्गविग्रही मांडणी करणारांकडे ते अधिक आकर्षित झाले होते.

उपकारक सामाजिक पार्श्वभूमी आणि स्वकष्टार्जित बौद्धिक तयारी या गोष्टींमुळे यशवंतराव समाजवादाचा विचार सहज समजावून घेऊ शकले. सत्य-शोधक चळवळीने अप्रत्यक्षत: एक नवा ध्येयवाद त्यांच्या मनात पेरलेलाच होता. क्रांतिकारक विचारसरणी स्वीकारण्याची पूर्वपीठिका त्यातून तयार झाली होती. सावकारी पाश, कुळांची कायम ससेहोलपट वगैरे जे शेतकरी समाजाचे जिव्हाळ्याचे आर्थिक प्रश्न होते त्याकडे जिल्हा व प्रांतिक काँग्रेसचे नेते दुर्लक्ष करतात हे पाहून यशवंतराव अस्वस्थ होत असत. १९३१ साली मसूर ( तालुका कराड ) गावी भरलेल्या राजकीय परिषदेत एका ठरावाला उपसूचना मांडून माधवराव बागल यांनी जेव्हा राजकीय मागण्यांच्या जोडीला काही आर्थिक मागण्या ठेवल्या तेव्हा तांत्रिक अडचणी पुढे करून नेत्यांनी त्या डावलल्या हे यशवंतरावांना खटकले होते. त्यांनी खुल्या अधिवेशनात बागलांना पाठिंबा दिला होता. शेतकरी समाजाच्या तातडीच्या प्रश्नांबद्दल ही परिषद काहीच बोलणार वा करणार नसेल तर शेतकरी समाजाने स्वातंत्र्य आंदोलनात

घेतलेला भाग फुकट जाईल अशी त्यांची भावना झाली होती. आपल्या आत्म-चरित्रात ते याबद्दल लिहितात, " शहरातल्या पांढरपेशा वर्गातील कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना राजकीय स्वातंत्र्य प्रिय होते. पण त्यातून उद्भवणारे सामाजिक व आर्थिक प्रश्न त्यांना नको होते, असा अर्थ मी मनाशी काढला आणि माझे मन अतिशय कष्टी झाले. " ( कृष्णाकाठ, १०३ )

सामान्य स्तरातील जीवनानुभव यशवंतरावांना समाजवादाच्या दिशेने असा घेऊन जात असतानाच वैचारिक अंगानेही समाजवादाचे संस्कार मिळण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. १९३२-३३ साली यशवंतराव विसापूर कारागृहात होते. तिथे त्यांची बारा नंबरची बराक म्हणजे यशवंतरावांच्या बौद्धिक जडण-घडणीची संस्कारशाळाच ठरली. आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन, अतीतकर, मामा गोखले, वि. म. भुस्कुटे, एसेम जोशी, ह. रा. महाजनी प्रभृती अभ्यासू राजकीय नेत्यांच्या सहवासात अनेक विषयांचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. विविध विचारसरणींचा सविस्तर व तौलनिक अभ्यास त्यांनी केला. गांधीवाद, साम्यवाद, समाजवाद, मार्क्सवाद वगैरे " राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी संबंध " त्यांना स्पष्ट झाला. वाचन-चिंतन-मनन आणि विचारविमर्श यामधून विविध विचार-सरणींच्या तात्त्विक आधारांचे इतके पिंजण तुरुंगात झाले की बाहेर पडताना आपण केवळ काँग्रेसवाले राहिलो नसून समाजवादी निष्ठेची जोड घेऊन आलो आहोत अशी खुद्द यशवंतरावांची धारणा झाली होती ( किता, १८२ ).

अर्थात या विचारमंथनातून समाजवादाची त्यांना सांगोपांग कल्पना आली होती किंवा समाजवाद कसा आणता येईल याची दिशा स्पष्ट झाली होती असे मात्र म्हणता येणार नाही, कारण त्यांनीच पुढे हे कबूल केले आहे की, अतिव्याप्त अर्थानेच त्या वेळी समाजवाद शब्दाचा प्रयोग ते करीत असत. शब्दामागे असलेले संदर्भांचे सगळे पदर उकलण्याऐवजी त्यांनी समाजवादाचा आपल्यापुरता एक सुटसुटीत अर्थ करून घेतला होता. स्वातंत्र्यसैनिक म्हणून आपण काँग्रेसचे व्यासपीठ मूलभूत मानतो आणि त्याच वेळी समाजवादही स्वीकारतो याचा मर्यादित अर्थ " एवढाच की राजकीय स्वातंत्र्य म्हणजे निव्वळ इंग्रजांचे राज्य जाऊन या देशातील जनतेची प्रगती होणार नाही, त्याचबरोबर आमच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनामध्ये मूलभूत फेरफार करावे

लागतील. ''

स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय न राहता सामाजिक-आर्थिक आशयही त्यास लाभावा एवढ्या स्थूल व संदिग्ध स्वरूपातच समाजवादाचा विचार यशवंतरावांनी स्वीकारला होता. साम्यवादी मंडळींशी शास्त्रीय समाजवादासंबंधी वादविवाद करताना आपली गडबड उडत असे, मात्र तरीही खोलात जाण्याची आपली तयारी नव्हती हे त्यांनी स्वच्छ शब्दात कबूल केले आहे. पुस्तकी विचारविमर्शापेक्षा प्रत्यक्ष जनआंदोलनाच्या अनुभवांमधूनच आपल्या देशातील परिस्थितीला अनुरूप असे समाजवादाचे प्रारूप पुढे येईल अशी आशा त्यांनी बाळगली होती. आपल्या समाजवादी दृष्टिकोणाने काँग्रेसनिष्ठेवर मात करू नये अशी दक्षताही त्यांनी आरंभापासून घेतली होती. १९३४–३५ पर्यंत काँग्रेसवर राष्ट्रवादी विचाराची एवढी गडद छाया होती की, ब्रिटिशांनी देश सोडून जाणे एवढाच नकारात्मक अर्थ काँग्रेसप्रणीत स्वातंत्र्याला आला होता. सामान्य जनतेच्या जीवनात क्रांती व्हावी किंवा सामान्य नागरिक सामाजिक-आर्थिक दास्यातून मुक्त व्हावा हे त्या राष्ट्रवादात तोपर्यंत अंतर्भूतच झालेले नव्हते.

ही जाणीव ज्यांना प्रकर्षाने झाली त्यांनी काँग्रेसमध्ये काँग्रेस समाजवादी पक्ष संघटित केला होता. राघूअण्णा लिमये यांच्यामुळे यशवंतराव या गटाशी जोडले गेले होते. समाजवादाचा विचार खेड्यातल्या शेतकऱ्यांनाही आवडतो हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. गरीब-श्रीमंत विषमता नष्ट व्हावी, आणि जे मागासलेले आहेत त्यांना उन्नतीच्या सर्व संधी अधिकार म्हणून मिळाव्यात (कृष्णाकाठ, १५६)—या समाजवादाच्या उद्दिष्टांबाबत काँग्रेसमध्येही कुणाचे दुमत होईल असे यशवंतरावांना वाटले नव्हते. गरिबी आणि मागासलेपणा यांच्या ओझ्याखाली पिचलेले कार्यकर्ते मित्र समाजवादी विचाराने प्रेरित होतात हे पाहिल्यावर काँग्रेस संघटनेत राहूनच सर्व जिल्हा काँग्रेस समाजवादी विचाराची करायची असे मनसुबेही यशवंतरावांनी आखले होते.

पण लवकरच एक शृंगापत्ती त्यांच्यापुढे उभी राहिली. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नेतृत्वाखाली आणखी एक गट काँग्रेसमध्ये निर्माण झाला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भय्याशास्त्री वाटवे, ह. रा. महाजनी, वामनराव कुळकर्णी प्रभृती त्या गटात होते. यशवंतरावांचे त्यांच्यापैकी काहींशी वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध होते. यशवंतरावांनी काँग्रेस समाजवादी पक्षात जावे हे या मंडळील

पसंत नव्हते. " ( समाजवादी ) मंडळी खरा समाजवाद देशात आणू शकणार नाहीत. हे गांधींचा अहिंसावादच समाजवादाच्या परिभाषेत मांडण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या वैचारिक भूमिकेत मूलभूत असे काहीही क्रांतिकारकत्व नाही. हिंदुस्थानचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सुटायचे असतील तर स्वराज्याची चळवळ अशा कार्यक्रमांवर व अशा पद्धतीने बांधायला पाहिजेल की, तिची जसजशी प्रगती होईल, तसतसे त्यातून समाजवादाचे स्वप्न साकार व्हायला मदत होईल. " ( कृष्णाकाठ, १८७ ) अशी भूमिका रॉयवादी घेत असत.

यशवंतरावांना निवड करायची होती. त्यांनी विचार केला समाजवादी बुद्धिमान व देशभक्त निःसंशयपणे आहेत, पण ते पुस्तकी आहेत. हस्तिदंती मनोऱ्यात बसून चिंतन करणारे आहेत, लोकांच्या प्रश्नाचे त्यांना यथार्थ आकलन नाही, त्यांच्या पुस्तकी विचारांना शहरी झालर आहे. जनतेमधील आंदोलनाचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव मुळीच नसल्यामुळे ते या देशात समाजवाद आणू शकणे असंभवनीय आहे. याउलट रॉय तुरुंगातून आपल्या अनुयायांना पत्राद्वारे जे विचार कळवीत किंवा चळवळ-बांधणीविषयी मार्गदर्शन करीत ते पाहिल्यावर समाजवाद्यांच्या भोंगळ विचारांपेक्षा रॉय यांची मांडणी अधिक नेमकी आहे, तीत ठाम दिशा आहे अशी यशवंतरावांची भावना झाली. अर्थात रॉय यांच्या विचारांपेक्षा व्यक्तिमत्त्वानेच ते जास्त प्रभावित झाले होते हे त्यांच्या लेखनावरून दिसते ( कृष्णाकाठ, १९० ). रॉय यांची तीव्र बुद्धिमत्ता, मार्क्सवादाचा त्यांनी केलेला सखोल अभ्यास, रशियात लेनिनसोबत केलेले राजकीय व वैचारिक कार्य, चीन, द. आफ्रिका व मेक्सिकन क्रांतीतील प्रत्यक्ष सहभाग आणि पूर्व आशियायी देशामध्ये ज्या भांडवलशाहीविरोधी चळवळी करायच्या त्याच्या आखणीतील जागतिक पातळीवरचा पुढाकार–या बाबींमुळे रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक तेजोवलय त्या काळात निर्माण झाले होते. समाजवाद्यांपेक्षा रॉयवाद्यांमध्ये समाजवादी क्रांती घडवून आणण्याची अधिक क्षमता आहे असे त्या वेळी यशवंतरावांना वाटून त्यांनी समाजवादी पक्षाचा राजीनामा दिला आणि रॉयवाद्यांची सोबत धरली.

रॉयवादी प्रतिपादनातील पुढील दोन गोष्टी चव्हाणांना पटत होत्या. एक, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची लढाई ही समाजवादी क्रांतीच्या पूर्वीची लोकशाही क्रांतीची लढाई आहे आणि ती कामगार व शेतकरी यांनी संयुक्त बळावरच

लढवायची आहे, त्या दृष्टीने कोट्यवधी गरीब शेतकऱ्यांना वर्गहिताच्या मागण्यांच्या आधारे संघटित करणे हे मुख्य कार्य असून हे ऐतिहासिक कार्य फक्त काँग्रेसच पार पाडू शकेल; आणि दुसरे असे की, राज्यक्रांती करायची असेल तर आधी देशामध्ये विचारक्रांती घडवून आणली पाहिजे, त्याशिवाय समाजवादाची क्रांती होणार नाही. विचारक्रांतीसाठी डोळसपणाचे वातावरण निर्माण केले पाहिजे, परंपरावादी दृष्टीने आंधळेपणाने गोष्टी स्वीकारण्याची मनोवृत्ती काढून टाकली पाहिजे (कृष्णाकाठ, १९२). चव्हाणांनी त्या काळात रॉय यांच्याशी "भारतीय सामाजिक क्रांतीतील किसानांचे स्थान आणि राज्यक्रांतीचे तंत्र" या विषयावर सविस्तर खल केला होता असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री सांगतात ( चव्हाण अभिनंदन ग्रंथ, ८ ).

रॉय यांचा आपल्यावर प्रभाव झाला तो केवळ बौद्धिक व तात्त्विक पातळी-पुरताच परिमित होता, त्यापेक्षा अधिक खोलवर तो जाऊ शकला नव्हता हे खुद्द चव्हाणांनीच सांगितले होते ( कुन्हीकृष्णन. ३३ ). स्वातंत्र्योत्तर देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नाचे गांभीर्य रॉय यांच्या शिकवणुकीतून त्यांना पटले असले तरी हे प्रश्न दुय्यम आहेत. स्वातंत्र्य हेच प्रथम महत्त्वाचे आहे अशीच त्यांची एकंदरीत धारणा होती. काँग्रेसमध्ये पर्यायी नेतृत्व उभे करण्याची रॉयची भूमिका तर त्यांना कधीच पटली नव्हती. हे रॉयवादी काँग्रेसला अप्रत्यक्षतः कमजोर तर करणार नाहीत ना ही भीतीही चव्हाणांच्या मनात सतत वावरत होती. (कृष्णाकाठ. १९२ ). रॉय तुरुंगातून सुटल्यावर काँग्रेसवाल्यांनी त्यांचे थंड स्वागत केले तेव्हा तर चव्हाणांची खात्रीच झाली. तासगावची रॉयवाद्यांची परिषद उधळली गेली. जिल्ह्यात रॉयवादी व रॉयविरोधी अशा फळ्या पडल्या तेव्हा " जिथे गांधी–नेहरू तिथे मी " ही मूळ स्वभावाशी सुसंगत भूमिका चव्हाणांनी स्वीकारली. दुसऱ्या महायुद्धात सहभागी होण्याच्या प्रश्नावरून अल्पावधीतच रॉयवादी व काँग्रेस यांच्या वाटा वेगळाल्या झाल्या आणि चव्हाणांच्या आयुष्यातले रॉयपर्व संपुष्टात आले.

चव्हाणांवर रॉयच्या विचारसरणीतून समाजवादाचे खूप ठळक संस्कार झाले होते असे म्हणता येणार नाही. कारण नंतरच्या त्यांच्या राजकीय वाटचालीत त्यांनी त्या विचारसरणीचा कुठेही आग्रह धरलेला आढळत नाही. रॉयवादातल्या त्यना पटलेल्या उपरोक्त दोन बाबींचा – काँग्रेसतर्फे शेतकऱ्यांचे वर्गहिताधारे

संघटन आणि विचारक्रांतीचे प्रयत्न – त्यांच्या हातून पाठपुरावाही झालेला दिसत नाही. युद्धातल्या सहभागावरून मतभेद झाला हे समजू शकले तरी रॉय यांनी पुढे जो नवमानवतावादी विचार मांडला तो मार्क्सवादाला भारतीय परिस्थितीशी जुळवण्याचाच एक खटाटोप होता. चव्हाणांची भूमिका तशी असली तरी त्यांनी रॉयवादाचा आधार मात्र पुढे कधीच घेतलेला दिसत नाही. यावरून हे स्पष्ट होते की, त्यांना वाटलेले आकर्षण रॉय यांच्या विचारांपेक्षा व्यक्तिमत्त्वाचेच होते आणि त्याचे स्वरूप बौद्धिक असण्यापेक्षा भावनिकच होते. लवकरच ते यथाक्रम विरले.

## गांधीवादी पर्यायही नाकारला

समाजवादाचा रॉयप्रणीत आराखडा जसा चव्हाणांनी नाकारला तद्वतच गांधींनी समाजवादाच्या विचारसरणीला एतद्देशीय स्वरूपात मांडण्याचा केलेला प्रयत्नही चव्हाण स्वीकारू शकले नाहीत. पश्चिमी समाजवादाला पर्याय म्हणून रॉयचा नवमानवतावाद होता. तसाच गांधींचा सर्वोदय विचार होता. पण चव्हाण त्या विचारापासूनही अलिप्तच होते. गांधी-नेहरू असा संयुक्त उल्लेख ते करीत असले तरी त्यांचा कल स्पष्टपणे नेहरूंच्या बाजूने होता. " स्वतःला कधीच गांधीवादी न म्हणवून घेणारा मला भेटलेला पहिला नेता " असे त्यांचे वर्णन वेलेस हँजेन या लेखकाने केले आहे. ( हू आफ्टर नेहरू १,१३२ ). भूमिगत चळवळीच्या खडतर वाटचालीत त्यांचे राजकीय संगोपन झाले असल्यामुळे असेल किंवा जहाल व झुंजार सातारा जिल्ह्याच्या ' समाजवादी ' संस्कारामुळे असेल पण गांधीप्रणीत अहिंसा-सत्य-अस्तेयादी व्रतस्थ जीवनादर्शाचे त्यांना कधीच फारसे आकर्षण वाटले नाही. वैयक्तिक जीवनातही विरक्तिपूर्ण आचरणाचे त्यांनी स्तोम माजवले नाही. सुखवस्तु जीवनपद्धती त्यांना आवडायची. गांधींची. आध्यात्मिकताही त्यांना मानवणारी नव्हती. गांधीविचाराविरुद्ध बंडखोरी त्यांनी कधी केली नसली तरी वर्तमानकाळात गांधीवादाची तत्त्वे बरीच गैरलागू झाली आहेत याबद्दल ते निःशंक होते. स्वतः खादी वापरीत असले तरी खादीचे संपूर्ण तत्त्वज्ञान त्यांनी कधीच स्वीकारले नव्हते, आणि गांधीमार्गातील विधायक कार्यक्रम, क्रियाशील कार्यकर्ते, जनसंपर्क वगैरेबद्दल त्यांना आस्था असली तरी समाजाचे मूलभूत प्रश्न सोडवून देशाला नवे आधुनिक रूप द्यायचे सामर्थ्य

त्या कार्यक्रमात आहे काय? या प्रश्नाचे त्यांचे उत्तर स्पष्ट नकारार्थी होते. (कृष्णाकाठ, १५६). त्यामुळे गांधीप्रणीत समाजवादाचा पर्याय त्यांनी गंभीरपणे विचारात घेतलाच नव्हता.

**नेहरूंचा समाजवाद**

यशवंतरावांनी स्वतःला "नेहरूवादी" हेही विरुद कधी लावले नसले तरी त्यांनी आपल्या निष्ठा नेहरूंना समर्पित केल्या होत्या हे स्पष्ट आहे. रॉयच्या मार्क्सवादात उगम पावलेली त्यांची विचारसरणी नेहरूंच्या समाजवादात परिणत झाली होती असे रास्त विधान तर्कतीर्थांनी केले आहे. नेहरूंच्या मार्गाने काँग्रेस गेली तर देशात समाजवाद येईल याची त्यांना एवढी खात्री होती की, नेहरू जे म्हणतील व करतील तोच समाजवाद हे त्यांनी जणू गृहीतच धरले होते! त्यांच्या प्रारंभिक काँग्रेसनिष्ठेचे रूपांतर असे नेहरूनिष्ठेत झाल्यामुळे आपल्या "मूळ" समाजवादी धारणांना मुरड घालण्याचे अनेक प्रसंग पुढे त्यांच्यावर ओढवले.

नेहरूंची वैचारिक परिबद्धता समाजवादाशी निश्चितपणे होती. रशियातील समाजवादाच्या यशाचे त्यांना कौतुक होते. भारतातले प्रश्नही रशियातील प्रश्नां-प्रमाणेच असून समाजवादाच्या मार्गाने त्यांची सोडवणूक होऊ शकेल अशी त्यांना खात्री वाटे. १९३६ साली लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, "समाज-वाद म्हणजे अशी एक व्यवस्था की जीमध्ये भूमी आणि भूमीची फळे यांचा समाजाच्या हितासाठी अशा तऱ्हेने उपयोग व्हावा की, मिळणारा लाभ खासगी मालमत्तेच्या अपघाताने न ठरता लोकांनी केलेल्या सेवेच्या प्रमाणात ठरावा" (स्पीचेस, खं. ३,१५६–७). उत्पादन व वितरणाच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण करून त्याद्वारे आमूलाग्र बदल घडवून आणणे हा त्यांच्या मते समाजवादाचा गाभा होता. १९३७ नंतर क्रमशः काँग्रेसची मंत्रिमंडळे सत्तेवर आल्यानंतर आधी काँग्रेस चळवळीबद्दल तटस्थ असलेला स्थानिक भांडवलदारवर्ग काँग्रेसला पैसा व पाठिंबा पुरवू लागला, आणि मग नेहरूप्रभृतींना आपल्या समाजवादी विचारांना मुरड घालणे अनिवार्य होऊ लागले. जोपर्यंत काँग्रेस सुशिक्षित मध्यम-वर्गीयांच्या ध्येयवादाच्या बळावर उभी होती आणि जनजागृती व जनसंघटनातूनच आपले आधार भरभक्कम करू पाहात होती तोपर्यंतच नेत्यांची समाजवादी ध्येय-

निष्ठा टिकून राहू शकली, पुढे मात्र ती शिथिल होणे भाग ठरले. नेहरूंनी आणि नेहरूनंतर काँग्रेसच्या अन्य नेत्यांनी पुन:पुन्हा समाजवादी कार्यक्रमांचा जोरकस जाहीर पुरस्कार केला असला तरी खऱ्या अर्थाने काँग्रेस कधीच समाजवादी होऊ शकली नाही. नेहरूंच्या समाजवादाची ही अपरिहार्य शोकान्तिका होती आणि स्वाभाविकच नेहरूंमध्ये समाजवादाचे आदर्श शोधणाऱ्या चव्हाणां-सारख्यांच्या पदरीही निराशा येणे त्यामुळे अटळ ठरले होते.

## " संसदीय " समाजवाद

जनआंदोलनांच्या प्रत्यक्ष अनुभवांमधून भारतीय समाजवादाची उभारणी होईल असे चव्हाणांनी वारंवार म्हटले असले तरी त्यांनी स्वत: मात्र पुरोगामी कायद्यांद्वारे निश्चितपणे समाजवाद आणता येईल अशी खूणगाठ बांधूनच राजकारण केले. तत्त्वाखातर राजकारणातून बाहेर पडण्याची पाळी त्यांच्यावर जेव्हा जेव्हा आली त्या प्रत्येक वेळी तत्त्वाला मुरड घालूनही सत्तास्थानांवर राहणेच त्यांनी पसंत केले. यावरून समाजवादासाठी जनआंदोलनांपेक्षा सत्ताकारणाचे माध्यमच श्रेयस्कर मानण्याची त्यांची वृत्ती स्पष्ट होते.

१९४६ च्या निवडणुकांनंतर ते मुंबई राज्याच्या गृहखात्याचे संसदीय सचिव झाले. हँजेनच्या म्हणण्याप्रमाणे लवकरच त्यांच्या लक्षात आले की, तरुणपणीच्या आपल्या समाजवादाच्या रोमँटिक कल्पना युद्धोत्तर टंचाईग्रस्त मुंबई राज्याच्या अर्थव्यवस्थेत सपशेल गैरलागू आहेत. अन्न-वस्त्र-निवारा-संपर्क साधने-ऊर्जा वगैरे सगळ्याच गोष्टींचा तुटवडा आणि भडकती महागाई अशी सर्वत्र दुर्दशा होती. समाजवादाच्या सैद्धान्तिकांनी वाचाळपणे पुरस्कारलेली नियंत्रणे सहजा-सहजी धाब्यावर बसवली जात होती. भ्रष्टाचार भारतीय समाजजीवनाच्या हाडी मुरला होता ( हँजेन, १३९ ). या अनुभवानंतर यशवंतरावांनी काँग्रेसच्या प्रचारात समाजवादी पण आचारात भांडवलदारी असलेल्या, धोरणांना मूकसंमती देण्याचा वसा स्वीकारला. काँग्रेसचे नामांतर " काँग्रेस समाजवादी पक्ष " असे करावे असा जो ठराव शंकरराव मोरे यांनी आणला होता तो मान्य करणे या परिस्थितीत काँग्रेस पक्षाला शक्यच नव्हते.

काँग्रेसच्या शहरी भांडवलदारधार्जिण्या धोरणाविरुद्ध केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव प्रभृतींच्या पुढाकाराखाली एक गट काँग्रेसमध्ये संघटित

होत होता. त्याची एक बैठक खुद्द यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. पुरोगामी विचार आणि कार्यक्रमाच्या आधारे ग्रामीण शेतकरीवर्गाचे व एकूणच बहुजनसमाजाचे हित साधावे हा या पक्षाचा हेतू होता. यशवंतरावांच्या मूळ समाजवादी भूमिकेशी तो सुसंगत होता. पण जेव्हा हा गट काँग्रेसबाहेर पडला तेव्हा यशवंतराव मात्र त्यांच्यासोबत गेले नाहीत. राष्ट्रीय राजकारणाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रादेशिक पक्षांपेक्षा काँग्रेसच प्रभावी ठरेल अशा विचारांती चव्हाणांनी तसे केल्याचे त्यांचे सर्व चरित्रकार ( उदा० बाबुराव काळे, ५४ ) सांगत असले तरी यात वैचारिक आत्मप्रतारणा व तत्त्वच्युती होती हे लपवून लपवता येत नाही.

पुरवठामंत्री असताना अन्नधान्यावरची नियंत्रणे यशवंतरावांनी काढून टाकली होती, किंवा शेतकऱ्यांनी अधिक धान्य पिकवावे म्हणून त्यांना आर्थिक प्रलोभने दिली होती. शेतकऱ्यांची उत्पादनप्रेरणा जमिनीच्या स्वामित्वाशी निबद्ध आहे असे मत मांडून त्यांनी सहकारी शेतीची कल्पना उडवून लावली होती. यशवंतरावांचा दृष्टिकोण व्यवहारी व फलितदर्शी असल्याचे सांगून काही भाष्यकारांनी या त्यांच्या समाजवादाशी विसंगत भूमिकांचा गौरवही केला होता. परिस्थितीतील वास्तवाशी चव्हाण कसे चपखलपणे जुळवून घेत हे सांगताना हँजेन म्हणतो की शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी आर्थिक प्रलोभने प्रभावी ठरतात हे चिनी नेत्यांनी उपेक्षिलेले सत्य चव्हाणांनी अचूक हेरले होते ( हँजेन, १४० ). तर शेतीची उत्पादनप्रेरणा यशवंतरावांनी स्वामित्वाशी जोडल्यावर, त्यांचा समाजवाद पाठ्यपुस्तकी नसून ' लोकांचा ' समाजवाद असल्याचे शिफारसपत्र ब्लिटझचे संपादक आर. के. करंजिया यांनी दिले होते (अभिनंदन ग्रंथ, २१). चव्हाणांच्या समाजवादात मार्क्सची नीतिवचने नसली तरी मार्क्सवाद भारतीय परिस्थितीला लागू करण्याचे मनोधैर्य असल्यामुळे पुस्तकी समाजवाद्यांनाच नव्हे तर ' समाजवादाचा उच्चार पण समाजवादविरोधी आचार करणाऱ्या ' काँग्रेसवाल्यांनाही आपल्या मागे खेचून नेण्याचे सामर्थ्यही त्या संपादकांना यशवंतरावांच्या ठिकाणी जाणवले होते.

संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे चव्हाण मुख्यमंत्री होते. त्या काळात अत्यंत प्रतिकूल राजकीय पर्यावरण असूनदेखील ते ग्रामीण बहुजन समाजाप्रमाणेच मुंबईतील अ-मराठी भांडवलदारांची

मने आपलीशी करू शकले. वास्तविक आधीच आवडी अधिवेशनाच्या समाजवादी समाजरचनेच्या घोषणेने किंचित् चिंताक्रांत झालेला हा भांडवल-दारवर्ग तळागाळातून आलेल्या एका मराठी माणसाच्या हाती सत्तेची सूत्रे गेल्यामुळे अधिकच हवालदिल झाला होता. गुजराती व्यापाऱ्यांच्या देशी वसाहतवादावर चव्हाणांनी डागलेल्या तोफेचे पडसाद अजूनही पुरते विरलेले नव्हते. तरी पण अल्पावधीतच मुख्यमंत्री चव्हाणांनी या व्यापारीवर्गाचा विश्वास आपल्या प्रत्यक्ष कारभारातून संपादित केला. समाजवादविषयक संदिग्धतेतच त्यांच्या या यशाचे रहस्य शोधावे लागेल. विचाराने डावी पण व्यवहारात लवचिक माणसे नेहरूंना आवडायची. यशवंतराव नेहरूंना त्यामुळे लवकरच प्रिय झाले ( हँजेन, १५७ ). ए. डी. श्रॉफ या मुंबईच्या एका बड्या सावकाराने चव्हाणांसंबंधी केलेले विधन या संदर्भात लक्षणीय आहे. तो म्हणतो, "यशवंतराव नेहरूंना खूप करण्यासाठी इतर अनेकांप्रमाणे समाजवादी असल्याचा देखावा करीत असले तरी खासगी उद्योगक्षेत्राकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण सहानुभूतीचा आहे." ( कित्ता, १४७ ).

संयुक्त महाराष्ट्र झाला त्या वेळी तर वातावरणात समाजवादाची हवा प्रखर होती. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये डाव्या पक्षाचे वर्चस्व असल्यामुळे महाराष्ट्रात समाजवादी सरकार यावे हे समितीचे साध्य होतेच, पण काँग्रेसलाही आता तीच भाषा करण्यावाचून चळवळीच्या वातावरणामुळे गत्यंतर उरले नव्हते. 'संयुक्त महाराष्ट्रात समाजवादाचा पहिला पाळणा हलेल' अशी भविष्यवाणी मुख्यमंत्री चव्हाणांनी मावळत्या सूर्याच्या साक्षीने मुंबईत उच्चारली. महाराष्ट्रात कृषि–औद्योगिक अर्थव्यवस्थेची पायाभरणी करण्यातून इथे खऱ्या अर्थाने न्याय्य व स्वतंत्र समाज उभा राहू शकेल, शेती आणि ग्रामीण उद्योगधंदे या दोन्ही क्षेत्रात सहकारी संस्थांचे जाळे विणण्यातून समाजवाद अवतरू शकेल आणि ग्रामीण-शहरी विकासातील दरी बुजविता येईल अशीही चव्हाणांची अटकळ होती. पण प्रत्यक्षात मात्र मुंबईचे कारखानदार-भांडवलदार आणि खेड्यातील सधन शेतकरी यांच्या युतीचे पौरोहित्य या मुख्यमंत्र्यांना करणे भाग पडले.

विकास योजनांच्या द्वारे सामाजिक, आर्थिक विषमता दूर करता येईल, उत्पन्नाची विभागणी योग्य प्रमाणात होते किंवा नाही हे पाहण्यासाठी योजनेच्या कार्यांतर्गत एक कायमची यंत्रणा उभारली जाईल ( सह्याद्रीचे वारे,

१०५–६). योजनेमधून निर्माण होणारा फायदा समाजाच्या खालच्या थरापर्यंत नेऊन पोहोचवणाऱ्या आज क्षीण असलेल्या शक्ती योजनेच्या क्रमातच बलवत्तर केल्या जातील! (कित्ता, १०७) इत्यादी ज्या अपेक्षा यशवंतरावांनी व्यक्त केल्या होत्या त्या त्यांच्या कारकीर्दीत आणि नंतरसुद्धा कधीच पूर्ण होऊ शकल्या नाहीत. समाजवादी यशवंतरावांना धनिक सत्तेची बटीक असलेल्या मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचेच अस्तित्व तर पुसता आलेच नाही पण वर्चस्वही कमी करता आले नाही. तडजोड हेच त्यांच्या कारभाराचे मुख्य सूत्र राहिले. कोणत्याही वादात विरोधकांचा विरोध बोथट व्हावा व क्रमशः लयास जावा अशा पद्धतीने त्यांच्याशी वागणे हे कौशल्य त्यांना विशेष अवगत होते. एकीकडे कमाल जमीनधारणा कायदा करून पक्षांतर्गत पुरोगामी गटांना संतुष्ट ठेवायचे पण त्याचबरोबर सहकारी सोसायट्यांमार्फत साखर कारखानदारांना कमालधारणेची मर्यादा मोडण्याचीही मुभा ठेवायची असे हे खास तंत्र चव्हाणांनी सर्वच बाबतीत राबवले. परिणामी चव्हाणांची लोकप्रियता, महाराष्ट्राचे साखर उत्पादन आणि जमीन सुधारणेचा समाजवादी कैवार – तिन्ही गोष्टी बिनबोभाट वृद्धिंगत होत राहिल्या (हॅंजेन, १३४).

१९८५ साली महाराष्ट्र राज्याने आपला रौप्यमहोत्सव साजरा केला पण आजही या राज्याच्या मुहूर्ताच्या वेळी घोषित केलेली समाजवादी उद्दिष्टे मात्र कागदोपत्रीच राहिलेली दिसतात. याचे कारण राज्यकर्त्यांच्या संदिग्ध विचारसरणीत व दुटप्पी वर्तनात सापडू शकते. आज महाराष्ट्रात भांडवलदारांच्या सोयीनुसार मुंबई, ठाणे व पुणे या तीन जिल्ह्यांतच संघटित उद्योगांचे केंद्रीकरण झाले असून उर्वरित जिल्ह्यांची औद्योगिक वाढ नगण्य व निःसंदर्भ झाली आहे. १९६० सालानंतरच्या महाराष्ट्राची शेतीविषयक वाटचाल अन्य कोणत्याही सरासरी किंवा सरासरीखालच्या राज्यापेक्षा गुणात्मकदृष्ट्या वेगळी झालेली नाही. उलट ऊस वगळता दुसऱ्या कोणत्याही शेतमालाच्या दर हेक्टरी वाढीबाबत महाराष्ट्र इतर राज्यांच्या मागेच आहे. दिवसेंदिवस नगदी पिकांकडे रोख वाढतो आहे. ग्रामीण समाजाच्या प्राथमिक गरजाही भागवल्या जात नाहीत. आर्थिक–सामाजिक विषमता व शोषण कमी होण्याऐवजी वाढते आहे.

यशवंतरावांनी सुरू केलेल्या सहकारी चळवळ व विकेंद्रीकरण या दोहोंचा ग्रामीण जीवनात पुरोगामी परिवर्तन घडवणे हा मूळ हेतू आजही विफलच

राहिला आहे. मक्तेदारीला आळा घालून कृषि-औद्योगिक समाजाची पायाभरणी करण्यासाठी अस्तित्वात आलेले साखर कारखाने केवळ त्या भागात ' समृद्धीची बेटे ' निर्माण करूनच कृतकृत्य ठरले आहेत. ग्रामीण भागात औद्योगिक जाणीवजागृती घडून अन्य उद्योगांना चालना मिळण्याचे प्रयोजन सफल झालेले नाही. सहकाराची चळवळ कोरडवाहू शेतकऱ्यांसह सर्व ग्रामीण घटकांना सामावून घेण्याइतकी व्यापक झालेली नाही. ऊस कामगारांची स्थितीही फारशी सुधारू शकलेली नाही. सहकारातून मध्यम व लहान शेतकऱ्यांचे कल्याण झाले आहे असे यशवंतरावांनी आवर्जून सांगितले असले तरी महाराष्ट्र काँग्रेसने सतत जमीनदारवर्गाचे व मोठ्या शेतकऱ्यांचेच हित सांभाळले ही वस्तुस्थिती आहे. शेतीवरील आयकराच्या कायद्याची १९६२ पासून झालेली अंमलबजावणी हेच दाखवते. प्रचंड गुंतवणुकीचा लाभ उपटणारे हे सधन शेतकरी आपल्यावरचा करभारमात्र चुकता करीत नाहीत. शेती आयकराची इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातली वसुली लोकलेखा समितीच्या अहवालात ( जुलै १९७६ ) पुढील-प्रमाणे नोंदवलेली आढळते. ती पुरेशी बोलकी आहे.

( आकडे लाखात )

| वर्ष | १९७२–३ | १९७१–२ | १९७०–१ |
|---|---|---|---|
| बिहार | २१ | २७ | ३२ |
| केरळ | ३२४ | ३७४ | ३०२ |
| तामिळनाडू | २२९ | २१५ | १८७ |
| महाराष्ट्र | २ | ३१ | ५ |

शहरी मध्यमवर्गीय अभ्यासक व पत्रकार सहकारी संस्थानिकांवर करीत असलेली बव्हंशी टीका ' शहरी असूयेतून ' होते असे यशवंतराव म्हणतात. पण सत्तेची मक्तेदारी निर्माण करण्याकडे या सहकारी संस्थांचा कल आहे हेही ते कबूल करतात. पुढे ते अशा अपेक्षा व्यक्त करतात की या चळवळीचा उपयोग दारिद्र्याशी लढण्यासाठी व्हावा, रोजगार वाढवण्यासाठी व्हावा, या संस्थांनी श्रीमंत शेतकऱ्यांच्या हातातली खेळणी बनू नये. त्यांनी श्रीमंतांना

अधिक श्रीमंत करू नये. संस्थांच्या विकासाची शास्त्रीय चिकित्सा व्हावी. राजकीय सत्तेचे नवे मक्तेदार जर या चळवळीतून निर्माण व्हायचे नसतील तर एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे राहू नये. कोणाही व्यक्तीला दोनपेक्षा अधिक कार्यक्रमांसाठी आपल्या पदावर राहता येऊ नये ( कुन्हीकृष्णन्, ५७ ). प्रत्यक्षात हे संकेत पाळले जाणे तर दूरच राहिले. उलट कायदेशीरपणे ते उडवून लावण्याचेच कार्य त्यांच्या वारसदारांनी केले. नगदी पीक अर्थव्यवस्थेतून काँग्रेस पक्षाला भक्कम पाया जरूर मिळाला, मात्र समाजवादाच्या शक्यतेला त्यातून तिलांजली मिळाली.

१९६२ साली यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सोडून केंद्रीय संरक्षण-मंत्री म्हणून गेले. नेहरू या वेळी आपल्या आर्थिक व राजकीय धोरणांचा पुनर्विचार करण्याच्या मन:स्थितीत होते. जिथे उत्पादनाची मुख्य साधने सामाजिक मालकीची असतील, उत्पादनाला क्रमश: चालना मिळेल आणि राष्ट्रीय संपत्तीची न्याय्य विभागणी होईल असा समाजवादी समाजरचनेचा आवडी अधिवेशनात १९५५ साली सोडलेला संकल्प केवळ घोषणामात्र ठरला होता. आर्थिक धोरणे, पक्षबांधणी, सदस्यांच्या समाजवादी निष्ठा वगैरे बाबतीत स्थिती जैसे थे राहिली होती. त्यामुळे पक्षाची लोकप्रियता घटून पक्षात एक बेचैनी व नैराश्य पसरले होते. १९६४ साली भुवनेश्वर अधिवेशनात पुन्हा नेहरूंनी समाजवादी धोरणाचा पुरस्कार केला. चव्हाणांचा त्यांना पाठिंबा होताच. १९७५ पर्यंत लोकांच्या अन्न-वस्त्र-निवारा-औषधपाणी व शिक्षण या पाच मूलभूत गरजा काँग्रेसने पूर्ण कराव्यात असा ठराव या अधिवेशनात झाला. पण अल्पावधीतच नेहरूंचे निधन झाले. नव्या प्रश्नामध्ये राज्यकर्ते व्यस्त झाले. समाजवादी कार्यक्रम गुलदस्तातच राहिला.

१९६७ साली सार्वत्रिक निवडणूक अपयशानंतर पुन्हा काँग्रेसला समाज-वादाची आठवण झाली. दिल्ली अधिवेशनात एक १० कलमी कार्यक्रम पक्षाने स्वीकारला. बँकांवर सामाजिक नियंत्रण, विम्याचे राष्ट्रीयीकरण, आयातनिर्यात व्यापाराचे क्रमश: सरकारीकरण, मक्तेदारीला व अर्थसत्तेच्या केंद्रीकरणाला आळा, सर्वांच्या प्राथमिक गरजांची परिपूर्ती, शहरी मालमत्ता कमालधारणा, त्वरित भूसुधारणा, संस्थानिकांचे तनखे व भत्ते रद्द करणे वगैरे कलमे त्यात होती. अखेरच्या कलमाचे कर्तृत्व चव्हाणांकडे असल्याचे सांगितले जाते. यांपैकी

प्रचारमूल्य असलेली काही कलमे औपचारिक पातळीवर राबवली गेली तरी बाकीची ( समाजवादाच्या दृष्टीने मौलिक असलेली ) मात्र तशीच राहिली. या कार्यक्रमाने काँग्रेसमधील अंतर्विरोध मात्र तीव्र झाले. १९६९ च्या फरिदाबाद काँग्रेसमध्ये निजलिंगप्पांनी सर्व मौलिक पुरोगामी धोरणे आव्हानित केली. श्रीमती गांधींची पुरोगामी प्रतिमा त्यामुळे उजळ झाली.

चव्हाणांचे संबंध नेहमीप्रमाणे दोन्ही अंतर्विग्रही गटांशी सलोख्याचे होते. स्वतः ते पुरोगामी पक्षाचे होते. तरीही प्रतिगामी पक्षांशी संवाद करू शकत असत. बंगलोर अधिवेशनात पंतप्रधानांच्या टिपणात तरुण तुर्कांनी " राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रमाची रूपरेषा " मांडली त्यात पुन्हा समाजवादी कार्यक्रमाचे अधोरेखन केले गेले होते. इंदिरा गांधी त्या वेळी हजर नसल्यामुळे या कार्य-क्रमाचे समर्थन–स्पष्टीकरण चव्हाणांनीच केले होते. तरुण तुर्कांशी त्यांची वैचारिक जवळीक या काळात होती. दोन्ही गटांना संमत व्हावा असा तडजोड मसुदा चव्हाणांनी तयार करून मांडला तरीपण मोरारजींनी मोडता घातलाच. चव्हाण या प्रसंगी म्हणाले होते की, " निरनिराळ्या वर्गांच्या आपापसातील संबंधात संरचनात्मक बदल होणे समाजवादात गृहीत असते, आणि ज्या अर्थी असे बदल भारतात आजपर्यंत झालेले नाहीत त्या अर्थी नव्या प्रयत्नांची अजून गरज आहे. पंतप्रधानांच्या टिपणात देशातील आर्थिक परिस्थितीचे प्रामाणिक मूल्यांकन असून राष्ट्राच्या अस्वस्थ मनःस्थितीचे यथार्थ प्रतिबिंब उमटले आहे." इतिहासाने स्वीकारलेली ही दिशा असून काँग्रेस पक्षाला आता मागे पाय घेता येणार नाही ( कुन्हीकृष्णम्, ३०७ ).

पक्षांतर्गत फुटीत चव्हाणांनी श्रीमती गांधींची बाजू अशी पुरोगामी असण्याच्या कारणावरून उचलून धरली असली तरी हे कथित पुरोगामित्व हा श्रीमती गांधींच्या राजकारणाचा भाग आहे, व्यक्तिगत नेतृत्वस्पर्धेत प्रतिपक्षाला शह देण्यासाठी टाकलेला तो डाव आहे याची बहुधा यशवंतरावांना जाणीव नसावी. कायद्याच्या द्वारे समाजवादाची रुजवात करता येईल हा त्यांचा भाबडा आशा-वादच बहुधा प्रबळ ठरला असावा असे दिसते. पुरोगामी कायदे करूनही प्रत्यक्षात काहीही मूलभूत परिवर्तन घडत नाही हा अनुभव स्वीकारायलाच त्यांचे मन तयार नसावे.

राष्ट्रपतींच्या निवडणुकीचे निमित्त घडून पक्षात फूट पडली. " सरकारच्या,

पुरोगामी कार्यक्रमांना वृद्ध नेते खीळ घालतात " अशी हाकाटी करून श्रीमती गांधी बंडाचे निशाण घेऊन उभ्या राहिल्या. राष्ट्रपतिपदाच्या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध मतदान करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. पक्षशिस्तीला प्रमाण मानणाऱ्या चव्हाणांना हे पटले नाही. त्यांनी महाराष्ट्रातल्या आपल्या अनुयायांसह पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला मत दिले. पण पक्षाचा उमेदवार पराभूत होऊन श्रीमती गांधीपुरस्कृत उमेदवार स्पर्धेत यशस्वी झाला. पुरोगामी प्रतिमेमुळे एऱ्हवी चव्हाणांना श्रीमती गांधी जवळच्या होत्याच आणि सिंडिकेटशी त्यांची कोणत्याच अर्थाने जवळीक नव्हती. मात्र पक्ष फुटू नये यासाठी त्यांनी केलेली धडपड आणि पक्षशिस्तीखातर अधिकृत उमेदवारीचा घेतलेला कैवार या दोन गोष्टींमुळे चव्हाणांची " कुंपणावरचे " ही प्रतिमा लोकांच्या नजरेत भरली. नंतर श्रीमती गांधींनी त्यांना वेळोवेळी आपल्या राजकारणासाठी वापरले असले तरी पूर्ण विश्वसनीय कधीच मानले नाही.

तरुण तुर्कांप्रमाणेच काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिस्ट ॲक्शनशीही चव्हाण जवळून संबंधित होते. ऑक्टोबर १९७० मध्ये फोरमच्या चवथ्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना ते म्हणाले होते, " हे सत्य आपल्याला स्वीकारले पाहिजे की, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण वाढले आहे. पैशाची उधळमाधळ मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मूठभर लोक डामडौलाने जगत असून पंचवार्षिक योजनांमधून मागासवर्गीयांच्या व परंपरेने दारिद्र्यात असणाऱ्यांच्या परिस्थितीत कवडीमात्रही सुधारणा झालेली नाही. १९७० नंतरच्या दशकाची आर्थिक व्यूहरचना अशी हवी की त्यातील उत्पन्न व मालमत्ताविषयक समुचित धोरणाचा संदर्भ समग्र परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात असलेल्या समाजाच्या सामाजिक–आर्थिक रेट्यांशी जोडलेला असावा. "

चव्हाणांची ही अपेक्षा कधीच पूर्ण होणे शक्य नव्हते, सत्तारूढ पक्षाचे ते ईप्सितच नव्हते. गरिबी हटावच्या घोषणेवर प्रचंड बहुमताने निवडणूक जिंकून आलेल्या श्रीमती गांधींच्या सरकारात वित्तमंत्री वगैरे पदांवर चव्हाण राहिले पण समाजवादाच्या दिशेने काहीही घडवू शकले नाहीत. आणीबाणीनंतर श्रीमती गांधींनी पुन्हा पक्ष फोडला त्या वेळी रेड्डी काँग्रेसमध्ये ते राहिले. कालांतराने पुन्हा लाचारी पत्करून स्वगृही आले. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष झाले. काही वर्षांनी निधन पावले. त्यांच्या या प्रदीर्घ संसदीय कार्यकालाचे समाजवादाच्या

निकषावर मूल्यमापन केल्यास काहीही हाती लागत नाही.

आपला पक्ष प्रशिक्षित केडरवर आधारित असावा, परिवर्तनाचे साधन अशा स्वरूपात त्याची संघटनात्मक रचना व्हावी, कागदोपत्री आखलेल्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यापैकी काहीही करणे यशवंतरावांच्या ताकदी-बाहेरचे होते. समाजवादाला मारक असलेल्या शक्तींपुढे खुद्द नेहरूही जिथे हतबल ठरले, तिथे चव्हाण काय करणार? त्यांची चूक फक्त एवढीच की कायदे, प्रशासकीय उपाययोजना यातून समाजवाद अवतरू शकेल असा विश्वास त्यांनी बाळगला. ध्येयवादाच्या पूर्ततेसाठी धोके पत्करण्याची तयारी त्यांनी दाखविली नाही. ती दाखविली असती तर मोहन धारिया यांनी म्हटल्याप्रमाणे ते अखिल भारतीय कीर्तीचे महान नेते, कदाचित पंतप्रधानही झाले असते. मुख-बद्ध राजबंद्यांप्रमाणे अवमानित अवस्थेत मंत्री राहण्याचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर ओढवला नसता ( सफर, ११३ ). पण आपले आसन सुरक्षित ठेवण्याच्या नादात ते मावळत्या सूर्याची शपथ विसरले, आणि कापलेल्या दोराचा जनतेला व काँग्रेस कार्यकर्त्यांना त्यांनी दिलेला इशारा सत्तेच्या सूर्याने वितळून टाकला ( कित्ता, ११२ ).

## वैचारिक भूमिका

यशवंतरावांच्या या अपयशाचे कारण त्यांच्या वैचारिक संदिग्धतेतच शोधावे लागते. त्यांनी शास्त्रीय सिद्धान्ताच्या स्वरूपात समाजवाद कधीच स्वीकारला नव्हता. ते राजकारणात "मध्यबिंदूच्या डाव्या बाजूकडे" झुकलेले होते. समाजवादाच्या संभाव्य परिणामांचे त्यांना आकर्षण होते, पण समाजवादाची काटेकोर मांडणी करून त्या विचारसरणीच्या आधारावर आपली प्रत्येक कृती व निर्णय तपासून पाहण्याची मात्र त्यांची तयारी नव्हती. आपला समाजवाद पाश्चात्त्यांच्या समाजवादापेक्षा निराळा आहे, मार्क्सवादाला तो अचूक व त्रिकालाबाधित मानीत नाही. हिंदुस्थानातला समाजवाद इथल्या अनुभवावरच अधिष्ठित असावा लागेल, मार्क्सप्रणीत तराजूवर तो मोजून भागणार नाही. माझा समाजवाद व्यावहारिक व फलितदर्शी आहे, तो महावाक्यांपेक्षा प्रत्यक्ष वैधानिक व प्रशासकीय उपायांच्या रूपाने व्यक्त होत असतो, शब्दांपेक्षा कृतीवर त्याची भिस्त असते, वगैरे शब्दांत त्यांनी समाजवादाचे सिद्धान्त

उडवून लावले होते.

पण त्याचबरोबर हिंदुस्थानचा जो वेगळा समाजवाद असेल त्याचे नेमके स्वरूप कसे असेल आणि कोणत्या मार्गाने तो आणता येईल याची मांडणी मात्र त्यांनी कुठेही केलेली नव्हती. आपण सांगितलेली समाजवादाची गमके मोघम असल्याचे त्यांना मान्य होते. पण त्या संदर्भात "ही गोष्टच अशी आहे की ती शब्दात उभी करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ती अस्पष्टच राहते" (सह्याद्रीचे वारे २४१), असे म्हणून ते मोकळे होतात; आणि त्याच वेळी "निश्चित अशा समाजवादाकडे जाण्याची आमची इच्छा आहे" असेही म्हणतात. "खासगी नफ्याच्या जागी सामाजिक नफ्याचा पाया अधिक घट्ट करणे" त्यासाठी एकतर, आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करणे आणि दुसरे म्हणजे सर्वांना समान संधी मिळेल अशी परिस्थिती निर्माण करणे व व्यक्तित्वविकासाला वाव देणे एवढाच स्थूल अर्थ ते समाजवादाचा सांगतात (कित्ता, २३९). सर्वांना समान संधी असावी, उत्पादनामागची प्रेरणा वैयक्तिक नफेबाजीपेक्षा समाजाच्या सुखाची व हिताची असावी, लोकांच्या गरजा व विकासाच्या शक्याशक्यता विचारात घेऊन मालमत्तेची विभागणी व्हावी अशा समाजवादाच्या तीन कसोट्याही त्यांनी दुसऱ्या एका भाषणात नोंदवल्या होत्या (युगांतर, २८८). मात्र हे अमुकच मार्गाने होईल असे सांगता येणार नाही, कारण इतिहास हा काही आंधळा पीर नाही, प्रत्येक देशाला समाजवादाची स्वतःची व्याख्या करावी लागते, इथेही ती प्रत्यक्ष अनुभवातून केली जाईल असे त्यांचे प्रतिपादन होते. आपण समाजवादाची फक्त भाषा करतो, पण त्या दिशेने ठोस वाटचाल मात्र करीत नाही ही खंत त्यांनी आयुष्याच्या अखेरीपावेतो अनेकदा व्यक्त केली होती.

समाजवादाचे समीकरण साम्यवादी देशांमधील लोकशाहीच्या संकोचाशी घालून आमचा समाजवाद लोकशाही मूल्यांची बूज राखील असेही एक ठोक विधान चव्हाणांच्या भाषणात वारंवार आले आहे. १९६० च्या महाबळेश्वर शिबिरापासून नंतरच्या अनेक प्रासंगिक भाषणांमधून समाजवादासंबंधी विवेचन त्यांनी केले असले तरी उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टान्त व अन्य भाषिक अलंकरणे यामुळे त्यांच्या मांडणीचे स्वरूप कमालीचे शब्दाळ, भोंगळ व पसरट होत असे. उदाहरणार्थ, समाजवाद ही नुसती चर्चा करण्याची कल्पना उरली नसून

ती आता प्रत्यक्षात आणता यावी, लोकांना उपलब्ध करून देता यावी, ती तरुणांनी जगावी व संपादावी अशी बाब झाली आहे ... थोडक्यात समाजवाद हा जीवनमार्ग आहे ( उद्धृत अभिनंदनग्रंथ, ६७ ). तत्त्वज्ञानावर जास्त विसंबून न राहता व्यावहारिकदृष्ट्या जी गोष्ट योग्य दिसते तीच करायची, आकाशात भराऱ्या नकोत, जमिनीवर चालायचे आहे (सह्याद्रीचे वारे, १०९). समाजवादी मूल्यांवर माझा विश्वास आहे म्हणून मला आश्वासन द्यावयास हरकत वाटत नाही की या योजनेच्या विकासाची जी गती आहे ती पर्यायाने आपल्याला समाजवादाकडे घेऊन जाणारी आहे ( कित्ता, १०७ ). आम्ही ग्रंथनिष्ठ नाही, मार्क्स आम्ही संपूर्ण सत्य समजत नाही ( कित्ता, २३८ ). समाजवादाचे आपले तरुणपणीचे रोमँटिक विचार परिस्थितिवशात व मंत्रिपदाच्या प्रत्यक्ष अनुभवांमुळे अधिक वस्तुनिष्ठ झाल्याचेही त्यांनी वारंवार सांगितले आहे. समाजवाद न म्हणता समाजवादी समाजरचना असा शब्दप्रयोग करण्याचे स्पष्टीकरणही त्यांनी देशकालपरिस्थिति-विशिष्टत्वाशी जोडून दिले आहे.

**समारोप :**

" आपण समाजवादी आहात काय ? " या पत्रकारांच्या प्रश्नाला यशवंतरावांनी ठाम होकारार्थी उत्तर देऊन, " पण माझा समाजवाद निराळा आहे, " हेही आवर्जून सांगितले आहे. त्यांचा समाजवाद रॉय, मार्क्स, गांधी, लेनिन, समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष वगैरेपेक्षा निराळा होता हे समजू शकते, पण त्याचे त्यांनी सांगितलेले कारण मात्र पटू शकत नाही आणि त्यांच्या समाजवादाचा आशयही नीट हाती लागत नाही. नवसमाजरचना अस्तित्वात आणण्याची आकांक्षा आपल्याला पाठ्यपुस्तकातून मिळालेली नाही. समाजवादावरचा आपला विश्वास आपण ज्यांच्यात जन्मतो, वाढतो त्या कोट्यवधी देशबांधवांच्या दैन्य-दारिद्र्यातून प्रादुर्भूत झाला आहे, कारण समाजवादच त्यांना त्यातून मुक्त करणार आहे ( कुन्हीकृष्णन्, ९ ), असे त्यांनी एका संदर्भात म्हटले आहे. समाजवादाकडे त्यांचा असलेला स्वाभाविक कल त्यांच्या संस्कारक्षम वयात भोवताली असलेल्या परिस्थितीमुळे झाला होता हे यावरून समजू शकते. पण समाजवादी विचारसरणी आत्मसात करून आचरणात आणण्याच्या दृष्टीने हा ' स्वाभाविक कल ' पुरेसा ठरू शकत नाही, हेही लक्षात घेणे

आवश्यक आहे. यशवंतरावांनी त्या स्वाभाविक कलाला वैचारिक परिबद्धतेची जोड दिली नाही हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वैगुण्य म्हणावे लागेल.

रॉय यांचे संस्कार त्यांनी वरवर व प्रसंगापुरतेच स्वीकारले. अधिक खोलवर त्यांनी त्यांचा अंगीकार केला नाही हे त्यांच्याच निवेदनावरून स्पष्ट होते. रॉयकडून आपल्याला आर्थिक न्यायाची निकड पटली असली तरी केवळ खासगी मालमत्तेच्या निराकरणातून सामाजिक न्याय साध्य होऊ शकेल असे कधीच वाटले नाही हे चव्हाणांचे म्हणणे समजू शकते. खासगी मालमत्ता नष्ट झालेल्या देशात छळ व दमन झाले हेही मान्य करायला हरकत नाही. प्रश्न एवढाच पडतो की, नेहरूंनी ज्या लोकशाही समाजवादाचे प्रतिपादन केले होते त्याच्याशी तरी बांधिलकी सत्तारूढ पक्षाने ठेवली होती काय ? आणि ती ठेवलेली नाही हे चव्हाणांनीच दिलेल्या कबुलायतींवरून जर स्पष्ट होते तर अशा पक्षाला चिकटून राहण्यातून आपल्या दुःखदैन्यग्रस्त ग्रामीण देशबांधवांसाठी चव्हाणांनी काय मिळवले ?

समाजवादाची व्याख्या करण्याचा ज्या ज्या वेळी यशवंतरावांनी प्रयत्न केला त्या त्या वेळी लोककल्याणकारी राज्याच्याच कल्पनेपर्यंत त्यांची मजल गेलेली दिसून येते. राज्यशासनाने केलेल्या कायद्यांमधून दिलेल्या सोयी-सवलती-संरक्षणे वगैरे लाभांमधून शोषितांना दिलासा मिळणे एवढेच कल्याणकारी उपायांचे प्रयोजन असते. क्रांतिकारक समाजवादी परिवर्तनाच्या शक्यता अशा उपायांनी स्थगित होत असतात, हे चव्हाणांनी लक्षातच घेतले नव्हते. सत्तास्थानांपासून दूर राहूनही समाजवादी शक्ती बळकट केल्या जाऊ शकतात हा पर्याय त्यांच्या राजकारणी मनाने कधी स्वीकारलाच नाही. डाव्या-उजव्यांच्या तत्त्वशून्य तडजोडींचेच राजकारण ते जन्मभर करीत राहिले. महाराष्ट्रात त्यांच्या पुरोगामी कायद्यांमधून व विकास योजनांमधून सधन शेतकरी व शहरी भांडवलदारांची युती होऊन समाजवादाच्या शक्यता संपल्या तर राष्ट्रीय पातळीवर नेहरूंच्या-तील फक्त संकलनात्मक, तर इंदिरा गांधींच्यातील फक्त प्रचारमूल्यात्मक पातळीवर समाजवाद अज्ञात राहिला आणि यशवंतराव हे त्याचे मूक साक्षीदार व निमूट हस्तक ठरले.

११

# कृषि-औद्योगिक क्रांतीचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण

श्री. अण्णासाहेब शिंदे

गेल्या दीडशे वर्षांत विशेषत: इंग्रजांचे राज्य भारतात सुस्थिर झाल्यानंतर महाराष्ट्रात अनेक थोर ऐतिहासिक पुरुष जन्माला आले आणि आपापल्या परीने आणि आपल्या कर्तबगारीने महाराष्ट्रातील व देशातील सामाजिक, आर्थिक अगर राजकीय जीवनावर कायमचा ठसा ठेवून गेले. या सर्वांत थोर म्हणून महात्मा जोतिबा फुले, नामदार गोखले आणि लोकमान्य टिळक यांचा उल्लेख करता येईल. नामदार गोखले यांना तर महात्मा गांधींनीसुद्धा आपले गुरू मानले होते. महात्मा फुले यांचा सामाजिक समतेचा दृष्टिकोण, शोषित आणि दलितांविषयीचे प्रेम, आणि ग्रामीण जीवनाविषयीची आत्मीयता, लोकमान्य टिळक यांची जाज्वल्य देशभक्ती आणि नामदार गोखले यांचा उदारमतवाद अशा महाराष्ट्रातील तीनही थोर परंपरांचा वारसा समर्थपणे पुढे नेण्याचे कार्य यशवंतराव चव्हाण यांनी केले.

यशवंतरावांनी व्यवहारी आणि राजकारणी म्हणून जीवनात अनेक प्रश्नांवर तडजोडी केल्या. तथापि जाज्वल्य राष्ट्रभक्ती आणि पुरोगामी सामाजिक दृष्टिकोण याबाबत त्यांनी जीवनात कधीच तडजोड केली नाही. महाराष्ट्राच्या जीवनावर चिरंतन स्वरूपाचा ठसा उमटवून यशवंतरावांनी इहलोकीचा प्रवास संपविला.

समाजाच्या सर्व थरांतील असंख्य सहकाऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे अपार व्यक्तिगत प्रेम यशवंतरावांनी संपादन केले. महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्त्यांना ते पहिल्या नावाने ओळखत असत. यशवंतरावांच्या चालत्या काळात त्यांचे संघटना-कौशल्य हे कुणाही राजकीय नेत्याला हेवा वाटेल असेच होते. लक्षावधी ज्ञात आणि अज्ञात व्यक्तींनी आणि कार्यकर्त्यांनी यशवंतरावांवर प्रेम केले. असे सद्भाग्य राजकीय नेत्याच्या वाट्याला क्वचितच येते. ग्रामीण भागातील अगदी सामान्य कुटुंबात जन्म घेऊन ते लोकप्रियतेच्या शिखरावरही चढले. जीवनात अनेक चढउतार त्यांनी पाहिले. शिखरावर चढण्यापूर्वी कठोर अशा दिव्यातून त्यांना प्रवास करावा लागला. भारतातील भिन्न सामाजिक घटकांचे संबंध कसे जोडावेत, त्यांची जडणघडण कशी करावी याबाबत तर त्यांचा हातखंडाच होता. केंद्र आणि राज्यसंबंध, पक्षांतर्गत लोकशाही, सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे महत्त्व, भारतासारख्या मागासलेल्या देशासाठी बळकट लोकशाही संस्थांची सर्व पातळीवरील उभारणी, ग्रामीण जीवनाचे प्रश्न इत्यादी सर्व बाबतींत यशवंतरावांची स्वतःची अशी काही मते होती. पक्षातील व पक्षाबाहेरील मतभेद असलेल्या मंडळींशीही काही मूलभूत मानवी मूल्यांचा आणि लोकशाही मूल्यांचा आधार घेऊनच वागलं पाहिजे यासंबंधी त्यांनी काही संकेत मनाशी ठरविले होते. साध्य आणि साधन यासंबंधीच्या गांधीवादी विचारांचा प्रभावही यशवंतरावांच्या मनावर होता. ते उदारमतवादी आणि लोकशाही मूल्यांवर निष्ठा असलेले नेते होते. यशवंतरावांच्या ध्येयनिष्ठा आणि जीवननिष्ठा यामुळेच त्यांना जीवनात राजकीय संकटांना तोंड देण्याची पाळी आली. कधी कधी जिवलग मित्रमंडळी-कडूनही त्यांना टीकेचे घाव सोसावे लागले. यशवंतरावांनी अनेक कार्यकर्त्यांना मोठे करण्याचा प्रयत्न केला. प्रकाशझोतात आणले. उच्चाधिकार पदे मिळवून देण्यासही मदत केली. परंतु अशा मंडळींनाही यशवंतरावांच्या जीवनातील दृष्टिकोण नीटपणे समजू शकत नाही. अशा मंडळींपैकी काहीजण त्यांचे विरोधकही बनले.

यशवंतरावांचा मित्रपरिवारही मोठा होता. मीही त्यांच्या मित्रपरिवारापैकी आणि राजकीय सहकाऱ्यांपैकी एक. १९६२ ते १९८० सुरुवातीपर्यंत दिल्लीत संसद-सदस्य म्हणून मी राहिलो आणि सर्व राजकीय चढउतारात आम्ही एकमेकांच्या बरोबर राहिल्यामुळे व अनेक प्रश्नांवरील समान वैचारिक भूमिके-

मुळे यशवंतरावांची आणि माझी वैयक्तिक मैत्री दृढ झाली. दीर्घकालीन सहवासामुळे यशवंतरावांचे विचार समजून घेण्याचीही संधी लाभली.

यशवंतरावांचे वागणे हे डावपेचाचे आहे, अशा प्रकारचा गैरसमज अनेक लोकांचा होता. यशवंतरावांचा स्वभाव हा अतिशय कमी बोलण्याचा. अनेक प्रश्नांवर स्वतःचे मत स्पष्ट असतानाही उगीचच गैरसमज नको म्हणून ते बोलण्याचे टाळीत. पण त्यामुळेच त्यांचेसंबंधी गैरसमज प्रसृत होत असत. राजकारणात हुशारीने आणि मुत्सद्देगिरीने कधी कधी वागावे लागते, हे जरी खरे असले तरी डावपेचाने वागणे हा यशवंतरावांचा स्वभावधर्म मुळीच नव्हता. कै. शास्त्रींच्या निधनानंतरचा प्रसंग आहे. इंदिरा गांधी, मोरारजी आणि यशवंतराव चव्हाण या तीन नावांची शास्त्रीजींचे वारस म्हणून चर्चा चालू होती. तथापि श्री. गुलझारीलाल नंदा यांचीही उमेदवार होण्याची इच्छा होती, परंतु त्यांना कुणाचाच पाठिंबा नव्हता. श्री. मोरारजी देसाई यांनी तर आपली उमेदवारी जाहीरच केली होती. इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांच्या आपसात गाठी-भेटी व चर्चा चालू होत्या. इंदिरा गांधींना पाठिंबा देण्याचे यशवंतराव चव्हाणांनी ठरविले होते. आम्ही जवळचे स्नेही म्हणून त्यांनी मला आणि कै. किसन वीर यांना त्यांच्या मनातील विचार सांगितले होते. इंदिरा गांधींना पाठिंबा देण्यास आमच्या मनाशी दोघांचीही हरकत असण्याचे कारण नव्हते. परंतु यशवंतरावांनी इंदिरा गांधींना पाठिंबा देण्याचे निवेदन आजच्याऐवजी उद्याला काढावे असे आम्ही त्यांना उभयतांनी मिळून सुचविले होते. तुम्ही माझ्या जीवाभावाचे मित्र आहात, परंतु हा तुमचा सल्ला मला मान्य करता येणार नाही, असे यशवंतरावांनी आम्हाला स्पष्ट सांगितले. १९६६ साली भारताच्या राजकारणात यशवंतरावांना फार मोठी प्रतिष्ठा होती. कामराज व यशवंतराव चव्हाण या दोघांच्या तोडीचे, मोठी प्रतिष्ठा असलेले व संघटनेचे पाठबळ असलेले दुसरे कोणीही नव्हते. महाराष्ट्रातही यशवंतरावांच्या विचाराला एकमुखी पाठिंबा होता. यशवंतरावांनी इंदिर गांधींना पाठिंबा देण्याचे निवेदन वृत्तसंस्थांना दिले आणि यशवंतरावांच्या पाठिंब्यामुळेच त्या वेळच्या परिस्थितीत देशाच्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधींची निवड आणि मोरारजी देसाईंचा पराभव हे अटळ ठरले.

अगदी अलीकडे यशवंतराव चव्हाणांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा

निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्रात खूपच उलटसुलट चर्चा सुरू झाली. त्यांच्या स्वगृही परतण्याच्या निर्णयावर कटू टीका केली. त्यांच्या मृत्यूपर्यंत ही चर्चा कमी अधिक प्रमाणात चालू होती. १९५६ साली द्वैभाषिकाला पाठिंबा दिल्यामुळे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व असेच वादग्रस्त बनले होते. काळे झेंडे, प्रतिकूल निदर्शने आणि यशवंतराव "मुर्दाबाद" अशा घोषणांनी यशवंतरावांचे स्वागत होई. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असूनही त्या वेळी त्या परिस्थितीत असे प्रसंग म्हणजे जवळ जवळ नित्याची गोष्ट होऊन बसली होती. परंतु पुढे यशवंतरावांनी केलेले परिस्थितीचे मूल्यमापन आणि प्रयत्न, केंद्रीय नेतृत्वाच्या दृष्टिकोणात घडून आलेला बदल यामुळे द्वैभाषिकाचा निर्णय केंद्रीय नेत्यांना बदलावा लागला. केंद्रीय नेतृत्वाचे सहकार्य घेऊन हा निर्णय बदलण्याचे जे चातुर्य आणि राजकीय मुत्सद्देगिरी यशवंतरावांनी दाखविली यातूनच संयुक्त महाराष्ट्राचा जन्म झाला.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात यशवंतरावांचे स्वागत होऊ लागले. 'यशवंतराव झिंदाबाद' अशा घोषणा महाराष्ट्रात सर्वत्र निनादू लागल्या. द्वैभाषिकाच्या काळातील यशवंतरावांवरील राग महाराष्ट्रातील जनता विसरून गेली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ज्यांनी यशवंतरावांना कडवेपणाने विरोध केला अशा सर्वांशी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांशीही संयमाने आणि आदराने वागून लोकशाही मूल्यांचा नवीन आदर्श यशवंतरावांनी निर्माण केला.

भारत हा जातिजमातींचा देश आहे. महाराष्ट्रही कमी अधिक प्रमाणात तसाच आहे. परंतु महात्मा गांधींच्या खुनानंतर महाराष्ट्रातील जाळपोळीची झळ लागलेल्या ब्राह्मण कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी दिलेल्या कर्जाचे माफीचे धोरण यशवंतरावांनी जाहीर केले आणि जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी तयार तर केलीच, परंतु त्यांनी जातिजमातींचा संकुचित दृष्टिकोण आपला नाही हेही जनतेला दाखवून दिले. कै. बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबर जी मंडळी बुद्ध झाली त्यांना मागासलेल्या वर्गाच्या सवलती देण्याबाबतच्या धोरणाचा घोळ राष्ट्रीय पातळीवर अद्यापही चालू आहे. यशवंतरावांनी मात्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना बुद्धजनांना मागासलेल्या वर्गाच्या सर्व सवलती देऊन महाराष्ट्रापुरता हा प्रश्न निकाली काढला. महाराष्ट्रातील काही ऐतिहासिक पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील बहुसंख्य ब्राह्मण समाज हा

महात्मा गांधींच्या चळवळीपासून अलिप्त राहिला होता. बुद्धिजीवी समाजाला राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेतले पाहिजे याची तीव्र जाणीव यशवंतराव चव्हाणांना झाली. राष्ट्रीय चळवळीपासूनचा ब्राह्मण समाजाचा दुरावा काय केले असता कमी करता येईल याचाच यशवंतराव सातत्याने विचार करीत होते. या प्रयत्नां-पैकीच एक भाग म्हणून कै. बर्वे यांना त्यांनी सरकारी सेवेतून निवृत्त व्हावयास लावले आणि त्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला. ब्राह्मण असो, हरिजन असो अगर कोणी कोणत्याही जातीचा असो, महाराष्ट्रात सर्व जातिजमातींना न्याय मिळेल असे वातावरण निर्माण होण्यास यशवंतरावांच्या या आणि इतर अनेक निर्णयांमुळे मदत झाली.

यशवंतरावांना नेहरूंनी भारताचे संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला बोलाविले. त्या वेळेस यशवंतरावांनी आपल्या दूरदृष्टीची व राजकीय नेतृत्वाला शोभेल अशा व्यक्तित्वाची प्रचिती आणून दिली. पंडित नेहरू आणि पंतप्रधान झाल्यानंतर शास्त्रीजी यांचा यशवंतरावांनी संपादन केलेला विश्वास म्हणजे यशवंतरावांच्या जीवनातील सुवर्ण मोलाचे प्रसंगच होत.

यशवंतरावांची महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षावर केवढी वैचारिक आणि नैतिक पकड त्या काळात होती हे कदाचित आजच्या तरुण पिढीला समजणे अवघड आहे. यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला जाणार होते. महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून कोणाचे नाव सुचवावे असा महत्त्वाचा प्रश्न होता. यशवंतरावांनी कुणाचेही नाव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सुचविले असते तर ते एकमताने मान्य झाले असते. परंतु थोड्याच काळापूर्वी संयुक्त महाराष्ट्राची जडणघडण झालेली होती. विदर्भ मराठवाड्यातील भाग नवीन महाराष्ट्रात सामील झालेला होता. महाराष्ट्रातील ह्या निरनिराळ्या प्रदेशात भ्रातृभावाचे संबंध निर्माण होण्यास मदत होईल असे निर्णय जाणीवपूर्वक घेण्याची आवश्यकता होती. तसेच महाराष्ट्राचा मराठा समाज हा बऱ्याच मोठ्या संख्येने असल्यामुळे आणि यशवंतराव स्वतः मराठा असल्यामुळे केवळ आपल्याच जातीच्या माणसाला पुढे करून मुख्यमंत्री बनविले असते तर ती चूक झाली असती. कारण महाराष्ट्रात जातिजमातींच्या ऐक्याचा पाया घालण्याची नितांत आवश्यकता होती, आणि ते प्रत्यक्ष आपल्या वागण्याने दाखवून देणे जरूर होते. विदर्भ आणि मराठवाड्याप्रमाणे सर्व जातिधर्मांचे आणि प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे

मुंबईसारखे शहर महाराष्ट्रातच आहे याचीही जाणीव ठेवून राजकीय निर्णय घेण्याची आवश्यकता होती. अशा पार्श्वभूमीत मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेणे ही मोठी जबाबदारी आहे याची यशवंतराव चव्हाणांना जाणीव होती. म्हणून त्यांनी प्रथम कै. कन्नमवार आणि त्यांच्या मृत्यूनंतर कै. वसंतराव नाईक यांना आपली व्यक्तिगत प्रतिष्ठा उपयोगात आणून मुख्यमंत्री होण्यास मदत केली. वस्तुत: कै. वसंतराव नाईक अगर कन्नमवारांच्या जमातीचे फारच थोडे लोक महाराष्ट्रात होते. परंतु अशा प्रकारचे निर्णय घेऊन यशवंतरावांनी आपल्या सामाजिक समतोल दृष्टिकोणाची आणि सुज्ञपणाची प्रचिती आणून दिली. महाराष्ट्रात सामाजिक सामंजस्याचे वातावरण निर्माण होण्यास त्यामुळे बहुमोल मदत झाली, आणि यशवंतराव ज्या महाराष्ट्र काँग्रेसचे नेते होते त्या राजकीय पक्षाची जनमानसात देशात कुठेही नाही इतकी प्रतिष्ठा त्या वेळी वाढली.

सामाजिक समस्यांप्रमाणेच आर्थिक समस्या याही या देशात अतिशय गुंतागुंतीच्या आहेत. भारत हा अप्रगत देश आहे. भारताचे आधुनिकीकरण करण्याचा पाया प्रामुख्याने ग्रामीण भागात घालण्याचा गरज आहे याची कल्पना यशवंतरावांना जितकी स्पष्टपणे होती तितकी भारतातील दुसऱ्या कोणाही राजकीय नेत्याला होती असे वाटत नाही.

महाराष्ट्रात ज्या तऱ्हेचा लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग झाला असा देशात कोठेही प्रत्यक्ष झाला नाही. विकेंद्रित लोकशाहीची चर्चा व औपचारिक निर्णय फक्त राष्ट्रीय पातळीवर झाले. पण गुजरातचा अपवाद सोडला. तर देशात इतरत्र कोठेही विकेंद्रित लोकशाहीचा प्रयोग खऱ्या अर्थाने राबवला गेला नाही परंतु ग्रामीण भागात प्राचीन काळातील गावपातळीवरच्या आणि इतर संस्था मोडून पडल्या होत्या आणि आता आधुनिक काळास अनुरूप समाजाला व राष्ट्राला शक्ती देणाऱ्या लोकशाहीवर आधारित अशा संस्था उभ्या करण्याची नितांत गरज होती. यशवंतरावांचा लोकशाही मूल्यांवर विश्वास असल्यामुळे त्यांच्या प्रेरणेने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, विविध प्रकारचे सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, शिक्षण संस्था, इत्यादींचे जाळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उभे राहिले.

कृषि-औद्योगिक समाजाची कल्पना या देशात राजकीय पातळीवर प्रथम यशवंतराव चव्हाण यांनीच मांडली. सांगली येथील शेतकरी सहकारी साखर

कारखान्याच्या प्रथम गळीत हंगामाच्या प्रसंगी १९५८ साली हे विचार प्रथमच स्पष्ट स्वरूपात मांडले गेले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्या अनेकविध वक्तव्यांतून त्यांनी हा विचार महाराष्ट्रीयन जनतेसमोर मांडला होता. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले त्या वेळेस हा विचार महाराष्ट्र शासनाने अंगीकृत धोरण म्हणून यशवंतरावांनी राष्ट्रासमोर मांडला. या विचाराचा ते पाठपुरावाही सातत्याने करीत राहिले.

यशवंतरावांच्या सहकारी आणि कृषि-औद्योगिक क्षेत्रातील नेतृत्वामुळे किती दूरगामी परिणाम होऊ लागले होते हे श्री. वसंतरावदादा यांच्या १९६६ सालच्या पुढील भाषणावरून लक्षात येऊ शकेल. श्री. वसंतरावदादा म्हणतात— " ६–७ वर्षांपूर्वी आपल्या मुखातून कृषि-औद्योगिक समाज हा शब्द बाहेर पडला आणि एखाद्या मंत्रासारखा महाराष्ट्रातील शेकडो कार्यकर्त्यांना आणि थंड शिळा होऊन पडलेल्या शेतकऱ्यांना आणि शेतकरी जीवनाला तो शब्द प्रेरक आणि तारक ठरला. त्या शब्दातून जे तेज, जी प्रेरणा आणि सामर्थ्य मिळाले त्यातून या माळावर लक्ष्मी पाणी भरू लागली आहे. दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या पाताळात रक्षा होऊन पडलेल्या लक्षावधी शेतकऱ्यांच्या ४२ पिढ्या उद्धारल्या गेल्या आहेत.

माननीय यशवंतराव चव्हाणांच्या या शब्दातून स्फूर्ती घेऊन निर्माण केलेली कृषि-औद्योगिक समाजाची उद्यम मंदिरे आम्ही आता त्यांनाच अर्पण करीत आहोत. "

यशवंतरावांच्या कृषि-औद्योगिक धोरणाचा केवढा प्रभाव पडला यासंबंधी श्री. वसंतरावदादा यांचे विचार हे प्रातिनिधिकच समजले पाहिजेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच त्या वेळच्या मुंबई राज्यात ( महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक ) सहकारी चळवळ मूळ धरू लागली होती. कै. सख्या, कै. वैकुंठभाई मेहता, कै. धनंजयराव गाडगीळ इत्यादी मंडळींनी त्या वेळच्या मुंबई राज्यात सहकारी चळवळ वाढावी म्हणून अनेक वर्षे प्रयत्न केले होते. कै. धनंजयराव गाडगीळ, कै. विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे स्वातंत्र्योत्तर काळात १९५० चे सुमारासच सहकारी साखर कारखानदारीचा जन्म झालेला होता. त्याचे अगोदर महाराष्ट्रातील माळी समाजातील जाणकार व प्रगतिशील शेतकरी मंडळींनी खासगी क्षेत्रात परंतु शेतकऱ्यांनी चालविलेली साखर कारखान-

दारी यशस्वी करून दाखविली होती. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतदादा हे सांगलीच्या ग्रामीण परिसरात उद्योगीकरण व्हावे आणि शेतमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी राहावी म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. सुजाण राजकीय नेता या नात्याने या सर्व कामाची दखल घेऊन यशवंतरावांनी योग्य ते राजकीय व आर्थिक निष्कर्ष काढले होते. यशवंतरावांच्या कृषि-औद्योगिक समाजाच्या कल्पनेशी ही अनुभवाची पार्श्वभूमी मिळतीजुळती होती. उद्योगीकरण केवळ शहरी भागापुरते मर्यादित राहिले तर देशाचे खरेखुरे आधुनिकीकरणही होणार नाही आणि बहुसंख्य समाज हा आधुनिक प्रगतीपासून वंचित राहील याची स्पष्ट जाणीव यशवंतरावांना होती. मुंबईसारख्या आधुनिक औद्योगिक नगरीस देशाचे आर्थिक राजधानीचे स्वरूप प्राप्त होऊनही मुंबई-पासून १००–१२५ किलोमीटर अंतरावर ठाणे जिल्ह्यात आदिवासी वारली समाजाची अवस्था कशी होती आणि त्यामुळे राजकीय व सामाजिक गुंतागुंती किती गंभीर स्वरूपाच्या होऊ शकतात हे यशवंतरावांनी अनुभवले होते. म्हणूनच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर कृषि-औद्योगिक समाजाच्या कल्पनेला यशवंतरावांनी शासकीय पातळीवर उचलून धरले. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरणी व इतर अन्य तऱ्हेची शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी मोठ्या प्रमाणात जनतेच्या भागीदारीने उभी राहिल्याशिवाय देशाचे आधुनिकीकरणही करता येणार नाही व कच्चा माल पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचीही दलालाकडून होणारी पिळवणूकही थांबविता येणार नाही किंवा शेतीमालास वाजवी किंमतही मिळवून देणे शक्य होणार नाही, यासंबंधीच्या स्पष्ट कल्पना यशवंतरावांना होत्या म्हणूनच त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील औद्योगिक प्रकल्पांना आणि सहकारी साखर कारखानदारीला प्रशासकीय पातळीवर प्रोत्साहन देण्याचे मूलभूत स्वरूपाचे निर्णय घेतले. यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर शासनाची सर्व शक्ती त्यांनी वर उल्लेख केलेल्या सहकारी औद्योगिक प्रकल्पांच्या पाठीशी उभी केली. सहकारी कारखानदारीला मदत करण्यासाठी जी मंत्री समिती होती तिचे अध्यक्षस्थान त्यांनी स्वत: स्वीकारले. औद्योगिक आर्थिक महामंडळाकडून सहकारी कारखानदारीस नियमित कर्जपुरवठा व्हावा, या कर्जासाठी जरूर पडल्यास राज्य शासनाने जामीन रहावे, भारत सरकारकडून अशा प्रकल्पांना परवाने

मिळावे म्हणून शासनाने पाठपुरावा करावा, राष्ट्रीय नियोजनात या धोरणाचा समावेश व्हावा म्हणून यशवंतरावांनी अनेकविध प्रयत्न केले. त्यांच्या काळातील धोरणामुळेच महाराष्ट्रात आज वैभवशाली सहकारी साखर कारखानदारी, सूत गिरण्यांचेच इतर प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभे राहिले आहेत. ग्रामीण भागातील कारखानदारीत साखर कारखानदारीत महाराष्ट्र आज पहिल्या क्रमांकाचे राज्य बनले आहे, ते यशवंतरावांच्या दूरदृष्टीमुळेच. पुढील काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात व्यापक स्वरूपाच्या शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभारण्याची जबाबदारी नंतरच्या पिढीवर आहे. उभ्या केलेल्या कारखानदारांत काही दोषही निर्माण झाले आहेत किंवा ही कारखानदारी काही बाबतीत वादग्रस्त बनली आहे हे खरे असले तरी नवीन अनुभवाच्या आधारे आवश्यक ते धोरणात्मक बदल करण्याची जबाबदारीही नंतरच्या पिढीवरच आहे. यशवंतरावांनी देशबांधणीच्या दृष्टीने केलेल्या कामाचे किंवा त्यांनी जी दिशा आर्थिक विकासाचे कामाला दिली त्याचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही.

यशवंतरावांच्या कार्यांचा, विचारांचा, धोरणाचा केंद्रबिंदू ग्रामीण भागातील माणूस आणि लोकशाही मूल्ये हाच होता. महाराष्ट्राचे सहकारी साखर कारखानदारीचे क्षेत्रात काम करीत असताना मला स्वत:लाही याचा चांगलाच अनुभव आला. यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना मी महाराष्ट्र सहकारी साखर संघाचा काही वर्षे अध्यक्षही होतो. त्या वेळेस सहकारी साखर कारखान्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मंत्री समिती होती. त्या समितीचे यशवंतराव चव्हाण अध्यक्ष होते. कै. धनंजयराव गाडगीळ आणि मी मंत्री नसूनही या समितीचे सभासद होतो. सहकारी साखर कारखाने कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून राज्य सरकारच्या साखर कारखानदारांचे पोट-नियम त्या वेळच्या परिस्थितीत सहकारी खात्याच्या सल्ल्याने केलेले सहकारी साखर कारखान्याच्या शेतकरी संचालकांनी बहुमताने केलेल्या ठरावांविरुद्ध ' व्हेटो ' वापरण्याचा अधिकार सरकारी प्रतिनिधींना होता. ही तरतूदही लोकशाही तत्त्वाचे विरुद्ध होती म्हणून हा नियम रद्द करण्यासाठी राज्य सरकारकडे दाद मागण्याचा निर्णय साखर संघाने घेतला. मी व कै. धनंजयराव गाडगीळ साखर संघाची बाजू मांडण्यासाठी राज्याचे आणि मंत्री समितीचे प्रमुख म्हणून यशवंतरावांना भेटलो. यशवंतरावांनी आमचे म्हणणे शांतपणाने ऐकून घेतले आणि या प्रश्नावर शासन लवकरच निर्णय घेईल असे

आम्हास त्यांनी सांगितले. यशवंतरावांनी घेतलेल्या निर्णयाने आम्ही आश्चर्य-चकित झालो. सहकारी प्रतिनिधीने सहकारी साखर कारखान्यांच्या सभांना हजरच राहू नये असे आज्ञापत्र यशवंतरावांनी काढले. सहकारी अधिकाऱ्यास सहकारी चळवळीत हस्तक्षेप करण्यास संधीच मिळू नये आणि सहकारी चळ-वळीतील लोकशाही मूल्यांची जोपासना व्हावी म्हणून यशवंतरावांनी अशा प्रकारचा खळबळजनक निर्णय आमच्या विनंतिपत्रावर दिला.

लोकशाही मूल्यांची जोपासना करण्याच्या दृष्टीने असे प्रशासकीय आज्ञापत्र म्हणजे प्रशासनाच्या इतिहासातील मोठी क्रांतिकारक घटनाच होती. परंतु यात यशवंतरावांच्या लोकशाही निष्ठेची प्रचिती आली. वास्तविक सहकारी साखर कारखान्याच्या सभांना येणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांची साखर कारखान्यांना मोलाची मदत होत असे, म्हणून पुन्हा कै. गाडगीळ यांना व मला यशवंतरावांना भेटून वरील हुकमात आवश्यक ते फेरबदल करून घ्यावे लागले.

यशवंतरावांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे व प्रेरणेमुळेच ही कारखानदारी उभी राहिली व प्रचंड वृक्ष म्हणून वाढली. त्यामुळेच आज महाराष्ट्रात अनेक कर्तब-गार कार्यकर्ते व पुढारी ग्रामीण महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाचा पाया घालणारी नवीन पिढी यशवंतरावांनी निर्माण केली. महाराष्ट्राची जडणघडण करण्याचे ऐतिहासिक कार्य हीच पिढी करीत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव-दादा हे यशवंतरावांच्या प्रमुख सहकाऱ्यांपैकीच जसे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीतून पुढे आले तसे त्यांच्या कर्तबगारीला खरा वाव मिळाला तो यशवंतरावांच्या कृषि-औद्योगिक क्रांतीच्या कार्यक्रमामुळेच. यशवंतराव हे सर्व अर्थाने कृषि-औद्योगिक क्रांतीचे शिल्पकार होते.

S

# १२

## यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्र काँग्रेस

### अनंतराव पाटील

पंडित जवाहरलाल नेहरू इतर प्रांतांना सांगत की, काँग्रेस पक्ष कसा असावा तर महाराष्ट्र काँग्रेससारखा. काँग्रेसचे राजकारण कसे असावे तर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या राजकारणासारखे आणि काँग्रेसचे प्रशासन कसे असावे तर यशवंतराव चव्हाण-यांच्या प्रशासनासारखे. यशवंतरावजींच्या कारकीर्दीत महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष एकजिनसी व एकमुखी होता. काँग्रेसचे राजकारण हे सर्व समावेशक होते, आणि काँग्रेसचे प्रशासन लोकाभिमुख होते. राज्य चालविताना, सरकार चालविताना यशवंतरावजींनी प्रशासन आणि संघटना या दोन्हींत सामंजस्य आणि समन्वय राखण्याबाबत कटाक्ष ठेवला होता. मंत्रिमंडळात एकजिनसीपणा आणि एकोपा राखला होता. प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निवडणुका, जिल्हा आणि ब्लॉक काँग्रेस कमिट्यांच्या निवडणुका पक्षाच्या घटनेप्रमाणे होत होत्या, आणि प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीची आणि जनरल बॉडीची बैठक देखील वेळच्या वेळी व्हायची. कार्यकारणीवर जे कार्यकर्ते निवडून येऊ शकत नव्हते त्यांची सल्लामसलत उपलब्ध व्हावी म्हणून त्यांना निमंत्रितांच्या यादीत समाविष्ट करण्याचा यशवंतरावजींचा शिरस्ता असे. बैठकीत सर्वांना बोलण्याचे स्वातंत्र्य असे आणि वक्त्यांच्या विचारांची मतांची कदर केली जात असे. पक्षांतर्गत लोकशाही आणि सामुदायिक नेतृत्व यावर चव्हाणांचा कटाक्ष असे. तरुणांना

जवळ करावे, त्याना कामाची संधी द्यावी, त्यांचेवर जबाबदारी टाकावी, त्यांच्या कामात जरूर तेव्हा सहकार्य करावे, अशी यशवंतरावजींची भूमिका असे. तसेच वडीलधाऱ्या नेत्यांचा मान राखावा, त्यांचा सल्ला घ्यावा, त्यांचा आदर करावा या बाबतीत चव्हाणसाहेब दक्ष असत. शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे, मामासाहेब देवगिरीकर, देवकीनंदन नारायण या वडिलधाऱ्या प्रान्ताध्यक्षांप्रमाणेच यशवंतरावजींनी तरुण अध्यक्ष राजाराम बापू पाटील, विनायकराव पाटील, वसंतदादा पाटील यांच्यासारख्यांबरोबर सहकारी म्हणून काम केले. त्यांचा मान राखला. कोणत्या जिल्ह्यात कोणता जुना नवा नेता आहे, जुना-नवा कार्यकर्ता आहे हे यशवंतरावजींना चांगले माहीत असायचे. एवढेच नव्हे तर कार्यकर्त्यांना नावागावावरून ओळखायचे आणि त्यांच्या घरच्या मंडळींची आत्मीयतेने विचारपूस करायचे. काँग्रेस संघटना म्हणजे एक कौटुंबिक संस्था असेच चव्हाणसाहेब मानायचे आणि कार्यकर्त्यांप्रमाणे सर्वांना बरोबर घेऊन पुढे जायचे. चव्हाणांची बोलण्याची, वागण्याची, काम करण्याची आणि काम करून घेण्याची पद्धत १९४६ पासून अगदी जवळून पाहण्याची संधी मला लाभली. मुंबई प्रांताचे पार्लमेंटरी सेक्रेटरीपदापासून तो भारताच्या उपपंतप्रधानपदाच्या उच्च स्थानावर काम करताना चव्हाणांनी कधी अहंकार—गर्व बाळगला नाही. बडेजाव केला नाही. संघटनेची आणि कार्यकर्त्यांची साथ सोडली नाही. त्याचप्रमाणे ते सामान्य माणसापासून दूर गेले नाहीत की त्यांच्या प्रश्नाकडे त्यांनी पाठ फिरविली नाही. यशवंतरावजी म्हणत की काँग्रेस ही आपली खरी शक्ती आहे आणि कार्यकर्ते हा फार मोठा आधार आहे. काँग्रेस संघटनेत काम करायला मिळणे आणि जवाहरलाल नेहरूंच्या मांडीला मांडी लावून बसणे हे एक मोठे भाग्यच समजायला हवे.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यावर काँग्रेस पक्षाचे कार्य, कार्यक्रम, धोरण, भूमिका यांत बदल होणे अपरिहार्य होते. काँग्रेसच्या शिरावर एक वेगळ्या प्रकारची जबाबदारी येऊन पडलेली होती. शासन चालविणे आणि राज्याचा विकास व प्रगती करणे यासाठी काँग्रेस संघटना बलवान हवी होती, कार्यकर्त्यांचा मोठा संच हाती असण्याची गरज होती. नवे नवे कार्यकर्ते जोडणे, त्यांना कामाला लावणे जरूर होते. निवडणुका, उमेदवार आदी गोष्टी अपरिहार्य बनल्या होत्या. सर्वच कार्यकर्त्यांना असेंब्लीत उभे करणे किंवा

तिकीट देणे शक्य नव्हते म्हणून यशवंतरावजींनी काहींना संघटनेची पदाधिकार-पदे दिली. सहकार संस्थांची प्रमुखपदे उपलब्ध करून दिली आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणानंतर जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांत काम करण्याची संधी मिळवून दिली. काँग्रेस खेड्यात रुजवावी, वाढावी, ग्रामीण नेतृत्व पुढे यावे म्हणून यशवंतरावजींनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर इतर पक्षांत गेलेल्या सुशिक्षित तरुण कार्यकर्त्यांना काँग्रेसमध्ये आणून त्यांचा उपयोग या संघटनेला करून दिला. १९४८–४९ मध्ये जेव्हा जेधे–मोरे–जाधव–खाडिलकरप्रभृती काँग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला आणि महाराष्ट्रात काँग्रेसला आव्हान दिले, तेव्हा हे आव्हान काँग्रेसच्या वतीने यशवंतराव चव्हाणांनी स्वीकारले आणि काँग्रेस पक्षाला एखाद्या जाति-जमातीचे अथवा प्रादेशिक स्वरूप येऊ नये म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्या वेळी त्यांना मदत करण्यास काँग्रेसमधील, बहुजन समाजातील कितीतरी कार्यकर्ते पुढे आले. काँग्रेसचे राजकारण चव्हाणांनी जातीच्या, प्रदेशाच्या, विभागाच्या वरती नेले आणि शे. का. प. च्या धोक्यापासून काँग्रेसचे रक्षण केले. चव्हाणांनी बहुजन समाजातील तरुणांना तर काँग्रेसमध्ये आणि शासनामध्ये काम करण्याची संधी दिलीच, पण त्याचबरोबर पांढरपेशा वर्गातील ब्राह्मणांना व हुशार कर्तृत्व-वान मारवाडी, गुजराथी, माळी धनगर, हरिजन, गिरिजन आदींना काँग्रेसमध्ये आणून काँग्रेसचा पाया व्यापक केला. सर्वश्री माडगूळकर, पां. वा. गाडगीळ, स. गो. बर्वे, त्र्यं. शि. भारदे, वि. स. पागे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांसारख्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा काँग्रेससाठी उपयोग करून घेतला. निवडणुकीसाठी तिकीट वाटताना अधिक अधिक जाति जमातींना प्रतिनिधित्व मिळावे याची यशवंतराव खबरदारी घेत. भाऊसाहेब हिरे आणि यशवंतराव चव्हाण या दोघांनी १९५२–५७ च्या काळात महाराष्ट्र काँग्रेस बलवान बनविली आणि काँग्रेस प्रशासनाला लोकप्रिय बनविले. नंतर मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर काँग्रेसमध्ये दोन तट पडले. चव्हाण व हिरे एकमेकापासून थोडे दूर झाले. कित्येक महत्त्वाचे कार्यकर्ते काँग्रेसपासून दूर होऊन त्यांनी जन काँग्रेस स्थापन केली. १९५७ च्या निवडणुकीत प. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची पिछेहाट झाली. विदर्भाने सावरून धरल्यामुळे काँग्रेस पक्ष कसाबसा अधिकारा-रूढ बनला. १९५७ ते ५९ ही दोन वर्षे काँग्रेसच्या दृष्टीने फार वाईट गेली

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्ताने विरोधी पक्षांनी समिती बनवून एकत्र येऊन काँग्रेसला व काँग्रेस सरकारला विरोध केला. महाराष्ट्रातून काँग्रेसचे उच्चाटन होते की काय असे वाटू लागले होते. तथापि यशवंतराव चव्हाणांच्या कौशल्यामुळे, मुत्सद्देगिरीमुळे, राजकीय शहाणपणामुळे काँग्रेस वाचली. यशवंतरावांना वैयक्तिक खूप त्रास झाला. खूप मानहानी सोसावी लागली. महाराष्ट्रापेक्षा देश मोठा मानायचा आणि नेहरूंचे मन वळवूनच महाराष्ट्र मिळवायचा हे सूत्र पुढे ठेवून यशवंतरावजी दिल्लीचे मन वळवू शकले आणि त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा कलश आणून संयुक्त महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी केली.

काँग्रेस पक्षच संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करील हे आश्वासन त्यांनी पुरे करून दाखविले.

काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नसून ती एक चळवळ आहे, जन आंदोलन आहे असे चव्हाणसाहेब म्हणत. या राष्ट्रीय प्रवाहात इतर प्रवाह सामील होणार आणि त्याबरोबर काही चांगलं, काही वाईट प्रवाहात शिरणार. चांगली माणसे काँग्रेसमध्ये यावीत असा त्यांचा सततचा प्रयत्न असे. मग ते शे. का. प.चे मोरे, जेधे, जाधव, खाडिलकर आणि मोहिते असोत वा समाजवादी पक्षाचे शिवाजीराव पाटील, मोहन धारिया वा बॅ. विठ्ठलराव गाडगीळ असोत, या सर्वांना आत घेऊन त्यांचा काँग्रेससाठी उपयोग करून घेण्याची कामगिरी यशवंतरावांनी पार पाडली. तसेच रिपब्लिकन पक्षाचे दादासाहेब रूपवते, कम्युनिस्ट पक्षाचे अण्णासाहेब शिंदे अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. यशवंतरावजींचा दृष्टिकोण उदार होता. त्यांना माणसांची चांगली पारख होती. माणसे कार्यकर्ते चुकायचे पण त्यांच्या चुका सांभाळून घ्यायच्या, त्यांना रागवायाचे नाही हा साहेबांचा स्वभाव. विश्वास द्यायचा आणि घ्यायचा. कुणाचा द्वेष करायचा नाही, कुणाकडून काही अपेक्षा बाळगायची नाही. सर्वांशी संबंध ठेवायचे. मग ती मंडळी राजकारणातील असोत वा समाजकारण, शिक्षण, कला-क्रीडाक्षेत्रातील असोत. राजकारणी पण रसिक, राजकारणी पण साहित्यिक, राजकारणी पण मोठ्या मनाचा माणूस अशी यशवंतरावजींची विविध रूपे होती.

दिल्लीत त्यांचे नेतृत्व, कर्तृत्व, बुद्धिमता, हुशारी, मुत्सद्देगिरी अधिक खुलून दिसली. १९६२ ते १९७७ पर्यंत १५ वर्षे त्यांनी केंद्रीय मंत्रिपदे भूषविली, नव्हे तर गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री ही महत्त्वाची

पदे सांभाळून देशाकडून, काँग्रेस पक्षाकडून, विरोधकांकडून वाहवा मिळविली. परदेशांनी व परदेशी वृत्तपत्रांनी पण त्यांची वाखाणणी केली. एक चांगले पार्लमेंटॅरियन म्हणून त्यांचा बोलबाला झाला. थोड्या मोजक्या शब्दात म्हणणे कसे मांडायचे, शांतपणे हसत हसत उत्तर कसे द्यायचे, गृहास विश्वासात घेऊन निवेदन कसे करायचे याची यशवंतरावजींची जी हातोटी होती, ती विलक्षण होती. त्यांनी पं. नेहरूंच्या समवेत काँग्रेस वर्किंग कमिटीवर काम केले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या बरोबर काँग्रेस कार्यकारिणीत आणि केंद्रीय मंत्रिमंडळात काम केले. प्रथम १९६९ मध्ये आणि नंतर १९७८ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांनी काँग्रेस पक्ष फोडल्याचे चव्हाणांनी डोळ्याने पाहिले. अनुभवले. इंदिरा गांधींचे १९६९ मधील धोरण त्यांना मान्य नव्हते आणि १९७८ मधील तर नव्हतेच नव्हते. संजीव रेड्डी प्रकरणी त्यांनी श्रीमती इंदिरा गांधींना जाहीर विरोध केला आणि १९७८ मध्ये ते इंदिरा गांधींच्या नव्या काँग्रेसमध्ये न जाता जुन्या पारंपरिक काँग्रेसमध्ये राहिले. स्वतःच्या नावाचा पक्ष स्थापन करणे आणि त्या पक्षात आपली हुकूमशाही प्रस्थापित करणे हे धोरण त्यांना मान्य नव्हते. यशवंतरावजींचा १९८० ते ८१ मध्ये खूप कोंडमारा झाला. त्यापूर्वी त्यांनी १९७८ ते १९७९ पर्यंत जुन्या काँग्रेसमध्ये राहून ती बळकट करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसच्या मूल्यांसाठी झगडा दिला. तथापि १९८० च्या निवडणुकीत लोकांनी श्रीमती इंदिरा गांधींच्या बाजूने कौल दिल्यानंतर यशवंतराव थोडे हलके, व्यथित झाले. अरस काँग्रेस की इंदिरा काँग्रेस असा प्रश्न त्यांच्यापुढे पडला, आणि काही महिन्यांच्या मंथनानंतर त्यांनी मनाशी निर्णय घेतला की, काँग्रेसचा मुख्य प्रवाह ती बनला आहे. अरस काँग्रेस नव्हे. म्हणून त्यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये सामील होण्याचे ठरविले. हा निर्णय बरोबर की वाईट याचे मूल्यमापन करण्याच्या किंवा शहानिशा करण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत. काँग्रेसबरोबर आपण राहिले पाहिजे, राष्ट्रीय प्रवाहाबरोबर राहिले पाहिजे, एवढाच निकष त्यांनी लावला.

हायस्कूलमध्ये असताना यशवंतरावजींनी काँग्रेसचा झेंडा खांद्यावर घेऊन सत्याग्रह केला. तुरुंगवास भोगला. त्या वेळी म्हणजे १९३० मध्ये त्यांनी काँग्रेसशी जो संबंध जोडला तो अखेरपर्यंत, शेवटच्या श्वासापर्यंत–१९८० पर्यंत, ५० वर्षे ठेवला. काँग्रेसमध्ये खूप स्थित्यंतरे झाली. खूप मतभेद, भांडणे झाली पण

यशवंतरावजींनी कॉंग्रेसचा कधी त्याग केला नाही. व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा आणि पक्षापेक्षा देश मोठा हे सूत्र शेवटपर्यंत कायम ठेवले. त्यांचे जीवन कॉंग्रेसमय बनले होते, आणि कॉंग्रेससाठी आणि देशासाठी त्यांनी परिश्रमाची आणि त्यागाची परिसीमा गाठली होती. ज्या कॉंग्रेसकरता त्यांनी जीवन वेचलं तो पक्ष मोठा करण्याकरिता परिश्रम केले, त्या कॉंग्रेसने शेवटी शेवटी चव्हाणांची उपेक्षा केली ही त्यांच्या जीवनातील शोकांतिका. यशवंतराव कॉंग्रेसमय जीवन जगले आणि कॉंग्रेसजन म्हणून अनंतात विलीन झाले. एका फार मोठ्या माणसाला महाराष्ट्र आणि देश अवेळी मुकला !

S

# १३

# यशवंतराव
# महाराष्ट्रातील अखेरचा रोमन

## अनंत भालेराव

पुण्याचे सुप्रसिद्ध विद्वान प्राध्यापक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे वर्णन त्यांचे एक विद्यार्थी श्री. विद्याधर पुंडलिक यांनी 'पुण्यातील ग्रीक शिक्षक' असे केले आहे. याच धर्तीवर यशवंतराव चव्हाणांचे वर्णन करावयाचे झाल्यास मी त्यांना 'महाराष्ट्रातील अखेरचा रोमन' असेच संबोधीन. रोमन या शब्दाद्वारे जुन्या रोमन राज्यकर्त्यांतील गुणसमुच्चयांचा, प्रशासकीय कौशल्याचा, चांगल्या अर्थाने व मूल्यांच्या संदर्भात कर्मठपणा आणि जबरदस्त आवाक्यांचा बोध होतो. या कोरीव महाराष्ट्रातून ज्यांची ज्यांची गणना करता येते अगर करता येत होती त्यांतले यशवंतराव हे शेवटचेच. यशवंतरावांनी दोन मोठ्या ऐतिहासिक कालखंडांचा सांधा कौशल्याने जोडला एवढेच नव्हे तर अंगीकृत कार्याच्या मर्यादेत आणला. त्या सांधेजोड वर ठसाही उमटविला. सत्तेवर अव्याहत ३५–४० वर्षे राहून अनेक मर्यादांनी आकुंचित बनलेली शासनव्यवस्था चापल्याने आणि सामर्थ्याने वापरून आपल्या पाऊलखुणा पाठीमागे सोडणारे आणि अखिल भारतीय पातळीपर्यंत पोचलेले यशवंतराव हे एकटेच राज्यकर्ते होत. महाराष्ट्राला त्यांच्यानंतर कन्नमवार, वसंतराव नाईक, वसंतरावदादा, शंकरराव चव्हाण आदी कर्तबगार मुख्यमंत्री लाभले हे खरे, परंतु अखिल भारतीय पातळीवर कॉंग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बनण्याचे भाग्य एकट्या यशवंतरावांनाच

[illegible] च मुख्यमंत्री जास्तीत जास्त आपले राज्य अथवा आपले विभाग यांच्यापुरतेच व्यापक बनले. या अर्थाने विचार केला तर नरीमन, बाळासाहेब खेर आणि मोरारजी देसाई यांच्यानंतर अखिल भारतीय स्तरावर जाण्याचे व तेथेही आपले कर्तृत्व गाजविण्याचे श्रेय अलीकडेपर्यंत एकट्या यशवंतरावांनाच हस्तगत करता आले. या अर्थानेही यशवंतराव ' लास्ट ऑफ द रोमन्स ' ठरावेत.

पुढारी आपण अनेक बघितले व नित्य बघतो आहोत. काही पुढारी सत्तेवर असे तोवरच लोकमानसात असतात. सत्ता गेली की ते निस्तेज बनतात. अशी लोपलेली नावे पुष्कळ सांगता येतील. या लोकांचे कर्तृत्व चंद्राप्रमाणे परप्रकाशित आणि त्यांचा पुरुषार्थ परभृत होता. आणखी काही पुढारी इतके उद्धट आणि अधिकारमदाने मस्त झालेले असतात की, लोक त्यांच्या अस्ताची जणू वाट बघत असतात. थोडेच नेते असे असतात की, ज्यांच्या मोठेपणाला सत्तेची अगर इतर कुठल्याही तकलुवी आधाराची गरज नसते. जो काही प्रकाश असेल जो त्यांच्या स्वतःचा असतो. यशवंतराव या तिसऱ्या प्रकारातील नेते होते. आज आपल्यात ते नाहीत. तसे पुष्कळ नेते आज हयात नाहीत, परंतु यशवंतराव हे अशा नेत्यांपैकी व अशा व्यक्तिमत्त्वांपैकी आहेत, की त्यांच्या मृत्यूने आपण खरोखरीच काहीतरी गमावले आहे, कुठेतरी एक पोकळी निर्माण झाली आहे, जिला आपण अपरिमित हानी अगर कधीही भरून न येणारे नुकसान म्हणून संबोधित असतो तशी खंत आणि तसली चुटपूट लावून यशवंतराव गेले. सत्तेत राहूनही यशवंतरावांना ही अनिवार्यता प्राप्त करून घेता आली.

मृत्यूच्या काही महिने आधी ते औरंगाबादी आले होते. कै. उद्धवराव पाटलांच्या एकसष्टी समारंभाचे ते मुख्य पाहुणे होते. तेव्हा त्यांची भेट झाली. यशवंतराव या वेळी बरेच खंगले होते व म्हातारपणाच्या खुणा चर्येवर बाळगणारे वाटले. आपलेही मन मोठे गमतीचे आहे. आपण काही व्यक्तींवर जेव्हा अनिवार प्रेम करतो तेव्हा त्या व्यक्ती आपल्या मनाच्या गाभाऱ्यांना सदैव 'अजर ' असतात. पंडित नेहरू म्हातारे झालेले बघण्यास आपले मन तयार नसायचे. त्यांच्या शरीरावर तसे काही चिन्ह दिसले तर आपल्यालाच वाईट वाटावयाचे. तसेच यशवंतरावांचे होते. यशवंतरावांना आपण स्वातंत्र्यानंतर व विशेषतः राज्य-पुनर्रचनेनंतर राजकारणाच्या विविध आखाड्यांत कुस्त्या मारताना व हरताना

बघितले आहे. त्यांची हार त्यांना नव्हे तर आपल्यासारख्या त्यांच्या चाहत्यांनाच नाराज करून गेली. थकलेले यशवंतराव बघितले आणि वाईट वाटले. या माणसावर आपण खूप टीका केली, त्यांच्या गुणदोषांची आपण खूप चिरफाड केली, पुष्कळदा त्यांच्यावर अत्यंत कठोर प्रहारही केले. आपल्या अपेक्षांना यशवंतराव जेव्हा जेव्हा उतरले नाहीत तेव्हा तेव्हा त्यांच्यावर महाराष्ट्रात व बाहेर खूप टीका झाली. असाच काहीसा विषय औरंगाबादच्या भेटीत निघाला. यशवंतरावांचा चांगुलपणा व त्यांचा मोठेपणा त्या क्षणी जाणवला व मनाला एक जखम करून गेला. आणीबाणीच्या नंतरची यशवंतरावांची वागणूक आणि काँग्रेस अंतर्गतच त्यांचे पक्षांतर याविषयी चर्चा निघाली तेव्हा यशवंतरावांनी त्यांच्या नेहमीच्या हसऱ्या व नर्मविनोदी पद्धतीने आपले समर्थन असे दिले की, लोकांचे एकदा प्रेम जडले की, तेही इतर प्रेमासारखेच आंधळे असते. आपल्या नायकांच्या मर्यादा लोकांना दिसत नाहीत. यशवंतराव हसतच पाठीवर थाप मारीत, मधूनच एखादी कोटी करीत सांगू लागले की, सत्तेचे हे काही स्वभाव व गुणदोष असतात. फार दिवस सत्तेवर राहिल्यामुळे तिचे दोषही आपल्याला बाधित असतात. माझी त्यांच्याविषयीची मते त्यांना माहीत होती. इंडिकेट व सिंडिकेटच्या वेळी म्हणजे रेड्डी, गिरी यांच्या निवडणुकीच्या वेळी मी त्यांच्यावर 'कुंपणावरचे शहाणे पायउतार झाले' हा अग्रलेख लिहिला होता व नंतर अलीकडे म्हणजे आणीबाणीनंतर इंदिरा गांधींचा पराभव होऊन त्या परत सत्तेवर आल्या तेव्हा 'खरारा करणारे, अश्वमेधाचा घोडा काय अडविणार?' असाही एक अग्रलेख प्रकाशित केला होता. त्यातील टीकेचा रोख आठवून यशवंतरावांनी प्रांजळपणे सांगून टाकले की, तुम्हा मंडळींना काय कुस्त्या मारणारा व जिंकणाराच पहिलवान हवा असतो. परंतु प्रत्येक खेळात हारजीत असतेच व प्रत्येक पहिलवानावर कधी ना कधी कुस्तीचा फड सोडण्याची पाळी येतच असते. मी काय ते समजलो. मग खूप प्रश्नोत्तरे झाली. पक्षांतराविषयी यशवंतराव अलीकडे प्रांजलपणे सांगून टाकीत असत की, त्यांची चूक झाली. इंदिरा गांधीच बरोबर होत्या. फारसा वादविवाद त्यांना मंजूर नव्हता. असे असले की, यशवंतराव समोर जे कोणी असेल त्याला बेमालूम विषयांतर करायला लावीत. यशवंतरावांच्या वार्तापरिषदाही अत्यंत चांगल्या व संस्मरणीय असत.

पंडित नेहरूंना रागात आणले की, त्यांची उत्तरे अत्यंत गाजत असत.

मोरारजी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तरे देण्याऐवजी त्यांनाच प्रतिप्रश्न करीत. आचार्य विनोबा वार्तापरिषदांच्या भानगडीत क्वचितच पडत, परंतु जे थोडे प्रसंग त्यांच्यावर आले त्यावरून त्यांची ही लकब लक्षात आली की, ते वार्ताहरांच्या प्रश्नामध्येच चुका दाखवीत व मग उत्तरे देत. यशवंतरावांची पद्धत निराळी. ते प्रश्न करणाऱ्याच्या प्रश्नाचीच प्रथम स्तुती करीत. विचारणारालाच आपला गौरव होतो आहे असे एकसारखे वाटत असे. अशी मानसिक अवस्था निर्माण करून मग यशवंतराव उत्तराची रचना अशी करीत की, हाती काहीच लागू नये. ही लबाडी लक्षात येण्याइतका प्रश्नकर्ता तल्लख असला की, मग प्रश्नोत्तरे बाजूला राहून हास्याचे धबधबे कोसळत. मात्र एवढे खरे की, यशवंतरावांची बौद्धिक आणि वैचारिक पातळी नेहमीच अशी तरबेज राहात आली की, समोरच्यांना त्यांच्याशी व त्यांना समोरच्यांशी झट्या घेण्यावाचून आणि दोन हात केल्यावाचून राहताच येऊ नये. पुष्कळदा तर तेच डिवचीत आणि मग कोंडीत गाठून गडी आऊट करीत. म्हणूनच यशवंतरावांचा सहवास सत्ताधारी असूनही सदैव हवाहवासा वाटत असे. काही तरी हमखास मिळेल असे हे महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांपैकी एकमेव स्थळ होते. बाकी सगळे ऐसपैस परंतु निखळ सर्व नंबर होते. भूमिका असलेली भूमी ही एवढीच.

यशवंतराव हे महाराष्ट्राच्या बहुजन समाजापैकी कदाचित पहिले आणि शेवटचे नेते होते, की ज्यांनी करावयाचे ते सर्व डावपेच करून आणि राजकारण खेळून महाराष्ट्रात जातिधर्मनिरपेक्षपणे चांगल्या तीन पिढ्या घडविल्या. त्यांनी हे ओळखले होते की, राजकारणाचा प्रवाह शहरी, मध्यवर्गीय व वरिष्ठ जातीय वर्गामध्ये कुंठित होऊन पडला होता तो खेड्यापाड्यांपर्यंत मोकळा करून दिला पाहिजे आणि राजकारणाला फुले आणि शाहू महाराज यांच्यानंतर व त्यांच्या अपेक्षेप्रमाणे बहुजन समाजाचे भक्कम अधिष्ठान मिळवून दिले पाहिजे, हे मोलाचे कार्य त्यांनी केले. त्यासाठी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून कृषि-औद्योगिक क्षेत्र तयार केले व त्याला सहकाराची जोड दिली. यशवंतरावांच्या पारदर्शी राजकीय दृष्टीचा हा सबळ पुरावा होय. सहकाराच्या बरोबरच त्यांनी प्रशासकीय व्यवस्थेचे विकेंद्रीकरण घडवून आणून पंचायत समित्या व जिल्हा परिषदा निर्माण केल्या. खेड्यापाड्यांतून बहुजन समाजातील नेतृत्व तयार होण्यासाठी व त्यात सातत्य राहण्यासाठी या विकेंद्रीकरणाचा फार उपयोग झाला. यशवंतरावांचे हे ऋण

विसरण्याइतका महाराष्ट्र कृतघ्न ठरणार नाही, अशी अपेक्षा आहे.

राजकारणाच्या मध्य धारेत असूनही यशवंतराव कधी एकारले नाहीत. जीवनाच्या विविध क्षेत्रांचे मोल त्यांना माहीत होते. आधुनिक काळातील शासनसंस्था केवळ सरकारपुरतीच मर्यादित नसते तर ती संपूर्ण जीवन व्यापण्याची आकांक्षा व शक्ती बाळगून असते. म्हणून राज्यकर्ता जीवनाच्या अनेक अंगोपांगांविषयी जागृत असावा लागतो. यशवंतराव स्वतः चांगले व्यासंगी होते. त्यांचे नित्य वाचन कधी खंडले नाही. साहित्य, शास्त्र, काव्य, नृत्य, संगीत, शिल्प, संशोधन, इतिहास अशा अनेक क्षेत्रांचे ते साक्षेपी अभ्यासक होते. प्रत्येक क्षेत्र आणि त्यातील तज्ज्ञ यांच्या स्वायत्ततेविषयी त्यांना डोळस आदर होता. औरंगाबादचाच एक प्रसंग आठवतो. मला वाटते, संगीत संमेलनाचे का अशाच कसल्या ललित कलेच्या एका कार्यक्रमाचे त्यांच्या हातून उद्‌घाटन ठरले होते. यशवंतराव आले आणि त्यांनी आपल्या भगतगणांनाच त्या दिवशी येथेच्छ फटकारले. ते म्हणाले की, अशा कलेच्या क्षेत्रात राज्यकर्त्यांची जागा येथे व्यास-पीठावर अगर रंगमंचावर नसून श्रोत्यांत कुठेतरी मागच्या बाजूला आहे. रसिक श्रोता अगर प्रेक्षक म्हणून त्याने पुढचे स्थान जरूर मिळवावे. परंतु हे स्थान प्रेक्षकातले व श्रोत्यातलेच असेल हे लक्षात ठेवावे. त्यांनी ललित क्षेत्रात काम करणारांकडूनही अशी अपेक्षा व्यक्त केली की, आपला मान आपण राखला पाहिजे. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य या कल्पना विकसित संस्कृतीच्या द्योतक आहेत. सुसंस्कृत आणि स्वतंत्र मनच स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकते. सत्तेचा तिरस्कार नको, परंतु सत्तेपुढे सदैव लांगूलचालनही नको. यशवंतरावांचे हे उद्‌गार कायमचेच लक्षात राहून गेले. अशी जाण असलेला व सर्व थरांतून प्रामाणिक पाठिंबा असणारा मराठी नेता यशवतरावांच्या नंतर अजून तरी बघा-वयास मिळाला नाही. असा हा मोठा नेता इंदिरा गांधींच्या राजकारणाने वाळीत टाकला आणि विकलांग बनविला तेव्हा यशवंतरावांच्या सर्वच चाहत्यांना वाईट वाटले. यशवंतराव तेव्हाच थकले होते व म्हणूनच त्यांनी कबुलीची जुळवून घेण्याची भूमिका स्वीकारली होती. शेक्सपीयरने ज्युलियस सीझरची शोकांतिका चितारताना त्याचे पतनही फार मोठे दाखवले. जगातील सर्व मोठ्या माणसांचे दैव असेच राहात आले आहे. यशवंतरावांच्या मृत्यूने एक कायमची खंत निर्माण केली तिचे कारण या नेत्याचे मोठेपण हेच.

# १४

# यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य

प्राचार्य डॉ. जे. एम्. वाघमारे

१

स्व. यशवंतराव चव्हाण हे एक फार मोठे लोकनेते होते. खरा लोकनेता हा एका अर्थाने लोकशिक्षक असतो. लोकनेत्याला लोकांच्या विविध प्रश्नांची उकल तर करावीच लागते, पण त्याचबरोबर त्यांना समाजाचे सातत्याने प्रबोधनही करावे लागते, आणि म्हणून तो लोकशिक्षक असतो. लोकशिक्षक हा समाजाला सतत विचार देत असतो; त्याला तो विचारप्रवण आणि विचारशील बनविण्याचा प्रयत्नही करीत असतो. समाजाला शेवटी कार्यप्रवणता प्राप्त होत असते ती अशा व्यक्तीच्या विचार आणि कार्यातून.

यशवंतरावजींनी हयातभर लोकशिक्षणाचे कार्य केले. सत्तेवर येण्यापूर्वी, सत्तेवर आल्यानंतर आणि सत्तेपासून दूर गेल्यानंतर–अशा तिन्हीही अवस्थांत त्यांनी लोकशिक्षणाचे अविरतपणे कार्य केले. अनेक प्रश्नांच्या बरोबर त्यांनी शैक्षणिक प्रश्नांवरही आपले विचार व्यक्त केले, आणि दीर्घकाळ शासनात असल्यामुळे त्यांना आपल्या काही शैक्षणिक विचारांचा अनुभव प्रत्यक्ष कार्यात अनुवादित करता आला. भावी महाराष्ट्राचा आकृतिबंध कसा असावा याविषयी त्यांनी सतत चिंतन आणि कार्य केले आणि म्हणून महाराष्ट्राच्या आजच्या जडण-घडणीमध्ये

# १४

## ´राव चव्हाण यांचे
## क विचार व कार्य

डॉ. जे. एम्. वाघमारे

१

र्क फार मोठे लोकनेते होते. खरा लोकनेता
ासतो. लोकनेत्याला लोकांच्या विविध प्रश्नांची
पण त्याचबरोबर त्यांना समाजाचे सातत्याने
म्हणून तो लोकशिक्षक असतो. लोकशिक्षक हा
सतो; त्याला तो विचारप्रवण आणि विचारशील
ातो. समाजाला शेवटी कार्यप्रवणता प्राप्त होत
आणि कार्यातून.
कशिक्षणाचे कार्य केले. सत्तेवर येण्यापूर्वी, सत्तेवर
गेल्यानंतर—अशा तिन्हीही अवस्थांत त्यांनी
केले. अनेक प्रश्नांच्या बरोबर त्यांनी शैक्षणिक
केले, आणि दीर्घकाळ शासनात असल्यामुळे
विचारांचा अनुभव प्रत्यक्ष कार्यात अनुवादित
आकृतिबंध कसा असावा याविषयी त्यांनी सतत
म्हणून महाराष्ट्राच्या आजच्या जडण-घडणीमध्ये

त्यांनी फार मोठे योगदान दिले.

राज्यपुनर्रचनेनंतर द्वैभाषिक राज्याची आणि महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर एकसंध अशा महाराष्ट्राची धुरा इतिहासाने यशवंतरावजींच्या हाती सोपविली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी आम मराठी जनतेसमोर लोककल्याणकारी राज्याचे व कृषि-औद्योगिक समाजाचे अतिशय कल्पक मनाने चित्र रेखाटले. महाराष्ट्र राज्य हे लोकशाही समाजवादाची प्रयोगशाळा बनावी म्हणून त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. वस्तुतः कोठलीही प्रयोगशाळा ही मूलतः संशोधनाची व ज्ञाननिर्मितीची प्रयोगशाळा असते. तिचा पाया घालण्याचे व त्या पायावर इमारत उभी करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. हे ओळखण्याची दृष्टी यशवंतरावजींना लाभली होती. इतिहासाचा एक जिज्ञासू अभ्यासक आणि सर्जनशील विचारांनी भारलेला एक द्रष्टा नेता व प्रशासक होण्याचे भाग्य लाभल्यामुळे यशवंतराव चव्हाणांनी शिक्षणाची ही अनिवार्यता लक्षात घेतली होती आणि ती आपल्या सहकाऱ्यांच्याही लक्षात आणून दिली होती. आपल्याला अभिप्रेत असलेल्या सामाजिक पुनर्रचनेच्या कार्यासाठी शिक्षणाचा उपयोग कसा करता येईल, याचे चिंतन त्यांनी सातत्याने केले होते.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीचा सोहळा साजरा करण्यापूर्वी त्यांनी ' महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर ' ही कशी असेल आणि कशी असावी, याचे विचारपरिप्लुत असे विवेचन व विश्लेषण आपल्या एका भाषणात केले होते. भवितव्याच्या या प्रदीर्घ सफरीत महाराष्ट्राला ज्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांस तोंड देणे भाग आहे याची स्पष्ट अशी कल्पना त्यांनी मराठी जनतेला करून दिली होती. त्या प्रश्नांच्या मागे शैक्षणिक प्रश्नही दडून बसले आहेत आणि म्हणून तेही आपल्याला चांगल्या प्रकारे सोडविता आले पाहिजेत, याची चर्चाही त्यांनी त्या भाषणात केली होती. महाराष्ट्र राज्य हे सर्वांगांनी वर्धिष्णू करण्याच्या कामी इतर अनेक घटकांच्या बरोबर शिक्षणाला किती व कशा प्रकारचा वाटा उचलता येईल याचाही ऊहापोह त्यांनी आपल्या या भाषणात आवर्जून केला होता. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा मागोवा घेतला तर शिक्षणाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोणाचा उलगडा आपल्याला होऊ शकेल. ते म्हणाले होते : " आमच्या शिक्षणाची पद्धती कशी असावी हाही आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. आजपर्यंत आम्ही ज्या तऱ्हेचे शिक्षण घेतले ते शिक्षण चांगले असेल,

योग्यही असेल, परंतु त्यामुळे आमच्यात नोकरीपेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आम्हाला असे सांगण्यात येते की, आमची बुद्धीच – आमचा पिंडच – नोकरीपेशाचा आहे. मला ही गोष्ट मंजूर नाही. "[१]

मराठी माणसाची बुद्धीच– किंवा त्याचा पिंडच– नोकरीपेशाचा आहे असे मानणे अर्थातच चुकीचे आहे. पण चुकीच्या शिक्षणपद्धतीमुळे चुकीच्या प्रवृत्ती निर्माण होत असतात, हेही तितकेच खरे आहे. नोकरीपेशाची मनोवृत्ती ही ब्रिटिशांनी येथे जी शिक्षणपद्धती राबविली तिचे फलित आहे. या मनोवृत्तीतून देशातील सुशिक्षितांमध्ये समाजपराङ्मुखता निर्माण झाली आहे हे नाकारता येत नाही. असे असतानाही महाराष्ट्रात निरनिराळ्या क्षेत्रांत कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्ती निर्माण झाल्या. उद्योगधंद्यांमध्येही कर्तृत्व गाजवणाऱ्या पल्लेदार बुद्धि-सामर्थ्याच्या किर्लोस्करांसारख्या व्यक्ती महाराष्ट्रात निर्माण झाल्या. तेव्हा मराठी माणसाचा पिंडच नोकरीपेशाचा आहे असे मानणे चुकीचे ठरेल. पण महाराष्ट्राचा आर्थिक विकास घडवायचा असेल तर तांत्रिक शिक्षणाचीही कास धरावी लागेल, असे यशवंतरावजींना वाटत होते. ते पुढे म्हणतात : "फक्त आम्हाला तांत्रिक शिक्षण, वेगवेगळ्या शास्त्रांचे शिक्षण घेतले पाहिजे. अशा तऱ्हेच्या शिक्षणाला आम्ही प्राधान्य दिले पाहिजे. याशिवाय ज्याला आपण निव्वळ ह्युमॅनिटीजचे शिक्षण म्हणतो अशा तऱ्हेच्या शिक्षणाचेही महत्त्व आहेच. ते मूलभूत शिक्षण आम्हाला मंजूर आहे, आणि या शिक्षणाच्या बाबतीत शिक्षणाची सारी दारे सताड उघडी करून ते खालच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे आमचे ध्येय असले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, या तऱ्हेच्या शिक्षणाचे प्रकाशस्रोत अगदी शेवटच्या थरापर्यंत जर आम्ही नेऊ शकलो, तर महाराष्ट्राची शक्ती इतकी जबरदस्त वाढेल की, त्याला कोणाच्याही मेहेरबानीवर अवलंबून राहण्याचे कारण राहणार नाही. तो स्वतःचे रक्षण करील आणि राष्ट्राचेही रक्षण करील. "[२]

वरील शब्दात यशवंतरावजींचा शिक्षणाकडे बघण्याचा मूलगामी दृष्टिकोण व्यक्त झाला आहे. या शब्दातून महाराष्ट्रशासनाचे शैक्षणिक धोरणच त्यांनी व्यक्त केले, असे म्हणावे लागेल. कारण महाराष्ट्र शासनाने या विचारांचा समावेश आपल्या शैक्षणिक धोरणात केला आहे आणि त्याची अंमलबजावणी करण्याचेही प्रयत्न त्याने चालविले आहेत. शिक्षणाची संधी खालच्या थरातील

सर्वांना मिळाली पाहिजे आणि शिक्षणातून त्यांच्या अस्मितेचा आविष्कार झाला पाहिजे. समाजाच्या आर्थिक विकासासाठी तांत्रिक शिक्षण आवश्यक आहे; कारण तांत्रिक शिक्षणाशिवाय आधुनिक जगात आर्थिक विकासाची कल्पनाही करणे शक्य नाही. समाजाला आणि पर्यायाने राष्ट्राला स्वावलंबी बनविण्याचे एक प्रभावी माध्यम बनणे हेच शिक्षणाचे आज तरी प्रमुख उद्दिष्ट असू शकते. हाच विचार यशवंतरावजींनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आपल्या मंत्रिमंडळाच्या शपथविधी प्रसंगीही व्यक्त केला. त्या प्रसंगी त्यांनी आपल्या प्रशासनाचे धोरण काय असेल याचा ऊहापोह केला. ते म्हणाले होते, " शिक्षणाच्या बाबतीत माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक बाजूवर विशेष भर देण्यात येईल. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे अडचणी येऊ नयेत म्हणून शिष्यवृत्त्या वगैरे मार्गांनी सर्व प्रकारे साहाय्य करण्यात येईल."[3] या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी इ. बी. सी. आणि मागासवर्गीयांना शिष्यवृत्त्या देण्याचा निर्णय घेण्यात आला. अनुसूचित जातिजमातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याचे धोरण हे तसे केंद्रशासनाचे धोरण होते. पण इ. बी. सी. ची योजना हे महाराष्ट्र शासनाने स्वतंत्रपणे उचललेले पुरोगामी पाऊल होते. बाराशे रुपये वार्षिक उत्पन्नाखालील सर्वांना या योजनेच्या तहत फीमाफीचा फायदा मिळाला. या क्रांतिकारी निर्णयाद्वारे यशवंतरावजींनी शिक्षणाची सारी दारे सताड उघडली. त्याचा फायदा महाराष्ट्रातील हजारो तरुणतरुणींना झाला. ज्यांच्या घरात आणि दिव्याभोवती पिढ्यान्‌पिढ्या कुणीही पुस्तक उघडले नव्हते त्यांच्या घरात पहिल्यांदाच सरस्वती नांदायला गेली.

महाराष्ट्राच्या भवितव्याविषयी यशवंतरावजी आपले चिंतनगर्भ विचार मांडितच राहिले. त्या विचारात नियोजनाला आणि नियोजनात शिक्षणाला त्यांनी अनन्य साधारण महत्त्व दिले. २५ ऑगस्ट १९६० या दिवशी त्यांनी विधानसभेत ' लोकशाहीतील नियोजन ' या विषयावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. त्या प्रसंगी त्यांनी शिक्षणावर अधिक भर दिला. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे आणि सामाजिक सुखसोयींचे माध्यम म्हणून शिक्षणाकडे बघण्याचे आवाहन त्यांनी सभागृहाला केले. ते म्हणाले होते की, " सामाजिक सुखयोयींकडे दुर्लक्ष होता कामा नये ही गोष्ट मी मान्य करतो, आणि त्यातल्या त्यात शिक्षणाकडे तर मुळीच दुर्लक्ष होता कामा नये. मी ' च 'च्या भाषेत बोलणार

नाही, परंतु शिक्षणाची बाब इतकी महत्त्वाची आहे की त्यासंबंधी ' च 'च्या भाषेत मला बोलावे लागत आहे. आपल्याला नवीन पिढी निर्माण करावयाची आहे. म्हणून मी सांगू इच्छितो की, शिक्षणाच्या बाबीकडे मुळीच दुर्लक्ष होणार नाही. मी ही गोष्ट मुद्दाम आग्रहपूर्वक सांगतो आहे."[४] यशवंतरावांनी शिक्षणा-संबंधी जी भाषा वापरली ती ' च 'ची भाषा होती. ही भाषा शिक्षणाच्या संदर्भात ते सतत वापरीत राहिले. महाराष्ट्राच्या भवितव्याचा आकृतिबंध त्यांना पूर्ण रूपाने आम जनतेसमोर मांडायचा होता. मला असे वाटते की त्यांचे हे मौलिक कार्य १९६० साली महाबळेश्वर येथे आयोजित केलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरात पूर्ण झाले. या शिबिराच्या समारोप प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणात शिक्षणाच्या प्रश्नांची दखल अतिशय चांगल्या प्रकारे घेण्यात आल्याचे आपल्याला दिसेल. ते म्हणाले होते : " मी आपणाला सांगू इच्छितो की, शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहात नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या साधनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यात विजली नेऊन पोहोचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेताचा विकास होणार नाही, त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्य-बळाचा हा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे त्यात शिक्षणाची विजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वतःचा हा असा दृष्टिकोण आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, शेतीचे उद्योगीकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शिक्षणाचा हा कार्यक्रम महाराष्ट्रात महत्त्वाचा आहे. "[५] उद्योग, शेती आणि शिक्षण ही यशवंतरावांच्या शासकीय धोरणाची ' ट्रिनिटी ' होती. सर्वांगीण विकासाचे त्यांचे तत्त्वज्ञान ह्या त्रिसूत्रीवर आधारलेले होते. पाश्चिमात्य देशात जी औद्योगिक क्रांती घडली ती या त्रिसूत्रीच्या आधारावरच, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्ञान ही एक शक्ती आहे. विद्या ही एक प्रकारची ऊर्जाच असते. शिक्षण हे एक प्रकारचे जलसिंचनच आहे. पण हे समजण्यासाठी ' दृष्टी 'ची आवश्यकता आहे. यशवंतरावजींना ही ' दृष्टी ' लाभली होती.

## २

वस्तुत: यशवंतरावजींचा स्वत:चा वैचारिक पिंड उदारमतवादी शिक्षणावर (Liberal Education) पोसला गेला होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व ह्युमॅनिटीज-मधून विकसित झाले होते. साहित्य, इतिहास आणि इतर सामाजिक शाखांच्या अभ्यासातून त्यांचे वैचारिक व भावनिक जीवन फुलले होते. माणसाच्या जीवनात उदात्त मूल्यांचे बीजारोपण मानव्यविद्यांच्या ( Humanities ) शिक्षणाद्वारे होते. उदारमतवादी शिक्षणात एक फार मोठी संस्कारक्षमता दडलेली असते. विचार-सामर्थ्याबरोबर संवेदनशीलता देण्याचे कार्यही हे शिक्षण करते यात शंका नाही. " माणूस मनाने, विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल, ही शिक्षणाची महत्त्वाची कसोटी व साध्य आपण मानले पाहिजे, "[६] असे यशवंतरावजींचे स्वत:चे मत होते. मूल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे सांस्कृतिक प्रगल्भता ! 'ब्रेड' आणि 'बटर'-च्या पलीकडचा विचार या शिक्षणात असतो. अशा या उदारमतवादी शिक्षणातून आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रेरणा आणि सामाजिक जाणिवा प्राप्त होतात. अशा शिक्षणातून ज्ञानप्राप्तीबरोबर व्यक्तींच्या भावजीवनाची प्रगल्भताही वाढते अशी यशवंतरावांची धारणा होती. ते म्हणतात की, शिक्षणातून " केवळ ज्ञानाची उपासना वा बुद्धीची जोपासना करून चालणार नाही, तर भावनांची प्रगल्भता आणि अंत:करणाचा मोठेपणा अंगी असणे अवश्य आहे."[७] माणसाला संवेदनाशील व सुसंस्कृत बनविणे हे शिक्षणाचे महत्तम उद्दिष्ट असले पाहिजे. म्हणूनच ते म्हणतात, " कारण माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही. "[८] अर्थातच सुसंस्कृत माणसांच्या सहअस्तित्वातून 'समाज' अस्तित्वात येत असतो, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

माणसाला मुक्त करण्याची, त्याचा स्वाभिमान जागृत करण्याची किमया ज्ञानच करू शकते, याच्यावर यशवंतरावांची नितांत श्रद्धा होती. हा विचार त्यांनी अनेकदा बोलून दाखविला होता. इतिहासाने आपल्यासमोर उभी केलेली आव्हाने स्वीकारण्याचे सामर्थ्य आपण आपल्या अंगी बाणविले पाहिजे. " परंतु खरे सामर्थ्य निर्माण होते, खरी शक्ती वाढते आणि राष्ट्रे पहिल्या प्रतीची बनतात ती शेवटी बुद्धीच्या क्षेत्रात, ज्ञानाच्या क्षेत्रात. या क्षेत्रात निरलसपणे अखंड

सेवा करणारी जी माणसे असतात त्यांच्या कार्यामुळेच राष्ट्रे मोठी होतात हे मी आपणास सांगू इच्छितो. ज्ञानाच्या अखंड सेवेमधून निर्माण होणारे जे सामर्थ्य आहे तेच खरे सामर्थ्य आहे." १ यशवंतरावांचा हा बहुमोल विचार आपल्याला अंतर्मुख बनवितो. माणसाला मुक्त करण्याची, त्याचा स्वाभिमान जागृत करण्याची आणि त्याचे जीवन प्रगतीच्या दिशेने मार्गस्थ करण्याची प्रतिज्ञा घेऊनच शिक्षणसंस्थांनी आणि विद्यापीठांनी काम केले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. महाराष्ट्रातला सामान्य माणूस सर्व प्रकारच्या जाचक बंधनांतून मुक्त झाला पाहिजे असे त्यांना मनोमन वाटत होते. स्वत:चे भाग्य स्वत:च्या हाताने घडविण्याचे सामर्थ्य असणारा माणूस शिक्षणामुळेच तयार होणार आहे अशी त्यांची श्रद्धा होती. वास्तविक या प्रेरणेसाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खूप प्रयत्न केले होते याची जाणीव यशवंतरावांच्या मनात सतत वास करीत होती. माणूस मनाने, विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल, ही शिक्षणाची महत्त्वाची कसोटी व साध्य आपण मानले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

स्वातंत्र्याच्या विचारांचा आरंभ भाकरीपासून होतो. पण अंतिमत: तो विचार आपल्याला भाकरीच्या पलीकडे घेऊन जाणारा असला पाहिजे. या दोन्हीही गोष्टींचे भान राखता आले तरच शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे आपल्याला ठरविता येतात. यशवंतरावांनी या महत्त्वाच्या गोष्टीचे भान आपल्या मनात नेहमीच बाळगले होते. समाजाच्या भौतिक गरजांची पूर्तता करीत करीतच मानवी जीवनाच्या उच्चतर मूल्यांकडे जाणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटत होते. तेव्हा विकासाच्या प्रश्नांना अधिक प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे होते यात शंका नाही आणि म्हणूनच यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर आर्थिक धोरणाशी सुसंगत असे शैक्षणिक धोरण स्वीकारले.

## २

यशवंतरावजी हे उदारमतवादी शिक्षणाचे समर्थक होते यात शंका नाही. परंतु राष्ट्राचा विकास केवळ अशा ह्या उदारमतवादी शिक्षणातून होणार नाही याची त्यांना पुरेपूर जाणीव होती. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरल्याशिवाय या देशाचा औद्योगिक विकास घडू शकणार नाही. याची

जाणीव त्यांनी आम्हाला वारंवार करून दिली. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीच्या विकासावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे आणि म्हणून शेतीचा प्रश्न हा आपला मूलभूत प्रश्न आहे, या गोष्टीकडे त्यांनी आमचे लक्ष अनेकदा वेधले होते. ज्ञान-विज्ञानाची कास धरल्याशिवाय विकासाची गंगा अवतरणार नाही याचे भान विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या मंडळींनी ठेवणे आवश्यक आहे, असा आग्रही विचार यशवंतरावांनी आपल्या अनेक भाषणां-तून व्यक्त केला. उदा. परभणी येथील कृषिमहाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा शिलान्यास करताना ( १९६० ) ते म्हणाले होते, " मी हल्लीच्या शिक्षणाचा म्हणजे ज्याला ह्युमॅनिटीजचे शिक्षण म्हणतात त्याचा पुरस्कार करणारा आहे. पण मी ज्या देवाचा भक्त आहे त्याच देवाची स्तुती करणारा नाही. शेतीच्या शिक्षणाचीही आवश्यकता आहे. शेतकरी आणि शेतीशी संबंध असणारा मनुष्य हा शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही यावर माझा विश्वास आहे."[१०] आणि म्हणून शेतीसंबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोण अगदी झोपडीतल्या शेतकऱ्यापर्यंत नेऊन पोचवण्याची आवश्यकता आहे. आपली शेती ' शहाणी ' नाही, त्याचे कारण आपला शेतकरी ' शहाणा ' नाही. शेतीचा प्रश्न एवढा गुंतागुंतीचा व बिकट आहे की त्याने भारताच्या जीवनातच एक प्रकारची ' ट्रॅजिडी ' निर्माण केली आहे, असे यशवंतरावांना वाटत होते. हा बिकट प्रश्न सोडवण्यासाठी आधुनिक पद्धतीने शेती करण्याची आणि त्यासाठी शेतीच्या नवीन ज्ञानाची गरज आहे. शेतीसंबंधीचा नवा विचार केवळ कृषिशास्त्राच्या अभ्यासकांपर्यंत मर्यादित ठेवून चालणार नाही. वस्तुतः तो असा " पाझरत किंवा न पाझरता अगदी सरळ कालव्यासारखा वाहत वाहत शेवटच्या शेतकऱ्या-पर्यंत जाऊन पोचला पाहिजे."[११] शेतीचा हा अति बिकट प्रश्न सोडविण्या-साठी सबंध शेतकरीवर्गच शहाणा करून सोडावा लागेल. " त्याकरिता शेतीचे हे ज्ञान पावसाच्या पाण्यासारखे गेले पाहिजे असे मला वाटते. वाहणारी नदी ज्या गावाच्या काठाने जाईल त्यालाच फक्त पाणी देते. पण पावसाचे पाणी हे सगळीकडे जाते. कुठे कमी तर कुठे जास्त. असे पावसाच्या पाण्यासारखे शेतीचे ज्ञान सगळीकडे पसरले पाहिजे, वाढले पाहिजे, आणि ही महाविद्यालये त्याची केंद्रे झाली पाहिजेत."[१२]

यशवंतरावजींनी हा जो विचार मांडला आहे तो ग्रामीण जीवनाच्या

पुनर्रचनेचाच विचार आहे. विकास नागरी जीवनाचाही झाला पाहिजे आणि ग्रामीण जीवनाचाही. पण दुर्दैवाने ग्रामीण जीवन हे शतकानुशतकांपासून दुर्लक्षित आणि उपेक्षित राहिलेले आहे. ते अंधारात बुडालेले आहे. ते प्रकाशात कसे आणता येईल ? नवीन ज्ञानाचा प्रकाश ग्रामीण भागात नेल्याशिवाय अंधारात चाचपडणाऱ्या कोट्यवधी लोकांना विकासाच्या वाटा सापडणार नाहीत. विकासाच्या वाटा त्यांना शिक्षणातूनच सापडू शकतील, अशी यशवंतरावांची धारणा होती. आणि म्हणूनच ते म्हणतात, "शेतीसंबंधी जे नवीन संशोधन आज होत आहे त्याचा उपयोग आपली शेतकरी करू शकेल अशा दृष्टीने शिक्षण देण्याचा प्रयत्न आपणाला करता येईल."[१३] यशवंतरावजींनी ग्रामीण शिक्षणाची कल्पना मांडली होती. ग्रामीण जीवनाच्या पुनर्रचनेसाठी व सर्वांगीण विकासासाठी जे शिक्षण उपयुक्त ठरते, आवश्यक ठरते त्याला 'ग्रामीण शिक्षण' म्हणता येईल.

यशवंतराव चव्हाणांच्या शैक्षणिक विचारांचा आणि कार्याचा मागोवा आपल्याला सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्नांच्या संदर्भातच घेणे भाग आहे. त्याशिवाय त्यांचा अन्वयार्थ आपल्याला कळणार नाही. व्यक्तींच्या वैचारिक आणि भावनिक समृद्धीसाठी शिक्षण हे जेवढे अनिवार्य आहे तेवढेच ते समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठीही आवश्यक आहे. यशवंतरावजींनी विकासाची स्वत:पुरती एक सुटसुटीत व्याख्या केली होती. "सर्वच क्षेत्रांमध्ये संतुलित प्रगती म्हणजे विकास अशी विकासाची मी व्याख्या करतो. आणि म्हणून काही प्राथमिक संस्थांची, काही मूलभूत शैक्षणिक प्रयत्नांची विकासासाठी आवश्यकता असते."[१४] 'काही मूलभूत शैक्षणिक प्रयत्न' हे विकासप्रक्रियेसाठी आवश्यक असतात हे आता सर्वच राष्ट्रांच्या राज्यकर्त्यांनी आणि नियोजनकारांनी मान्य केले आहे, आणि म्हणूनच शिक्षणाचा प्रश्न आपल्याला बाजूला ठेवता येत नाही. यशवंतराव चव्हाणांनी विकासाची जशी सरळ व सोपी व्याख्या केली होती तशीच त्यांनी शिक्षणाचीही साधी व सरळ व्याख्या केली होती. ती अशी होती : "शिक्षित व्यक्तीला स्वत:च्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो, आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर

काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते, त्याला मी शिक्षण मानत आलो आहे."[१५] सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन ज्याच्यामुळे होते त्याला त्यांनी शिक्षण मानले. तेव्हा अशा प्रकारचे शिक्षण समाज व व्यक्तीच्या विकासासाठी आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाच्या नियोजनासाठी अपरिहार्य ठरते. मानवी शक्तीच्या गुंतवणुकीशिवाय 'विकास' करणे, साधणे शक्य नाही, आणि म्हणूनच विकासाचे प्रश्न हे मूलभूत शैक्षणिक प्रश्न असतात. यशवंतरावजी जेव्हा विकासासाठी 'काही मूलभूत शैक्षणिक प्रयत्नांची आवश्यकता असते' असे म्हणतात तेव्हा ते शिक्षणाच्या अनिवार्यतेबरोबरच त्याच्या मूलभूत उद्दिष्टांवरही बोट ठेवतात.

परंतु विकासासाठी आवश्यक असणारे 'काही मूलभूत शैक्षणिक प्रयत्न' करणार कोण? देशातील शिक्षणसंस्था, विद्यापीठे, शासन आणि नियोजनकार या सर्वांनी मिळूनच हे 'शैक्षणिक प्रयत्न' केले पाहिजेत. आणि हे 'प्रयत्न' ज्यांच्या विकासासाठी करणे आवश्यक आहेत त्यांचा त्यात सहभागही तितकाच किंबहुना अधिक—महत्त्वाचा आहे. त्यासाठी व्यक्ती आणि समाज यांना विकासाभिमुख बनवावे लागेल. समाज 'विकसनशील' बनला तर विकासाच्या योजना द्रुत गतीने फलद्रूप होऊ शकतात. आपली आकलनशक्ती वाढविल्याशिवाय जगातील कुठल्याही समाजाला या वैज्ञानिक युगात प्रगती करता येणे शक्य नाही, आणि म्हणून "या पुढे सर्व समाजच शिकत राहिला पाहिजे,"[१६] असा विचार यशवंतरावांनी बोलून दाखविला होता. 'शिकणाऱ्या समाजा'ची संकल्पना ही अतिशय अर्थपूर्ण व महत्त्वाची संकल्पना आहे. युनेस्कोसारख्या जागतिक संस्थेनेच ही संकल्पना अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक पुनर्रचनेसाठी मांडली होती. खरे तर या संकल्पनेला मूर्त रूप देणे ही फारच कठीण अशी गोष्ट आहे; पण त्याचबरोबर ती तितकीच आवश्यकही आहे. अविकसित देशांचा विकास शिक्षणप्रसाराच्या कार्याला प्राधान्य दिल्याशिवाय शक्यच नाही.

४

शास्त्रीय ज्ञानाचा आधार घेतल्याशिवाय आपल्याला विकासाच्या वाटा सापडणार नाहीत हे महाराष्ट्राला यशवंतरावांनी अनेकदा सांगितले. पण शास्त्रीय

ज्ञान घेण्याची सर्वसामान्य लोकांमध्ये कुवत कधी निर्माण होईल ? लोक साक्षर झाल्याशिवाय ते शक्य नाही; हे उघड आहे आणि म्हणून देशातील सर्व थरांतील नागरिकांना प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीने देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराशिवाय लोकशाही समाजाची आपल्याला कल्पनाही करता येणार नाही. जनसामान्यांना प्राथमिक शिक्षण प्राप्त झाले तर त्यातून लोकशाही शक्तीचा आविष्कार अतिशय प्रभावीपणे होऊ शकतो, हा विचार यशवंतरावांनी अनेकदा आपल्या भाषणांतून अगदी हिरीरीने मांडला होता. प्राथमिक शिक्षण हे तळागाळातील आणि सर्वदूर पसरलेल्या ग्रामीण भागातील पिढ्यान्‌पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजनसमाजाला उपलब्ध करून देता आले तरच भारतीय लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजतील अशी यशवंतरावांची प्रामाणिक धारणा होती. भारताच्या राज्यघटनेत वयाच्या चौदा वर्षांपर्यंत सर्वांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण दिले जावे अशा एका मार्गदर्शक तत्त्वाचा समावेश करण्यात आला आहे. हे मार्गदर्शक तत्त्व सर्व राज्यांच्या शैक्षणिक धोरणाचे एक अविभाज्य अंग आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला की माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणही विकास पावते यात शंका नाही. तेव्हा अशा ह्या पायाभूत प्राथमिक शिक्षणाला यशवंतरावजींनी अनन्य साधारण महत्त्व दिले होते. लोकशाहीची मुळे खोलवर रुजविण्याची असतील आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर शिक्षणप्रसाराचे कार्य शासनाला प्रचंड प्रमाणात हाती घेणे भागच होते आणि आहे.

यशवंतरावांनी अलिगढ विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी केलेल्या दीक्षान्त भाषणात या संदर्भात पुढील विचार मांडला होता : "शिक्षणप्रसार ही प्रौढ मतदानपद्धतीबरोबर येणारी गोष्ट असून प्रौढ मतदानपद्धती लोकशाही राज्यकारभाराचा पाया आहे. म्हणून, आपल्या नवजात लोकशाहीची मुळे खोलवर रुजविण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास साहजिकच राजकीय महत्त्व आहे. त्याचप्रमाणे आपल्या प्रचंड मनुष्यबळाची कार्यक्षमता वाढविण्यासही त्याची पुष्कळच मदत होऊ शकेल. तसे झाल्यास आर्थिक क्षेत्रातही त्याचे इष्ट असे परिणाम घडून येतील. शिवाय शिक्षणाच्या या प्रसारात संस्कृतीच्या प्रसाराची बीजे साठलेली असून त्यामुळे मानवी मूल्ये व ध्येय आम जनतेच्या आवाक्यात आणणे शक्य होणार आहे."[१७] शिक्षणप्रसाराकडे बघण्याची यशवंतरावजींची

दृष्टी किती व्यापक आणि अर्थपूर्ण होती हे त्यांच्या या शब्दांतून व्यक्त होते. शिक्षणप्रसाराला राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक महत्त्व असते व असले पाहिजे. शिक्षण हे आपल्या समोर राजकीय अधिकारांचे, आर्थिक विकासाचे आणि सांस्कृतिक संपन्नतेचे दरवाजे उघडीत असते आणि म्हणून जगातील कुठल्याही राष्ट्राला व समाजाला शिक्षणाकडे पाठ फिरविता येत नाही. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या. विषमतेच्या दलदलीत रुतून बसलेल्या आणि जातिजातीत विरफळलेल्या समाजाला तर शिक्षणाशिवाय प्रगतीचा विचार करणे शक्य नाही.

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा वस्तुत: या दिशेतील पहिले पाऊल ठरते. पुढचा मार्ग माध्यमिक आणि उच्च शिक्षणाशिवाय सापडणे कठीणच. विशेषत: माध्यमिक शिक्षणाच्या सोयी व सवलती जनसामान्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असा यशवंतरावांचा आग्रह होता. कारण माध्यमिक शिक्षण हा एकूण सर्व शिक्षणाचा गाभा असतो. माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर बहुसंख्य विद्यार्थी विविध क्षेत्रांत पदार्पण करतात. त्याचबरोबर माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यातून विविध व्यवसायांसाठी आवश्यक असणारे आणि उच्च शिक्षणाच्या विविध शाखांना जोडणारे मार्ग निघतात. शिक्षणातला एक महत्त्वाचा व स्वतंत्र असा टप्पा म्हणून आणि त्याचबरोबर त्याच्या इतर टप्प्यांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा म्हणून माध्यमिक शिक्षणाकडे पाहणे आवश्यक ठरते आणि म्हणून माध्यमिक शिक्षणात विविधता आणि उपयुक्तता आणणे आवश्यक आहे, असा यशवंतरावजींचा आग्रही सल्ला होता. " माध्यमिक शिक्षणात ही विविधता आपण आणली नाही तर त्याच्या उपयुक्ततेसंबंधी लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होऊन माध्यमिक शिक्षण ही एक डोकेदुखी निर्माण करणारी गोष्ट ठरेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती."[१८] माध्यमिक शिक्षण हे अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी असले पाहिजे. समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेकविध प्रश्नांचा त्यात विचार असला पाहिजे. ज्यांना माध्यमिक शिक्षणानंतर उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळत नाही त्यांना माध्यमिक शिक्षणालाच आपल्या आयुष्याची शिदोरी मानावी लागते, आणि ती त्यांना आयुष्यभर कशी पुरेल याचा विचार माध्यमिक शिक्षण राबविणाऱ्या मंडळींनी करणे आवश्यक आहे, असा यशवंतरावांचा आग्रह होता. या संदर्भात ते

म्हणतात, " थोडक्यात म्हणजे काही काळ तरी माध्यमिक शिक्षण हेच बहुसंख्य मुलांच्या जीवनातील अंतिम शिक्षण असून त्यांच्यापुरते बोलायचे झाल्यास हे शिक्षण म्हणजे त्यांच्या भावी जीवनाची खूपच मोठी शिदोरी ठरणार आहे. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, हे शिक्षण पुरे होत असताना जीवनामध्ये प्रवेश करण्यासाठी लागणारी साधनसामग्री विद्यार्थ्यांच्या पदरात पडते आहे किंवा नाही ? हे सर्व पाहण्याची जबाबदारी अर्थातच शासनावर आहे आणि पर्यायाने ती आता या माध्यमिक शिक्षणमंडळावर पडणार आहे "[१९] माध्यमिक शिक्षणमंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी, पुणे येथे व्यक्त केलेला हा विचार आहे (७·३·१९६६).

महाराष्ट्राच्या माध्यमिक शिक्षणमंडळाकडे, शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ अशा अधिकारी सेवकांचे एक पार्लमेंट, एक संसद म्हणून मी पाहू इच्छितो, असे उद्‌गार त्यांनी त्या प्रसंगी काढले होते. " कारण संसदेप्रमाणेच या मंडळावर काम करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये आपल्या विचारांची, आपल्या अनुभवांची देवाणघेवाण होईल, प्रसंगी तत्त्वांचे वा विचारांचे संघर्षही निर्माण होतील, परंतु या विचारांच्या मंथनातून आणि संघर्षातून शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींना मार्गदर्शक अशी तत्त्वे तयार होतील, निर्णय घेतले जातील, आणि शिक्षणाचे हे काम उत्तम प्रकारे वाढत राहील या अपेक्षेने मी आपल्या या मंडळाकडे पाहात आहे, "[२०] असे उद्‌गार त्यांनी काढले होते. माध्यमिक शिक्षणाचे स्वरूप ठरविणारे हे मंडळ स्वायत्त स्वरूपाचे असावे, हाच अर्थ या शब्दांतून ध्वनित होतो. माध्यमिक शिक्षणाचे स्वरूप ठरविण्याचे कार्य ज्यांच्यावर सोपविण्यात आले आहे त्यांना एक महत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागते यात शंका नाही. आणि ती जबाबदारी शिक्षणक्षेत्रातील मंडळींनी पेलली पाहिजे. " महाराष्ट्राच्या भावी पिढीच्या संपूर्ण सांस्कृतिक जीवनाची जबाबदारी या मंडळावर आहे,"[२१] असे ते म्हणाले होते.

५

महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाच्या संदर्भातही यशवंतरावजींनी असंदिग्ध रूपाचे काही विचार मांडले आहेत. उच्च शिक्षणाची दारे गुणवत्तेचा विचार न करता सर्वांनाच खुली असावीत का ? उच्च शिक्षणाची उद्दिष्टे काय

असावीत ? आणि उच्च शिक्षणाचे माध्यम काय असावे ? मुख्यत: या तीन प्रश्नांच्या भोवती स्वातंत्र्योत्तर काळात देशव्यापी वादविवाद होत आलेले आहेत. विशेषत: महाराष्ट्रात या प्रश्नांसंबंधीचा वादविवाद अधिक प्रकर्षाने होत आलेला आहे. या प्रश्नांवर एकमत होणे शक्यच नाही. विशेषत: पहिला प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे. कारण या प्रश्नाचे धागेदोरे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांशी जोडले गेले आहेत. म्हणून तरी या पहिल्या प्रश्नाच्या भोवती वैचारिक आणि समाजिक संघर्ष होत असताना आपल्याला दिसतो. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची दारे सर्वांनाच उघडी असावीत यासंबंधी तसे मतभेद नाहीत. मतभेदाला आरंभ होतो तो महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या संदर्भात. यशवंतरावजींनी या तिन्ही प्रश्नाच्या संदर्भात केवळ विचार मांडले नाहीत; तर एक प्रकारची ठाम अशी भूमिका त्यांनी घेतली.

उच्च शिक्षणाची दारे सर्वांना खुली असावीत का ? या प्रश्नाचे उत्तर तसे होकारार्थी मिळते. पण महाविद्यालयातून आणि विद्यापीठातून विद्यार्थ्यांची गर्दी होते आहे आणि त्यामुळे उच्च शिक्षणाची गुणवत्ता रसातळाला जाते आहे, अशा प्रकारची ओरड या बाबतीत आपल्याला ऐकू येते. गुणवत्तेच्या निकषांवरच प्रवेश दिला तर ही गर्दी रोखता येईल आणि अशा प्रकारे सुशिक्षित बेकारांचा प्रश्नही सोडवता येईल, असा मुद्दाही या बाबतीत पुढे केला जातो. वरवर पाहता हा मुद्दा आक्षेपार्ह वाटत नाही, परंतु खोलात जाऊन विचार केला तर आक्षेपार्ह न वाटणाऱ्या ह्या मुद्द्याच्या मागे परंपरागत प्रस्थापित वर्गाचे हितसंबंध दडलेले दिसतात. यशवंतरावजींनी भूमिका घेतली ती या हितसंबंधांच्या विरोधात. त्यांनी आणि त्यांच्यानंतर महाराष्ट्र शासनाची सूत्रे ज्यांच्या हातात गेली त्यांनी ही भूमिका घेतली नसती तर महाराष्ट्राचे स्वरूप वेगळे राहिले असते. शिक्षण-प्रसार म्हणजे शिक्षणविस्तार आणि विस्तार हे विकासाचे एक आवश्यक अंग असते. लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये जनसामान्यांच्या मनात निर्माण झालेल्या ऊर्मी दाबून टाकणे शक्यही नसते आणि इष्टही नसते. सार्वत्रिक प्रौढमतदानाच्या माध्यमाद्वारे लोकशाही राज्यव्यवस्थेने राज्यकारभाराची सूत्रेच ज्या बहुजनसमाजाच्या ( Masses ) हाती सोपविली त्या बहुजनसमाजाला कुठल्याही स्तरावरचे शिक्षण नाकारता येत नाही. ज्यांच्या पूर्वपिढ्यांना परंपरेने शिक्षणाचा अधिकार नाकारला होता त्यांच्या शैक्षणिक आणि पर्यायाने सांस्कृतिक ऊर्मी

स्वातंत्र्यानंतर प्रकर्षाने उफाळून वर आल्या. तसे होणे अपरिहार्य होते. सामाजिक गतिशास्त्राचाच हा एक भाग होता. त्याचे प्रकटीकरण होणे आवश्यकच होते, आणि म्हणून अशा अवस्थेत सर्वच स्तरांवरील शिक्षणाच्या सुविधा कमीअधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे शासन व समाजाचे कर्तव्यच होते. शिक्षणाच्या अशा या वाढत्या विस्तारातून त्याला 'मास एज्युकेशन'चे स्वरूप प्राप्त होत असते. साधनसामग्री कमी पडते आणि गुणवत्तेवर काही काळ बरावाईट परिणामही होतो. परंतु या संक्रमणातून जाणे अनिवार्य ठरते. जगातील सर्वच विकसित राष्ट्रांना या प्रक्रियेतून जावे लागलेले आहे, आणि आज तिसऱ्या जगातील सर्वच विकसनशील राष्ट्रांना त्याच प्रक्रियेतून जावे लागत आहे. आपला देश याला अपवाद नाही. औद्योगिक क्रांतीची प्रक्रिया आणि लोकशाही समाजाच्या निर्मितीची प्रक्रिया अशा ह्या दोन्हीही समांतर प्रक्रियेतून विकसित राष्ट्रांना जावे लागलेले आहे. हा इतिहास ताजा आहे. आपणही आज ह्या दुहेरी प्रक्रियेतून पुढे जात आहोत. विकासाच्या ऊर्मीतून आणि अस्मितेच्या आवि-ष्कारातून 'लोकशाहीकरण' ( Democratisation ) वाढत जाते. हे सर्व ओळखण्याची कुवत यशवंतरावांच्या मानसिकतेमध्ये रुजली होती म्हणून उच्च शिक्षणाचीही दारे सगळ्यांना खुली असली पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती.

गुणवत्तेच्या नावावर उच्चशिक्षणसंस्थांमध्ये मर्यादित संख्येचा आग्रह धरणे अदूरदर्शीपणाचे ठरले असते. समाजाचा जो एक मोठा भाग शतकानुशतके पददलित राहिला व ज्याला ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले त्यातील तरुण आज बऱ्याच मोठ्या संख्येने महाविद्यालयात व विद्यापीठात प्रवेशासाठी धडपड-ताना दिसतात. त्यांची ही धडपड वस्तुतः सामाजिक प्रतिष्ठा व अस्मिता प्राप्त करण्याची धडपड आहे, असे यशवंतरावजींचे स्पष्ट मत होते. ते म्हणतात, " ज्यांच्या अनेक पिढ्यांना शिक्षणाची दारे बंद होती अशा तरुण मुलामुलींना आपली परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षण घ्यावेसे वाटले तर त्यात आक्षेपार्ह असे काहीच नाही. एवढेच नव्हे तर दूरदृष्टीने पाहिल्यास ज्ञानाच्या या प्रसारामुळे शिक्षणाच्या दर्जात सर्व बाजूंनी सुधारणा होणे अगदी शक्य होणार आहे. कारण जेवढे अधिक विद्यार्थी विद्यापीठात जातील, तेवढ्या लायक विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अधिक वाव मिळणार आहे. म्हणून शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांनी त्याच कार्यावर आपले

लक्ष केंद्रित केल्यास कालांतराने शिक्षणाचा दर्जा सुधारणे फारसे अवघड जाईल असे मला वाटत नाही. "[२२]

यशवंतरावांची ही भूमिका महाराष्ट्र शासनाने स्वीकारली नसती तर महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला नसता. आज ग्रामीण भागात ज्या अनेक शिक्षणसंस्था अस्तित्वात आल्या त्या याच ध्येयधोरणाच्या पाठपुराव्यातून. त्या संदर्भात ते म्हणतात, " आज उच्च शिक्षणाचा जो प्रसार होत आहे त्यामागे माझ्या मते, देशातील लोकशाहीच्या प्रसाराची प्रभावी शक्ती आहे. उच्च शिक्षणाचा लाभ जोपर्यंत फक्त मूठभर लोकांनाच मिळत होता तोपर्यंत समाजजीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत पुढे येणाऱ्यांची संख्या अगदी अल्प असे. अशा परिस्थितीत या मूठभर लोकांची बौद्धिक वाढ खुंटल्यास सर्व समाजाचीच अधोगती होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून निरक्षरता व अज्ञान यात रुतून बसलेल्या लोकांच्या बुद्धीचा विकास घडवून आणून, आणि त्यांच्या अंगच्या सुप्त गुणांचा पुरेपूर विकास होण्यासाठी त्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देऊन गुणवत्तेवर आधारलेले नेतृत्व आपण निर्माण करू शकू. तसे झाल्यास सामाजिक दर्जा, जात, कूळ यासारख्या गोष्टी हळूहळू मागे पडत जातील, आणि परिणामी आपले सामाजिक जीवन अधिक निकोप व निर्मळ होईल यात वाद नाही. "[२३]

शिक्षणप्रसारातून आज लक्षणीय परिवर्तन झाल्याचे आपण पाहात आहोत. सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेच्या गतीला अधिक वेगवान करण्याच्या कामी शिक्षणक्षेत्राने फार मोठे योगदान दिले आहे हे अमान्य करता येत नाही. ग्रामीण भागात सर्व स्तरांवरच्या शिक्षणाचा विस्तार झाला नसता तर विकेंद्रित लोकशाहीचा पाया आपण घालू शकलो नसतो, ग्रामीण भागातून राजकीय आणि आर्थिक नेतृत्व उभे करू शकलो नसतो, आणि ज्या कृषिऔद्योगिक समाजाची संकल्पना मा. यशवंतरावजींनी मांडली ती आज आकार घेत असल्याचे दृश्य आपण पाहू शकलो नसतो. जे शिक्षण आज उपलब्ध आहे त्यात खूप दोष आहेत, जे नेतृत्व आज उभे राहिले आहे तेही बऱ्याच प्रमाणात सदोष आहे आणि जे छोटेमोठे सहकारी कारखाने निर्माण झाले आहेत त्यांतही खूप उणिवा आहेत. हे सर्व लक्षात घेऊनही असे म्हणावे लागेल की आपण बरेच अर्थपूर्ण असे परिवर्तन घडवून आणले आहे. या सर्व घडामोडींच्या मागे यशवंतरावजींच्या विचारांची व नेतृत्वाची प्रेरणा आहे, हे कुणीही नाकारू शकत नाही.

असे म्हणता येईल. तेव्हा साहित्यिकांबरोबर शास्त्रज्ञ, इतिहासकार, तत्त्ववेत्ते हे सर्वजण मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासास चालना देतील असा मला विश्वास वाटतो."[२६] मराठी भाषेत नव्या विचारांची, नव्या शब्दांची आणि नव्या शास्त्रीय ज्ञानाची भर पडावी असे त्यांना मनोमन वाटत होते. महाराष्ट्र राज्य-निर्मितीच्या सोहळ्यापूर्वीच त्यांनी यासंबंधीचे आपले चिंतन व्यक्त केले होते. ते म्हणाले होते, "नव्या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे काम आम्हाला करावयाचे आहे. जुने अमृतासारखे शब्द आहेत ते शब्द तर आम्हाला वापरायचे आहेतच, पण तुमच्या आमच्या जुन्या पिढीला माहीत नसणारे अमृतासारखे विचार अजून आपल्याला शोधून काढावयाचे आहेत. नवीन शास्त्रीय विचारांचा, शास्त्रीय ज्ञानाचा एक नवा इमला आपल्याला महाराष्ट्राच्या जीवनामध्ये उभा करावयाचा आहे आणि या सगळ्या विचारांचे पोषण करणारे, त्यांना तोलणारे शब्द आणि भाषा तुम्हा आम्हाला निर्माण करावयाची आहे."[२७] लेखकांनी, विचारवंतांनी आणि विद्यापीठांनी हे अमूल्य काम हाती घेण्याचे आवाहन त्यांनी केले होते. ज्ञान-विज्ञानाचे मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा खऱ्या अर्थाने ज्ञानाची भाषा होऊ शकते. मूलभूत संशोधन आणि मूलभूत चिंतन आणि मूलभूत विचारनिर्मिती मराठीत होणे आवश्यक आहे.

यशवंतरावजींना ज्याला 'थ्री लँग्वेज फार्मुला' म्हणतात तो मान्य होता. मातृभाषा, तिच्या जोडीला राष्ट्रभाषा म्हणून हिंदी आणि हिंदीच्या जोडीला काही काळ तरी 'लिंक लँग्वेज' म्हणून इंग्रजी अशा तीन भाषांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रादेशिक भाषांचा स्वीकार करण्यास काही कालावधी लागेल; पण शेवटी ते मातृभाषेतूनच दिले पाहिजे, त्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असे यशवंतरावजींचे स्पष्ट मत होते. वस्तुतः त्या दिशेनेच आपली वाटचाल होत आलेली आहे. मात्र म्हणावी तेवढी प्रगती झालेली नाही. पण दिशा बरोबर आहे. कोठारी आयोगाने (१९६४-६६) देखील उच्च शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषाच असावे अशी शिफारस केली होती. ती स्वीकारली गेली आहे. लोकभाषा ही ज्ञानभाषा असलीच पाहिजे अशी यशवंतरावजींनी आग्रही भूमिका घेतली होती. या संदर्भातही त्यांनी 'च'-चीच भाषा वापरली, असे म्हणावे लागेल. ते म्हणतात, "उच्च शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे याला एक दुसरेही कारण आहे. ते काहीसे

ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. क्रांती होऊन, सामाजिक उलथापालथ करून एक प्रकारचे नवीन तऱ्हेचे जीवन बनले असे फारसे हिंदुस्थानात कधी घडलेले नाही. याचे खरे कारण असे आहे की, सामान्य माणसांपर्यंत महत्त्वाचा विचार किंवा ज्ञान आम्ही कधी जाऊच दिले नाही, ही माझी मुख्य तक्रार आहे. हा मुद्दा थोडक्यात सांगावयाचा झाला तर मी असे म्हणेन की, ज्ञान, भाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. ऋषिमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा होती संस्कृत. कारण ती देवभाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत. हे फार पूर्वी. पण नंतरही तेच झाले. मुसलमानी अमलात ज्ञानभाषा उर्दू. फारशी, अरबी जी काही असेल ती झाली. त्यानंतर इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षित राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा जनजीवन आम्हाला विकसित करावयाचे आहे असे आम्ही म्हणतो, तेव्हाही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यानेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल ते होऊ देता कामा नये असे माझे स्वतःचे खंबीर मत आहे.''[२८]

यशवंतरावजींनी शैक्षणिक प्रश्नांवर मांडलेले विचार एकत्रित केले तर त्यांना एक प्रकारच्या ' शैक्षणिक जाहीरनाम्या 'चे ( Educational Manifesto) स्वरूप प्राप्त होऊ शकेल, आणि त्यात लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे हा मुद्दा अतिशय मूलगामी स्वरूपाचा ठरेल. लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली की लगेच शैक्षणिक क्रांती घडेल अशी भाबडी समजूत करून घेण्याचे कारण नाही. सामाजिक रचनेला हात घातल्याशिवाय ते शक्य नाही. समाजामध्ये जे जे घडत असते ते ते सामाजिक रचनेच्या केंद्राभोवती फिरत असते. या देशातील सांस्कृतिक घडामोडी आजपर्यंत जुनाट आणि कालबाह्य अशा सामाजिक रचनेच्या केंद्राभोवतीच फिरत आलेल्या आहेत. तेव्हा केंद्रच बदलावे लागेल. ते बदलायचे असेल तर लोकांपर्यंत ज्ञान घेऊन जावे लागेल. हे काम लोकभाषांच्या माध्यमातून होऊ शकते. लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली तर आपल्याला अभिप्रेत असलेल्या सामाजिक क्रांतीच्या प्रक्रियेत ती एक महत्त्वाचा घटक

ठरेल यात शंका नाही. लोकभाषेच्या संदर्भात मांडलेला त्यांचा हा विचार आपल्या ऐतिहासिक परिस्थितीच्या मर्मावरच बोट ठेवतो यात शंका नाही. शिक्षण हे संस्कृतीचे प्रवेशद्वार (Gateway of Civilisation) असते. ते समाजाच्या सर्वांगीण विकासाचे व राष्ट्रांच्या समग्र सांस्कृतिक परिवर्तनाचे माध्यम बनले पाहिजे, असे यशवंतरावांना वाटत होते. ऐतिहासिक परंपरेने आणि परिस्थितीने आपल्यावर लादलेली ही वेठबिगार फेकून दिल्याशिवाय या देशात सांस्कृतिक परिवर्तन घडणार नाही असेच ते सूचित करतात.

उच्च शिक्षण हे संस्कृतीचे प्रवेशद्वार आहे यात शंका नाही. पण या प्रवेशद्वाराची किल्ली मात्र आता विज्ञानाच्या हातात गेली आहे, हे आपल्याला विसरून चालणार नाही. यशवंतरावांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व जाणले होते. विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेतला एक महत्त्वाचा घटक म्हणून विज्ञानाकडे आपण पाहिले पाहिजे, असे त्यांचे मत होते, आणि म्हणून निरनिराळ्या शास्त्रांचे ज्ञान मराठीत आले पाहिजे आणि मराठी भाषेचा उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून आपण स्वीकार केला पाहिजे, या गोष्टींवर त्यांचा भर होता. मराठी भाषेच्या विकासावर त्यांनी खूप भर दिला होता. तिचा विकास करायचा असेल तर तिच्यात नवनवीन विचार आणावे लागतील, तिच्यातूनच 'विचार' करण्याचा प्रयत्न करावा लागेल. ते म्हणतात : "खरे म्हणजे भाषा ही विचाराच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जसजशी निर्माण होतील, वाढतील, तसतशी भाषा वाढत जाईल. नवे अनुभव आले, भाषा वाढली. नवे काम वाढले, भाषा वाढली. पहिल्याने मोटारीची कल्पना आली आणि त्या मोटारीबरोबर किती तरी नवे शब्द आले. एक नवी परिभाषा आली. साखर कारखान्यांबरोबर किती तरी नव्या कल्पना आल्या. नवीन जीवन आले. नवा विचार आला की भाषा नवे रंगरूप घेऊन आपल्यापाशी येते आणि तो विचार व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती स्वतःच संपन्न होऊन जाते. भाषेचे स्वरूप हे असे आहे. तेव्हा भाषा ही सतत वाढत राहील, याबद्दल शका नको."[२९] यशवंतरावजींनी भाषाविकासाचे रहस्य किंवा सूत्रच आपल्याला सांगितलेले आहे. सर्वांगीण विकासाच्या कार्यातून भाषा विकसित होते आणि भाषेच्या विकासातूत सांस्कृतिक संपन्नता वाढते, आणि या सर्व

गोष्टींचे संक्रमण आणि संवर्धन उच्च शिक्षणातून व्हायला हवे.

७

शिक्षण आणि शिक्षणसंस्थांपासून यशवंतरावजींच्या खूप मोठ्या अपेक्षा होत्या. शिक्षण हे केवळ व्यक्तीच्याच नव्हे तर एकंदर समाज आणि राष्ट्राच्या भवितव्याची कुंडली मांडते अशी त्यांची धारणा होती.[३०] ते बऱ्याचदा अपेक्षाभंग करणारे ठरते याची त्यांना कल्पना नव्हती असे नाही. तरीपण ते समाज व राष्ट्राच्या आशेचे अंतिम स्थान आहे अशी त्यांची श्रद्धा होती. शिक्षणाकडे सतत आशेनेच पाहिले पाहिजे, निराशेने पाहणे धोक्याचे ठरेल असे त्यांचे म्हणणे होते. शिक्षणाविषयीची असमाधानता सार्वत्रिक होत असल्याचेही त्यांच्या ध्यानात आले होते. विकसित राष्ट्रांमध्येही शिक्षणाविषयीची असमाधानता वाढत असल्याची जाणीव त्यांना होती. सुशिक्षित बेकारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत असल्याचे ते आपल्या डोळ्यांनी पाहात होते. आजच्या शिक्षणातून तरुणांच्यामध्ये शिस्तही बाळगली जात नाही अशी ओरड त्यांच्या कानी पडत नव्हती असे नाही. तरीपण निरक्षर बेकारांपेक्षा सुशिक्षित बेकार अंतिमतः देशहिताचे ठरतील असे त्यांनी अनेकदा म्हटले होते. त्यांचे हे म्हणणे तऱ्हेवाईक वाटण्यासारखे होते. पीडलेला माणूस सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करू शकतो. ती परिस्थिती बदलण्याचा विचारही तो करू शकेल. ते म्हणतात : "पण काही मंडळींचा असा आक्षेप आहे की, फार महाविद्यालये काढल्याने गुणवत्ता कमी होते, आणि पुष्कळ मुले शिकून शहाणी झाली आणि त्यांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत म्हणजे सुशिक्षित बेकारांचा प्रश्न तयार होतो. त्यांना यात मोठा धोका दिसतो. पण धोका कोणत्या कामात नाही ? आणि यात धोका असलाच तर सुशिक्षित बेकार आणि अशिक्षित बेकार यांमधला कोठला धोका अधिक मोठा ? शिक्षणाने देशात बेकारीच निर्माण होणार असेल तर देशामध्ये सुशिक्षित बेकार असणे अधिक चांगले असे मी म्हणेन. कारण सुशिक्षित बेकार निदान विचार तरी करू शकेल. आपण बेकार का राहिलो याची तो कारणपरंपरा शोधील आणि ती दूर करण्याचा तो प्रयत्न करील. तेव्हा शिक्षणाने सुशिक्षित बेकारांचा धोका निर्माण होईल या शंकेत काही अर्थ नाही."[३१] या सुशिक्षित बेकारांच्या असंतोषातून समाजक्रांतीची मशाल पेटेल असा विचार त्यांच्या मनात निर्माण

होत असे. वास्तविक यशवंतरावजींचा पिंड समन्वयवादी व्यक्तीचा होता. वर्गकलह देशात पेटावा असे त्यांना वाटत नव्हते. पण तो टाळता येईल का? याबद्दल त्यांचे मन साशंक होते. हिंदुस्थानात वर्गसंघर्ष नव्हता, असे कधी झाले नाही. तो होता आणि आज तो अधिक उग्ररूप धारण करीत आहे. आपल्या देशातला वर्गसंघर्ष हे जातिसंघर्षाचेच रूप आहे, असे यशवंतरावांचेही ठाम मत होते. ते म्हणतात, "जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था, वर्णव्यवस्था ही अत्यंत वाईट स्वरूपाची विग्रहव्यवस्थाच आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या जाति-वर्ण-वर्गव्यवस्थांना सध्या जे विकृत स्वरूप आले आहे, त्या स्वरूपासाठी त्या निर्माण करण्यात आलेल्या नव्हत्या, असे म्हणण्यात फारसा अर्थ नाही नि तसे म्हणणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे ठरेल."[३२] भारतात वर्गसंघर्ष अटळ असे त्यांचे मत बनले होते. जे शोषित आहेत त्यांनी संघटितपणे शोषकांचा आहे, प्रतिकार केला पाहिजे. त्यांनी प्रस्थापितांच्या दयेवर जगण्याचे काही कारण नाही. "हा संघर्ष अटळ आहे; आणि एकदा तो अटळ आहे, हे मान्य केले की मग ही एक लढाई ठरते आणि लढाई नेहमी अहिंसकच राहिली पाहिजे ही इच्छा चांगली आहे, पण व्यवहारात तसे घडणे अशक्य आहे,"[३३] असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

यशवंतरावांच्या वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष यासंबंधीच्या मतांच्या संदर्भात त्यांच्या शिक्षणविषयक विचारांची दखल घेतली पाहिजे असे मला वाटते. मला असे वाटते की त्यांनी हे सर्व पुढे उद्भवणाऱ्या परिस्थितीवर सोडून देण्याचे ठरविले होते. या देशात क्रांतिकारक परिवर्तन कधी घडले नाही, याची मात्र त्यांना खंत होती. उच्च शिक्षणाची दारे सगळ्यांना खुली असली पाहिजेत. शिक्षण लोकभाषेतून दिले पाहिजे, ज्ञानविज्ञान खालच्या थरातील सर्वांच्या घरा-दारांपर्यंत जाऊन पोचले पाहिजे; आणि ते समाजक्रांतीचे रसायन ठरले पाहिजे, असे त्यांना मनापासून वाटत होते. शिक्षणप्रसारातून बेकारी वाढली तरी हरकत नाही; कारण सुशिक्षित बेकार हे विचार करू शकतील व काही तरी कृती करू शकतील, यावर त्यांचा विश्वास होता. या देशात आमूलाग्र परिवर्तन घडू शकेल का? हा प्रश्न त्यांच्या मनाच्या तळाशी घर करून बसलेला होता, असे माझे मत आहे.

८

सभोवतालचे निराशाजनक वातावरण पाहून आशेच्या किरणासाठी यशवंतरावजी शिक्षणक्षेत्राकडे मोठ्या आपेक्षेने पाहात होते. मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. केंद्रस्थानी संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि अर्थमंत्री या नात्यांनी प्रदीर्घ काळ काम करण्याची संधी मला मिळाली. पण शिक्षणमंत्री होण्याची संधी मात्र मला मिळाली नाही, अशी खंत त्यांनी दोन वर्षांपूर्वी एका समारंभात व्यक्त केली होती. अलीकडे शिक्षणासंबंधीचे त्यांचे विचार पुन्हा ऐकायला मिळत होते. त्यांनी शिक्षणाविषयीचा आपला आशावाद कधीही ढळू दिला नाही. " कारण शिक्षणाविषयीची निराशा ही भविष्याविषयीची निराशा होय. " [३४] असे त्यांचे मत होते. उलट ध्येयवादी शिक्षणसंस्था ह्या आपल्याला समाजक्रांतीचे रसायन प्राप्त करून देतील, अशी त्यांची श्रद्धा होती. [३५] माणसाच्या मनात ध्येयवाद पेटविण्याचे, त्याच्या मनात सामर्थ्य निर्माण करण्याचे आणि त्याला कार्यप्रवृत्त करण्याचे काम शिक्षण हे चांगल्या प्रकारे करू शकते, या गोष्टींवर त्यांचा विश्वास होता.

चव्हाणसाहेबांचे शिक्षणविषयक विचार हे केवळ ' अकॅडेमिक ' स्वरूपाचे नव्हते, ही गोष्ट मात्र आपण लक्षात घेतली पाहिजे. महाराष्ट्र राज्याची धुरा त्यांनी सुरुवातीच्या काळात सांभाळली. ती सांभाळीत असताना त्याच्या जडणघडणीचा पायाच त्यांनी घातला असे म्हणता येईल. केंद्रशासनातही अनेक वर्षे ते सत्तेवर होते, आणि म्हणून त्यांच्या विचारांना कमीअधिक प्रमाणात मूर्तरूप मिळू शकले. महाराष्ट्र राज्याचे धोरण निश्चित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता, म्हणून तर त्यांच्या विचारांना प्रत्यक्ष कार्याची जोड मिळू शकली. महाराष्ट्रात शिक्षणप्रसाराचे कार्य प्रचंड प्रमाणात वाढले आहे. त्याच्यामागे यशवंतरावांच्या विचारांच्या प्रेरणा निश्चितच आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागांचे शैक्षणिक एकसूत्रीकरण त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झाले. ऐतिहासिक कारणांमुळे मराठी संस्कृतीचे माहेरघर असलेला मराठवाडा मागे पडला होता. तो उर्वरित महाराष्ट्राबरोबर यावा म्हणून मराठवाडा विद्यापीठाची स्थापना त्यांनी केली. शिवाजी विद्यापीठाची स्थापनाही त्यांच्याच प्रेरणेने झाली. ग्रामीण महाराष्ट्राच्या अस्मितेचा आविष्कार दोन्हीही विद्यापीठांच्या

रूपाने झाला. आज महाराष्ट्रात महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचा विस्तारही प्रचंड प्रमाणात होतो आहे. त्यामागेही यशवंतरावजींच्या प्रेरणा आहेत. आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील ( इ. बी. सी. ) मुलामुलींना शैक्षणिक शुल्कात पूर्णत: सूट देण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. महाराष्ट्रातील लाखो मुलामुलींना त्याचा फायदा मिळाला. नवबौद्धांना धर्मांतराची बाब पुढे करून शिष्यवृत्त्या आणि आरक्षणापासून त्यांनी वंचित होऊ दिले नाही. ज्या कृषिऔद्योगिक समाजाचे स्वप्न त्यांनी पाहिले त्याला साकार करण्यासाठी पुढे महाराष्ट्रात चार कृषिविद्यापीठांची स्थापना झाली. सत्तेचे विकेंद्रीकरण, सहकारी चळवळीतून उभे राहिलेले उद्योगीकरण आणि शेतीविकासाच्या विविध योजना, या सर्वांचा शिक्षणप्रसारावर अनुकूल परिणाम झाला, ही गोष्ट नाकारता येत नाही. वस्तुत: या सर्व गोष्टी आणि घडामोडींच्या संदर्भातच यशवंतरावजींच्या शैक्षणिक विचाराचा व कार्याचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक घडामोडींशी स्व. यशवंतराव चव्हाणांनी सातत्याने संपर्क ठेवला होता. त्या घडामोडींना योग्य दिशा व वळण देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या प्रेरणेने अनेक संस्था महाराष्ट्रात जन्माला आल्या. बऱ्याच शिक्षणसंस्थांनी व महाविद्यालयांनी त्यांचेच नाव धारण केले. ‘ यशवंत ’ हे प्रतिपच्चंद्रापरी वाढणाऱ्या एका ‘ औक्षवंत ’ लोकनेत्याचे नाव होते आणि हे ‘ नाव ’ महाराष्ट्राचे ‘ विशेषण ’ ठरले. यशवंतरावांनी निरनिराळ्या क्षेत्रांतील संस्थांशी आणि व्यक्तींशी सतत संपर्क ठेवला. शिक्षणक्षेत्रात याला अपवाद नव्हते. त्यांच्या ‘ ऋणानुबंधा ’त शिक्षणक्षेत्रातील व्यक्तीही होत्या. शिक्षणक्षेत्रातील अंत:प्रवाहाची त्यांना जाण होती. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अनेक वर्षे ते कुलपती होते. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या मृत्यूनंतर रयत शिक्षण संस्थेकडे पालकाच्या जिव्हाळ्याने ते पाहात होते. तिचे ते अध्यक्ष होते. कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणक्षेत्रातील ‘ क्रुसेडर ’ ( Crusader ) होते. रयत शिक्षण संस्थेने महाराष्ट्रात वटवृक्षाचे रूप धारण केले. या वटवृक्षाची मुळं व फांद्या सर्व महाराष्ट्रभर पसरल्या. ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा घेऊन जाणाऱ्या या भगीरथाकडे यशवंतरावजी आदराच्या दृष्टीने पाहात होते. रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षस्थानी असणे ही गोष्ट त्यांना व संस्था या दोघांनाही भूषणावह होती.

शैक्षणिक क्षेत्रात सतत प्रयोगशीलता येत राहावी अशी त्यांची अपेक्षा होती. महाराष्ट्र शासनाने खासगी संस्थांना तंत्रनिकेतने आणि अभियांत्रिकी महाविद्यालये काढू देण्याचा निर्णय घेतला तेव्हा यशवंतरावांनी त्याचे एक क्रांतिकारक पाऊल म्हणून स्वागत केले. त्याच्यातून बरेच गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असतानाही त्यांनी या निर्णयाचे समर्थन केले. तंत्रज्ञान ही काळाची गरज आहे आणि ती भागविण्यासाठी फार मोठ्या धाडशी प्रयत्नांची गरज आहे, असे त्यांना वाटत होते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपण भारताला सुजलाम्–सुफलाम् करू शकू असा त्यांचा विश्वास होता. शिक्षण हे समाज-परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे या गोष्टीवर त्यांचा दृढ विश्वास होता. बदलत्या परिस्थितीची दखल घेत घेत शैक्षणिक परिवर्तन घडविता आले तर समाज-परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिशील होऊ शकेल असे त्यांचे मत होते. शिक्षण हे शेवटी राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय विकासाचे प्रभावी माध्यम ठरले पाहिजे या गोष्टीवर त्यांचा विशेष कटाक्ष होता.

## संदर्भ टीपा :


१. 'महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर', सह्याद्रीचे वारे (मुंबई : प्रसिद्धी विभाग महाराष्ट्र सरकार, १९६२) पृ. १८.
२. कित्ता, पृ. १९.
३. 'सोनियाचा दिवस', सह्याद्रीचे वारे, पृ. ५६.
४. 'लोकशाहीतील नियोजन", सह्याद्रीचे वारे, पृ. ११४.
५. 'नियोजन, मनुष्यबळ व शेती'. सह्याद्रीचे वारे, पृ. १२५–२६.
६. 'अमृताचे कुंभ', युगांतर (पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७०), पृ. १८१.
७. 'समाजाभिमुख शिक्षण', भूमिका (पुणे : प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९७९), पृ. १६८.
८. 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा', युगांतर, पृ. १७०.
९. 'अमृताचे कुंभ', युगांतर, पृ. १८५.
१०. 'आमच्या शेतीचा मूलभुत प्रश्न', सह्याद्रीचे वारे, पृ. १३६.
११. कित्ता, पृ. १३८.
१२. कित्ता, पृ. १३८.
१३. 'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना', सह्याद्रीचे वारे, पृ. १४२.

१४. ‘ आमच्या शेतीचा मूलभूत प्रश्न ’, सह्याद्रीचे वारे, पृ. १३३–३४.
१५. ‘ ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना ’, सह्याद्रीचे वारे, पृ. १४०.
१६. ‘ समाजाभिमुख शिक्षण ’ भूमिका, पृ. १६७.
१७. ‘ लोकशाही शक्तीचा प्रभावी आविष्कार ’, सह्याद्रीचे वारे, पृ. १५३.
१८. ‘ माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व ’, युगांतर, पृ. १६७.
१९. कित्ता, पृ. १६६.
२०. कित्ता, पृ. १६३–६४.
२१. कित्ता, पृ. १६८.
२२. ‘ लोकशाही शक्तीचा प्रभावी आविष्कार ’, सह्याद्रीचे वारे, पृ. १५६.
२३. कित्ता, पृ. १५६–५७.
२४. ‘ नवपदवीधरांकडून अपेक्षा ’, सह्याद्रीचे वारे, पृ. १४६.
२५. कित्ता, पृ. १४७–४८.
२६. कित्ता, पृ. १४८.
२७. ‘ जनप्रेमाची शक्ती ’, सह्याद्रीचे वारे, पृ. २६.
२८. ‘ लोकभाषा हीच ज्ञानभाषा ’, युगांतर, पृ. १७२–७३.
२९. कित्ता, पृ. १७४.
३०. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या नव्या इमारतीच्या कोनशिलासमारंभ प्रसंगी ( २९ आक्टोबर १९७९ ) मांडलेला विचार.
३१. ‘ लोकभाषा हीच ज्ञानभाषा ’, युगांतर, पृ. १७१.
३२. ‘ वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष ’, भूमिका, पृ. २४४.
३३. कित्ता, पृ. २४४.
३४. ‘ समाजाभिमुख शिक्षण ’ भूमिका, पृ. १६२–६३.
३५. ‘ समाजक्रांतीचे रसायन ’, युगांतर, पृ. १५८–१६२.

१५

# यशवंतराव चव्हाण : एक ललित लेणे

## प्रा. भु. दि. वाडीकर

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातून पुढे आलेले आणि सत्तेच्या राजकारणात आयुष्यभर राहूनही आदरणीय राजकारणी म्हणून देशभर प्रतिष्ठा मिळालेले पहिले नेते पं. जवाहरलाल नेहरू आणि शेवटचे नेते यशवंतराव चव्हाण हे होत. यशवंतराव चव्हाणांचे गेल्या तीस-चाळीस वर्षांचे जीवन म्हणजे एका ठाम, प्रगत, वैचारिक आणि सुसंस्कृत नेतृत्वाच्या स्वरूपात विकास पावलेले व स्वतःच्या अभिजात वैशिष्ट्याने नटलेले एक तत्त्वज्ञान आहे. एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेऊनही स्वकर्तृत्वाने मनुष्य किती मोठा होऊ शकतो, हे भारतीय लोकशाहीत यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाने इतरांना दाखवून दिले आहे. आजपर्यंतच्या राजकारणात बहुतेक मोठेमोठे पुढारी श्रीमंत दिसतात. सामान्य परिस्थितीतून वर आलेले आणि आपल्या कर्तबगारीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या दर्जापर्यंत पोचलेले आणि संघटना व प्रशासन या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच वेळी यशस्वीपणे पेलू शकणारे भारतातील हे पहिलेच नेतृत्व होते.

यशवंतरावांच्या जीवनाकडे माणसे अनेक दृष्टींनी पाहू शकतात. पुत्र यशवंतराव, मित्र यशवंतराव, नेता यशवंतराव, वक्ता यशवंतराव, लेखक यशवंतराव, रसिक यशवंतराव, गृहस्थ यशवंतराव, विचारवंत यशवंतराव अशा अनेक

नात्यांनी त्यांच्या जीवनाकडे पाहता येते. या प्रत्येकातील त्यांचे कर्तृत्व असे आहे की, त्या त्या क्षेत्रातील मोठेपण त्यांच्याकडे आपोआप चालून यावे इतके यशवंतरावांचे जीवन मोठे होते. "मी यशवंतराव चव्हाण होणार," असे त्यांनी त्यांच्या शेणोलीकर मास्तरांना दिलेले इंग्रजी चौथ्या इयत्तेतील उत्तर स्वतःच्या कर्तबगारीने त्यांनी अक्षरशः खरे करून दाखविले. प्रत्येक क्षेत्रातील त्यांची कामगिरी कशी शिगोशीग भरलेली आहे आणि त्यामुळे यशवंतराव चव्हाणांचे व्यक्तिमत्त्व सर्वांना मोहविणारे, सर्वांना हवेहवेसे वाटणारे ठरले.

यशवंतरावांचे हे नेतृत्व कुठलीही परंपरा नसलेले, स्वयंभू, स्वकष्टार्जित नेतृत्व होते, ही वस्तुस्थिती कुणीही नाकारणार नाही. जातीची, घराण्याची, परंपरेची पुण्याई गाठीशी घेऊन समाजाचं नेतृत्व करण्यासाठी पुढे आलेला माणूस सापडू शकेल, परंतु केवळ नशिबावर हवाला न ठेवता ईर्षेने, चिवटपणे, प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करून, स्वतःच्या दारिद्र्याची तमा न बाळगता व बहुजन समाजात आपण जन्मलो याचा अभिमान बाळगत, प्राप्त परिस्थितीला टक्कर देत देत, प्रतिष्ठित झालेलं व्यक्तिमत्त्व शोधायचा प्रयत्न केला तर तसं नेतृत्व फक्त यशवंतरावांच्या रूपानेच आपल्याला पाहायला मिळू शकेल. मराठी माणसाच्या मनात यशवंतरावांनी हे जे स्थान मिळविले होते त्यामागे त्यांचे स्वतःचे कर्तृत्व, अभ्यास आणि निष्कलंक जीवन-प्रवास यांची तपश्चर्या होती.

महाराष्ट्राने देशाला एकापेक्षा एक थोर नेते उपलब्ध करून दिले. दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लो. टिळक, म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्यांपैकी अग्रगण्य, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगळता या सर्व आदरणीयांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतले स्थान दुसऱ्या महायुद्धापूर्वीचे. दुसऱ्या महायुद्धानंतर महाराष्ट्राची संपूर्ण देशात जी प्रतिमा उमटली तीत मात्र अग्रेसर म्हणून यशवंतरावांचेच नाव मुद्दाम घ्यावे लागेल. अर्थात वस्तुस्थिती म्हणून हे कबूल करायला हरकत नाही की, महाराष्ट्राच्या राजकारणातील यशवंतरावांचा उदय हा प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळातील आहे. पण त्यांच्या समकालीनांच्या तुलनेत त्यांच्याइतका धूर्त मुत्सद्दी, विद्वान व यशस्वी राजकारणी म्हणून अन्य कुणाचाही उल्लेख करता येणार नाही. श्रीपाद अमृत डांगे. एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे हे सगळे

त्यांना वयाने वडील, पण या त्यांच्या वडिलकीचा वसा जपत, त्यांचे प्रेमसंबंध कायम टिकवत, त्यांचे श्रेष्ठत्व न विसरता मराठी मनावर आपला पगडा बसवण्याचा पुरुषार्थ फक्त यशवंतरावच करू शकले, आणि त्यामुळेच यशवंतराव चव्हाण आकस्मिकरीत्या गेले तेव्हा आपल्याच घरातले एक वडिलधारी व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले याची काळीज भेदणारी जाणीव महाराष्ट्राच्या घराघरातून व्यक्त झाली होती. यशवंतरावांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या यशाची ती पावतीच म्हणावी लागेल. कारण ज्याच्या मृत्यूची खंत वाटावी आणि ह्या माणसाचे मरण लांबणे आवश्यक होते असे वाटावे असे ईश्वरी वरदान लाभलेले यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व अजून काही दिवस मराठी माणूस अपेक्षित होता.

देवराष्ट्रेसारख्या चिमुकल्या खेड्यात, गरीब कुटुंबात जन्मलेला असा हा माणूस. शिक्षणाची फार मोठी परंपरा चव्हाण कुटुंबाला लाभलेली नव्हती. यशवंतरावांच्या वेगळेपणाचा विचार करताना आपण ह्या गोष्टी नेहमीच ध्यानात घेतो असे नाही. यशवंतरावांना थोडेसे समजू लागले होते त्या काळात महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ अतिशय जोरात होती. साऱ्या ग्रामीण भागात या चळवळीविषयी विलक्षण ओढ होती. आपुलकीची भावना होती. पण एव्हाना जातिधर्म-पंथ-भाषा यांच्या पलीकडे असलेला निखळ आणि शुद्ध राष्ट्रवाद म्हणजे काय ते त्यांना उमगले होते. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीच्या जाळ्यात न अडकता, स्वातंत्र्यलढ्याच्या मुख्य प्रवाहात यशवंतरावांनी त्या वयातही स्वतःला बेभान होऊन झोकून दिले. आज यशवंतरावांच्या या वागण्याविषयी तटस्थ राहून बोलणे, लिहिणे सोपे आहे. यशवंतरावांच्या या निर्णयाचे मोल आणि महत्त्व त्या काळातला ग्रामीण महाराष्ट्र जाणण्याची दृष्टी ज्याच्या पाशी आहे, त्यालाच समजू शकेल. ग्रामीण भागातून पुढे आलेला, खस्ता खात खात अडीअडचणीतून शिक्षण पूर्ण केलेला आणि कायम दारिद्र्यातसुद्धा सतत वाचन, विचार व रसिकता जपलेला हा माणूस देशाच्या राजकारणात सतत चाळीस वर्षे या ना त्या नात्याने वावरला. या दीर्घ काळात कुठल्या ना कुठल्या कार्यात सर्व काळ मन गढून गेलेले यशवंतराव हे एक अनेकावधानी नेते होते. बेचाळीसच्या स्वातंत्र्य आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता, किंवा स्वातंत्र्यसंग्रामात कोवळ्या वयापासूनच त्यांनी भाग घेतला होता ही बाब घरची

परिस्थिती विकट असतानाही सांसारिक गरजांपेक्षा सामाजिक गरजा जास्त महत्त्वाच्या मानणाऱ्या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याची साक्ष देणारी आहे. ग्रामीण भागातून आणि विशेषत: बहुजन समाजातून असे सर्वंकष नेतृत्व महाराष्ट्राला पूर्वी लाभलेलेच नव्हते. अर्थात इतिहासाची साक्ष काढायची ठरली तर केवळ छत्रपती शिवाजीमहाराजांचाच तसा संदर्भ देता येऊ शकेल. ग्रामीण भागाची परंपरा असलेल्या इतर अनेक समाजसुधारकांचा नेतृत्वविकास शहरी भागातच झालेला दिसेल. "कृष्णाकाठ" या त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी कुठलीही अतिशयोक्ती न करता, सहज सांगताना जे उल्लेख केलेले आहेत त्यावरून निराधार अवस्थेत केवळ आत्मबळावर विसंबून, स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून सातारा, कोल्हापूर आणि पुणे या सगळ्या परिसरात जमेल तेथे आणि मिळेल त्या संधीचा फायदा घेत त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे विकसित झाले याचा उल्लेख केला आहे. त्यांच्या पूर्व जीवनातील या आठवणी वाचत असताना या माणसाने केवळ जिद्दीने स्वत:ला आभाळाएवढे केले, हे कुठलाही पुरावा न देता कबूल करावे लागेल, इतपत माहिती दिलेली आहे. ही माहिती वाचताना मन हळवे व्हायला लागते आणि ते एक अनेकावधानी व्यक्तिमत्त्व होते असा जो उल्लेख यापूर्वी केला आहे त्याला हा एक संदर्भ प्राप्त होतो. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेत, कुठलीही तडजोड न करता त्यांनी आपले वाचन, मनन, चिंतन, निरीक्षण कायम ठेवले, आणि त्याचे कारण ते त्यांचे उपजत गुण होते. तसं तर त्यांचं सारं जीवन म्हणजे एकामागून एक अशा कठीण समस्यांची मालिका होती. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी त्यांना उदंड परिश्रम घ्यावे लागले. अनेकविध विषयांचे ज्ञान त्यांनी स्वकष्टाने मिळवले. वाचन ही त्यांची स्वाभाविक आवड होती, आणि प्रत्येक वेळी निर्माण होणाऱ्या समस्यांतून मार्ग काढणे हा त्यांचा स्वभावधर्म होता. समस्यांचे आव्हान स्वीकारणे आणि त्यावर मात करणे हा त्यांच्या जीवनविकासाचा एक अव्याहत क्रम राहिलेला आढळतो. अप्रतिहत-पणे आपली रसिकता जपत मिळवलेले अनेक विषयांतील ज्ञातेपण त्यांनी आयुष्य-भर सांभाळले. आरंभी उदंड दारिद्र्य, नंतर मध्यमवर्गीय जीवन आणि नंतर राजकीय प्रतिष्ठा मिळाल्यानंतरचे वैभवी जीवन जगत असतानासुद्धा ते कधीही आपले पूर्वायुष्य विसरले नाहीत. जीवनाचे अनंत नमुने त्यांनी पाहिले आणि स्वत:ही एक नमुनेदार जीवन ते जगले. त्यामुळे सामान्य माणसाची सुखदु:खे,

त्यांच्या भावना, वासना, अडचणी यांची त्यांना चटकन् कल्पना यावयाची. शहरात असो वा खेड्यात त्यांच्या तरल, कल्पक मनात जीवनातील ही वास्तविकता सतत जागी असायची. ते जेव्हा बोलू लागायचे तेव्हा त्यांच्या वाणीने समृद्ध केलेली अकृत्रिम शब्दकळा अगदी अशिक्षित माणसाच्याही हृदयाला जाऊन भिडत असे.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राचं नेतृत्व करणं ही गोष्ट तशी सोपी नव्हती. भल्याभल्यांनाही महाराष्ट्राचे नेतृत्व यशस्वी रीत्या करणं जमलं नाही. शंकरराव देव, काका गाडगीळ, केशवराव जेधे, शंकरराव मोरे या सगळ्यांच्या काँग्रेसमधील राजकारणाला बगल देत, बाळासाहेब खेरांचा विश्वास संपादन करत, भाषावार प्रांतरचनेपूर्वीच आपण राजकारणात अटळ आहोत असा दबदबा निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व फक्त यशवंतरावांचेच होते, आणि त्याचं मुख्य कारण म्हणजे सामान्यांच्या जीवनाचं आणि त्यांच्या अवस्थांचं चित्रण नेमक्या पण प्रभावी शब्दात, अंतःकरणाचा ठाव घेणाऱ्या मुलायम भाषेत ते लीलया करू शकत असत, हे होतं. मनाचा उदारपणा, मार्मिकता, दिलदारपणा आणि उदारमनस्कता त्यांच्यापाशी भरपूर होता, आणि या उदार– दिलदारपणाला जोड होती वस्तुनिष्ठ अभ्यासाची, प्रभावी पण मधाळ वक्तृत्वाची आणि त्यांच्या माणुसकीला सुंदर झालर होती जिव्हाळ्याची. परिणामी अतिशय कमी कालावधीत जातीची, पंथाची बंधनं मोडून यशवंतरावांनी मराठी माणसाच्या मनात आपले घर निर्माण केले. पहिलवानी उमदेपणा व कविमनाचा मोकळेपणा, आदर्शवाद आणि व्यवहार यांचा बेमालूम आणि मनोज्ञ संगम असलेला त्यांचा स्वभाव अभिजात रसिकता, मनाची सुसंस्कृतता आणि सततचा व्यासंग यामुळे— अधिकच प्रभावी झाला.

महाराष्ट्राने यशवंतरावांवर काही अपवादात्मक प्रसंग सोडले तर अपरंपार प्रेमच केले. कारण त्यांच्यासारखे रसिले आणि राजकारणात यशस्वी ठरलेले अष्टपैलू नेतृत्व मराठी माणसाला प्रथमच पाहायला मिळत होते. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाची बव्हंशी जडणघडण राजकारणाने केली हे तर खरेच, पण त्यांनी जे राजकारण केले त्यामागे केवळ पक्षीय राजकारण नव्हते, हे आज निर्लेप मनाने विचार केल्यावर कोणालाही मान्य करावे लागेल. त्यांनी जसं केवळ पक्षीय राजकारण केलं नाही तसं राजकारण म्हणजे जीवनसर्वस्व असंही कधी मानलं

नाही. प्रबोधनावर तर त्यांचा गाढ विश्वास होता, आणि मूळ म्हणजे सामान्य मराठी माणसाच्या मनावर ते सदैव विसंबून होते. कारण या सामान्य माणसात ते वावरले होते. या माणसांजवळ असलेली स्वातंत्र्यप्रीती, देशनिष्ठा आणि दारिद्र्यातही आपल्या नेत्यावर श्रद्धा ठेवून त्यांच्या आदेशानुसार स्वतःची किंवा संपूर्ण संसाराची काळजी न करता सर्वस्वाने स्वतःला झोकून देण्याची वृत्ती त्यांनी जवळून पाहिली होती. शिवाजीमहाराजांवर जिवापाड प्रेम करणारे अनेक मावळे याच मातीने दिले ही वस्तुस्थिती ते विसरू शकत नव्हते. खेडं आणि खेड्यातील मन यशवंतरावांना जितकं कळलं तितकं ते इतर कुणालाही उमगलं नाही. केवळ राजकारण करणं, सत्ता मिळवणं हा त्यांचा जीवनादर्श नव्हता. शतकानुशतके दारिद्र्य भोगलेल्या शेतकरी–कामकरी जनतेलाही एक मन आहे, हे ते उमजू शकत होते, आणि केवळ शिक्षणाच्या अभावी उत्तम बुद्धी असलेलं खेडूत मन विकसित होऊ शकत नाही हे दुःख त्यांना सतत व्यथित करत होतं. शाहू महाराज, म. ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज यांनी शिक्षणाचं आवर्जून सांगितलेलं महत्त्व त्यांच्या डोळ्यासमोर तरळत असे. खेडोपाडी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध केल्या गेल्या तर बहुजनसमाजातून सुद्धा तोलामोलाची माणसं मिळू शकतात यावर त्यांचा विश्वास होता. या सगळ्यांच्या परिणामी शहरी संघटनेपेक्षाही खेड्यातील संघटना अधिक प्रभावी राहू शकते यावर त्यांनी आपल्या राजकारणाचं गणित बांधलं आणि अगदी स्वातंत्र्य चळवळीपासून खेड्यातील असंख्य माणसांची संघटना त्यांनी अगदी काळजीपूर्वक निर्माण केली. सर्वसामान्य माणसातील कर्तृत्व त्यांनी जागृत आणि संघटित केलं. माणसं जोडणं, माणसांचा संग्रह करणं, आणि प्रत्येकातील दुर्गुणांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यातील सद्गुणांचा उपयोग करून घेणं त्यांच्या व्यक्तित्वाचेच वैशिष्ट्य बनले. सत्ताकारणात विरोधी पक्षातील अनेक माणसे ते आपल्याकडे आकर्षित करून घेऊ शकले याचे प्रमुख कारण त्यांनी प्रयत्नपूर्वक खेड्यातील माणसांचा विश्वास संपादन केला होता हे आहे.

भारतीय संस्कृतीची खोलवर रुजलेली पाळेमुळे ही त्यांना ज्ञात होती. इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाने पाश्चात्त्य आणि पौर्वात्य विचारांची सांगड घालून जीवन समृद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. जिथे जिथे जे जे चांगले दिसेल ते ते टिपण्याचा त्यांचा प्रयत्न असे. म्हणूनच बहुजन समाजाचा नेता म्हणून जरी

त्यांना प्रतिष्ठा मिळालेली होती तरीही सर्व जाति-जमातींतील नेते त्यांच्यावर खरेखुरे प्रेम करत असत. प्रत्येकालाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी जिव्हाळा वाटत असे आणि असा हा जिव्हाळा वाटावा अशी वागणूक समाजातल्या सर्व स्तरांतील लोकांची जवळिक साधून त्यांनी टिकवली होती.

यशवंतरावांचा पिंड कलासक्त होता. साहित्य संस्कृती आणि अनेकविध कलांच्या आस्वादात ते रमत असत. आरंभी एम्. एन्. रॉय यांच्या विचारसरणीने भारावून गेलेले त्यांचे मन केवळ तार्किकपणे शेवटपर्यंत रॉय यांचे अनुयायी म्हणून त्या मर्यादेतच गुंतून पडले नाही. तसेच बहुजन समाजाच्या भलेपणाचे कंकण बांधलेल्या सत्यशोधक चळवळीतही त्यांचे मन अडकून पडले नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारख्या ज्ञानमहर्षीच्या सहवासात जसे त्यांचे विचार विकसित झाले तसे नाना पाटलांच्या क्रांतिकारी चळवळीचे महत्त्वही आत्मसात करणे त्यांना महत्त्वाचे वाटले. लो. टिळक, गोपाळ गणेश आगरकर, मा. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पगडा जसा त्यांच्या मनावर होता, अगदी तसाच मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा पगडाही त्यांच्यावर होता. म. गांधींच्या विचारांची आणि नेतृत्वाची यशस्विता त्यांना जशी भारावून टाकणारी होती, तद्वतच पं. नेहरूंच्या अजोड व्यक्तिमत्त्वाची त्यांच्या मनावर विलक्षण मोहिनी होती, आणि म्हणूनच नेहरू हा आधुनिक भारताचा युगपुरुष आहे, यावर त्यांचा गाढ विश्वास होता. जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी, नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण यांची समाजवादी विचारसरणी त्यांना मनापासून पटत होती, आणि हे सगळं समजून घेण्यासाठी सतत अभ्यास करण्याची आवश्यकता त्यांनी आयुष्यभर महत्त्वाची मानली होती. त्यामुळे एकाच वेळी समतोल विचारवंत आणि व्यवहारी प्रज्ञावंत, सुसंस्कृत राजनीतिज्ञ आणि वैचारिक वसा जपणारा रसिला राजकारणी हे त्यांच्या व्यक्तित्वाचे अपरिहार्य पैलू बनले होते. त्यामुळं महाराष्ट्राच्या इतिहासात एवढा रसिकाग्रणी आणि चतुरस्त्र मुत्सद्दी व कर्तबगार राजकारणी दुसरा झाला नाही, याचे कारण भारताच्या राजकारणातील अनेक श्रेष्ठ व ज्येष्ठ व्यक्तींच्या जीवनाचा त्यांच्याइतका सखोल विचार अन्य-कोणी केलेला नव्हता हे आहे.

तसा विविध विषयांचा व्यासंग करणे ही यशवंतरावांची उपजत आवड होती. साहित्यासह इतर सर्व कलांचा आस्वाद त्यांना राजकारणापेक्षाही महत्त्वाचा

वाटत असे. भारताच्या राजकारणात हा विशेष प्रामुख्याने पं. जवाहरलाल नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वात पहिल्यांदा आढळतो. पंडित नेहरूंच्या इतकीच रसिकता यशवंतरावांच्या जवळ होती. स्वातंत्र्योत्तरकाळातील राजकारणात प्रभावी ठरलेल्या व्यक्तीत हे गुण मोडीत निघालेले दिसतात. स्वातंत्र्यपूर्वकाळात मात्र राजकारणातील बलदंड नेते साहित्य, संस्कृती आणि कला यांच्याशी निकटचे जिव्हाळ्याचे नाते असलेले दिसतात. यशवंतराव चव्हाण असे वैशिष्ट्य असलेले शेवटचे राजकारणी.

साहित्यावरचे त्यांचे प्रेम ही एक नितांत सुंदर वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे. राजकारणात ते जर नसते तर एक प्रतिभासंपन्न लेखक म्हणून त्यांना निश्चितच प्रतिष्ठा मिळाली असती. हे विलोभनीय वैशिष्ट्य सत्तेच्या राजकारणात केवळ यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातच होते. यशवंतरावांचं पडलेलं भाषण जसं कुणी ऐकलं नाही तसा त्यांचा फसलेला लेखही कधी कुणी वाचलेला नाही. यशवंतराव स्वत: एक शैलीदार वक्ते व लेखक तर होतेच. पण मराठीतील व इंग्रजीतील उत्तमोत्तम लेखकांचे लेखन त्यांनी जितक्या आवडीने वाचले तितक्याच आवडीने मराठीतील सर्व वाङ्मयप्रवाहही त्यांनी अभ्यासले. काव्य, कथा, कादंबरी, नाटके, ललितलेखन ते वेळात वेळ काढून अपूर्वाईने वाचत असत. त्यांनी दिलेली दादही संबंधित लेखकाला मानाची वाटत असे. फडके-खांडेकरांच्या कादंबऱ्या, कुसुमाग्रज-बोरकर-अनिल-महानोरांची कविता ही त्यांना मनोमन आवडत असे. दुर्गा भागवत, इरावती कर्वे यांचे ललितलेखन जितके त्यांना मोहवीत असे तितकेच गडकरी, अत्रे, पु. ल. देशपांडे यांचे विनोदी लेखनही त्यांना हवेहवेसे वाटत असे. ग्रामीण व दलित वाङ्मयाचे त्यांचे वाचन जसे अद्ययावत होते तसे नाट्य, संगीत, चित्र या कलांतील त्यांची रसिकताही अतिशय निकोप होती. वाङ्मयाच्या सर्व प्रकारांतील लेखनाशी जवळिक साधणे हा तर त्यांच्या सत्तेच्या राजकारणातील विरंगुळा होता, आणि समृद्ध जीवनाची उभारणी कलांच्या अभ्यासातून, आस्वादातूनच होते यावर त्यांची जाज्वल्य निष्ठा होती. प्रत्येक वैचारिक चळवळ स्वागतार्ह आहे, असे मानून तिच्यातील चांगलेपण टिपणे आणि ते वृद्धिंगत करण्यासाठी साहाय्यभूत होणे त्यांना फारफार मोलाचे वाटे. लेखक साहित्यिक आणि कलावंतांनीही त्यांच्यावर प्रेम करण्यात व त्यांच्याशी जवळिक साधण्यात धन्यता वाटत असे.

यशवंतरावांचे वक्तृत्व ही एक अपूर्व किमया होती. उपमा–दृष्टान्त देण्यात व म्हणी–वाक्प्रचार वापरण्यात तर त्यांचा हातखंडा होता. कुठलाही विषय पटवून देताना त्यांचे हे वैशिष्ट्य तीव्रतेने लक्षात येत असे. शारदेचे तर त्यांना वरदानच लाभलेले होते आणि अगदी साध्या समारंभातसुद्धा उपचार म्हणून त्यांनी केलेले भाषणही कुठलातरी विचार समृद्ध करतच श्रोत्यांच्या अंतः-करणाचा ठाव घेत असे. सभा शेतकऱ्यांची असो की साहित्यिकांची असो की वैदिक पंडितांची असो की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची, आपल्या आटोप-शीर भाषणात श्रोत्यांनी मनःपूर्वक दाद द्यावी असा विचार ते मांडत असत आणि एखादी वीज चमकावी तसा विचार श्रोत्यांच्या मनात चमकून जात असे. या दृष्टीने १९५२ साली पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत ' हिंदी लोकशाहीचे भवितव्य ' या विषयावर भाषण करताना त्यांनी मांडलेला विचार पाहण्यासारखा आहे. ते म्हणाले, " गरीब मनात नव्या आकांक्षा निर्माण करून त्यांना कार्य-प्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजी त्यांच्यात असंतोषच पसरवण्याचा प्रयत्न झाला तर रात्री त्याचे लक्ष त्या श्रीमंतांच्या तिजोरीकडे जाईल इतकेच. पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा हा पुंजीपतींच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून तो आकाशातील ढगात आहे. त्या ढगातून खाली कोसळणाऱ्या जलधारांत आहे. त्या पाण्याच्या प्रवाहरूपी नदीत आहे. नदीच्या दुकाठास मिळणाऱ्या काळ्या जमिनीत आहे. त्याच जमिनीतील खनिज संपत्तीत आहे. त्याच खनिज-संपत्तीद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामग्रीत आहे. इतकेच नव्हे तर त्या सर्वांना एका सूत्रात बांधणाऱ्या मानवाच्या मनगटात आहे. असे जर त्या गरीब जनतेला पटवून देऊन, त्यांच्यात सर्जनशक्ती निर्माण करून त्यांना कार्यप्रवण केले तर आपले सारे प्रश्न सुटतील व त्या सुटण्यातच भारतीय लोकशाहीचे भवितव्य सामावलेले आहे. " – हा विचार किती नवीन आणि भव्य आहे. यशवंतरावांच्या चिंतनातून तो निर्माण झालेला आहे. त्यावरून त्यांच्या सर्जनशील प्रतिभेचा जसा प्रत्यय येतो, तसाच विधायक कार्यकर्तृत्वाचाही येतो. मानवाच्या मनगटातील सामर्थ्यावर श्रद्धा निर्माण करणारा हा नवीन विचार ऐकून श्रोत्यांचे अंतःकरण फुलून न गेले तरच आश्चर्य.

भाषावार प्रांतरचनेची आवश्यकता असो, खेड्यांच्या विकासाचा प्रश्न असो किंवा परकीयांच्या आक्रमणापासून देशाच्या संरक्षणाचे महत्त्व विशद

करण्याचा प्रश्न असो अगदी काही क्षणांतच यशवंतराव सहज बोलता बोलता श्रोत्यांचे मन जिंकून घेत असत, आणि ऐकतच राहावे असे वाटत असताना आपले व्याख्यान संपवीत असत. यासाठी पुरावा म्हणून शेकडो उदाहरणे देता येतील. ती सारी उदाहरणे नमूद करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु समंजसपणे, संयपणे, दमदारपणे, कुठलीही आक्रस्ताळी भूमिका न घेता, कमीत कमी वेळात जास्तीत जास्त उद्बोधक विचार देऊ शकणारा आणि मुलायम शब्दात सोप्या नि सुटसुटीत भाषेत तो विचार श्रोत्यांच्या गळी उतरवणारा, बुद्धिमंतापासून आपल्या खेड्याबाहेरचे जग न पाहिलेल्या दरिद्री, अशिक्षित, अडाणी माणसांपर्यंत सगळ्यांचीच मने जिंकून घेणारा दुसरा पुढारी झालाच नाही, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

जनमानसावर प्रभुत्व गाजवणाऱ्या लेखणी आणि वाणी या दोन महान शक्ती यशवंतरावांनी आत्मसात केल्या होत्या. नेता आणि शासनकर्ता अशी जोड भूमिका यशवंतरावांना एकाच वेळी करायची असल्याने त्यांच्या वाणीचा विकास नित्य होत राहिला. त्या मानाने त्यांचं लेखन तुरळक घडत असे. परंतु जेव्हा जेव्हा ते लेखणी उचलत तेव्हा तेव्हा अशा काही उत्कृष्ट दर्जाचं साहित्य त्यांची लेखणी निर्माण करून जाई की वाचकांनी थक्क होऊन जावं. १९६४ साली ' सह्याद्रि ' दिवाळी अंकात त्यांनी ' शांति-चितेचे भस्म ' या मथळ्याचा जो लेख लिहिला आहे, तो केवळ अविस्मरणीय म्हणावा लागेल. ' कृष्णाकाठ ' या आत्मचरित्रातील प्रांजळ निवेदन आणि प्रत्येक आठवण नोंदवण्यामागील अपरिहार्य प्रयोजन त्यांनी ज्या पद्धतीनं सांगितलेले आहे, त्यावरून त्यांची लेखणीही त्यांच्या वक्तृत्वाला साजेशीच होती, हे लक्षात येईल. डौलदार शैलीत ज्यांना बोलता येते त्यांना तसे लिहिता येतेच असे नाही. पण बोलणे आणि लिहिणे या दोन्ही कलांत सारखीच वाकबगारी मिळवलेला व त्यास एक वैचारिक अधिष्ठान देणारा वक्ता केवळ यशवंतरावांच्यामध्येच आढळत असे.

यशवंतरावांच्या स्वभावात चिडचिड किंवा आक्रस्ताळेपणा कधीच नव्हता. मनमोकळे हास्य हा त्यांच्या निर्मळ स्वभावाचा एक देखणा पैलू होता. राजकारणातील अनेक वादळांना पचवून टाकून हसत हसत समस्या सोपी करणे आणि तोल न जाऊ देता अंगावर पडलेली जबाबदारी संयमाने, कौशल्याने पेलण्यासाठी सदा सज्ज राहणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं दुर्मिळ वैशिष्ट्य म्हणून

नमूद करावं लागेल. महाराष्ट्राचं नेतृत्व सोडून देशाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी जेव्हा त्यांनी स्वीकारली तेव्हा त्या कसोटीच्या क्षणी सुद्धा यशवंतराव सर्वार्थानं यशस्वी झाले. कारण यशासाठी पुरुषार्थाची प्रेरणा निर्माण करणं हे त्यांनाच जमणं शक्य होतं. एक रसिले, उमदे आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून नेहरूंच्यानंतर त्यांचाच उल्लेख केला जात असे. आयुष्याच्या उत्तरार्धात राजकारणाचे डावपेच चुकले असतील, सत्तास्पर्धेतील तडजोडी करण्यात काही हुकले असेल किंवा अशा अष्टपैलू समृद्ध नेतृत्वाचा स्वीकार हा सत्तेतील सूत्रधारांना एक अडचणीचाही भाग वाटला असेल, पण महाराष्ट्राने ज्याच्यावर नितान्त प्रेम केले व मराठी माणसावरही ज्याने निरतिशय प्रेम केले आणि सत्तेच्या राजकारणात राहूनही देशभरात ज्यांनी ' जवळिकीची सरोवरे ' निर्माण केली, अशा यशवंतराव चव्हाणांची याद आधुनिक महाराष्ट्राचा व भारताचा इतिहास लिहिणाऱ्या प्रत्येकाला आवर्जून ठेवावीच लागेल. हे ' सह्याद्रीचे वारे ' ' युगांतर ' घडवीत, ' ऋणानुबंध ' जोडीत, ' कृष्णाकाठ ' उजळीत ' सागरतीरा 'वरून ' यमुनाकाठ 'च्या दिशेने झेपावत असतानाच अकस्मात चंद्राला खळे पडले.

ଌ

# १६

# यशवंतराव चव्हाण : महाराष्ट्राचा अलौकिक ठेवा

प्रा. कृ. दि. बोराळकर

कोणत्याही प्रदेशाचे वेगळेपण हे तेथील कर्तबगार व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वावर अवलंबून असते. त्यांचे अस्तित्व किंवा आठवणसुद्धा त्या प्रदेशातील लोकांचा अमोल ठेवा असतो, अभिमानाचा वारसा असतो. यशवंतराव चव्हाणांच्या रूपात महाराष्ट्राने भारताला फार मोठी देणगी दिली. त्यांच्या निधनाने कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली हे वाक्य कधी नसेल इतके खरे झाले. शाहू-महाराज, ज्योतिराव फुले, लो. टिळक, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या कर्मनिष्ठांच्या परंपरेत यशवंतराव वाढले. स्वतःला जाणीवपूर्वक त्यांनी जोपासले. आघाडीवरील युद्धनायक जसा सर्वच आघाड्यांवर लढून यश संपादन करतो तसेच यश अत्यंत अवघड असूनही एकाच वेळी अनेक आघाड्यांवर यशस्वीपणे लढणारे ते एक लोकोत्तर यशवंत नेते होते. शिवाजी महाराज आणि लो. टिळक यांचे अपवाद सोडता एवढा सर्वस्पर्शी, लोकजीवन व्यापून टाकणारा नेता महाराष्ट्राने पाहिला नाही हे निर्विवाद आहे. कृष्णेच्या कुशीत आणि कऱ्हाडच्या मातीत यशवंतराव लहानाचे मोठे झाले. अवघ्या महाराष्ट्राचे भूषण बनले. सातारा तसा वैचारिक परंपरेसाठी फारसा प्रसिद्ध नव्हता. वैचारिक चिंतनाची बैठक इथे कधी प्रखरतेने जाणवली नाही, तरीपण यशवंतरावांनी वैचारिक परिवर्तनाचे

एक नवे पर्व सुसंस्कृत राजकारणाचा आधार घेत घेत प्रस्थापित केले. त्यांच्या यशस्वी जीवनाचे श्रेय त्यांच्या वक्तृत्वशैलीत होते. शब्दांची अचूक फेक करणारे ते एक उत्तम संसदपटू होते. जनमानसावर प्रभुत्व प्राप्त करून देणाऱ्या वाणी व लेखणी या दोन अमोघ शक्ती आहेत, ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती, म्हणून तर बोलण्यात जेवढा खंबीरपणा तेवढाच जिव्हाळा आणि प्रेमळपणा ते ठेवीत. जनतेशी संवाद साधण्याची एक अलौकिक कला त्यांनी साध्य केली होती. टिपणे न घेता मुद्देसूद बोलणे, मोठा आशय वेचक शब्दात सांगणे, सूक्ष्म दृष्टीचा मूलभूत मुद्दा मांडून लोकांना विचार करावयास लावणे, वक्तृत्वात पांडित्य न आणता सहजता टिकविणे, बोलताना आत्मीयतेने इतरांशी केलेली हितगूज वाटावी असे बोलणे ही त्यांची स्वतःची वैशिष्ट्ये होती. ते जेथे जातील तेथे लोकांना व कार्यकर्त्यांना जिंकीत. त्यांची व्याख्याने भावनात्मक आवाहनाने भरलेली असत. शब्दांची बारेमाप उधळपट्टी त्यांना मान्यच नव्हती. जिभेवर संयम ठेवून काळजीपूर्वक बोलणारे ते उत्तम संसदपटू होते. ज्याचा आपण उच्चार करतो ते प्रत्यक्षात आले पाहिजे यावर यशवंतराव चव्हाणांचा कटाक्ष असे. यासाठी थोडे व आवश्यक एवढेच ते बोलत. त्यांच्या भाषणात पुनरुक्ती असे. विचार नेहमीच स्वतंत्र, नवे व विचारांना चालना देणारे असत. कित्येकदा तर प्रत्येक वाक्य जणू काही एक सूत्रच वाटे. हजारो लोकांची विराट सभा असो की निवडक शेदोनशे लोकांची बैठक असो भावनांना आवाहन करून ती जिंकण्याचं हमखास कौशल्य त्यांच्यात होतं. त्यांचा पडलेला लेख व फसलेले भाषण ऐकिवातच नाही, म्हणूनच महाराष्ट्राच्या नामांकित वक्त्यांत त्यांची गणना केली जाते. आत्मीयतेने प्रत्येकाशी केलेले हितगूज, आपल्या माणसाशी केलेला विचारविनिमय असे त्यांचे वक्तृत्व लोकांना कायमचे आपलेसे करीत असे.

लोकशाहीतील नेत्याची भूमिका ही शिक्षकासारखी असावी लागते. तशी ती त्यांनी ठेवली होती. जात कितीही वाईट असली तरी जातीच्या विचाराशिवाय भारतीय राजकारणाचा विचार होऊच शकत नाही ही येथील राजकारणाची शोकांतिका त्यांनी चांगल्या प्रकारे ओळखली होती, म्हणून १९६० साली सांगली येथे भाषण करताना ते म्हणाले होते की, जातीय वादाच्या विषारी विचारांपासून आपण महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे. सामाजिक मन एकसंध

करून भंगलेली मने जोडण्यासाठी जातीयवाद हद्दपार होणे जरुरी होते. म्हणून हे राज्य मराठ्यांचे की मराठीचे यावर भाष्य करताना त्यांनी ठासून हे सांगितले की हे राज्य मराठी जनतेचेच राज्य राहील. इथे गुणांचीच पूजा होईल. जातीची नव्हे. नवसमाज निर्मितीत समतेचे महत्त्व त्यांनी ओळखले होते म्हणून सामाजिक विषमतेचा वारसा नष्ट केला पाहिजे. ते म्हणत की आपला एकमेकांवर हक्क आहे, कारण आपण अनेक शतके एकत्र राहिलो आहोत. सामाजिक ऐक्यातूनच राष्ट्राचे ऐक्य निर्माण होते. ते म्हणत आमचा इतिहास हा आक्रमणाचा आणि पराभवाचा इतिहास आहे. पराक्रम व शौर्य असूनही आम्ही हरलो, कारण आम्ही भारतीय म्हणून लढलो नाहीत. जातीयवादाने नष्ट केलेली देशाची एकात्मता आजही देशासमोरील एक गंभीर प्रश्न आहे, असे यशवंतरावांना वाटे. त्यामुळे सर्व जातिजमातींना त्यांनी आपलेसे केले. त्यांनी जसा रामोशी, हरिजन व तत्सम पददलितांना सहाय्याचा हात दिला त्याचप्रमाणे वेदसंपन्न ब्राह्मणांचा सत्कारही केला. सर्व थरांतील माणसे वर आणण्यासाठी त्यांनी सहकारी क्षेत्र निवडले. यशवंतराव स्वतःच एवढे उदारमतवादी व सुसंस्कृत मनाचे होते की त्यांना धर्मभेदाचा, जातीयवादाचा आणि त्यांतून येणाऱ्या हेव्यादाव्यांचा कधीही स्पर्श झाला नाही. संकुचित ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादापासून ते शेकडो योजने दूर होते. तो वाद गाडून टाकण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. त्यांना जसा कर्मवीर भाऊराव पाटील व ज्योतिबा फुल्यांबद्दल आदरभाव होता तशीच लो. टिळक, ना. गोखले, आगरकर यांच्याबद्दलही मनात अपार श्रद्धा होती. खरोखर हे तर महाराष्ट्राचे भाग्यच की महाराष्ट्राच्या सुरुवातीच्या जडणघडणीत यशवंतरावजींसारखा सहिष्णू व उदारमतवादी नेता महाराष्ट्रास लाभला. त्यांच्या अभावी महाराष्ट्राचे जनजीवन जातीयवादाने उद्ध्वस्त झाले असते व महाराष्ट्राचा मद्रास किंवा बिहार झाला असता, हे १९४८ च्या जळीत प्रकरणाने दाखवून दिले. कारण गांधीवधोत्तर झालेल्या जाळपोळीत त्यांनी ब्राह्मण वस्त्यांचे निग्रहाने संरक्षण केले व त्या वेळच्या आर्थिक नीतीत हे बसत नसले तरी त्यांनी ब्राह्मणांची कर्जे माफ केली. पानशेत प्रकरणी स. गो. बर्वे यांना पुण्याच्या हद्दीत मुख्य-मंत्र्याचे अधिकार देऊन टाकले. खरेच लो. टिळकांनंतर लोकांनी फक्त यशवंतराव चव्हाणांवरच प्रेम केले. ते गेले व महाराष्ट्राचा सूर्यच मावळला. इतिहासाचे एक सोनेरी पान उलटले गेले.

राजकारणात सत्तेचा वापर अटळ असतो. सत्तावापर हेच राजकारणचे मुख्य सूत्र असते. सत्तेचा वापर इतका जाणीवपूर्वक, समजून आणि समतोल, सर्वांगीण दृष्टीने करणारा नेता यशवंतरावजी चव्हाणांइतका क्वचितच असेल. महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही शिवरायाची पुण्याई आहे या त्यांच्या ठाम श्रद्धेतच सत्तेची त्यांची कल्पना स्पष्ट होते. जनतेला काय वाटते हे महत्त्वाचे आहे ते जागून सत्तेचा वापर केला पाहिजे असे त्यांना वाटे. आर्थिक विकासातील नियोजनाचे महत्त्व हे, कोणत्याही शासनपद्धतीवर अवलंबून नसते. सत्ता अशी वापरावी की तिचा फायदा सर्वसामान्य लोकांना मिळाला पाहिजे. सांगलीच्या सभेत एकदा ते म्हणाले होते की, मी सेवेचा अधिकार घेऊन राजकारणात आलो आहे. म्हणून ते म्हणत की सत्तेचा वापर करीत असताना, प्रशासनाने किंवा धुरीणांनी सत्तेचा वापर आपण कशासाठी करीत आहोत याचा दररोज विचार केला पाहिजे. साधा पोलिसही गणवेश चढविला की सत्तेबद्दल एकदम जागरूक होतो. पण यशवंतरावजी एवढे मोठे सत्ताधारी असूनही अहंकाराचा साधा स्पर्शही त्यांना कधी झाला नाही. सत्ता त्यांच्याकडे नम्रपणेच वागली. ती उद्दाम कधीच झाली नाही. मुख्य म्हणजे नेहमीच सत्ता त्यांच्याकडे आपण होऊन चालत आली. दिल्लीला १९६२ मध्ये संरक्षणमंत्री म्हणून जाताना सत्तेचा वाद खेळण्यासाठी आपणाला बोलावले नसून देशाच्या कर्तव्यपूर्तीसाठी आपण जात आहोत ही खूणगाठ त्यांनी पक्की केली होती. तसेच ते पुढे वावरलेही. सत्ता हेच सर्वस्व त्यांनी कधीच मानले नाही. सत्ता व सामाजिक कार्य यांचा अनुक्रम ठरविताना सत्ता ही सामाजिक कार्यासाठीच वापरावी ही ठाम श्रद्धा त्यांनी मनात जपली होती. म्हणूनच एस. एम. जोशीसारखे सर्वमान्य नेते त्यांना लोकशाहीवादी प्रवृत्तीचा नेता हे सार्थ विशेषण लावतात. सत्तेचा वापर इतक्या सुसंस्कृतपणे क्वचितच कोणी केला असेल. सत्तेच्या राजकारणाच्या आडदांड जंगलात हे कठीणच असते. ,उलट सत्ता वापरताना गोंजारून, पटवून ते विरोधाचे धुके वितळवून टाकीत. दूरदृष्टीने धोरणे आखून समस्यांची उकल करीत. सहकार, जिल्हा परिषदा ही त्याचीं उदाहरणे होत. कौशल्याने प्रशासकीय निर्णय घेणे हा तर त्यांचा स्थायिभावच होता. त्वरित व स्वच्छ निर्णय घेण्याच्या त्यांच्या कुशलतेने त्यांना उत्कृष्ट प्रशासकाच्या पंक्तीत नेऊन बसविले. राज्यकारभार चालविताना एखादा मुद्दा इतरांना न पटला

तर मोठ्या खुबीने ते आपली नाराजी व्यक्त करीत. त्यामुळे अधिकाऱ्यांत त्यांच्याबद्दल आदराची भावना असे. त्या काळातील सनदी अधिकारी ब्रिटिश परंपरेत वाढलेले असल्याने अहंकारी अलिप्तता त्यांच्यात प्रकर्षाने जाणवे. त्यांचा दबदबाही असे. परंपरेला चिकटून राहण्याची त्यांची प्रवृत्ती चाकोरीबाहेर जाऊन निर्णय घेणे अशक्य बनवीत असे. इथे यशवंतरावजींनी प्रशासनात सामाजिक जाणीव सावधपणे निर्माण केली. प्रशासकांची स्थितिप्रियता दूर केली. त्यासाठीच अधिकाऱ्यांची निवडही ते कौशल्याने करीत. अधिकाऱ्यांची कल्पकता व कार्यक्षमता व्यापक समाजकार्यासाठी खर्च व्हावी असे त्यांना वाटे. त्यासाठी वेडरपणे त्यांनी गुणवत्तेला अग्रक्रम दिला. म्हणूनच स. गो. बर्वे, मधुसूदन कोल्हटकर, डी. डी. साठे, कृ. पां. मेढेकर यांसारखी प्रशासनात मुरलेली मातब्बर मंडळी यशवंतरावजींबद्दल सखोल आदर बाळगून असत. स्वच्छ माणसाने उभी केलेली ही स्वच्छ माणसे होती. त्यांचा कट्टर शत्रूसुद्धा त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करू शकणार नाही. राजकारणातील या दुर्गुणांचा दूरान्वयानेही तिथे स्पर्श नव्हता. नेत्याला स्वच्छ लखलखीत प्रसन्न राजकीय, प्रशासकीय जीवन जगता येते हा महाराष्ट्राच्या राजकारणातला सर्वोत्कृष्ट प्रयोग होता. राजकारणात एवढी निर्मळता, साधनसुचिता, एवढे सामंजस्य, मृदुता आजपर्यंत क्वचितच कोणी दाखविली असेल.

माणसे जोडण्याची अद्वितीय कुशलता हा यशवंतरावांचा स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण गुण होता. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे व पुढे येण्याची संधी देणे, सहकाऱ्यांना विश्वासात घेणे, त्यांच्यावर जबाबदारी टाकून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हे त्यांचे वैशिष्ट्य. तसेच विरोधी पक्षातही बुद्धिमान माणसे आहेत त्यांचाही उपयोग करून घेतला पाहिजे, त्यांच्याबद्दल मनात राग व सूडबुद्धी न ठेवता त्यांना समजून घेतले पाहिजे, ही त्यांची उदारमतवादी राजकारण करण्याची रीत होती. अशा शांत व समतोल विचारसरणीचा अत्यंत वादळी परिस्थितीतही त्यांना फायदा झाला. त्यामुळे विरोधकांतसुद्धा त्यांच्याबद्दल कमालीचा आदर असे. एखादा मुद्दा हसतमुखाने विरोधकास पटवून देणे, डोंगराएवढ्या आपत्तीला अपार धीराने तोंड देणे, चौफेर दृष्टी ठेवून विरोधकांशी शांत वृत्तीने वागणे हे त्यांच्या राजकारणाचे सुसंस्कृत स्वरूप होते. म्हणूनच संघटनाकुशल व गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणारा कर्तबगार मुख्यमंत्री म्हणून त्यांनी लौकिक प्राप्त केला.

एवढा लोकसंग्रह करणारा नेता अलीकडे तरी महाराष्ट्रात झाला नाही. स्वातंत्र्य-पूर्व काळात ब्रिटिशांना दहशत बसविणारे आणि स्वातंत्र्योत्तर काळात संपूर्ण भारताचे मन जिंकून घेणारे हे एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच जयप्रकाश नारायणांसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या नेत्यानेसुद्धा यशवंतराव चव्हाण भारताचे पंतप्रधान होऊ शकतील असा निर्वाळा दिला. तसे राजकारण गढूळ चिखलासारखे असते पण त्यातूनही आपले स्वच्छ, प्रसन्न व्यक्तिमत्त्व टिकविण्याची कला त्यांनी कशी प्रयत्नपूर्वक जोपासली हा कौतुकाचा विषय ठरेल. त्यामागे मोठा आत्मसंयम व निग्रहीपणा आहे. माणसांवर माया करण्याचा स्नेहार्द्र स्वभाव आहे. इतरांच्या गुणांचे चीज करण्याची उदात्त वृत्ती आहे. ब्रिटिश मुत्सद्दी डिझरेली म्हणतो की राजकारण फक्त उपयुक्ततेला स्थान व मान आहे, स्नेहाला नाही. त्यांनी राजकारणात या रूक्ष चाकोरीच्या व संकुचित स्वार्थाच्या परिघा-बाहेर नेले. खाजगी भेटीत दिलेला शब्दसुद्धा ते पाळीत. सहकारी व स्नेही यांच्याबद्दल इमान व स्नेह त्यांनी कधीही ढळू दिला नाही. विरोधकांचाही स्नेह संपादन करण्याचे अतुल कौशल्य त्यांनी सतत दाखविले. त्यामुळे ते इतके मितभाषी, संयमी, नेमके बोलणारे, सौजन्याने वागणारे झाले असावेत. शब्दाला जागणारा, संग्राहक वृत्तीचा राजकारणी नेता ही त्यांची प्रतिमा अनेकांनी जपलेली आहे. महाविदर्भासाठी उग्र आंदोलन करणारे वि. गो. देशमुख सुरुवातीला यशवंतरावजींचे कट्टर विरोधक पण यशवंतरावांमुळेच ते काँग्रेसमध्ये आले. भाई माधवराव बागल यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत चव्हाणांवर विरोधाच्या तोफा डागल्या, पण बागल नंतर चव्हाणांचे खरेखुरे स्नेही बनले. चव्हाणांचे ते मुक्त-कंठाने कौतुक करू लागले. याचा अर्थ ऋणानुबंध टिकविणे, वाढविणे-हा त्यांचा सहज स्वभाव होता. राजकारणाला त्यामुळे स्नेहल स्वरूप आले. चांगला माणूस मोठा असतो पण मोठा माणूस हा चांगला असतोच असे नाही. यशवंतराव मोठे होते. चांगले होते. त्यामुळेच प्रतिस्पर्धी त्यांच्याकडे विश्वासाने पाहू शकत आणि विरोधक त्यांच्याबद्दल आदराने बोलत. राज्यपाल लतीफ म्हणत की यशवंतराव चव्हाण प्रशासनातील निर्णय नेहमी तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच घेत. प्रखर टीकेला दिपून, घाईने किंवा स्वस्त लोकप्रियता वाढविणारे निर्णय त्यांनी कधीच घेतले नाहीत आणि पोकळ आश्वासने देऊन ते मोकळे झाले नाहीत. त्वरित निर्णय घेण्याची कुवत, ते अमलात आणण्याची धडाडी व

कौशल्य, कामाचा उरक, योजकता व कल्पकता ही त्यांच्या दूरदर्शी राजकारणाची, कारभाराची खूणच होती. योग्य तेच प्रेमाने सांगण्याची हतोटी यामुळे शासक या नात्याने ते लोकप्रिय झाले. 'असे म्हटले जाते की जोपर्यंत राजकारणाची सूत्रे त्यांच्याकडे होती तोपर्यंत राजकारणात सौंदर्य होते, साहित्य होते, संस्कृती होती, शान होती, शहाणपण होते, पुरोगामित्व होते. पण राजकारणच त्यांनी सर्वस्व मानले नाही. त्यांनी राजकारण जन्मभर केले पण राजकारणातील उर्मटपणाचा आडदांडपणाचा त्यांना कधीही स्पर्श झाला नाही. हा प्रत्येकाचा विचार आहे, कारण आपल्या भूमिकेत त्यांनी कधीही शिवराळपणा आणला नाही. ते गेले व रुजुता, सौजन्यशीलता, सुसंस्कारितता यांनी फुललेला, डवरलेला हा महाकाय वृक्ष कोसळला व राजकारणाचे सारे पठार रखरखीत व भकास झाले.

अपार देशभक्तीचे गडद संस्कार व देशकार्याचे सतीचे वाण त्यांनी लहानपणापासूनच घेतलेले होते त्यामुळे यशवंतराव चव्हाणांनी सत्ताकारण हेच सर्वस्व असे कधीच मानले नाही. लहानपणी टिळक हायस्कूलच्या आवारात कुठलीही तमा न बाळगता तिरंगा झेंडा लिंबाच्या झाडावर लावणारे यशवंतराव, येरवडा येथे अठरा महिने आचार्य भागवतांबरोबर तुरुंगात कठोर शिक्षा भोगणारे यशवंतराव, १९४६ साली नाना पाटलांबरोबर सहकार्य करून पत्री सरकारचे नेतृत्व करणारे यशवंतराव, सत्यशोधक मंडळी स्वातंत्र्याच्या कुर्बानीबद्दल का बोलत नाहीत असा खडा सवाल टाकणारे यशवंतराव, जतींद्रनाथ व भगतसिंग यांच्या अन्नसत्याग्रहाने तळमळून छातीभर पाण्यातून गावात वृत्तपत्र वाचण्यासाठी धावणारे यशवंतराव व त्यांच्या मृत्यूमुळे आपलेच कोणी आप्त गेले आहे या जाणिवेने व्याकुळ होऊन गावी अंधारात रडत स्फुंदत जाणारे यशवंतराव पुढील राजकारण ध्येयवादीच करणार यात शंकाच नव्हती. त्यांची समाजवादावरची श्रद्धा, सामान्य माणसावरचा विश्वास व सत्तेची कल्पना यांत पावित्र्य व प्रतिष्ठा यामुळेच जाणवते. यशवंतराव केवळ व्यक्ती न राहता सामान्य जनांची शक्ती बनले ते यामुळेच. तावून सुलाखून निघण्याच्या या प्रक्रियेतूनच त्यांना वैचारिक बळ प्राप्त झाले. त्यासाठी लोकमताच्या विरोधी जाण्याचेही धाडस त्यांनी दाखविले. लोकमताच्या विरोधी जाण्यासाठी विचाराचे बळ पक्के असावे लागते आणि त्यावर अविचल व ठाम राहावे लागते. अर्थात लोकमताचे स्वरूप त्यांनी कधीच दृष्टीआड केले नाही, त्याला कमी लेखले नाही किंवा त्याला अवाजवी

महत्त्वही दिले नाही. खरे तर लोकांच्या मनाचा अंदाज घेण्याचे अजोड कौशल्य त्यांच्याकडे होते. स्वत:विरुद्ध त्यांनी बहुमताचा आदर केला याची पुष्कळ उदाहरणे देता येतील. १९७४ - ७५ साली शंकरराव चव्हाण यांना मुख्य मंत्रिपदाबाबतीत त्यांनी संमती दिली. आपल्या विरुद्धही मत मांडावे असा विश्वास त्यांनी इतरांना दिला व लोकशाहीतील आदर्श नेत्याची स्वप्रतिमा कष्टाने उभारली. वास्तविक लोकांच्या गराड्यात व सहवासात, नियमितपणा विस्कळीत झाला होता. लोक झोपू देतील तेव्हाच झोपावे. त्यांच्यातून वेळ मिळेल तेव्हाच जेवण करावे. पण भेटीसाठी, मुलाखती, चर्चा, सभा, संमेलने, दौरे, संघटनेच्या बैठकी, शिष्टमंडळाच्या भेटी, फायलींचे ढीग यांना ते कधी कंटाळले नाहीत. महाराष्ट्रातील सर्व स्तरांतील लोकांना यशवंतराव आधारस्थान वाटे. लोकांत मिसळताना स्वत:भोवती कोणत्याही भिंती त्यांनी उभ्या केल्या नाहीत. त्यामुळे ते सर्व थरांत आपलेसे झाले. लोकमतापुढे नमणारे यशवंतराव लोकशाहीचे मूर्तिमंत प्रतीक होते. सांगली येथे भाषण करताना एकदा ते म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मी सोडविलेला नाही. महाराष्ट्रातील चार कोटी लोकांचे ते श्रेय आहे. मी म्हणजे जनतेच्या दुधावरची साय आहे, दूधच नसेल तर साय कुठून येणार ?" एक खरे की संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीचे श्रेय सामान्य जनतेच्या उग्र चळवळीला, शौर्याला व त्यागाला दिले पाहिजे. आता लोकांची इच्छा हाच खरा लोकशाहीचा आधार हे बोलायला ठीक आहे, पण त्या वेळी सामान्य जनता व दिल्लीतले सत्ताधारी यांत फार मोठी दरी निर्माण झाली होती. लोकांच्या अपेक्षेचे भान त्यांना नसल्यामुळे बेजबाबदार लोकांची चळवळ असा शिक्का त्यांनी मारला. पण यशवंतरावांच्या कुशल मुत्सद्देगिरीची जोड मिळाली व संयुक्त महाराष्ट्र तीव्र गतीने अस्तित्वात आला हेही खरेच. द्वैभाषिक राज्याचा मुख्यमंत्री होणे ही यशवंतरावांची कृती जनतेला पसंत नव्हती, पण द्वैभाषिक राबवता येणे किती अशक्य आहे हे मुख्यमंत्री होऊन त्यांनी पं. नेहरूंना दाखविले व नेहरूंची गैरसमजाची भिंत ढासळली. हा यशवंतरावांच्या चतुर मुत्सद्दीपणाचा, दूरदृष्टीचा, धीम्या धोरणाचा व आत्मविश्वासाचा प्रभाव होता, हे प्रा. ना. सी. फडके यांचे मत योग्यच आहे. लोकमताला आवश्यक तेव्हा फटकारून लोकांच्याच हिताचे निर्णय घेण्याचे कौशल्य यशवंतरावांनी दाखविले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांना खूप त्रास,

मनस्ताप झाला पण त्यांतून धीरोदात्तपणे, शांतपणे, विरोधकांचा राग शमवीत, लोकांना आपलेसे करीत समंजसपणाने पण सन्मानाने त्यांनी मार्ग काढला. सांगली येथे केलेल्या भाषणात ते म्हणाले होते की नेहरू हे महाराष्ट्रापेक्षा मोठे आहेत. या वाक्याने टीकेच्या आगीचे मोहोळ उठले. वास्तविक त्याचा अर्थ भारत-जगला तरच महाराष्ट्र जगेल (कारण नेहरू भारताचे प्रतिनिधी होते.) असा होता. महाराष्ट्रात जे जे उंच असेल ते ते भारताच्या उत्थापनासाठी यावे हा त्याचा अर्थ होता. पण त्यांचा कलात्मक जीवनपट सर्वांना उमगला असे नाही. यशवंतराव स्वगृही परतले त्यावरही खूप टीका झाली. पण लोकमताला सोडून, लोकांना त्यागून राहण्याची सवय नसलेले यशवंतराव पुन्हा लोकांत, प्रवाहात म्हणजे स्वगृही परत आले असा त्याचा अर्थ होता, पण इमर्सन म्हणतो त्याप्रमाणे मोठ्या माणसांबद्दल नेहमीच गैरसमज होतात. खरे तर निष्क्रिय माणसाला शत्रू नसतात. जो कर्तबगार असतो त्यालाच शत्रू निर्माण होतात. स्वतःचा मोठेपणा वाढविण्यासाठी ते नाटकीपणापासून, दंभ-ढोंगापासून, शेकडो योजने दूर राहिले. राजकारण, समाजकारण, सहकार, शेती, उद्योग यांत त्यांनी माणसे अक्षरशः उभी केली. काळ्या मातीतून सोन्यासारखी माणसे उभी करण्याची किमया त्यांनी घडविली. त्यामुळेच ते गेले तेव्हा लोकसिंहासन रिकामे झाले अशी लोकांची भावना बनली. मनाने मोठे, विचाराने समृद्ध, आचाराने निष्कलंक असे यशवंतराव महाराष्ट्राची शान होती. अस्मिता होती. शिवाजी महाराजांबरोबर माझी तुलना करू नका असे सुचवितांना यशवंतराव म्हणाले की शिवाजी व टिळक एकदाच होऊन गेले. ते पुन्हा होणे नाही. पण तीच तेजस्विता, तीच अस्मिता महाराष्ट्रात यशवंतरावांनी जोपासली त्यामुळे शिवाजीराजांबरोबर त्यांची तुलना करण्याचा लोकांचा अधिकार यशवंतराव हिरावून घेऊ शकले नाहीत.

जीवनात राजकारण हेच सर्वस्व त्यांनी कधी मानले नाही. राजकारणाच्या धकाधकीला साहित्याची सोनेरी किनार त्यांनी लावली. त्यांची संभावना एका जर्मन पत्रकाराने आधुनिक बुद्धिनिष्ठ युगाचे नेते अशी केली. त्यांचा मानवतावाद याच स्रोतातून अवतरला. हिमालयातील गंगा जेव्हा भागीरथी होऊन येते तेव्हाच ती लोकोपयोगी बनते, तसेच ज्ञानाची गंगा समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचली म्हणजे ती सर्वांना कल्याणकारक होईल असे त्यांना वाटे. ते

लेखक, कवी, विद्वानांचे चाहते होते. कारमध्ये, विमानात, प्रवासात ते पुस्तके वाचून काढीत. वाचायला वेळ मिळत नाही अशी तक्रार करून एकदा ते म्हणाले होते की, पाचसहा वर्षांत माझ्या ह्या बुद्धीवर गंज चढेल की काय अशी भीती वाटते. साहित्यिक मन असलेल्या ऐन संवेदनशील राजकारणी नेत्याचे हे विचार निश्चितच लोभस आहेत. ' शांतिचितेचे भस्म ' हा त्यांचा लेख त्यांच्या सहृदय साहित्य कवीचा उत्कृष्ट नमुना आहे. ग. दि. माडगूळकर म्हणत, " मधाचं पोळं जसं थबथबलेलं असतं तसा हा माणूस रसिकतेनं थबथबलेला आहे." म्हणून रणजित देसाई, ना. धों. महानोर, सरोजिनी बाबर, मधुकर भावे, भा. कृ. केळकर, भा. खं. मंगुडकर, बाळ कोल्हटकर यासारखे विविध क्षेत्रांत लेखणीचा संचार करणारी माणसे यशवंतरावांबद्दल आदरभावाने बोलतात. त्यांचे थोरपण मान्य करतात. असा हा रसिक सौजन्यशील साहित्यप्रेमी स्वतःही एक अव्वल दर्जाचा साहित्यिक होता हे ' कृष्णाकाठ 'ने दाखवून दिलेच आहे. म्हणून नेतृत्वाला जनसामान्याचा आधार देणारे, कणखरपणाला विवेक व व्यवहार यांची जोड देणारे, बाँबे हॉस्पिटसमध्ये स. का. पाटीलसारख्या राजकीय विरोधकास विकलांग पाहून हुंदका देणारे, नोकरांचीसुद्धा आस्थेवाईकपणे विचारपूस करणारे, राजकीय शत्रशी सुद्धा स्नेह व जवळीक बाळगणारे, निर्भय पत्रकारांना अभयदान देणारे, सर्वच बाबतीत विशाल दृष्टिकोण ठेवणारे यशवंतराव लोकोत्तर लोकाग्रणी होते म्हणूनच महाराष्ट्राचे, देशाचे भूषण होते.

आणि हे त्यांचे दर्शनही तसे अपुरेच घडले आहे. यशवंतराव चव्हाण या प्रचंड हिमनगाच्या मोठेपणाचा वरवरचा एक अष्टमांश भाग या लेखातून कदाचित दिसू शकला असेल. त्यांच्या थोरवीचा सात अष्टमांश भाग गतेतिहासाच्या पाण्याखाली आहेच.

8

# यशवंतराव : एक माणूसवेडा माणूस

प्रा. भूषणकुमार जोरगुलवार, (शहापूरकर)

यशवंतराव चव्हाणांच्या बाबतीत विचार करताना रोमा रोलाँ यांच्या प्रसिद्ध विधानाची आठवण होते की, " महापुरुष हे उंच पर्वतशिखराप्रमाणे असतात. वारे त्यांच्यावर प्रहार करतात, मेघ त्यांना झाकोळतात, परंतु तेथेच अधिक मोकळेपणाने व जोरदार रीतीने आपण श्वासोच्छ्वास करतो. " रानडे, गोखले, नौरोजी व टिळक यांच्यानंतर अखिल भारतीय राजकीय नेत्यांमध्ये ज्यांचा समावेश करता येईल असा महाराष्ट्रीय नेता एकटाच झाला आणि तो म्हणजे यशवंतराव बळवंतराव चव्हाण. विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकाच्या उत्तरार्धात यशवंतरावांचे जीवननाट्य एका राष्ट्रीय उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. प्रादेशिक राज्याचा मुख्यमंत्री एकभाषिक प्रादेशिक राज्य शांततापूर्ण मुत्सद्देगिरीने निर्माण करण्यात यशस्वी होतो, महाराष्ट्राच्या इतिहासात एक युगप्रवर्तक कालखंड म्हणून इतिहासकाराला त्याची नोंद घ्यावी लागते.

वास्तविक पाहता संयुक्त महाराष्ट्राचा लढा १९४६ साली सुरू झाला आणि १९६० साली विजयी झाला. महाद्वैभाषिक मुंबई राज्याचे यशवंतराव मुख्यमंत्री झाले तेव्हाची परिस्थिती अशी होती की, यशवंतराव हे केंद्र सत्ताधाऱ्यांच्या कूट कारस्थानाला बळी पडले आणि संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे उद्दिष्ट संकटात सापडले असे वाटावे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हजारो

लोकांना अटक झाली, हजारो गोळीबार झाले, शेकडो लोकांना कैदेची शिक्षा झाली आणि एकशेपाच लोकांना हुतात्मा बनावे लागले. अशा अतिशय नाजूक, विद्रोहग्रस्त व स्फोटक परिस्थितीत जरी यशवंतराव हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले तरी सबंध महाराष्ट्र असंतुष्ट व अस्वस्थ होता. भाषिक प्रादेशिक राज्य निर्माण करण्याच्या विरुद्ध खुद्द पंतप्रधान नेहरू, व त्यांचे केंद्रीय मंत्रिमंडळ होते. महाराष्ट्रातील द्वैभाषिक राज्य प्रमाणिकपणे राबविण्याची प्रतिज्ञा करूनच यशवंतराव सत्तारूढ झाले आणि तीन वर्षे प्रामाणिकपणे ते राबवलेसुद्धा. अशा प्रतिकूल परिस्थितीत यशवंतरावांनी सर्वत्र सामंजस्याचे वातावरण निर्माण केले, विरोधी पक्षनेत्यांनासुद्धा मित्रभावनेने वागवले. पण शेवटी हे द्वैभाषिक राज्य चालविणे यापुढे काँग्रेस पक्षाच्या कुवतीपलीकडचे आहे हे स्पष्ट झाले. तेव्हा पंडित नेहरूंसारख्या मुत्सद्द्यांना यशवंतरावांनी पटवून दिले की, काँग्रेस पक्षाच्या मिठीतून हे महाद्वैभाषिक मुंबई राज्य आता निसटणार व गुजराथ आणि महाराष्ट्र अशी दोन स्वतंत्र राज्ये निर्माण करणे अपरिहार्य आहे. या ठिकाणी हृदयपरिवर्तनाच्या राजकारणाची व मुत्सद्दीपणाची कसोटी लागली. प्रामाणिकपणे महाद्वैभाषिक मुंबई राज्याचा मुख्यमंत्री विद्वेषाच्या आणि विग्रहाच्या राजकारणातून महाराष्ट्राला आणि गुजराथला प्रेमाच्या आणि मैत्रीच्या राजकारणाकडे मोठ्या कौशल्याने नेऊ शकला. ही घटनाच मुळी महाराष्ट्राच्या इतिहासात एकाकी आहे.

यशवंतरावांच्या जीवनातील १९४६ ते १९७५ हा जो तीस वर्षांचा कालखंड आहे तो अतिशय बहारीचा कालखंड होय. या काळात यशवंतराव चढत्या क्रमाने अनेक पदांवर रुजू झाले. अनेक उच्चपदे त्यांनी समर्थपणे भूषवली व पेलली. या काळात यशवंतराव म्हणजेच महाराष्ट्र असे समीकरण बनले. काँग्रेस पक्षाची तर अशी अवस्था होती की, यशवंतराव बोले आणि काँग्रेस हाले. संपूर्ण मराठा समाजाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. त्या वेळच्या कोणत्याही काँग्रेस पुढाऱ्याची ताकद त्यांच्या विरोधी जाण्याची नव्हती. महाराष्ट्रातील त्यांचे स्थान व कर्तृत्व ओळखूनच केंद्रीय नेतृत्वाने त्यांना विशाल अशा राष्ट्रीय प्रवाहात आणले. तेथेही त्यांनी आपली अमीट अशी वैशिष्ट्यपूर्ण छाप पाडली. लाघवी वाणी, सखोल गाढ वाचन, अभ्यासूवृत्ती यामुळे त्यांनी संसदेमध्येही आपले विशिष्ट स्थान निर्माण केले होते. मराठी भाषेवर त्यांचे अपरंपार प्रेम होते. पूर्व आयुष्यात त्यांच्यावर घडलेल्या सुसंस्कारांमुळेच हे सारे झाले. जे जे म्हणून

चांगले आहे ते ते आपणास माहीत असावे ही यशवंतरावांची भूमिका.

खरे म्हणजे खेड्यात जन्मलेला एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा भारताच्या उपपंतप्रधानपदापर्यंत चढतो यातच त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त सामर्थ्याची प्रचिती येते. मात्र उच्चपदावर पोहोचल्यावरसुद्धा सामान्यातल्या सामान्य व गरिबातल्या गरीब माणसांना ते कधी विसरले नाहीत यातच यशवंतरावांचे खरे मोठेपण आहे. एखादा किंमती अलंकार हस्तिदंती कड्यात सुरक्षितपणे ठेवावा त्याप्रमाणे त्यांनी आपल्याला मोठं केलं. ज्यांनी आपल्यासाठी त्याग केला, जे संकटकाळी सहाय्याला धावून आले त्यांच्या आठवणी यशवंतरावांनी अत्यंत निष्ठेने आपल्या अंतःकरणात जपून ठेवल्या. राजकारण असो, समाजकारण असो, साहित्य असो की कलेचे क्षेत्र असो जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत त्यांची रसिकता प्रत्यही दिसून आली. यशवंतरावांचं जीवन म्हणजे सर्जनतेचे मूर्तिमंत प्रतीक. आपल्याजवळच्या अभिजात गुणचुंबक वृत्तीने आपल्या जीवनात त्यांनी असंख्य माणसे जोडली, लहानाची मोठी केली, त्यांना अंधारातून प्रकाशाकडे आईच्या ममतेने बोट धरून नेलं. भारत हा देश गुणांनी, कर्तृत्वाने आणि सामर्थ्याने मोठा व्हावा यासाठी सामान्यातील असामान्यत्व जागे करून संघटितपणे प्रवाही केले. या महापुरुषाजवळ अनेक सद्गुणांचे व अभिरुचींचे सम्मेलन भरले होते विघटनाऐवजी संघटन, संघर्षाऐवजी समन्वय हे यशवंतरावांच्या जीवनाचे सूत्र होते. अनेक गैरसमजांचे हलाहल त्यानी पचवले, मर्मभेदक टीकेचे प्रहार त्यांनी सहन केले, संकटांचे आघात सोसले, पण आपला ताल व तोल त्यांनी कधी ढळू दिला नाही. यशवंतराव राजकारणी होते हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते. राजकारण त्यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय मानले होते. पण त्याहीपेक्षा यशवंत-राव हे माणूस म्हणून फार मोठे होते आणि यातच त्यांचे वेगळेपण सामावलेले आहे. यशवंतराव ही व्यक्ती नव्हे तर प्रवृत्ती होती. अनेक लोकोत्तर सद्गुणांचा असामान्य कर्तृत्वाचा त्यांच्या ठिकाणी चिरंतन संचय झालेला होता. त्यांचे प्रगल्भ आणि मानवतेनं नटलेलं व्यक्तिमत्त्व राजकारणाप्रमाणेच समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांना जाणीवपूर्वक स्पर्श करीत राहिले.

यशवंतराव म्हणजे एक माणूसवेडा माणूस. राजकरणाच्या पटावर वावरताना-सुद्धा ते माणुसकी कधी विसरले नाहीत. निवडणुका तोंडावर असतानासुद्धा विरोधी उमेदवाराच्या पाठीराख्यांनी आपल्याला येऊन मिळावे ही कल्पनासुद्धा

यशवंतरावांनी निषिद्ध मानली. यशवंतरावांचे राजकारण भक्तियुक्त राजकारण होते. राजकारण समाजजीवनापासून तुटू नये यासाठी ते अनेक वेळा धडपडत राहिले. राजकारण व समाजकारण ही एकाच जीवनाची दोन अंगे आहेत हा विचाराचा धागा त्यांनी कधी सोडला नाही. आपल्या आयुष्यात त्यांनी माणुसकीला खूप जपले. एका गोष्टीची त्यांनी सतत जाणीव ठेवली ती म्हणजे शब्द हे शस्त्र आहे. कोणाचा द्वेष करावा हे त्यांच्या रक्तातच नव्हते. शत्रूवरसुद्धा त्यांनी आयुष्यात प्रेमच केलं. माणसं तोडण्यापेक्षा जोडण्यातच आयुष्य वेचलं. राजकारणाबाहेरच्या लोकांचे विचार ऐकण्यात यशवंतरावांनी कधी कंटाळा केला नाही. यशवंतरावांना विद्वान माणसे तर प्रिय होतीच पण विद्वानांपेक्षाही एखादा सामान्य अडाणी माणूस हा त्यांना अधिक आवडत असे. श्रीमंतांपेक्षाही गरीब माणसांकडे त्यांचे लक्ष अधिक होते. निष्कपट प्रेमाचे दर्शन त्यांनी स्वतःच्या वागणुकीतून कित्येकदा घडवलेले आहे. त्यांचा असा सिद्धान्त होता की निष्कपट प्रेम करायला शिकणं हे समाजावर, राष्ट्रावर प्रेम करायला शिकण्याची पहिली पायरी आहे. अडाणी शेतकरी, विद्वान शास्त्रीपंडित, आधुनिक सुधारक किंवा सनातनी, इंग्रजी शिकलेले किंवा न शिकलेले तरुणतरुणी, महिला, कलावंत, व्यापारी, नोकरदार, डॉक्टर, इंजिनिअर, राजकारणी, मुत्सद्दी, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, समाजधुरीण यांपैकी कोणाशीही बोलायचे असो यशवंतराव हे त्यांच्या त्यांच्या भाषेत बोलत. त्यामुळे प्रत्येकजण त्यांचे म्हणणे प्रसन्नपणाने ऐकत असे. राष्ट्रप्रेमाचं, देशभक्तीचं आणि कार्यकर्त्यांच्या वागणुकीचं स्पष्टीकरण करताना तर त्यांच्या वाणीला स्फुरण चढे. उत्तम प्रकारचे दृष्टान्त ते सहजपणाने बोलून जात असत. देशाचे, पक्षाचे श्रेष्ठत्व व महत्त्व वर्णन करताना तर त्यांची वाणी खूपच तेजस्वी आणि गंभीर बनत असे. भाषा सोपी, वाक्ये लहान, कृत्रिमतेचा अभाव यामुळे त्यांचे बोलणे ऐकणाऱ्याच्या हृदयाशी जाऊन भिडे. जीवनाचे अनंत नमुने त्यांनी पाहिलेले असल्याने सामान्याची सुखदुःखे, त्याच्या भावना, वासना आणि अडचणी याची त्यांना पूर्णपणे कल्पना होती. त्यामुळे सामान्यांच्या जीवनाचे, त्यांच्या अवस्थांचे ते जेव्हा वास्तव बोलू लागत तेव्हा त्यांची भाषा अंतःकरणाचा ठाव घेत असे व ऐकणारा त्यांचा होऊन जात असे. त्यांच्या वाणीचा आणखी एक विशेष गुण म्हणजे त्यांच्या मुखातून कधीही अपशब्द बाहेर पडत नसे. स्वतःचा बडेजाव इतरांपुढे कधीच कथन करीत नसत. यशवंतराव

मत्सराने, द्वेषाने पेटलेले आहेत असे त्यांच्या जिभेने कधी दाखवले नाही. त्यांनी राग, लोभ, मद, मत्सर गिळला होता. संयमाने या सर्व विकारांना त्यांनी योग्य असे वळण लावले होते. जर असे नसते तर दुसऱ्यांची मनसोक्त स्तुती त्यांच्या मुखातून प्रकट होणे शक्यच नव्हते. कुणी एखादे हलके-सलके सामान्य काम केलेले असो त्याची प्रशंसा करून त्याला अधिक काम करण्याला उत्तेजन देण्याची वृत्ती निरहंकारी माणसाच्या ठिकाणीच असू शकते. विविध विचारांच्या कर्तृत्वाच्या माणसांचा सहवास हा यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यास पुष्कळच उपयुक्त ठरला. वृत्ती शांत व गंभीर राखून आपल्या कार्यक्षेत्रात अनेक कर्त्या माणसांना त्यांनी सामावून घेतलं. शुद्ध विचारांचाच त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अनेकांनी त्यांच्यावर टीका केली, शिवीगाळ केली, हेत्वारोप केले, दगडफेक केली तरी लोकनेत्यास आवश्यक असलेली मनाची शांतता त्यांनी किंचितही ढळू दिली नाही.

१९५२ पासून सत्तेच्या खुर्चीवर ते प्रत्यक्ष बसल्यानंतर, दिवसभर काम करताना लहानांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून आपण काही केले का ? याची बोच त्यांच्या मनात सतत राहिली. आपल्या जुन्या प्रेरणा काय होत्या ? आणि सत्तेत आल्यानंतर त्या शाबूत राहिल्या आहेत का ? याचा अंतर्मुख होऊन विचार करणारा हा नेता त्यामुळेच सत्तेत .टिकला आणि लहान व सर्वसामान्यांसाठी काम करू शकला. समाजातील श्रीमंत पुढारी, सत्ताधारी यांच्यातील अनेकजण स्वार्थी व विषयलोलुप बनलेले आहेत हेही यशवंतरावांनी आपल्या जीवनात पाहिलं. त्याचबरोबर गरीब, अडाणी, सामान्य जनताही सचोटीने जगताना पाहिली. त्यामुळे ते जातील तेथे गरीब व मध्यम स्थितीतल्या लोकांमध्ये अधिक मिसळले. सर्वसामान्य लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण त्यांनी असा ठेवला की, राजकारणात आपण मोठे झालो. परंतु एका मनुष्याने मोठा होऊन, पूर्णत्वाला जाऊन देशापुढच्या समस्या सुटणार नाहीत. यासाठी अनेकांनी अनेक पातळींवरून मोठा व्हायला पाहिजे. किमान थोडंतरी मोठं बनलंच पाहिजे. या तळमळीने यशवंतराव ग्रस्त असल्याने राजकारणात,· उद्योगात, सरकारात आणि अन्य विविध क्षेत्रांत अनेकांना त्यांनी या दृष्टिकोणातून संधी उपलब्ध करून दिली. सहसा कोणाच्या गुणांचा कधी अव्हेर केला नाही. आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुधारण्याचाच प्रयत्न यशवंतरावांनी आयुष्यभर केला. प्रत्येकाशी

संवाद साधून त्याला संतोष प्राप्त करून देण्यात त्यांची वर्षांमागून वर्षे खर्ची पडली. अनेकांशी त्यांनी व्यक्तिगत संबंध जोडला. तत्त्व कितीही उच्च असले तरी त्याची कसोटी त्या तत्त्वांच्या आचरणातच लागते ही यशवंतरावांची भूमिका असल्याने त्यांच्याकडे येणारे कुणी बुद्धिमान तरुण असोत किंवा अडाणी, गरीब शेतकरी असोत त्यांच्या दैनंदिन जीवनात राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम रुजले पाहिजे यावर त्यांनी कटाक्षाने सतत भर दिला.

यशवंतरावांच्या संगतीत हजारो माणसे आली परंतु एकदा भेटलेला माणूस पुन्हा पाहताच त्यांना ते बरोबर नावाने हाक मारीत व क्षेमकुशल विचारीत. ऐकणाराही त्यामुळे चकित होत असे. एवढा मोठा माणूस पण त्यांनी आपलं नाव लक्षात ठेवलं याचा आनंद अशा वेळी त्या माणसाच्या मनात जन्मभर टिकतो. राजकीय डावपेचात त्यांना कोणी लबाड ठरवलं तर कोणी सत्तालोलुप म्हटलं. म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही अशा अधांतरीपणानं कुंपणावर बसून राजकारण करतात असा आरोपही कुणी त्यांच्यावर केला. कुणी दुरून त्यांच्याविषयी विनाकारण गैरसमज करून घेतला. परंतु प्रत्यक्ष परिचय होऊन निकट संबंध आला की त्यांच्याविषयी अनेकांचे मत बदलून गेले.

मुळात यशवंतराव हा माणूसच मोठ्या मनाचा माणूस. देशासाठी, समाजाच्या हितासाठी विरोधकांचे आर्जव करण्याची वेळ आली तरी त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. अनेकदा त्यांनी विरोधकांच्या गोटात त्यांच्या पुढाऱ्यांकडे स्वतःच अनाहूतपणाने जाऊन सामाजिक स्वास्थ्य टिकविण्याचा प्रयत्न केल्याची उदाहरणे आहेत. या प्रसंगी एक घटना आठवते ती अशी–मुंबईला हुतात्मा स्मारकाच्या उद्‌घाटनास उपस्थित राहून विरोधकांना त्यांनी आश्चर्यचकित केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मुंबईतील गोळीबारात जे कामी आले त्यांचं एक स्मारक फ्लोरा फाउंटनच्या ठिकाणी समितीच्या नेत्यांनी उभारले. या स्मारकास उपस्थित राहण्यासाठी त्यांना निमंत्रणपत्र अशा वेळी पोचविण्यात आले की त्यासंबंधी विचार करण्यास अवधीच उरू नये. निमंत्रण मिळाले, त्यानंतर क्षणाचाही विलंब न लावता यशवंतराव निघाले आणि फ्लोरा फाउंटनच्या ठिकाणी समारंभात दाखल झाले. त्यांना अचानक आलेले पाहताच सारेच चपापले. यशवंतराव उपस्थित राहिले नसते तर विरोधकांना टीकेसाठी भांडवल मिळणार होते. प्रश्न महाराष्ट्राच्या भावनेचा होता. परंतु यशवंतरावांनी मुख्यमंत्रिपदाचा मोठेपणा,

समारंभास उपस्थित राहण्याच्या पद्धती वगैरे सर्व बावी बाजूस ठेवून स्वतः तेथे उपस्थित झाल्याने विरोधकांची अपेक्षित भांडवलाची हवाच निघून गेली. समाजाच्या हिताचे जे जे काही घडणार असेल त्यासाठी मानपान, प्रतिष्ठा, सत्ता या गोष्टी बाजूला ठेवून समाजहितालाच प्राधान्य देण्याच्या यशवंतरावांच्या या स्वभावामुळेच हे घडू शकले. झाल्या-गेल्याचा विसर आणि पुढच्याचा विचार हा एक त्यांच्या स्वभावाचा विशेष पैलू होता.

महाराष्ट्राने हिमालयाएवढी जी माणसे निर्माण केली व ज्यांनी हिमालयाचे उत्तुंगत्व व भारताचे स्वातंत्र्य जतन करण्याकरता आपले जीवनसर्वस्व अर्पण केले त्यामध्ये यशवंतरावांचं स्थान वरच्या दर्जाचे आहे. महाराष्ट्राची जडण-घडण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहेच. परंतु भारताच्या राजकारणातही त्यांनी अनन्य साधारण कामगिरी बजावली आहे. स्वदेश त्यांनी सर्वश्रेष्ठ मानला व शेवटच्या श्वासापर्यंत त्याचेच एकमेव चिंतन केले. जनसामान्यांतून उदयास आलेला हा असामान्य लोकनेता काळाच्या पडद्याआड निघून गेला यावर विश्वास ठेवण्यास मन अजूनही तयार होत नाही, इतका हा नेता या मातीशी एकरूप झालेला होता. ज्यांच्या निधनाने महाराष्ट्राची प्रकृती क्षीण होते असे बोटावर मोजता येतील अशी जी काही कर्तबगार मंडळी आहेत त्यांमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात यशवंतरावांना अग्रमान द्यावा लागेल.

# १८

# नवमहाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतरावजी चव्हाण

प्राचार्य जे. यु. चामरगोरे

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील तरुण पिढीचे भाग्यविधाते कै. यशवंतरावजी चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी देवराष्ट्रे या खेडेगावी सातारा जिल्ह्यात झाला. १९२० पासून महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली संपूर्ण भारतात स्वातंत्र्याची चळवळ फोफावत होती. त्यामुळे अगदी वयाच्या सोळाव्या वर्षीच ते माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी असताना म. गांधींनी सुरू केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी उडी घेतली. घरची एवढी वाईट परिस्थिती असतानादेखील भविष्याची मुळीच पर्वा न करता यशवंतरावांनी १९३० साली गांधीप्रणीत असहकारितेच्या चळवळीत भाग घेतला. घरादाराची जीविताची पर्वा केली नाही. त्यामुळे त्यांना १९३२ मध्ये १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. लहान वयातच भारतीय काँग्रेसच्या राष्ट्रवादी विचाराची त्यांच्यावर छाप पडली. ब्रिटिशांचे राज्य नष्ट व्हावे व भारतास स्वातंत्र्य मिळून सामान्य माणसाची सामाजिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता व्हावी म्हणून त्यांनी सातारा काँग्रेसमध्ये काम करण्यास सुरुवात करून आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केली.

१९३८ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाची बी. ए. ची पदवी व १९४० मध्ये

एलएल. बी. ची पदवी प्राप्त करून वयाच्या २६ व्या वर्षी वकिली व्यवसायास सुरुवात केली. १९४२ च्या मे महिन्यात त्यांचे वेणूताईंशी लग्न झाले.

ऑगस्ट १९४२ मध्ये म. गांधींनी ब्रिटिशांना ' चले जाव 'ची आज्ञा देऊन गुलामगिरीत खितपत पडलेल्या भारतीयांना मोलाचा मंत्र देऊन स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रवृत्त केले. त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रातसुद्धा उमटले. कै. यशवंतरावजींनी कै. किसन वीर व इतर सहकाऱ्यांसोबत सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत भाग घेऊन सदरहू चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या पत्नी वेणूताई ह्या एप्रिल १९४३ मध्ये अत्यंत आजारी असल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी म्हणून ते आले असताना त्यांना अटक झाली. त्याच वर्षी त्यांना त्यांचे ज्येष्ठ बंधू यांच्या मृत्यूचा आघात सोसावा लागला.

महात्माजी म्हणत की माझ्या सार्वजनिक कार्यात माझी पत्नी कस्तुरबाचा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे यशवंतरावजींच्या कार्यात त्यांच्या पत्नी वेणूताईंच्या त्यागाचा महत्त्वाचा भाग आहे. वेणूताईंच्या अशक्त प्रकृतीबद्दल कोणी प्रश्न काढला की यशवंतराव म्हणतात, " तिची प्रकृती खराब व्हायला मी कारणीभूत आहे. "

१९४५ ला यशवंतरावजींची तुरुंगातून सुटका झाली. १९४६ मध्ये त्यांनी मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीत कराड मतदारसंघातून निवडणूक लढविली व ते निवडून आले. त्यानंतर मुंबई राज्यात मोरारजी भाईंच्या मंत्रिमंडळात गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

१९५२ साली मुंबई विधिमंडळाच्या सार्वत्रिक निवडणुकीत कराड मतदारसंघातून पुन्हा निवडून आले व त्या वेळच्या मुंबई राज्याच्या मोरारजीभाईंच्या मंत्रिमंडळात पुरवठामंत्री म्हणून त्यांना घेण्यात आले.

विशाल द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाल्यानंतर १९५६ च्या नोव्हेंबरमध्ये श्री. यशवंतरावजी वयाच्या ४२ व्या वर्षी मुख्यमंत्रिपदी आरूढ झाले.

१ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन नवीन राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावजींची निवड झाली.

यशवंतरावजी गरीब, शेतकरी व सामान्य कुटुंबातून पुढे आले. त्यांनी अनंत हालअपेष्टा सोसून शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यात ध्येयवाद, राष्ट्रीय प्रवाहात

सामील होण्याची तयारी व सामान्य माणसाविषयी खरीखुरी तळमळ दिसून येते. विद्यार्थी असताना यशवंतरावजींना त्यांच्या गरीब परिस्थितीमुळे शाळेची फी भरणे अशक्य होते. इतर चारचौघांसारखे चांगले कपडेच काय पण पायात चप्पलसुद्धा घालता येणे त्यांना शक्य नव्हते. अशा गरीब व सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले यशवंतरावजी जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री किंवा स्वतंत्र भारताचे उपपंतप्रधान झाले तेव्हा राष्ट्रपिता म. गांधीजींची महत्त्वाकांक्षा खरी झाली असे म्हणता येईल.

मुख्यमंत्रिपदाची जिम्मेदारी मी शेतकरी, कष्टकरी जनतेसाठी घेतलेली आहे व मी जर त्या कामात चुकलो तर शेतकरी, कष्टकरी अशा पदास नालायक आहे अशी सर्व भारतीयांची समजूत होईल असे ते मानत. यशवंतरावजींनी गरीब व सामान्य शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारे शोषण होऊ नये म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

यशवंतरावजींची काँग्रेसपक्ष व पं. नेहरुजींवर नितांत श्रद्धा होती. १ डिसेंबर १९५५ रोजी त्यांनी फलटण येथील व्याख्यानात सांगितले होते की " मुंबई राज्य रचनेबाबत काँग्रेस कार्यकारिणी जो अंतिम निर्णय घेईल तो मी शिरोधार्य मानीन. "

यशवंतरावजींची काम करून घेण्याची एक आगळी अशी विशिष्ट पद्धत होती. सहकाऱ्यांचा विश्वास संपादन करून, त्यांना आपलेसे करून पोटात शिरून ते दुसऱ्याकडून काम करवून घेत. एकसंध, एकजिनसी नवमहाराष्ट्र तयार व्हावा अशी त्यांची मनापासून तळमळ होती.

विविध मोठमोठ्या पदांवर काम करताना त्यांना एकाच वेळी विविध अशा जटिल समस्यांना तोंड द्यावे लागत असे. पण यशवंतरावजींची काम करण्याची एक पद्धत होती. एक प्रश्न सुटला की लगेच दुसरा प्रश्न ते हाती घेत. एकाच वेळी अन्य सर्व गोष्टींची व विचारांची काळजी ते करीत नसत. एक समस्या व्यवस्थित सुटली की मग आपले डोके ते दुसऱ्या समस्येकडे लावीत. ते म्हणत की आपले पहिले पाऊल घट्ट रोवल्याबरच दुसरे पाऊल पुढे टाकावे. तसेच विविध प्रश्नांतून कोणत्या प्रश्नास अग्रक्रम द्यावयाचा याचाही ते गंभीरपणे विचार करीत. कोणता प्रश्न केव्हा हाती घ्यावयाचा तेही स्वतः ठरवीत.

काँग्रेसचे ते सच्चे पाइक होते. ते वयाने २३–२४ वर्षांचे असतानाच

कऱ्हाड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी त्यांचे बंधू श्री. गणपतराव चव्हाण हे काँग्रेसच्या विरुद्ध उभे होते. पण भावाच्या प्रेमाचा मोह बाजूला सारून यशवंतरावांनी त्यांचे विरुद्ध प्रचार केला व त्यांच्या भावाचा पराभव करविला. त्यावरून त्यांचे काँग्रेस पक्षाबद्दलचे प्रेम व पक्षशिस्त स्पष्ट होते.

यशवंतरावजींच्या बालपणी शिक्षण ही श्रीमंतांच्या आवाक्यातील बाब होती. गरीब शेतकरी, कष्टकरी मजूर व सामान्य माणसांच्या मुलांना त्या वेळी महागडे शिक्षण घेणे सर्वस्वी अशक्य होते. त्या वेळच्या परिस्थितीमुळे सामान्य माणसात शिक्षणाविषयी आस्था नव्हती. आजच्या मानाने त्या वेळी शिक्षणाच्या सोईसुद्धा अत्यंत अपुऱ्या होत्या. तालुक्याच्या ठिकाणी एखादे हायस्कूल व काही मोजक्या जिल्ह्याच्या ठिकाणी महाविद्यालये होती. तेथेसुद्धा फक्त मोठ्या जमीनदारांची, श्रीमंतांची व फार मोठ्या अधिकाऱ्यांची मुले शिक्षण घेऊ शकत. यशवंतरावजींनी स्वतः बालपणी शिक्षणासाठी सोसलेल्या अनंत अडचणींमुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर सामान्य गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची व्यवस्था त्यांनी केली. महाराष्ट्राची प्रगती हवी असेल तर प्रत्येक तरुणास उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली पाहिजे अशी यशवंतरावजींची धारणा होती.

महाराष्ट्राचा कायापालट करून नव महाराष्ट्र निर्माण करावयाचा असेल तर शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या व प्रत्येक सामान्य गरीब माणसाच्या मुलास सर्व प्रकारच्या मोफत शिक्षणाची सोय त्याच्या घराजवळ झाली पाहिजे ही खूणगाठ मनाशी बांधून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास शासनामार्फत फीमाफीची सवलत ( ई. बी. सी. ) जाहीर केली. अशा प्रकारची सवलत देणारे महाराष्ट्र हे भारतातील सर्व प्रथम राज्य आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या तिजोरीवर शिक्षणासाठी प्रचंड ताण पडला तरी हरकत नाही असे यशवंतरावजींचे म्हणणे होते.

शासनाने सुरू केलेल्या इ. बी. सी. च्या सवलतीमुळे महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती झाली असे म्हटले पाहिजे. यामुळे १९५९ नंतर महाराष्ट्रातील बहुसंख्य गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य होऊ लागले व त्यामुळे ग्रामीण भागात बहुजन समाजातील विद्यार्थ्यांत शिक्षणाबद्दल आस्था निर्माण झाली व शिक्षण घेऊन स्वतःची प्रगती करून घेण्यासाठी सामान्य ग्रामीण तरुण धडपडू लागला.

शासनाच्या या उदार धोरणामुळे ग्रामीण भागात नवनवीन शाळा व महा-

विद्यालये निर्माण झाली व गोरगरिबांच्या मुलांसाठी ज्ञानाची गंगा त्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे 'महान कार्य यशवंतरावजींच्या शैक्षणिक धोरणामुळे घडून आले.

महाराष्ट्रातील प्रत्येक खेडेगाव हे त्यांच्या आदर्शाप्रमाणे निर्माण झाले पाहिजे व प्रत्येक तरुण हा सुसंस्कृत व प्रगतिशील विचाराचा असला पाहिजे अशी यशवंतरावजींची धारणा होती. "कल्याणकारी राज्यात जोपर्यंत शिक्षण, सहकार, शेती व आरोग्य या गोष्टींना प्राधान्य व महत्त्व दिले जात नाही तोपर्यंत ते खरे लोककल्याणकारी राज्य झाले असे म्हणता येणार नाही," असे यशवंतरावजी म्हणत. खेड्यातील प्रत्येक माणसाने एकमेकाकडे सहृदयतेने मदत करण्याच्या भावनेतून पाहिले पाहिजे असे यशवंतरावजी म्हणत. त्यांच्या मते ज्या खेड्यातला समाज आपले सगळे प्रश्न एकमेकांच्या सहकार्याने, जिव्हाळ्याने आणि समजुतीने सोडविण्यासाठी एकत्र बसून निर्णय करू शकतो असे पंचायतीचे जीवन जगणारे खेडे निर्माण झाले पाहिजे असे यशवंतरावजींचे स्वप्न होते.

यशवंतरावजी गरिबांचे व भूमिहीनांचे रक्षक होते. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ज्या वेळी भूमिहीनांचा सत्याग्रह झाला त्या वेळी यशवंतरावांनी भूमिहीनांच्या समस्या मूलभूत आहेत हे मान्य करून त्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

नवमहाराष्ट्राचा भाग्योदय करण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले व या हाती घेतलेल्या अवघड कामात यश नक्की मिळेल अशी त्यांना आशा होती. नव-महाराष्ट्रात आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस यावेत या सामान्य माणसाच्या भावना लक्षात घेऊन त्यांनी शासनाच्या मार्फत लोकांची अधिकाधिक सेवा करण्यासाठी मनापासून प्रयत्न केले.

यशवंतरावजी हे नेहमी सावधपणाने जपून पावले टाकणारे मुत्सद्दी नेते होते. सर्व बाबींचा विचार करून एकाच प्रश्नाविषयी अत्यंत मोजके व नेमके बोलण्याचे पथ्य ते पाळीत.

यशवंतरावजींना त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे जीवाला जीव देणारे, सर्व जातिधर्माचे, अडाणी, शिक्षित, प्राध्यापक, शेतकरी, साहित्यिक, कलावंत इत्यादी अनेक व्यवसायांतील मित्र लाभले होते. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला होता.

यशवंतरावजींनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून राज्यकारभाराची एक आदर्श अशी परंपरा निर्माण करून सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कल्याणकारी राज्याचा आदर्श सर्वांपुढे ठेवला. स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली पाटबंधारे मंडळ स्थापून महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरणातून महाराष्ट्रात आदर्श जिल्हा परिषदा कशा निर्माण होतील याचा विचार करण्यासाठी समिती नेमून भारतात सर्वप्रथम महाराष्ट्रात जिल्हा परिषदा स्थापन केल्या.

यशवंतरावजी स्वतः एक उच्च कोटीचे साहित्यिक व कलेचे उपासक होते. साहित्य, कला, संगीत, भारतीय संस्कृती याबद्दल अपार प्रेम त्यांच्या ठाई होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना करून मान्यवर अशा थोर साहित्यिकांच्या व कलावंतांच्या कार्याला राजाश्रय देऊन चालना देण्याचे कार्य त्यांनी सुरू केले.

महाराष्ट्रात कृषी व औद्योगिक क्रान्ती घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांनी महाराष्ट्राची तिसरी पंचवार्षिक योजना तयार करण्याचे काम हाती घेऊन विविध खात्यांचे अभ्यास गट तयार केले.

मुंबई शहराचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने मुंबईच्या विकासाचा आराखडा त्यांनी तयार करविला. ठाणे खाडीवर पूल बांधून मुंबई महाराष्ट्राच्या मुख्य भूमीशी जोडण्याची योजना त्यांनीच करविली. त्यामुळे यशवंतरावजींना नव्या औद्योगिक नव मुंबईचे जनक म्हणविता येईल. प्रा. वि. म. दांडेकर यांच्या समितीने महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रात जवळ जवळ ७० टक्के नोकऱ्या ह्या केवळ मुंबई व ठाणे औद्योगिक परिसरातील आहेत, हे दाखविल्यामुळे १९६२ मध्ये यशवंतरावांनी मुंबईबाहेर उद्योगधंद्यांचे जाळे उभारण्याच्या योजना आखल्या.

महाराष्ट्राच्या दुर्दैवामुळे यशवंतरावजींना नवमहाराष्ट्र निर्मितीनंतर सुमारे अडीच वर्षांतच त्यांची भारताचे संरक्षणमंत्री म्हणून प. नेहरूंनी निवड केल्यामुळे दिल्लीस जावे लागले व यशवंतरावजींच्या मनातला महाराष्ट्र घडविण्याचा त्यांचा इरादा अर्धवटच राहिला.

१९६२ मध्ये चीनकडून पराभव होत असताना त्यांची देशाचे नवे संरक्षण-

मंत्री म्हणून निवड झाल्यामुळे नेहरूनंतर कोण हा प्रश्न यशवंतरावजींच्या रूपाने सुटला आहे असे अनेकांना वाटत होते.

भारताचे संरक्षणमंत्री असताना यशवंतरावांनी संरक्षण खात्यात अनेक सुधारणा घडवून आणल्या व त्यामुळे जवानांचे मनोधैर्य वाढविण्यास मदत केली व त्यामुळे भारतास १९६५ च्या युद्धात पाकिस्तानवर सहज मात करता आली.

त्यानंतर भारताचे गृहमंत्री, अर्थमंत्री व परराष्ट्रमंत्री म्हणून १९७७ पर्यंत विविध मंत्रिपदे त्यांनी समर्थपणे भूषविली व प्रत्येक खात्यावर स्वतःची वेगळी अशी छाप त्यांनी पाडली. जनता पक्षाच्या फाटाफुटीनंतर यशवंतरावजींची भारताच्या उपपंतप्रधानपदी निवड झाली.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार श्री. यशवंतरावजी चव्हाण हे त्यांच्या प्रिय पत्नी वेणूताई यांच्या निधनाचे दुःख न पेलू शकल्यामुळे अल्पशा आजाराने २५ नोव्हेंबर १९८४ ला स्वर्गवासी झाले.

त्यांच्या पवित्र स्मृतीस त्रिवार अभिवादन !

S

# १९

# यशवंतराव चव्हाण : मराठी मातीचे वैभव

प्रा. उत्तम सूर्यवंशी

आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती करणारे आणि या महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेऊन सोडणारे यशवंतरावजी चव्हाण मराठी मातीचे वैभव होते. भारताच्या पंतप्रधान इंदिराजी यांच्या अकल्पित व अमानुष हत्येनंतर २५ दिवसांतच यशवंतरावजींनी इहलोकीची यात्रा संपवली. त्यांच्या जाण्याने आजही जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून निघणे कठीण आहे. छत्रपती शिवाजी महाराज व लोकमान्य टिळकांनंतर एवढा मोठा महापुरुष महाराष्ट्राने पाहिला नाही. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सहकार, शिक्षण, तंत्रज्ञान, शेती, साहित्य, संस्कृती, वाङ्मय व कला इत्यादींच्या त्यांनी लावलेल्या रोपट्यांचे पुढे वटवृक्षात रूपांतर झाले आणि ते महाराष्ट्राच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग बनले. यशवंतरावजींनी महाराष्ट्रातील नाटक, साहित्य व कलेला रसिकतेने आणि मायेच्या ममतेने जोपासले. त्यांनी कर्तबगार माणसांना संधी देऊन त्यांच्या जीवनाचे सोने केले. यशवंतरावजी म्हणजे महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजे यशवंतराव असे जणू समीकरण झाले होते.

यशवंतरावजींनी अनेक क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी बजावली पण या सर्व कामगिरीमध्ये मला जी महत्त्वाची कामगिरी वाटते ती म्हणजे त्यांनी केलेले

ग्रामीण जीवनाचे परिवर्तन. त्यांचा पिंड तात्कालिक फायद्यासाठी लपंडाव खेळणाऱ्या राजकारण्याचा नव्हता. त्यांनी जे परिवर्तन घडवून आणले ते समाज-हितासाठी व तळागाळातल्या माणसासाठी. त्यांनी केलेले परिवर्तन दूरदृष्टीचे द्योतक आहे. ते स्वतः लोकशाहीचे पुरस्कर्ते होते म्हणूनच त्यांनी लोकशाहीची विधायक चळवळ झोपडपट्टीपर्यंत नेऊन पोहोचविली. " सामान्य माणूस सत्तेवर बसला हीच खरी लोकशाही " असे ते म्हणत, आणि ते प्रत्यक्षात आणण्या-साठी त्यांनी जिद्दीने प्रयत्न केले. आज महाराष्ट्रातील राजकारणात व समाज-कारणात जी मंडळी अग्रेसर आहेत ती यशवंतरावजींनी महाराष्ट्राला दिलेली कायमची ठेव आहे. श्री. वसंतदादा पाटील, श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर, श्री. शंकररावजी चव्हाण, मा. शरद पवार, श्री. माणिकराव पालोदकर, श्री. सुशीलकुमार शिंदे, रत्नाप्पा कुंभार, माधवराव बागल, दादासाहेब रूपवते, मधुकररावजी चौधरी, पद्मश्री शामरावजी कदम इ. कर्तृत्ववान माणसे यशवंत-रावांनी घडविली. त्यांच्या कर्तृत्वाला संधी प्राप्त करून दिली. यशवंतरावांनी माणसे बांधली, जोपासली, वाढवली आणि त्यांच्या मनाला आकार दिला. स्वकर्तृत्वावर उभे राहण्याचे सामर्थ्य दिले. या अर्थाने यशवंतराव म्हणजे महाराष्ट्राला लाभलेली संजीवनी होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या व कष्टकऱ्यांच्या मुलाला नांगरावरून सत्तेत नेऊन बसविणारे ते एक युगपुरुष होते. महाराष्ट्रात पंचायत राज्याची स्थापना करून जबाबदारीचे विकेंद्रीकरण घडवून आणले. जि. प., सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने व सहकारी तत्त्वावर चालणारे निरनिराळे उद्योग ही यशवंतरावांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी आहे. पद्मश्री कै. विठ्ठलराव विखे पाटील यांनी भारतात पहिल्यांदा सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. त्यांना यशवंतरावजींनी प्रोत्साहन देऊन नगर जिल्ह्यातील उजाड वाळवंटाचे हिरव्यागार रानात रूपांतर केले. त्यांनी खऱ्या अर्थाने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया रचला. सहकारी चळवळीमुळे ग्रामीण महाराष्ट्राचा काया-पालट झाला आहे. या चळवळीत काही वाईट अपप्रवृत्ती शिरल्या आहेत, नाही असे नाही; पण त्यामुळे सबंध चळवळच टाकाऊ आहे, असे म्हणणे गैरलागू आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतात आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा काँग्रेस पक्षाने फार मोठा प्रयत्न केला. पण या प्रयत्नाला यशाची फळे जर कुठे

लागली असतील तर ती या महाराष्ट्रात. आजही बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा या प्रांतात सरंजामदारी व जमीनदारी दिसते. तेथे वेठबिगारी पद्धतीचे संपूर्ण निर्मूलन झाले नाही. दलितांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. राजकीय व सामाजिक लोकशाहीचे मोकळे वारे मोकाट गुंडगिरीमुळे सामान्यापर्यंत पोहोचत नाही. आर्थिक व सामाजिक समता तर अजून खूप दूर आहे. या तुलनेत महाराष्ट्र एकदम उठून वेगळा दिसतो. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, आगरकर, लो. टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा थोर वारसा आपल्याला लाभला आहे. त्यामुळे येथील ग्रामीण समाजात स्वत्वाची भावना निर्माण झाली आहे. यशवंतरावजींनी हाती आलेल्या सत्तेचा वापर, स्वावलंबी व स्वाभिमानी ग्रामीण संस्कृती टिकविण्यासाठी केला. महाराष्ट्राच्या विकासासाठी शेती, मनुष्यबळ, नागरीकरण व उद्योगीकरण हे प्रश्न त्यांनी महत्त्वाचे मानले. केवळ जमीनविषयक सुधारणा करून सामाजिक व आर्थिक समस्या सुटणाऱ्या नाहीत. शेतीची उत्पादनक्षमता व उत्पादन वाढवीत असताना सामाजिक दृष्टिकोण पुढे ठेवला पाहिजे, त्या दृष्टीने त्यांनी कृषिउद्योगाला चालना दिली. १९५६ च्या अगोदर शेतकरी, मजूर, दलित, शोषित व आदिवासी मुलांना शिक्षण देणे दुरापास्त होते. आजही थोड्याफार फरकाने हीच स्थिती आंध्र, तामिळनाडू, बिहार, ओरिसामध्ये आहे पण यशवंतरावजींनी आर्थिक दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक सवलती उपलब्ध करून देऊन शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्यामुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा वेगाने प्रसार झाला. ते एका ठिकाणी म्हणतात, "शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक साधन आहे." शिक्षित माणूस स्वत:भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची संगती लावतो. आपल्या जीवनावर याचा काय परिणाम होतो हे तो जाणून घेतो. सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे खेड्यातील व शहरातील माणूस यांच्यात जे कृत्रिम अंतर आहे ते शिक्षणाने कमी झाले पाहिजे. महाराष्ट्रात शैक्षणिक विस्ताराबरोबर गुणवत्ता ही क्रमाक्रमाने वाढू लागली. या सर्व प्रक्रियेतून सुशिक्षित बेकारांचा एक प्रचंड वर्ग तयार झाला. आज ६.६५ कोटी बेकार आहेत. त्यांपैकी २१ लाख पदवीधर बेकार आहेत. यासंबंधी बोलताना यशवंतरावजी म्हणाले, "अडाणी बेकारापेक्षा विचार करणारा सुशिक्षित बेकार केव्हाही चांगला." जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्रातील तरुण आघाडीवर

आहे. तो नोकरीबरोबर विविध उद्योगांत रममाण होतो आहे. शहरी तरुणाबरोबर ग्रामीण तरुणही जीवनाची निरनिराळी क्षेत्रे खंबीरपणे पादाक्रांत करीत आहे. शहराबरोबर खेडीही सतत नवजागरणाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. आपल्या हक्काची त्यांना जाणीव आहे. सर्व समाजाला बरोबर घेऊन चालण्याशिवाय नवा महाराष्ट्र निर्माण होणार नाही. असे ते म्हणत. आज ग्रामीण महाराष्ट्राचे जे नवे स्वरूप आपल्याला पाहायला मिळते ते यशवंतरावजींच्या समर्थ नेतृत्वामुळेच. यशवंतरावजींनी जनतेचे प्रबोधन केले. नवा विचार अंमलात आणला व सामान्य माणसात आत्मविश्वास निर्माण केला. म्हणूनच ते ग्रामीण परिवर्तनाचे नेते होऊ शकतात. त्यांच्या नेतृत्वाला लोकमान्यता होती, कारण त्यांचे नेतृत्व अनुभवाच्या मुशीतून तावून सुलाखून निघालेले होते.

यशवंतरावजींनी ३६५ पृष्ठांचे ' कृष्णाकाठ ' हे आत्मचरित्र लिहिले. अजून त्याचे दोन भाग लिहावयाचे राहून गेले आहेत. पण जे आत्मचरित्र प्रकाशित झाले ते मराठी सारस्वताचे अमोल लेणे आहे. या आत्मचरित्रात १९४६ पर्यंतचा भाग आलेला आहे. विशेषत: त्यांना शिक्षण घेत असताना ज्या अडचणी आल्या त्या मुळातूनच वाचण्यासारख्या आहेत. शिक्षण घेत असताना यशवंतरावजींच्या मनाला ज्या जखमा झाल्या, त्याचे विदारक चित्रण ' कृष्णा-काठ 'मध्ये वाचावयास मिळते. मॅट्रिकला असताना त्यांना संस्कृत शिकावेसे वाटले. कालिदासाचे ' रघुवंश ' आणि संस्कृत नाटके शास्त्रीबुवांच्या सहाय्याने वाचावी लागत असत. म्हणून त्यांनी संस्कृत शिकण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा शास्त्रीबुवा उद्‌गारले, " संस्कृत देववाणी आहे. ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना मी ती शिकविणार नाही. " शास्त्रीबुवांच्या उद्‌गाराने यशवंतरावजींच्या काळजाला कायमची जखम झाली. या संदर्भात मला दया पवार यांच्या कवितेच्या काही ओळी आठवतात. ते म्हणतात,

कशाला झाली पुस्तकाची ओळख
बरा ओहोळाचा गोठा
गावची गुरे वळली असती
असल्या ईंगळ्या डसल्या नसत्या.

शिक्षणामुळे माणसाच्या मनाला ज्या जाणिवा होतात त्याचेच हे प्रगटीकरण आहे. यशवंतरावजींच्या आयुष्यातील दुसरा एक महत्त्वाचा प्रसंग त्यांनी आपल्या

आत्मचरित्रात सांगितला आहे. यशवंतरावजींचे जिगरी दोस्त स्व. राघूअण्णा लिमये हे होते. ते आणि यशवंतराव एकदा ग्रामीण भागात दौऱ्यावर गेले. या दौऱ्यात त्यांचा एका ब्राह्मणाच्या घरी मुक्काम पडला. जेवणाच्या वेळी राघूअण्णांचे पान आतल्या खोलीत टाकण्यात आले. आणि यशवंतरावांचे पान बाहेरच्या ओसरीत टाकण्यात आले, सामाजिक विषमतेचा हा कटू अनुभव त्यांनी स्वतः अनुभवला. हा अनुभव बहुजन समाजाच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शाळा व महाविद्यालये काढली. यशवंतरावांना अन्यायावर, विषमतेवर व दुहीवर आधारलेला समाज मोडून टाकावयाचा होता. ते त्यांचे स्वप्न होते.

१९२० ते १९३० हा काळ भारतीय राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा काळ होता. कारण १९२० पर्यंतचे या देशातील राजकारण व स्वातंत्र्य चळवळ पांढरपेशापर्यंतच अडकलेली होती. लो. टिळक हे तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी होते. पण तेही ही चळवळ सर्व सामान्यांपर्यंत नेऊन पोहोचवू शकले नाहीत. १९२० नंतर म्हणजे महात्मा गांधींच्या उदयानंतर काँग्रेसची चळवळ व्यापक बनली. शेतकरी, साळी, माळी, सुतार, धोबी या समाजा-पर्यंत ही चळवळ जाऊन पोहोचली. यशवंतरावजींनी स्वतःला या राष्ट्रीय प्रवाहात झोकून दिले. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला या काळात ब्राह्मणे-तर चळवळीचे स्वरूप आले होते. एवढेच नाही तर सत्यशोधक चळवळ समाजात प्रबोधन करण्याऐवजी ब्राह्मणद्वेषाचे विषमय वातावरण निर्माण करू लागली होती. यशवंतरावजींचे मोठेपण यात आहे की, त्यांनी या चळवळीत भाग न घेता ते राष्ट्रीय आघाडीत सामील झाले. स्व. केशवराव जेधे व स्व. महर्षी वि. रा. शिंदे यांनी म. गांधींच्या नेतृत्वाखाली समाजसुधारणा सामान्या-पर्यंत नेऊन पोहोचविली, एवढेच नाही तर १९३० सालच्या चळवळीत ग्रामीण समाजाचा प्रतिनिधी वर्ग मोठ्या प्रमाणात त्यांच्यामुळेच जेलमध्ये गेला. यशवंतरावजींनी म. गांधी, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस, अबुल कलाम आझाद यांचे नेतृत्व मान्य केले. हे थोर नेते त्या काळात झाल्यामुळे या देशातील सर्व जातिजमाती स्वातंत्र्यलढ्यात सामील झाल्या.

१९३२ मध्ये यशवंतरावांनी १८ महिने तुरुंगवास भोगला. त्या वेळी ते साधे मॅट्रिकही नव्हते. १९३७ साली डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांची ओळख

झाली. त्यांच्या 'Independent India' या पुस्तकाने यशवंतरावांच्या मनावर खोल ठसा उमटला. या पुस्तकात क्रांतिविकासाचे तर्कनिष्ठ विवेचन आहे. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांनी इंग्रजांना साथ दिली, म्हणून ते काँग्रेसच्या बाजूने उभे राहिले. १९४२ साली क्रांतिसिंह नाना पाटलांनी जे प्रतिसरकार स्थापन केले, त्यात यशवंतराव चव्हाण, वसंतराव पाटील, किसन वीर, जी. डी. लाड, हे सहभागी झाले.

१९४६ साली खेर मंत्रिमंडळाने कोयना योजनेसंबंधी चर्चा केली. यशवंतरावांनी ही योजना पूर्ण करण्यासाठी आग्रह धरला, कारण या योजनेमुळे पश्चिम महाराष्ट्राचा कृषिऔद्योगिक विकास होणार होता. शेती करणाऱ्याला शेतीचा हक्क मिळावा यासाठी माधवराव बागलांनी फार मोठे आंदोलन उभे केले होते. म्हणून यशवंतरावांनी १९४७ साली कर्ज निवारण कायदा, जमीन मर्यादेचा कायदा, वेठबिगार बंदी, किमान वेतन कायदा इत्यादी कायद्यांविषयी चर्चा केली, आणि १९५६ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर काही कायदे अंमलबजावणीत आणले. कमाल जमीन धारणा कायद्यामुळे शासनाला ९/१० लाख जमीन मिळाली. यातून त्यांची लोकशाही समाजवादाची दूरदृष्टी प्रगट होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी नाटक, मराठी चित्रपट व लोककला यांना उदार आश्रय देऊन या कलांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पंडित लक्ष्मण-शास्त्री जोशी यांच्या मराठी विश्वकोषाला आर्थिक साहाय्य देऊन एका ऐतिहा-सिक कार्यनिर्मितीला प्रोत्साहन दिले. मराठी साहित्यिकांच्या उत्कृष्ट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी व नवोदित लेखकांना अभय देण्यासाठी एक स्वतंत्र साहित्य व संस्कृती मंडळ निर्माण केले, त्यामुळे दलित, शोषित व ग्रामीण साहित्यिकांना आपल्यामधील साहित्यगुणांना प्रगट करण्याची संधी प्राप्त झाली. रूक्ष राजकारणात राहूनही त्यांनी आपल्यामधून साहित्यिक रसिक मरू दिला नाही. सरस्वतीच्या दरबारात हजेरी लावताना ते आपली राजवस्त्रे उतरून ठेवीत असत आणि साहित्यिक व कलाकार यांच्यापुढे नतमस्तक होत असत. मराठी मनाचा असा हा दिलदार राजा होता. म्हणूनच आजचा नवमहाराष्ट्र निर्माण होऊ शकला.

१९६२ साली संरक्षणमंत्री म्हणून ते दिल्लीला जेव्हा आले तेव्हा पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले,

" You are coming here in a Political Crisis. I want you as a Political Leader who has proved himself a leader of the people."

पंडित नेहरूंनी दिलेले हे प्रशस्तिपत्र पुढे त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सिद्ध केले. सरदार पटेल व गोविंद वल्लभ पंत यांच्यानंतर समर्थपणे गृहखाते फक्त यशवंतरावांनीच सांभाळले. ते १४ नोव्हेंबर १९६६ ला गृहमंत्री झाले. गृहखाते सांभाळण्यापूर्वी म्हणजे ६ नोव्हेंबरला गोवध बंदीसंबंधी शासनाने आदेश जारी करावा म्हणून साधूंची निदर्शने झाली होती. त्यांनी आपल्या कारकीर्दीचा प्रारंभ गोवर्धन पीठाचे शंकराचार्य यांच्या अटकेच्या निर्णयाने केला. या धाडसी निर्णयामुळे ते अनेकजणांच्या टीकेचे लक्ष्य बनले. त्यांनी अनेक ठाम निर्णय घेतले. पंजाबच्या प्रश्नावर संत फत्तेसिंग यांनी आत्मदहनाची धमकी दिली. ते २७ डिसेंबर १९६६ ला अग्निकुंडात प्रवेश करणार होते, पण त्या अगोदर यशवंतरावजींनी २६ डिसेंबर रोजी लोकसभेचे सभापती सरदार हुकूमसिंग यांना संत फत्तेसिंगाकडे पाठवले. त्यांची शिष्टाई यशस्वी झाली. १९६७ ला पोलिसांचे बंड झाले. ८०० वर पोलिसांना अटक करावी लागली. पण त्यामुळे पोलिसांविषयी त्यांच्या मनात कुठलाही आकस निर्माण झाला नाही. याउलट त्यांनी पोलिसांच्या कल्याणकार्यासाठी ५० लाख रुपये मंजूर केले. नक्षलवादी चळवळ, बिगर काँग्रेसी राज्यातील कायदा व सुव्यवस्था, केंद्र राज्य संबंध, पंजाबचा चंदीगढवरील हक्क, विद्यार्थ्यांमधील वाढती बेशिस्त, जातीय दंगली, व आसाम आणि नागालँडमधील सीमाप्रश्न अतिशय कौशल्यपूर्ण रीतीने हाताळले. कुठलीही कटुता येऊ न देता असले किचकट प्रश्न सोडविणे किती अवघड असते, पण यशवंतराव या बाबतीत यशस्वी ठरले. म्हणूनच त्यांना " Man of the Crisis " असे म्हणतात. २३ जुलै १९६७ ला मद्रास येथून प्रकाशित होणाऱ्या ' हिंदू ' दैनिकात के. रंगास्वामी यांनी एक लेख प्रकाशित केला. ते आपल्या लेखात म्हणतात, " चव्हाण यांनी आपल्या कौशल्याने संसदेतील सर्व पक्षीय खासदारांवर छाप पाडली. वस्तुत: काँग्रेस पक्षाला अनेक चव्हाणांची गरज आहे. परंतु चव्हाणांच्या यशामुळे अनेकांच्या मनात त्यांच्याबद्दल द्वेषच निर्माण झाला आहे. चव्हाणांनी गृहमंत्रालयातील प्रश्न अतिशय कार्यक्षमतेने हाताळले." के. रंगास्वामींच्या या लेखाची आजही तीव्रतेने

आठवण येते. संरक्षण व गृहखात्यानंतर त्यांनी अर्थ, विदेश ही खाती सांभाळली. त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनी जी जी खाती सांभाळली त्यावर स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवला.

यशवंतरावजी एका व्याख्यानात म्हणाले होते, " १९४७ पूर्वीची लढाई स्वातंत्र्याची लढाई होती. आज आपणास मूल्ये व तत्त्वे जोपासण्यासाठी लढाई करावयाची आहे. संघर्ष करावयाचा आहे." आज सांसदीय लोकशाहीपुढे जी आव्हाने आहेत त्यांपैकीच्या आव्हानांचा तत्त्वाच्या व मूल्यांच्या लढाईचा उल्लेख यशवंतरावांनी केला आहे. राष्ट्रीय जीवनात जाणवणारा फुटीरपणा, सार्वजनिक जीवनातील चारित्र्यसंपन्नतेची उणीव यामुळे लोकशाही आतून पोखरली जात आहे. अशा वेळी यशवंतरावांची आम्हाला फार तीव्रतेने आठवण येते. सामान्य शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेऊन ते उपपंतप्रधानापर्यंत स्वकर्तृत्वाने पोहोचले. " मी यशवंतराव होणार " हे लहानपणी त्यांनी गुरुजींना दिलेले उत्तर सार्थ ठरविले. यशवंतरावांनी अनेक माणसे जोडली, उभी केली आणि त्यांच्यात चैतन्य निर्माण केले. अनेक नेते निर्माण करणारे यशवंतराव खऱ्या अर्थाने लोकनेता होते. ते मराठी मुलखातला कोहिनूर हिरा होते. असा महापुरुष युगातून एखादाच निर्माण होतो. त्यांच्या पवित्र स्मृतीला त्रिवार अभिवादन.

S

## २०

# युगान्त

प्रा. निवृत्ती देशमुख

आधुनिक भारताच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या नेत्यांमध्ये श्री. यशवंतराव चव्हाणांचा क्रम लागतो. स्वतंत्र भारताची उभारणी करण्यात त्यांची कामगिरी महत्त्वाची ठरते. १९५६ साली ते द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून राज्यकारभार सुरू केला. देशहित व लोककल्याण ही आपल्या कारभाराची प्रमुख उद्दिष्टे ठरवून त्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी केंद्रीय सत्ताधाऱ्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी झाले. १९६० साली मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्माण झाले त्याचे फार मोठे श्रेय यशवंतरावांना आहे. चव्हाण यांनी द्वैभाषिक राज्य चालविणे हे तेथील जनतेच्या हिताचे नाही, हे पंडित नेहरूंना पटवून दिले. श्री. चव्हाणांनी याबद्दल पूर्ण गुप्तता पाळली होती. त्यामुळे मोरारजी देसाई मात्र दुखावले गेले होते. पंडित नेहरूंनी हैदराबाद येथे या प्रश्नाची चर्चा केली होती, हे खरे होते. पण आपल्या मनाचा कल दाखविला नसल्यामुळे चव्हाण यांना ही चर्चा मनात ठेवण्यापलीकडे गत्यंतरच नव्हते. पंडित नेहरू, पंत व श्रीमती इंदिरा गांधी यांनी नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री चव्हाण यांच्याशी चर्चा करून द्वैभाषिक तोडण्याचा निर्णय घेतला. मोरारजी देसाई यांचा या

निर्णयास सक्त विरोध होता. श्रीमती इंदिरा गांधी या जरी काँग्रेसच्या अध्यक्ष असल्या तरी त्या एकट्या या प्रश्नासंबंधी निर्णय घेऊ शकत नव्हत्या. पंडित नेहरू व पंडित पंत यांचा विश्वास यशवंतराव चव्हाण यांनी संपादन केला. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश यशवंतरावजी आणू शकले. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी महाराष्ट्राची नवनिर्मिती करण्याचे कार्य सुरू केले. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात कालानुरूप बदल करणे व सतत कालाशी असलेले नाते न तोडता या क्षेत्रात नवमूल्यांचे रोपण करणे व ती वाढविण्याची दक्षता त्यांनी घेतली. महाराष्ट्राचा इतिहास अतिशय प्रभावशाली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासावर छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव आहे. छत्रपती हिंदुधर्माचे पुरस्कर्ते होते. "मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" ही त्यांची नीती होती. वरील नीतीला नव्या काळाला अनुरूप असे नवे अर्थ प्रदान करणे व त्यांचा सतत पाठपुरावा करण्याचे काम यशवंतरावांनीच केले. लोकशाही, समाजवाद व धर्मातीत राज्यपद्धती ही नव्या घटनेने स्वीकारलेली तत्त्वे अमलात आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्वतंत्र भारतात महाराष्ट्राचे वेगळे स्थान राहील याचा त्यांनी प्रयत्न केला, पण त्याचबरोबर महाराष्ट्र भारताचा एक घटक आहे व तो नव्या राष्ट्रीय विचारापासून दूर जाऊ नये यासाठी यांनी वैयक्तिक अवहेलना व अपमान सहन करूनसुद्धा शेवट-पर्यंत प्रयत्न केले. महाराष्ट्राचा इतिहास व वर्तमान काळातील कल्पनांचा संघर्ष टाळून भविष्याची वाटचाल यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. आर्थिक दारिद्र्यात खितपत असलेल्या सामान्य मानवासाठी नव्या आशा निर्माण केल्या. आर्थिक दारिद्र्य नष्ट करण्यासाठी सहकाराची स्वतंत्र चळवळ महाराष्ट्रात सुरू केली. त्यामुळे आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात आधुनिक काळाशी सुसंगत विचार रुजण्यास मदत झाली. म. फुले, राजर्षी शाहू छत्रपती आणि डॉ. आंबेडकर यांनी जे सामाजिक व आर्थिक बदलाचे कार्य केले होते ते पुढे नेण्याचे काम यशवंतरावांनी केले. देशाच्या उभारणीसाठी एकजूट आणि नवी प्रेरणा देणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागाच्या विकासाचा प्रयत्न सुरू केला. सर्वांसाठी शिक्षण मिळावे यासाठी आर्थिकदृष्ट्या मागासले-पणा हा निकस ठेवून सवलती करविल्या, शिक्षणापासून वंचित असलेल्या ग्रामीण जनतेला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. महाराष्ट्राच्या सर्वांगीण

विकासासाठी विविध प्रकारची कामे त्यांनी सुरू केली. त्यामुळे सर्वांना विकासाचा लाभ झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना यशवंतरावांनी अमलात आणलेले निर्णय महाराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याची नांदीच ठरले. मराठवाडा विद्यापीठाची स्थापना २३ ऑगस्ट १९५८ ला करण्यात आली, त्यामुळे मराठवाडयाच्या शैक्षणिक विकासाला मदत झाली. औरंगाबाद, कराड व नागपूर येथे इंजिनिअरिंग कॉलेजेस सुरू केली त्यामुळे भविष्यातील इंजिनिअर्सची गरज पूर्ण करण्यास मदत झाली. साताराला सैनिकी शाळा स्थापन केली.

राज्यात औद्योगिक विकासासाठी पंधरा औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या. उद्योगीकरणाला मदत करण्यासाठी आवश्यक ती बाह्य परिस्थिती निर्माण करण्यात आली. सहकाराला चालना दिल्यामुळे १९५७ पर्यंत महाराष्ट्रात १८ सहकारी साखर कारखाने तयार झाले व उद्योगीकरणाचे लोण व फायदे ग्रामीण भागात पोहोचले.

केवळ उद्योगीकरण उपयोगाचे नव्हते. ग्रामीण समस्या वेगळ्या होत्या. त्या लक्षात घेऊन सामाजिक व आर्थिक निर्णय यशवंतरावांनी घेतले. कसेल त्याची जमीन हा कायदा, भूमिहीनांना भूमी देण्याचे धोरण अंमलात आणले. देशात सर्वांत प्रथम कमाल जमीन धारण मर्यादा कायदा पास करून समतेच्या दिशेने पाऊल टाकले. शेतीच्या विकासासाठी पाणी पुरवठा आवश्यक आहे म्हणून १ मार्च १९५८ ला कोयना धरण, तसेच जलविद्युत प्रकल्प पूर्ण करण्यात आले. विदर्भाच्या विकासासाठी पारस औष्णिक केंद्र स्थापण्यात आले. मुंबईला दूधपुरवठा व्हावा यासाठी वरळी दुग्धशाळा स्थापन केली.

राजकीय क्षेत्रात जागृती निर्माण करणे व सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी श्री. वसंतराव नाइकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली व याबाबत १ मे १९६२ ला जिल्हा परिषदा व पंचायत समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला वेग आला. नवे ग्रामीण नेतृत्व निर्माण झाले. राजकारभार व्यवस्थितपणे चालवू शकणाऱ्या अनुभवी नेते प्रशासकांचा वर्ग निर्माण झाला.

कोकणच्या विकासासाठी कोकण रेल्वे मार्ग सुरू करण्यात आला. दिवा ते पनवेल मार्गाची सुरुवात पण करण्यात आली.

इतर अनेक महत्त्वाचे निर्णय ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना घेतले गेले.

त्यात उल्लेखनीय असे खालीलप्रमाणे आहेत.

खेळाच्या विकासासाठी त्यांनी मदत केली. १९५९ साली मुंबईत पहिली राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा त्यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आली. विकासा-साठीही त्यांनी प्रेरणा दिली. १९५८ साली महारवतन रद्द केले. तसेच महारांना मिळणाऱ्या सवलती नवबौद्धांनाही मिळतील असे त्यांनी मान्य केले. पददलितांना न्याय देण्यासाठीचाच हा निर्णय होता. महात्मा गांधींच्या खुनानंतर महाराष्ट्रात ब्राह्मणांची घरे, दुकाने, कारखाने नष्ट करण्यात आली होती. ती नव्याने निर्माण करण्यासाठी सरकारने कर्जे दिली होती. त्यांची परतफेड करणे अनेकांना अशक्य होते म्हणून यशवंतरावांनी जळीत-पीडितांची कर्जे माफ केल्याची घोषणा केली. या सर्व गोष्टींमधून यशवंतरावांचा उदार दृष्टिकोण व दूरदृष्टी याचा प्रत्यय येतो. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. देश अतिशय कठीण परिस्थितीत असताना यशवंतरावांना संरक्षणमंत्रिपदी नेमण्यात आले, आणि देशाच्या विविध समस्यांशी झुंजत राहण्याचे कार्य सुरू झाले. यशवंतराव दीर्घकाळपर्यंत ( १९६२ ते १९८० पर्यंत अडीच वर्षे वगळता ) केंद्रीय सत्तेत वित्त खात्याचे प्रमुख म्हणून काम पाहात होते. या काळात अवाढव्य देशाच्या अवाढव्य समस्यांशी गनिमी काव्याने लढण्याचे 'मराठा तंत्र' त्यांनी अवलंबिले. संरक्षण, अर्थ, परराष्ट्र व्यवहार व गृह खात्याचा कारभार त्यांनी समर्थपणे पाहिला. उपपंतप्रधानपदाची धुराही त्यांनी काही काळ सांभाळली. आधुनिक काळात दिल्लीवर प्रभावी सत्ता गाजवू शकणारा एकमेव महाराष्ट्रीय नेता असा त्यांचा उल्लेख करणे भाग आहे.

त्यात उल्लेखनीय असे खालीलप्रमाणे आहेत.

खेळाच्या विकासासाठी त्यांनी मदत केली. १९५९ साली मुंबईत पहिली राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा त्यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आली. विकासासाठीही त्यांनी प्रेरणा दिली. १९५८ साली महारवतन रद्द केले. तसेच महारांना मिळणाऱ्या सवलती नवबौद्धांनाही मिळतील असे त्यांनी मान्य केले. पददलितांना न्याय देण्यासाठीचाच हा निर्णय होता. महात्मा गांधींच्या खुनानंतर महाराष्ट्रात ब्राह्मणांची घरे, दुकाने, कारखाने नष्ट करण्यात आली होती. ती नव्याने निर्माण करण्यासाठी सरकारने कर्जे दिली होती. त्यांची परतफेड करणे अनेकांना अशक्य होते म्हणून यशवंतरावांनी जळीत-पीडितांची कर्जे माफ केल्याची घोषणा केली. या सर्व गोष्टींमधून यशवंतरावांचा उदार दृष्टिकोण व दूरदृष्टी याचा प्रत्यय येतो. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. देश अतिशय कठीण परिस्थितीत असताना यशवंतरावांना संरक्षणमंत्रिपदी नेमण्यात आले, आणि देशाच्या विविध समस्यांशी झुंजत राहण्याचे कार्य सुरू झाले. यशवंतराव दीर्घकाळपर्यंत ( १९६२ ते १९८० पर्यंत अडीच वर्षे वगळता ) केंद्रीय सत्तेत वित्त खात्याचे प्रमुख म्हणून काम पाहात होते. या काळात अवाढव्य देशाच्या अवाढव्य समस्यांशी गनिमी काव्याने लढण्याचे 'मराठा तंत्र' त्यांनी अवलंबिले. संरक्षण, अर्थ, परराष्ट्र व्यवहार व गृह खात्याचा कारभार त्यांनी समर्थपणे पाहिला. उपपंतप्रधानपदाची धुराही त्यांनी काही काळ सांभाळली. आधुनिक काळात दिल्लीवर प्रभावी सत्ता गाजवू शकणारा एकमेव महाराष्ट्रीय नेता असा त्यांचा उल्लेख करणे भाग आहे.

# यशवंतरावांचे काही मौलिक विचार

( १ ) इतिहासाने काही अडचणी निर्माण करून ठेवल्या असल्या तरी त्या आता आपण बाजूला सारल्या पाहिजेत. पूर्वी हिंदुस्थानचा जो इतिहास घडला त्याला तुम्ही आणि मी जबाबदार नाही. कारण तो इतिहास तुम्ही आणि मी, तुमच्या आणि माझ्या हाताने घडविला नाही.

भंगलेली मने जोडून जातीयवादाच्या या विषारी विचारापासून महाराष्ट्राला मुक्त करावे. ' मराठा ' या शब्दामागे महाराष्ट्राच्या एक-जिनसी जीवनाची भावना आहे. भंगलेले मन जर आपल्याला एक करावयाचे असेल तर दोन गोष्टींची आवश्यकता आहे.

( १ ) आपण एकमेकाकडे संशयाने पाहावयाचे नाही. संशय निर्माण करावयाचा नाही.

( २ ) गुणांची पूजा बांधावयाची.
राष्ट्रनिष्ठा आणि महाराष्ट्रनिष्ठा हातात हात घालून चालली पाहिजे.

( २ ) अमका पक्षवाला काय म्हणतो त्यापेक्षा या सगळ्या पक्षाच्या बाहेर म्हणून जी काही जनता आहे, जो बहुजन आहे, त्याचा काय अंदाज आहे, ते पाहून शहाण्या पक्षाने व शहाण्या राज्यकर्त्यांने आपले धोरण ठरवावे. राज्ये जी चालतात ती, राज्य चालविणाऱ्या माणसापेक्षा राज्य शक्तीच्या बाहेर जी माणसे असतात त्यांच्या पुण्याईने चालतात. ती माणसे ज्या परंपरा आणि ज्या शक्ती निर्माण करतात त्यांच्या साह्याने ती चालतात.

( ३ ) शहर व खेडे यांच्यातील अंतर कमी झाले पाहिजे. उत्पादनाचे नवे तंत्र व विज्ञान निर्माण करणारी साधने शेतकऱ्यांपर्यंत गेली पाहिजेत. सर्वंकष विकास झाला पाहिजे. शेतीचा प्रश्न हा रावणासारखा आहे. जेथे पाहावे तेथे त्याला तोंड आहे, आणि त्याच्या प्रत्येक तोंडाशी घास द्यावा लागतो इतका महत्त्वाचा हा प्रश्न आहे.

( ४ ) शिक्षित व्यक्ती स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची संगती लावते. आपल्या जीवनावर याचा काय परिणाम होतो, हे जाणून घेते. सामाजिक व आर्थिक परिस्थिती-मुळे खेड्यातील व शहरातील माणूस यांच्यात जे कृत्रिम अंतर आहे ते कमी झाले पाहिजे. आर्थिक रचनेत बदल व्हावा. छोटे छोटे उद्योगधंदे काढावेत. शिक्षण घेऊन तयार झालेला तरुण हा गावातील शेतीच्या विकासाचा, ग्रामीण जीवनाच्या विकासाच्या उपयोगी पडण्याइतका सकस नागरिक व्हावा. गुणवत्तेवर आधारलेले नेतृत्व निर्माण केले पाहिजे.

**यशवंतराव चव्हाण**
" सह्याद्रीचे वारे "

रसेल यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे. त्यात त्यांनी आपले जीवन तीन प्रकारच्या ( Passions ) भावनांनी नियंत्रित झाल्याचे म्हटले आहे. " त्यांचे मन प्रीतीने मोहित झाले होते, ज्ञानाने मोहित झाले होते आणि दुःखी मानवाबद्दलच्या करुणेने ते भरून गेले होते. " प्रेम मानवी स्वभाव धर्म आहे. ज्ञानाचा पाठलाग करून दुःखी मानवाबद्दल करुणा वाटली तरच मानव तत्त्वज्ञानी होऊ शकतो. दुःखी मानवासंबंधी करुणेने बुद्धाला प्रेरणा दिली आणि मानवतेला एक महापुरुष मिळाला. गरिबांच्या, पददलितांच्या घरात जन्म झाल्यामुळे होणाऱ्या अपमानाची, अन्यायाची पोटतिडीक पोटामध्ये जळू लागली आणि त्यातून डॉ. आंबेडकर निर्माण झाले. महापुरुषांना जन्म देणाऱ्या प्रेरणा या अशा आहेत. परंतु कोठल्याही प्रेरणेशिवाय राष्ट्र पुढे जात नसते.

समाज उतरंडीसारखा आहे. आम्ही सर्व एकमेकांच्या डोक्यावर बसलो आहोत; आणि वरचा जो खालच्याच्या डोक्यावर बसला आहे, तो नुसता बसलेला नाही तर तो त्याचा गळा धरून बसला आहे, त्याचे तोंड बंद करून बसला आहे. खालच्याला काहीच वाव नाही. ही उतरंड ज्या दिवशी आपण मोडू त्याच दिवशी खरी क्रांती होईल.

**यशवंतराव चव्हाण**
" युगान्तर "

सातारा जिल्ह्यामधल्या देवराष्ट्रे या खेड्यातील
मुलगा ! अशा अशिक्षित, गरीब नि खेडवळ
काही इयत्ता ओलांडण्याऐवजी कॉलेजमध्ये
झाला. हाच सामान्यत: व विशेषत: त्या
पण केवळ तेवढ्यावर समाधान न मानता
प्रतिसरकारच्या लढ्यात महत्त्वाची कामगिरी
स्वत:चे नाव गाजविले आणि पुढे मुंबई राज्य
आले. पण तेवढ्यावरही न थांबता प्रथम त्या
मग त्या राज्याचे एक मंत्री, नंतर द्वैभाषिका
त्यानंतर भारताचे संरक्षणमंत्री आणि त्यापाठोप
मोठ्या यशाच्या पायऱ्या यशवंतराव भराभर च
असामान्य कर्तबगारीच्या, लवचिक मुत्सद्देगिरी
यात तिळमात्र शंका नाही.

**साहित्यसम्राट आचार्य प्रल्हाद केशव अत्रे**